म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क. २४१५

चक्र प्रवर्तन प्रकाशन, कोल्हापूर.,

हे कुंभ अमृताचे



संपादक
रा. तु. भगत

REFBK-0020921

२-९२१
निबंध
२१२१८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JUL 1974
1 AUG 1976
7 DEC 1980
6 DEC 1981
3 JUN 1984

[कृ. मा. प.]

चक्र प्रवर्तन प्रकाशन, कोल्हापूर.,



हे कुंभ अमृताचे




REFBK-0020921

संपादक

रा. तु. भगत

* प्रथमावृत्ती :
१२ जून १९७५

○

* प्रकाशक :
श्री. बाबा पाटील
संचालक,
चक्र प्रवर्तन प्रकाशन
५३४ ई, व्यापारी पेठ, कोल्हापूर

○

* सर्व हक्क प्रकाशकाधीन :

○

* मुद्रक :
श्री. प्र. नि. महाबळ
गजानन प्रिंटिंग प्रेस,
मिरज.

○


* किंमत २० रुपये



स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाहीच्या काळात लोकजागृती
आणि लोकहित साधतानाही लोकांची अस्मिता
टिकविण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या आणि
राजकारणाच्या वेगवान प्रवाहातही
सत्प्रवृत्तींच्या संवर्धनासाठी
धडपडणाऱ्या सर्वांना –
आदरपूर्वक समर्पण.



– रा. तु. भगत



हृद्गत

थोर कुल परंपरेचा व वैभवाचा मळवट कपाळी नसताना, सर्व ज्ञान-विज्ञानाच्या शाखांची शिदोरीही जवळ नसताना व प्रतिकूल परिस्थितीचे डोंगर समोर उभे ठाकलेले असताना केवळ देशप्रीती, सेवा, त्याग आणि अविरत श्रम साधनेतून दक्षिण महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर जे थोर व्यक्तीत्त्व उदयास आले व ज्यांच्या कार्य-शलाकानी सारा महाराष्ट्र प्रकाशमान झाला ते म्हणजे मान्यवर दे. भ. रत्नाप्पा कुंभार होत. श्री. रत्नाप्पा कुंभार यांना सर्वजण पू. 'आण्णा' या नावाने ओळखतात. 'आण्णा' या नावातच आस्था, आदर आणि औदार्य या सद्गुणांचा संगम झालेला आहे. पूज्य आण्णांच्या ठिकाणी गोर-गरीबाविषयी कळवळा आहे; बहुजन समाजाच्या विकासाचा ध्यास आहे; देशाच्या सामाजिक दुःसह परिस्थितीची जाणीव आहे; धर्म, जात, वर्ण, वंश, भाषा व प्रदेश यांच्या भिंती नष्ट करून एकसंघ समाज निर्माण करण्याची ओढ आहे आणि स्वातंत्र्योत्तर भारताची सर्वांगीण शान वाढविण्यासाठी अखंड साधना आहे. अशा अखंड साधनेसाठी ज्यानी आपली उभी हयात खर्ची घातली, समाज-विकासाच्या उंबरठ्यावर ज्यांनी जागता पहारा दिला, विराट समाज-पुरुषाच्या डोळ्यात ज्यांनी देशभक्तीचे अंजन घातले व माणसातील माणुसकीची पूजा बांधली त्या पूज्य आण्णांच्या विचार-रत्नांना समाजापुढे ठेवावे व त्यास 'नव्वी जाग' आणावी याच

उद्देशाने मी 'हे कुंभ अमृताचे !' या ग्रंथाचे संपादन केले आहे. समुद्र-मंथनातून बाहेर काढलेले सर्व 'अमृत' देव-दैत्यांनीच पिऊन टाकले. परंतु आज जन-सागराचे मंथन करून पूज्य आण्णांनी जी विचार-रत्ने बाहेर काढली ती अमृताचे कुंभासारखीच आहेत. आणि म्हणून आज हे विचार-अमृताचे कुंभ आपल्या समोर ठेवताना मला अपार आनंद होत आहे.

समाज-विकासाचे सांगाती

स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थानच्या इतिहासाची पाने चाळीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते ती म्हणजे भारतीय जनमनात वास करणारी स्वातंत्र्य-प्राप्तीची आस. कोटयावधी कंठामधून, मनगटामधून आणि मनामधून ही आस ओसंडत होती. देशाच्या कानाकोपऱ्यातून क्रांतिकारकांची फळीच्या-फळी बाहेर पडत होती. महाराष्ट्राची भूमी ही तर "सच्या मरगठ्ठ्यांची" भूमी. त्यातल्या त्यात करवीर म्हणजे शककर्ते छत्रपति शिवाजी महाराजांच्या पद-स्पर्शाने पावन झालेली भूमी. नरवीरांची खाणच. या खाणीतूनच दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार, माधवराव बागल, मेथे मास्तर, भाऊ धर्माधिकारी, श्रीधर श्रेष्ठी, रा. तु. बगाडे, म. दु. श्रेष्ठी, लालजी उपाध्ये, डॉ. केळकर, स्वामी वारके, माधव पार्टे, दत्तोबा तांबट, बापूसाहेब पवार, रामभाऊ शेटये, दिनकरराव मुद्राळे, पी. बी. पाटील, जिनगौंडा पाटील, वसंतराव पाटील, शंकरराव पाटील, बी. एस. पाटील व बाळासाहेब बराले असे एक ना अनेक क्रांतिकारक ४२ च्या निशाणाखाली आले. स्वातंत्र्यप्रेमाने ओथंबलेल्या व देश-भक्तीने भारावलेल्या दे. भ. रत्नाप्पाणांच्या मार्गदर्शनावर वरील सर्वच क्रांतिकारकांची नितांत श्रद्धा होती. ४२ च्या लढ्यामधील करवीर क्रांतीचे 'तेजोवलय' म्हणून पूज्य आण्णांचे कर्तृत्व सर्वतो-मुखी होते. संस्थानी राजवट आणि इंग्रजी राजवट हया उभयतांच्या पकड-वारंटाचा 'जरीपटका' मस्तकी धारण करून आण्णा आपल्या कार्यकर्त्यांच्या सभा घेत, विचार विनिमय करत, नवे आराखडे आखत, पुढील धोरणे ठरवीत असत. स्वीकृत कार्याबद्दल प्रखर

ध्येयनिष्ठा, सहकाऱ्याविषयी नितान्त आदर आणि विश्वास, तसेच देशासाठी सर्वस्व-समर्पण-वृत्ती या त्रयीमधूनच 'चले जाव' चा लढा यशस्वी झाला व १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य सूर्य उगवला.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मिळालेल्या स्वराज्याचे 'सुराज्य' करावयाचे या पुरुषार्थाने आपण कामाला लागलो. सर्वत्र नवे वारे संचारले. नव्या आशा आकांक्षाची पालवी फुटू लागली. बलशाली भारतासंबंधी नवी स्वप्ने आपण रंगवू लागलो. धर्मनिरपेक्ष वातावरणात आपण वावरू लागलो. परंतु लोकशाही मार्गाने पुढे जात असताना कधी धर्म, कधी जात, कधी प्रदेश, कधी भाषा या विषयीच्या संघर्षाने तोंड वर काढले. त्यामुळे आपल्या राष्ट्रीय भावनेला तडे जाऊ लागले. त्यातच आपणाला परकीय आक्रमणालाही तोंड द्यावे लागले. हे सर्व घडत असताना सामान्यातल्या सामान्य माणसाकडे आपणा सर्वांचेच दुर्लक्ष झाले. त्यामुळे सामाजिक निष्ठा, सामाजिक ध्येयासक्ती, सामाजिक प्रेरणा, सामाजिक चारित्र्यसंपन्नता व सामाजिक स्वाभिमान या विषयीची तीव्रता कमी होऊ लागली. स्वाभाविकपणे अन्यायाबद्दल चीड, न्यायाबद्दल चाड व देशाबद्दल प्रेम संपुष्टात येऊ लागले. स्वार्थाच्या बाजारात लोकांची गर्दी वाढू लागली आणि समाजाला आधारभूत असलेल्या 'सामान्य माणसा' च्या दैन्यावस्थेला पारावार राहिला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील सामान्य माणसाची ही दयनीय स्थितीच पूज्य आण्णांच्या समाजकार्याची प्रेरणा ठरली. 'अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा।' या कुसुमाग्रजांच्या ओळीमधील आशेचा अंगार आण्णांच्या अंतरंगात फुलला. "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले" या तुकोबाच्या शब्दामधील आर्तता आण्णांच्या ठायी निर्माण झाली. आणि "जो जे वांछील तो ते लाहो" या ध्येयासक्तीने ते पुढे सरसावले. यासाठी पहिले पाऊल म्हणून इचलकरंजीच्या माळावर 'श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्या' ची स्थापना केली. गोरगरीबांच्या झोपडीपर्यंत 'पंचगंगे' च्या "मदतीचा हात" पोहोचला.

सामान्य माणसाचे जीवन उन्नत करण्यासाठी, निरलस व निःपक्षपाती वृत्तीने एक नवा जनहिताचा यज्ञच आरंभिला. निष्काम कर्म भावनेने समाजमांगल्याचे मळे निर्माण करण्याचे नवे कार्य सुरू झाले. या कार्यासाठी पूज्य आण्णांनी प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न व निःस्वार्थी कार्यकर्त्यांचे एक मोहोळच निर्माण केले. आज शिरोळ तालुक्याच्या झोपडी झोपडीपर्यंत 'श्रमातून संपन्नतेकडे' जाण्याचा नव्या काळातला नवा मार्ग आण्णांनी आखून दिलेला आहे. खरे पहाता जिकडे आण्णांची पाऊले वळतात तिकडे आनंद झेपावतो. आशा-आकांक्षाचा नवा अकुंर फुटतो. मानवतेच्या मार्गावर मंगल-भावनांची क्षितिजे निर्माण होतात. ही मंगल-भावना अखंडपणे टिकावी यासाठी आण्णा स्वतःला श्रम-साधनेत झोकून देतात. मग भले त्यात 'कुर्बान' होण्याची वेळ आली तरी चालेल. समाज-जीवन फुलविण्याचे कार्य करीत असताना आण्णांना कधी भीरूतेचा स्पर्शच झाला नाही. "This man knew no fear." हे पं. नेहरूंच्याविषयी जे म्हटले जाते ते पूज्य आण्णांच्या बाबतीतही खरे आहे. निर्भय वृत्तीने, समाज-विकासासाठी 'सतीचे वाण' पत्करून आण्णा पुढे चाललेले आहेत. अशावेळी आण्णांनी कधी 'सत्ते' ची आराधना केली नाही. 'सत्ते' च्या प्राप्तीसाठी कधी धावपळ केली नाही. जनता ही एक प्रचंड शक्ती आहे. त्या शक्तीच्या विकासार्थ त्यानी जीवन वेचले. जनता-जनार्दनाच्या सेवेतच ते रममाण झालेत. जनसेवा करीत असताना ते जे बोलतात ते करून दाखवितात. जनहितासाठी ते जे करतात ते कधी बोलून दाखवित नाहीत. वस्तुतः जे दुःखाच्या ओझ्याने वाकलेले आहेत, उदास आहेत, खिन्न आहेत व जखमी आहेत त्या हीन-दिन-दलित जनांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. जन-सामान्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे व त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे यातच पूज्य आण्णांच्या समाज कार्याचे खरे रहस्य सामावलेले आहे.

ग्रामीण समाज हा 'अठरापगड' जातीचा समाज होय. अज्ञान, अंधश्रद्धा आणि अविवेक हे ग्रामीण समाजाचे खरे रोग होत. पूज्य

आण्णांनी ग्रामीण समाज जवळून पाहिला, अनुभवला आणि ओळखला. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या सर्व रोगांचे निदान करून बदलत्या काळाप्रमाणे त्यावर उपाय योजना शोधून तिची अंमलबजावणी करण्यामध्ये ते दंग होऊन गेलेले आहेत. समाज-जीवनात स्वास्थ्य व शांतता निर्माण व्हावी, समाजाचे जीवन ज्ञान व विवेक यानी उजळून निघावे आणि ग्रामीण जीवनाच्या विकासाची सर्व द्वारे खुली व्हावीत याचसाठी हा 'वेडा कुंभार' अहोरात्र परिश्रम घेत आहे. आणि म्हणूनच समाज-विकासाच्या भावनेने नटलेल्या पूज्य आण्णांच्या व्यक्तिमत्त्वात श्रम, सेवा आणि त्याग यांचा सुंदर समन्वय आढळून येतो. त्यांच्या समाज विषयक विचारांना अनुभूतीचे अधिष्ठान लाभल्यामुळे त्यातील 'वस्तुनिष्ठ' तेची झाक विलोभनीय वाटते. समाज-विकासाचे मर्म सांगत असताना आण्णांनी आपल्या भाषणात स्पष्ट म्हटले आहे की, "समाजातील सुप्त शक्तीना जागृत करून त्यांना सुसंधी प्राप्त करून दिली पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला "हा माझा देश आहे" असे वाटण्यासाठी त्याच्या श्रमातून त्याचे जीवनमान उन्नत व्हाययास पाहिजे. गावच्या श्रमाने गाव मोठा झाला पाहिजे. यासाठी सर्वच कार्यकर्त्यांनी एका ठिकाणी येऊन गावच्या समस्यांचे व त्यावरील उपायांचे आकलन करून घेतले पाहिजे. हे सर्व विधायक कार्य करीत असताना लोकातील जागृतीची दखल घेऊन समाजातील दुर्बल घटकाना विकासाच्या एका विशिष्ट पातळीवर आणणे हेच 'गरीबी हटाव' या घोषणेमागील खरे मर्म आहे."

सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ

आज आपण लोकशाही ही एक जीवननिष्ठा मानून पुढे जात आहोत. या लोकशाहीचे हात जर बळकट करावयाचे असतील तर सहकारी संघटनाच्या द्वारे सामाजिक न्याय कसा देता येईल, हे पाहणे आज आवश्यक होऊन बसलेले आहे. सामाजिक न्याय द्यावयाचा म्हणजे व्यक्तीच्या उपक्रमशीलतेसाठी योग्य ती संधी उपलब्ध करून द्यावयाची. अशी संधी जर उपलब्ध करून देता आली नाही तर आपल्या विकास-कार्यात फार मोठा धोका निर्माण होण्याची संभव-

नीयता आहे. या संबंधी बर्ट्रांड रसेलनेही आपणास इशारा दिला आहे. "The lack of opportunity for personal initiative is one of the great danger of the modern world." यासाठी विकास कार्यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या शक्तीचा, कौशल्याचा व ज्ञानाचा वाटा असलाच पाहिजे. कारण यातूनच समूहाचे सुख निर्माण होणार आहे. केवळ सहकार्याच्या भावनेने एकत्र आलेल्या व्यक्ती-समूहातूनच समूहाचे कल्याण होणार आहे. यासंबंधी महात्मा गांधीनी फार सुंदर उदाहरण दिलेले आहे. ते म्हणतात की– 'अलग अलग पडलेले पाण्याचे बिंदु बाष्पीभूत झाले. सहकाराने एकत्र झालेल्या बिंदूंनी महासागर निर्माण केला." आणि म्हणूनच 'प्रत्येकाने स्वतःपुरते पहावे' या ऐवजी आज 'एकाकरिता सर्व आणि सर्वांसाठी एक' अशी सहकाराची भावना जनमनात रुजविणे आवश्यक होऊन बसलेले आहे. यासाठी समाजातील वंचित व दुर्बल घटकाना सहकार क्षेत्रात फार मोठे स्थान देऊ करणे अपरिहार्य होऊन बसले आहे असे वाटते. कारण सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचाविणे हे सहकाराचे एक उद्दिष्ट आहे. मानवी जीवनातील सर्वच समस्यांचे आकलन करून घेऊन त्या समस्यांचे निराकरण करून सर्व मानव जातीची उन्नति साधण्याचा एक सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणून सहकाराचा अवलंब लाभदायक ठरत आहे.

खरे पाहता शेतकऱ्याला सावकाराच्या कठोर जाचातून मोकळे करावे आणि शेती उत्पादन वाढीसाठी त्यास आर्थिक मदत करावी या एका व्यापक उद्देशाने सहकारी चळवळीचा जन्म झाला. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेऊन पूज्य आण्णांनी विधायक कार्याचे एक नवे पर्व कोल्हापूर जिल्ह्यात निर्माण केले. याचे पहिले उदाहरण म्हणजे शेतकऱ्याला आर्थिक दृष्टीने समाधान मिळवून देणारा, सहकारी तत्त्वावर चालणारा 'श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना' होय. ज्याला एक एकर जमीन आहे असा बहुसंख्य शेतकरीच या कारखान्याचा आधार-स्तंभ होऊन राहिलेला आहे विधायक कार्याला उजाळा देणारी दुसरी सहकारी

संस्था म्हणजे ' कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी ' होय. सामान्य शेतकऱ्याबरोबरच शहराकडे धाव घेणाऱ्या कामगारांची संख्या कमी करून खेडी सुधारणे हा उद्देश उरी बाळगूनच ही दोन सहकार–केंद्रे (ज्यांना संस्कार केंद्रेही म्हणता येईल) उभारली गेली आहेत. या सहकारी संस्थामधून निर्माण होणाऱ्या नफ्याचा वाटा सर्व थरातील जनतेला मिळावा म्हणून ' पंचगंगे ' च्या परिसरातील शंभर गावांच्या उन्नतिसाठी एक ' पंच-वार्षिक योजना'ही कार्यान्वित केली गेली आहे. ' सहकारातून समाजसुधारणा'- हा दृष्टिकोण प्रत्येक ठिकाणी कटाक्षाने पाळलेला आहे. आणि यामुळेच यड्राव, जांभळी, कोथळी, रुई, चंदूर, हुपरी, तिळवणी, साजणी, कोरोची व सिरदवाड इत्यादी गावाचा चेहरा-मोहरा बदलून गेलेला आहे. त्यामुळे 'विना सहकार नहि उद्धार' ही भावना खेडेगावातील झोपडीपर्यंत जाऊन पोहचली. झोपडीतील 'मनुष्या' चे कल्याण हेच सहकाराचे खरे ध्येय होऊन बसलेले आहे. हा विचार पटवून देत असताना पूज्य आण्णा नेहमी एक मनोरंजक उदाहरण सांगत असतात. ते असे "रावणाने सीतेला पळवून नेले व तिला अशोक वनात ठेवले. रामाच्या आज्ञेनुसार सीतामाईची भेट घेण्यासाठी हनुमान अशोक वनात हजर झाले. सीतामाईने हनुमानाला बक्षीस म्हणून मोत्याची माळ दिली. हनुमान त्या माळेतील प्रत्येक मणी फोडून बघू लागलां. तेव्हा सीतामाईने माळेतील मणी फोड-ण्याचे कारण विचारले. त्याबरोबर हनुमान म्हणाले की, ' या माळेतील मण्यामध्ये 'राम' आहे किंवा नाही हे मी पहात होतो. याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्याला सहकारी कार्यात 'गरीब माणूस' दिसला पाहिजे. खरे पाहता गरीब माणसाचे कल्याण हेच सहकाराचे अंतिम ध्येय होय. "

पूज्य आण्णांचे सहकार विषयक विचार ग्रंथनिष्ठ नाहीत. ' आधी केले मग सांगितले ' या न्यायानेच त्यानी सहकार क्षेत्रात कार्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या सहकार विषयक विचाराना अनु-भवाचे तेज आहे. महाराष्ट्रात आज जेथे जेथे सहकाराचे वृक्ष फोफा-

वले आहेत, तेथे तेथे आण्णांच्या विचारांचे खत-पाणी लाभले आहे. आज सहकार क्षेत्रामध्ये आण्णा एक ' व्यक्ती ' म्हणून नव्हे तर एक ' विचार ' म्हणूनच निःसंशय श्रेष्ठ आहेत. आपणा सर्वांच्या जीवन विकासाचा एक राजमार्ग या दृष्टीने सहकाराचे महत्त्व किती मोठे आहे याचे आण्णांनी खालीलप्रमाणे सूत्रबद्ध शब्दामध्ये कथन केले आहे. " माणसाचे माणसाजवळ येणे हे प्रगतीचे द्योतक आहे. माणसामाणासातील सद्भाव, सद्भिरुचि व शुचिता यांचे शिखर जसे उंचावते तशी माणसे परस्पराशी एकजीव होतात. माणसा-माणसांच्या या एकजीव होण्याच्या प्रक्रियेलाच मी सहकार समजतो. असा सहकार जेथे नांदत असतो तेथे गरीबांची गरीबी व श्रीमंताची श्रीमंती कमी कमी होत एका समान भूमिकेवर येऊन ठेपते. येथेच सहकाराने सगळे जीवन उजळून निघते. संपूर्ण विकासमार्गाकडे सगळ्याची पाऊले पडत असतात. माणसामाणसामधील ' सहकार ' हाच येथे ' देव ' बनतो. मग येथे माणसा-माणसातल्या वैर भावनेला वाव उरत नाही. द्वेषाला थारा मिळत नाही. अहंकार वाढत नाही आणि भ्रष्टाचाराला सहाय्य लाभत नाही. अशा ठिकाणी सगळेच सहकार पंढरीचे वारकरी. शुचिता आणि सद्भाव हेच त्यांचे टाळ - मृदंग, " एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ " हाच त्यांचा अभंग. " सहकार क्षेत्रातील सर्वच कार्यकर्त्यांना आण्णांची ही वस्तुनिष्ठ ' अभंगवाणी ' दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरणारी अशीच आहे.

समाज-शिक्षणाचे कैवारी

स्वातंत्र्यपूर्व शिक्षणाच्या इतिहासाकडे नजर वळविल्यास असे आढळून येते की भारतीय आचार-विचार, धर्म-परंपरा व नीति संस्कृती यांना शिक्षणामध्ये फारसे स्थान नव्हतेच. इंग्रजी भाषा म्हणजे ' वाघिणीचे दूध ' असे समजून या दुधावर पोसला जाणारा समाज निर्माण करण्याकडे अधिक लक्ष दिले जात असे. स्वाभाविकपणे समाजाच्या वरच्या थरातील लोकाना हे ' दूध ' मिळत असे. परंतु समाजातील खालच्या थरातील लोकाना ' सामान्य ज्ञान ' मिळणेही

दुरापास्त झालेले होते. लॉर्ड मेकॉले यानी समाजाच्या वरच्या थरातून खालच्या थरापर्यंत झिरपणारी शिक्षणपद्धती सुरू करून समाजातील मूठभर लोकानाच सज्ञान केले आणि बहुजन समाज अज्ञानांधकारातच पिचत राहिला. असा हा बहुजन समाज सर्वांगानी व सर्वार्थानी नाडला गेला. या गोष्टीचे मोठे हृद्य वर्णन सद्गुरू गाडगे महाराजानी-देखील केले आहे. "ज्ञानोबा तुकोबाची पताका खांद्यावर घेऊन मी नाच-नाच नाचलो. पण झाले काय ? जनता नुसत्या वाऱ्याच करीत बसली. आषाढी, कार्तिकी, चैत्रीला पंढरीला जावे. आणि हरि-नामाचा गजर करावा. यापलिकडे तिला कांही सूचेना, तिची उंची वाढेना. तेव्हा मी अंतर्मुख झालो आणि विचार करू लागलो. तेव्हा मला विठोवारायाने साथ दिली. बाबा, हचा जनता जनार्दनास ज्ञानाची तहान लागली आहे. ज्ञानाच्या पाणपोया उघडल्या पाहिजेत, सद्धर्माची सदावर्ते घातली पाहिजेत आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या पोटाचा प्रश्न सोडविला पाहिजे. तो कसा सुटणार ? सुटेल. शिक्षणाची गुरुकिल्ली त्यांच्या हाताला लागली की सारे प्रश्न आपो-आपच सुटतील. देवाचे आणि धर्माचे भय दाखवून राजरोसपणे लुटणाऱ्या धर्मगुरूंची सारी कुलंगडी त्यांना कळतील. फाल्गुन आणि शिमगा, चैत्र आणि पाडवा असे दोनाचे चार महिने करून व्याजापायी काळजाचा तुकडा अशी जमीन घशाखाली घालणाऱ्या सावकाराच्या काळचा कारवाया त्याला समजतील आणि कायद्याचा बडगा दाखवून गरीबाला अधिकच गरीब करणाऱ्या सरकारची बेकायदेशीरपणे चाललेली लूटमारही त्याला उमगेल."

सद्गुरु गाडगे महाराजांच्या वरील शब्दामध्ये शिक्षणाभावी समाज कसा नाडला गेला याचे मार्मिक चित्रण आहे. खरे पाहता शिक्षण हे संजीवनी खरे. परंतु शिक्षण आणि समाज यांची गाठ-भेट तर पडली पाहिजे. आणि अशी गाठ-भेट जर पडली नाही तर समाजाचे खरे जीवन शिल्लक राहते कुठे ? काही शिल्लक राहिलेच तर ते केवळ 'अनर्थ' राहतील. अविद्येने किती अनर्थ होतात हे महात्मा फुलेनी चांगल्या सूत्रबद्ध शब्दामध्ये सांगितले आहे– "विद्ये-

वळे आहेत, तेथे तेथे आण्णांच्या विचारांचे खत-पाणी लाभले आहे. आज सहकार क्षेत्रामध्ये आण्णा एक 'व्यक्ती' म्हणून नव्हे तर एक 'विचार' म्हणूनच निःसंशय श्रेष्ठ आहेत. आपणा सर्वांच्या जीवन विकासाचा एक राजमार्ग या दृष्टीने सहकाराचे महत्त्व किती मोठे आहे याचे आण्णांनी खालीलप्रमाणे सूत्रबद्ध शब्दामध्ये कथन केले आहे. "माणसाचे माणसाजवळ येणे हे प्रगतीचे द्योतक आहे. माणसामाणासातील सद्भाव, सद्भिरुचि व शुचिता यांचे शिखर जसे उंचावते तशी माणसे परस्पराशी एकजीव होतात. माणसा-माणसांच्या या एकजीव होण्याच्या प्रक्रियेलाच मी सहकार समजतो. असा सहकार जेथे नांदत असतो तेथे गरीबांची गरीबी व श्रीमंताची श्रीमंती कमी कमी होत एका समान भूमिकेवर येऊन ठेपते. येथेच सहकाराने सगळे जीवन उजळून निघते. संपूर्ण विकासमार्गाकडे सगळ्याची पाऊले पडत असतात. माणसामाणसामधील 'सहकार' हाच येथे 'देव' बनतो. मग येथे माणसा-माणसातल्या वैर भावनेला वाव उरत नाही. द्वेषाला थारा मिळत नाही. अहंकार वाढत नाही आणि भ्रष्टाचाराला सहाय्य लाभत नाही. अशा ठिकाणी सगळेच सहकार पंढरीचे वारकरी. शुचिता आणि सद्भाव हेच त्यांचे टाळ - मृदंग, " एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ " हाच त्यांचा अभंग. " सहकार क्षेत्रातील सर्वच कार्यकर्त्यांना आण्णांची ही वस्तुनिष्ठ 'अभंगवाणी' दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरणारी अशीच आहे.

समाज-शिक्षणाचे कैवारी

स्वातंत्र्यपूर्व शिक्षणाच्या इतिहासाकडे नजर वळविल्यास असे आढळून येते की भारतीय आचार-विचार, धर्म-परंपरा व नीति संस्कृती यांना शिक्षणामध्ये फारसे स्थान नव्हतेच. इंग्रजी भाषा म्हणजे 'वाघिणीचे दूध' असे समजून या दुधावर पोसला जाणारा समाज निर्माण करण्याकडे अधिक लक्ष दिले जात असे. स्वाभाविकपणे समाजाच्या वरच्या थरातील लोकाना हे 'दूध' मिळत असे. परंतु समाजातील खालच्या थरातील लोकाना 'सामान्य ज्ञान' मिळणेही

दुरापास्त झालेले होते. लॉर्ड मेकॉले यानी समाजाच्या वरच्या थरातून खालच्या थरापर्यंत झिरपणारी शिक्षणपद्धती सुरू करून समाजातील मूठभर लोकानाच सज्ञान केले आणि बहुजन समाज अज्ञानांधकारातच पिचत राहिला. असा हा बहुजन समाज सर्वांगानी व सर्वार्थानी नाडला गेला. या गोष्टीचे मोठे हृद्य वर्णन सद्गुरू गाडगे महाराजानी-देखील केले आहे. "ज्ञानोबा तुकोबाची पताका खांद्यावर घेऊन मी नाच-नाच नाचलो. पण झाले काय ? जनता नुसत्या वाऱ्याच करीत बसली. आषाढी, कार्तिकी, चैत्रीला पंढरीला जावे. आणि हरि-नामाचा गजर करावा. यापलिकडे तिला कांही सूचेना, तिची उंची वाढेना. तेव्हा मी अंतर्मुख झालो आणि विचार करू लागलो. तेव्हा मला विठोवारायाने साथ दिली. बाबा, हचा जनता जनार्दनास ज्ञानाची तहान लागली आहे. ज्ञानाच्या पाणपोया उघडल्या पाहिजेत, सद्धर्माची सदावर्ते घातली पाहिजेत आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या पोटाचा प्रश्न सोडविला पाहिजे. तो कसा सुटणार ? सुटेल. शिक्षणाची गुरुकिल्ली त्यांच्या हाताला लागली की सारे प्रश्न आपो-आपच सुटतील. देवाचे आणि धर्माचे भय दाखवून राजरोसपणे लुटणाऱ्या धर्मगुरूंची सारी कुलंगडी त्यांना कळतील. फाल्गुन आणि शिमगा, चैत्र आणि पाडवा असे दोनाचे चार महिने करून व्याजापायी काळजाचा तुकडा अशी जमीन घशाखाली घालणाऱ्या सावकाराच्या काळचा कारवाया त्याला समजतील आणि कायद्याचा बडगा दाखवून गरीबाला अधिकच गरीब करणाऱ्या सरकारची बेकायदेशीरपणे चाललेली लूटमारही त्याला उमगेल."

सद्गुरु गाडगे महाराजांच्या वरील शब्दामध्ये शिक्षणाभावी समाज कसा नाडला गेला याचे मार्मिक चित्रण आहे. खरे पाहता शिक्षण हे संजीवनी खरे. परंतु शिक्षण आणि समाज यांची गाठ-भेट तर पडली पाहिजे. आणि अशी गाठ-भेट जर पडली नाही तर समाजाचे खरे जीवन शिल्लक राहते कुठे ? काही शिल्लक राहिलेच तर ते केवळ 'अनर्थ' राहतील. अविद्येने किती अनर्थ होतात हे महात्मा फुलेनी चांगल्या सूत्रबद्ध शब्दामध्ये सांगितले आहे– "विद्ये-

विना मति गेली; मतीविना नीती गेली; नीतीविना गती गेली; गतीविना वित्त गेले; वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले." हे सर्वच अनर्थ टाळण्यासाठी 'भाव, भाषा आणि जीवन ह्यांचा मेळ' ज्यात नीट घातलेला आहे, अशा शिक्षणाचा आग्रह गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी धरला. "आमचे शिक्षण पूर्णतया विदेशी आहे. राष्ट्रीय शिक्षणावाचून सर्व काही व्यर्थ आहे." असे महात्मा गांधीजीनी सर्वांच्या मनी बिंबविले. महात्मा गांधीजींच्या या राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेतूनच आम्ही १५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्य सूर्याच्या प्रकाशाकडे वाटचाल करीत राहिलो.

एक घटना व एक छत्र असा स्वातंत्र्यानंतरचा आपला हिंदुस्थान तयार झाला. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातदेखील जातीयवाद, प्रांतवाद व भाषावाद यामुळे आपली राष्ट्रीय भावना क्षीण होत चालल्याचे दिसू लागले आहे. शिक्षणातून राष्ट्रीय भावना बळावत गेली पाहिजे व राष्ट्रीय ऐक्याच्या धाग्याने सर्वांची मने बांधली पाहिजेत, असा शिक्षणाच्या ध्येयाविषयीचा दृष्टिकोन पूज्य आण्णांनी व्यक्त केला आहे– "लोकशाही राज्य व्यवस्थेत समाज बांधणीचे काम समर्थपणे करावयाचे असेल तर 'माणूस' सुशिक्षित व सुसंस्कृत बनला पाहिजे. प्रत्येक माणसाला वाचता आले पाहिजे. वाचलेले समजले पाहिजे आणि समजलेले कृतीत आणता आले पाहिजे. प्रत्येक खेडेगांवातील अज्ञानाचे माळ फोडून तेथे ज्ञानाचे नंदनवन निर्माण केले पाहिजे. राष्ट्रीय ऐक्याच्या बलवत्तर धाग्याने सर्वांची मने बांधली पाहिजेत. तरच आपण स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी देशाच्या विकासाचे जे मनोरथ बाळगले होते ते सिद्धीस जातील." पूज्य आण्णा हे केवळ 'वाचावीर' नाहीत. ते पहिल्या दर्जाचे 'कर्मवीर' आहेत. प्रथम कृती मग उक्ती हा त्यांचा बाणा आहे. 'बोले तैसा चाले' हा त्यांचा स्थायीभाव आहे. आणि याच स्थायीभावातून श्री पंचगंगेच्या परिसरातील शंभर गावाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व समाजिक विकासाचे कार्य त्यांनी आरंभिले आहे. 'आधी पाया मग कळस' या न्यायाने बालवाडी-पासून उच्च शिक्षणापर्यंतची सर्व द्वारे बहुजन समाजाला त्यानी खुली

केली. समाजाची अत्यंत निकडीची गरज म्हणून, कोल्हापूर येथे कॉमर्स कॉलेज, लॉ कॉलेज व नाईट कॉलेज सुरू करून महाराष्ट्रातील शिक्षण परंपरेमध्ये एक अभिनव आदर्श निर्माण केला.

शिक्षणातून एक 'समर्थ पुरुष' निर्माण व्हावा हा आण्णांचा ध्यास आहे. लोकशाही राज्यासाठी ज्या प्रकारचा 'माणूस' आपणास हवा आहे त्याची जडण घडण बालवाडीपासून झाली पाहिजे अशी आण्णांची दृढ समजूत आहे. 'माणुसकी' असलेला 'माणूस' शिक्षणातून निर्माण व्हावा या गोष्टीवर त्यांचा दृढ विश्वास आहे. आणि म्हणूनच "माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे" हे त्यांच्या अनेक भाषणांतील ध्रुपद आहे. अशी 'माणुसकी' निर्माण करण्याची प्रक्रियादेखील अत्यंत निकोपपणाची व स्वाभाविक असली पाहिजे असे त्यांचे मत आहे. आणि म्हणूनच 'माणुसकी' असलेला 'माणूस' राष्ट्रहिताची समर्थपणे जोपासना करेल अशी पूज्य आण्णांची दृढ श्रद्धा आहे.

अर्थव्यवस्थेचे मर्मज्ञ

आपला देश कृषिप्रधान देश म्हणुन प्रसिद्ध आहे. आपल्या देशातील सर्व उद्योगधंद्याचा प्रमुख आधार शेती हाच आहे. शेतीमधून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाच्या सुबत्तेवरच अनेक उद्योग-धंद्याचे भवितव्य अवलंबून आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाही. आणि म्हणूनच स्वतंत्र भारताच्या विकासासाठी जेव्हा पंचवार्षिक योजनांची आखणी झाली तेव्हा शेतीला अग्रक्रमाचे स्थान देण्यात आले. पहिल्या योजनेत आपण अनेक धरणाचे प्रकल्प पूर्ण केले. हेतू हा की ह्या धरणामुळे आपली शेती 'सुजलाम् सुफलाम्' व्हावी. आपली दूसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली आणि बेकारीचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे शेती विकासाला दुय्यम स्थान मिळाले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आपण शेती व उद्योग-विकासाची सांगड घातली. त्या पुढील योजनादेखील शेतीला प्राधान्य देण्याचे योजूनच पार पाडल्या गेल्या. परंतु तोंडांची संख्या

वाढली आणि अन्न-धान्य कमी पडू लागले. आणि म्हणूनच पंच-वार्षिक योजनांच्या उत्क्रांतीचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा असे वाटते की आपले कोठे चुकले आहे ?

पूज्य आण्णांनी आर्थिक नियोजनाचा लाभ सामान्य माणसापर्यंत व्हावा यासाठी कृषिकेंद्रित अर्थ व्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. या संबंधीची आपली ठाम भूमिका त्यानी खालील शब्दात व्यक्त केली आहे.– " मी जरी अर्थशास्त्रज्ञ नसलो तरी आज आपणास आत्म-विश्वासाने असे सांगू इच्छितो की, ग्रामीण अर्थ व्यवस्थेत कृषि-उद्योगधंद्याचे जाळे विकेन्द्रित अर्थव्यवस्थेच्या धर्तीवर विणल्याशिवाय भारताची समृद्धि होणार नाही. ग्रामीण अर्थ-व्यवस्था पायाभूत मानल्याशिवाय कोणताही 'इझम्' यशस्वी होणार नाही; अशी माझी ठाम समजूत आहे. आणि म्हणूनच आपला देश आर्थिक दृष्टया समर्थ करावयाचा असेल तर देशाचा जो प्रमुख धंदा असेल तो मजबूत करण्याची गरज आहे." यासाठीच आण्णांनी शती-विकासाच्या आड येणाऱ्या अनेक अडचणींचा समर्पकपणे उहापोह केला आहे.

आपल्या समाजामध्ये जी निरनिराळी बलस्थाने आहेत त्यामध्ये पैसा हे एक सर्वात मोठे बलस्थान आहे. पैसा ही समाजपरिवर्तन घडवून आणणारी एक मोठी शक्ती आहे. सामान्य माणसाला या शक्तीचा फायदा होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पूज्य आण्णांनी आर्थिक विकासाची तीन मर्म स्थाने सांगितली आहेत.

१) कोणत्याही आर्थिक विकासाच्या केंद्रासाठी सर्वप्रथम समाजातून मोठ्या प्रमाणामध्ये ठेवी जमा झाल्या पाहिजेत. त्यामुळे पैसा उपलब्ध होऊन विकास कार्याला उपभोग घेता येतो.

२) देशातील मालाच्या किंमतीची पातळी योग्य रीतीने राखणे आणि ती स्थिर करणे हे आर्थिक प्रगतीच्या क्षेत्रातील फार मोठे गमक आहे.

३) ध्येयबद्धरीतीने आणि मानवी मूल्याना अनुसरून समाजाचे परिवर्तन ज्यावेळी प्रखरपणे घडविण्याचा प्रयत्न होतो, त्यावेळी

प्रस्थापित पद्धतीमध्ये झपाटचाने बदल होतो. काही वेळेला प्रस्थापित पद्धती आणि नव्याा निर्माण होणाऱ्या पद्धती यामध्ये संघर्ष निर्माण होतो. असा संघर्ष वेळीच शहाणपणाने टाळणे आवश्यक असते.

आर्थिक विकासाची वाटचाल करीत असताना वरील तीन मर्मस्थाने डोळयासमोर ठेवणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लोकाचे राज्य निर्माण झाल्यामुळे लोकाच्या पैशाचा विनियोग लोक कल्याणासाठीच केला पाहिजे हा विचार चांगलाच मूळ धरू लागला आहे. आणि म्हणूनच आर्थिक प्रश्नांची उकल करीत असताना सामान्य 'माणूस' सतत डोळ्यासमोर ठेवला पाहिजे हा पूज्य आण्णांचा विचार महत्त्वाचा वाटतो.

आतापर्यंत पूज्य आण्णांच्या समाज, सहकार, शिक्षण व अर्थ विषयक विचारांचा आढावा घेतला. तथापि " हे कुंभ अमृताचे " या ग्रंथात ठिकठिकाणी धर्म, नीति, संस्कृति, कृषि, ग्रामोद्योग, सीमावाद क्रांति, वृत्तपत्र आणि उद्योग या विषयी देखील आण्णांच्या स्वतंत्र व समर्थ विचार धारणेचा आढळ होतो. या सर्व भाषणामध्ये आण्णांच्या ठिकाणी असलेल्या निष्काम, निष्कपट व निर्भय हृदयाचा बलवत्तर धागा दिसून येतो. संयम, सहनशीलता, समतोल आणि सहजता हे त्यांच्या विचार-धनाचे खास वैशिष्टच म्हणता येईल. 'समाज-मंगल भावना' हेच त्यांचे वैचारिक प्रतिष्ठान होय. त्यांच्या लोकशाही निष्ठेमध्ये जनसमुदायाविषयी कणव, तळमळ व कळकळ प्रकर्षाने दिसून येते. दोन वर्षापूर्वी महाराष्ट्रभर दुष्काळाची जी भीषण छाया पसरली होती, त्या भीषण छायेची झळ बसलेल्या शिरोळ तालुक्यातील गरीब माणसाचे अश्रु पुसण्याचे कार्य अत्यंत समर्थपणे आण्णांनी केले आहे. कोल्हापूर जिल्हचामध्ये महाविद्यालयात शिकत असलेल्या गरीब विद्यार्थ्याला आण्णांनी 'मदतीचा हात' पुढे केला. हे कार्य उपकाराच्या भावनेतून केले गेले नाही. केवळ कर्तव्य व कणव यामधून केले गेले आहे. महाराष्ट्रातील दुष्काळात संत दामाजीपंताचा 'सहानुभूतीचा दृष्टिकोन स्वीकारून हे काम केल गेले. ऐन दुष्काळात ' सहानुभूती' चा सुकाळ करण्याच्या थोर परंपरेला जपण्याचा हा

एक प्रामाणिक प्रयत्न होय. अशी ही 'सहानुभूती' च लोकशाहीचा प्राण आहे असे मला वाटते.

'हे कुंभ अमृताचे!' या ग्रंथातील सर्व भाषणे साधारणतः १९६४ पासून सन १९७४ पर्यंतची, म्हणजे एकूण १० वर्षाच्या कालखंडातील आहेत. या सर्वच भाषणामध्ये व्यक्ती, संस्था व शासन समृद्ध कसे होईल याचे एक मनोज्ञ चित्र आढळून येते. या ग्रंथाच्या संपादनाची प्रेरणा माझे सुहृद आदरणीय श्री. पी. बी. पाटीलसाहेब यांचेकडून लाभली. संपादनाचे कार्यात सदैव हातभार लावण्याचे कार्य श्री. कृ. भा. घाणेकर, श्री. आनंदराव पाटील व श्री. चंद्रकांत कुंभार या त्रिमूर्तीनी केले. माझे मित्र प्रा. कमलाकर दीक्षित व प्रा. डी. डी. पाटील याचे बहुमोल सहकार्य लाभले. या ग्रंथाचे अंतर्बाह्य रंग-सौंदर्य वाढविण्याचे कार्य गुणी कलाकार श्री. अरविन्द मेस्त्री यांनी केले. उदय प्रोसेसचे संचालक श्री. मराठे यांनी सुबक ब्लॉक्स करून दिले. दि गजानन प्रेसचे संचालक श्री. प्रभाकरपंत महाबळ यांनी हा ग्रंथ वेळेवर छापून सहकार्य दिले. याबद्दल मी सर्वांचा मनःपूर्वक आभारी आहे.

— रा. तु. भगत

अनुक्रमणिका

पृष्ठ

समाजविषयक विचार : १ : ६३

१ समाजोद्धाराची दिशा ... १
२ श्रमदेवतेचे उपासक ... ६
३ हा माझा मार्ग एकला ! ... ११
४ साधु-संत येती घरा ... १६
५ हरिजन-समाज ... २०
६ कुंभार : संस्कृतीचा शिल्पकार ... २५
७ विचारवंतांना आव्हान ... २९
८ हेचि फळ काय मम तपाला ! ... ३३
९ समाज आणि संस्कृति ... ३८
१० सर्व धर्मांचे सार : मानवता ... ४४
११ स्वातंत्र्य मिळविले, पण पुढे ? ... ५०
१२ वृत्तपत्र : लोकशाहीचे नेत्र ... ५८

सहकारविषयक विचार : ६५ : ११९

१३ आधी केले मग सांगितले ... ६७
१४ सजीव–सहकार ... ७८
१५ सहकार व समाजपरिवर्तन ... ८२
१६ बहुजनहिताय बहुजनसुखाय ... ८९
१७ अवघे धरू सुपंथ ... ९४
१८ एक क्रांतीकारक योजना ... १०४
१९ कर्मण्येवाधिकारस्ते ... १११
२० लोकजीवनाची वारणा ... ११५

अर्थविषयक विचार : १२१ : १८७

२१	आर्थिक विकासाची मर्मस्थाने	...	१२३
२२	समाजजीवनाचे माहेरघर	...	१२८
२३	कृषिकेंद्रित अर्थव्यवस्था	...	१३२
२४	एक यक्षप्रश्न	...	१४०
२५	भारताच्या भाग्यरेषा	...	१४५
२६	असा आहे हा साखर धंदा	...	१५२
२७	माती आणि माणूस	...	१५६
२८	लोकशाहीतील एक तीर्थस्थान	...	१७०
२९	कागद ! कागद !! कागद !!!	...	१८०

शिक्षणविषयक विचार : १८९ : २१५


३०	लोकशाहीसाठी लोकशिक्षण	...	१९१
३१	बलसंवर्धन हाच धर्म	...	१९८
३२	मला काय त्याचे ?	...	२०२
३३	वैद्यकीय शिक्षण : समस्या व उपाय	...	२०६
३४	आधी कळस मग पाया	...	२११

समाजविषयक विचार

आपला भारत देश विशाल असूनही अेक आहे. त्यात विविधता असूनही एकता आहे. त्यामध्ये धर्म, वर्ण, वंश, भाषा व प्रदेश हे जरी वेगळे असले तरी त्यांचा सांस्कृतिक धागा एकच आहे. असा हा सांस्कृतिक धागा लक्षात ठेऊन समाज जीवन समृद्ध करण्याच्या ध्यासातून केलेली पूज्य दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांची विविध भाषणें.

– रा. तु. भगत





समाजोद्धाराची दिशा

कनवाड शिरोळ तालुक्यातील एक लहानसे खेडे. या खेड्यातील ग्राम-पंचायतीच्या निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर कार्यकर्त्यांच्या सत्कार-समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले हे भाषण.

शिरोळ तालुक्यातील कनवाड ग्रामपंचायतीने बांधलेल्या समाज–मंदिराच्या उद्घाटन समारंभासाठी मी मोठ्या आनंदाने येथे आलो आहे. याचवेळी कनवाड ग्रामपंचायत--निवडणुकीत विजयी ठरलेल्या सदस्यांचा सत्कार–समारंभही आपण आयोजित केलेला आहे. या संयुक्त समारंभासाठी मोठ्या आपुलकीने व प्रेमाने आपण मला येथे बोलाविले त्याबद्दल मी आपले प्रथम मनःपूर्वक आभार मानतो.

तीन प्रेरणा

स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थानच्या इतिहासाचा आपण जर अभ्यास केला तर असे आढळून येईल की, या देशामध्ये मुख्यतः तीन प्रेरणा कार्य करीत होत्या. पहिली प्रेरणा होती भारतीय स्वातंत्र्याची. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या देशातून अनेक देशभक्त व क्रांतिकारक पुढे सरसावले. कोट्यवधी माणसांच्या मनांमध्ये ही प्रेरणा पूर्तीसाठी धडपड करीत होती. दुसरी

प्रेरणा होती, दीनदलितांच्या दुःखाविषयीची. सामाजिक अन्यायाची चीड व सामाजिक न्यायाविषयीची चाड असलेले राजा राममोहन रायांपासून महात्मा जोतीराव फुलेपर्यंतचे सर्व समाजसेवक वरील प्रेरणेनेच प्रेरित झालेले होते. तिसरी प्रेरणा दिसून येत होती ती ज्ञानप्रसाराची. ज्ञान--सूर्याच्या प्रकाशात समाजाच्या अंधश्रद्धा, रूढी व जातिविषयक विकृत धारणा धुवून काढण्याचे कार्य महात्मा गांधीपासून कर्मवीर भाऊराव पाटलांपर्यंतच्या सर्व शिक्षणतज्ज्ञांनी केले. स्वातंत्र्यपूर्व कालातील हे सर्व समाजसेवक राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे थोर महात्मेच होते. त्यांनी आखून दिलेल्या स्वातंत्र्यपथावरील अेक पथिक म्हणून आज तुम्ही आम्ही काम करीत आहोत.

तोच श्रेष्ठ कार्यकर्ता

आज स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपण धर्मनिरपेक्ष राज्या-मध्ये वावरत आहोत. धर्म, जाती, वंश, वर्ण, भाषा ही आज भांडण्याची कारणे राहिलेली नाहीत. समाजाची वर्गवारी करीत असतांना जाती, कार्य, वंश व वर्ण याची फूटपट्टी आज आपण वापरत नाही. परंतु खऱ्या अर्थाने आज समाजाची वर्गवारी करावयाची झाल्यास यापुढे जातीय वर्गवारी न करता सच्चे आणि लुच्चे अशी वर्गवारी करण्याची आवश्यकता आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे. कोणाचा व्यवहार आडपडद्याचा आहे व कोणाचा व्यवहार धुतल्या तांदळासारखा आहे हे आज पडताळून पाहण्याची वेळ आलेली आहे असे मला वाटते. आज आपल्या देशात सच्च्या माणसांनी संघटना करून लुच्च्यांची उचलबांगडी केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समाजवाद व लोकशाही नांदणार नाही. लोकशाहीची पताका हाती धरून कोण लोकशाहीची तत्त्वे पायदळी तुडवितो ते डोळे उघडून पाहण्याचा काळ जवळ येऊन ठेपला आहे. संधीसाधूंचे सत्यसंशोधन करणे जरूर वाटू लागले आहे. देशविघातकांच्या कृष्णकारवायांना पायबंद घालण्याची वेळ आलेली आहे. अशा वेळी तुम्ही सत्प्रवृत्त मंडळी निवडून आला

आहात. यापुढे केवळ थोर परंपरा, वैभव व उच्च ज्ञान यापैकी कशाचाच मळवट कपाळी न भरता सामान्य माणसांच्या उन्नतीसाठी अहोरात्र धडपडणाऱ्या आपल्यासारख्या सच्च्या कार्यकर्त्यांच्या मनःपूर्वक सत्काराचाच हा काळ आहे. जो सामान्य माणसांची दुःखे दूर करतो व त्यांचे अश्रू पुसतो तोच श्रेष्ठ कार्यकर्ता होय, असे मी मानतो.

समाज-मंदिराद्वारे समाज सेवा

समाजवाद हा आपल्या देशातील आजचा महत्त्वाचा विचार आहे. सर्वांना समान संधी हा समाजवादाच्या विचारातील मुख्य धागा आहे. सर्वांना समान संधी हीच समाजवादाची मुख्य कसोटी आहे.तुम्ही बांधलेले हे समाजमंदिर याच विचारसरणीतून निर्माण झालेल्या मार्गावरील एक मुख्य टप्पा आहे असे मला वाटते. तुम्ही या छोट्याशा गांवात श्रमदानाने मंदिर बांधले ही गोष्ट गौरवास्पद आहे. या मंदिरातून समाजाचे स्वास्थ्य जोपासले गेले पाहिजे. समाज सुशिक्षित झाला पाहिजे. संघटित झाला पाहिजे. समाजाच्या नसा-नसांमध्ये ऐक्य-भावनेचे वारे खेळले पाहिजे. सर्वांना विकासाची समान संधी लाभली पाहिजे. या समाजमंदिरात जनसेवेचा अखंड गजर चालला पाहिजे.

या समाजमंदिरातून बाहेर पडणाऱ्या सुबुद्ध पिढीने आर्थिक विकासासाठी उत्पादनाची अधिक मोहीम सुरू केली पाहिजे. उत्पादनाच्या पाठीमागील प्रमुख प्रेरणा व्यक्तिगत हिताची किंवा नफेबाजीची असता कामा नये. समाज–सुखाच्या प्रेरणेने, समाज–हिताच्या भावनेने नटलेले उत्पादनच समाज–मांगल्याच्या दाही दिशा उजळून टाकील. अशा तऱ्हेने समाजाच्या गरजा आणि विकासाच्या दिशा ओळखून केलेले उत्पादनच उत्पादन क्षेत्रामध्ये एक आदर्श निर्माण करू शकेल.

'क्रांती' चा नवा अर्थ

हल्ली लोकशाही समाजवादाच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या नावापुढे मागे "क्रांती" हा शब्द वापरला जातो. सभासंमेलनातून क्रांतीच्याच

घोषणा दिल्या जातात. परंतु आपल्या देशामध्ये १९४२ साली जी क्रांती घडून आली ती अजून लोकांनी समजावून घेतली नाही. महात्मा गांधींच्या दोन छोट्या बोटांनी " चले जाव " ची घोषणा दिली आणि सारे राष्ट्र त्या घोषणेमागे निर्धाराने उभे राहिले. १५० वर्षांच्या पारतंत्र्याच्या श्रृंखला निखळून पडल्या. गेली पाच हजार वर्षे कधी घडू शकले नाही असे एकसंघ राज्य निर्माण झाले. ही क्रांती नाही तर काय ? आणि म्हणूनच या क्रांतिकारक उठावातून निर्माण झालेल्या लोकांच्या राज्यातील आजच्या सामाजिक जीवनाशी एकरूप झालेल्या कार्यकर्त्यांनी डोळे उघडे ठेवून, सत्य पारखून, जनस्वास्थ्याच्या दृष्टीने माणसांतील फरक विसरून कष्ट केल्याशिवाय आपण जगणार नाही, अशी त्यांनी प्रतिज्ञा केली पाहिजे. तुमच्यासारख्या सर्व कार्यकर्त्यांनी कटिबद्ध होऊन जनहिताच्या कार्यात रममाण होण्याची वेळ आली आहे. सामान्य जनांच्या सुखासाठी रात्रंदिन झगडत राहणाऱ्या कार्यकर्त्यांची आज जरूर आहे. असे कार्यकर्तेच लोकांच्या जीवनात नवा सूर भरू शकतील. मगच सामान्यांच्या मांगल्याचा क्षण उदयाला येईल. अशावेळीच खरी क्रांती झाली असे म्हणता येईल. आजच्या काळातला " क्रांती " चा हा नवा अर्थ समजून कामाला लागावे लागेल.

आव्हानांचे स्वागत करा

आज तुमच्यापुढे कामाचे प्रचंड डोंगर अुभे आहेत. कोणाही अेका व्यक्तीला हा डोंगर डोक्यावर घेऊन चालता येणार नाही. श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन पर्वत धारण केला असला तरी आज आपणाला कोटी-कोटी भुजदंडांनीच हा कामाचा डोंगर पुढे रेटावा लागेल. नव्या नव्या आव्हानाना तोंड द्यावे लागेल. मोठ्या मनोधैर्याने त्याचा मुकाबला करावा लागेल. गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक करावी लागेल. अशा नव्या आव्हानांच्या व प्रश्नांच्या सोडवणुकीतूनच आपल्यामधील सर्वोत्तम गुणांचा विकास होईल. नवे व सर्वांना हवेसे वाटणारे व्यक्तित्व उदयास येईल आणि अशा अनेक व्यक्तित्वांच्या सामुदायिक प्रयत्नांमधूनच समाज-विकास साधता येईल.

दुभंगलेली मने सांधा

नवी नवी आव्हाने स्वीकारण्यात तुमचे तारुण्य आहे. यासाठी समाजातील प्रतिगामी शक्तीशी टक्कर देण्यासाठी तुम्हाला तयार राहिले पाहिजे. समाजातील प्रतिगामी शक्तींचे बुरूज ढासळले पाहिजेत. यासाठी तुम्ही सद्हेतु मनात ठेवला पाहिजे. दुभंगलेली मने सांधण्याचा प्रयत्न तुम्ही सर्व कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. गावागावांतून साचलेली प्रतिगामी शक्तीची कीड नष्ट झाली पाहिजे. तरच ग्रामीण स्वास्थ्याची जोपासना केल्यासारखे होईल. तुम्ही आपल्या विजयातूनच मोठे काम केले आहे. खऱ्या अर्थाने तुमच्या निवडणुकीच्या विजयापेक्षा या गोष्टीचाच मला फार आनंद झाला आहे.

सद्भावनेची साखळी करा

आज तुम्हाला गावातील ज्या मतदारांनी निवडून दिले त्यांच्या पाठीमागील खऱ्या भावनांचा अभ्यास करून पंचायत समितीचा कारभार लोकांच्या हिताच्या दृष्टीने केला पाहिजे. अडाणी आणि गरीब लोकांच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन प्रतिगामी शक्तींनी आपला स्वार्थ साधला म्हणूनच गावची मंडळी त्याला कंटाळली आणि त्यांनी तुम्हाला निवडून दिले आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून तुम्ही गावात सद्भावनेची साखळी निर्माण करा. जात-पात, वंश-वर्ण व वयोमान यांचा विचार न करता गावाच्या भल्यासाठी झटा.

तुम्ही सर्वांनी ही निवडणूक जिंकली ही फार चांगली गोष्ट झाली. परंतु हा तुमचा अर्धा विजय झाला असे मी समजतो. निवडून आलेल्या उमेदवारांची खरी कसोटी त्यांच्या नंतरच्या कामावर आधारलेली असते हे विसरता कामा नये. आता गावाच्या विकासकार्याची दिशा आखून, त्या दिशेने प्रयत्न करून ती तुम्ही पूर्ण केली तरच हा विजय संपूर्ण विजय होईल असे मला वाटते. तसा तुम्ही प्रयत्न करावा अशी माझी अपेक्षा आहे. पुनः अेकदा मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

कनवाड,
तारीख ११-७-१९७०

श्रमदेवतेचे उपासक

मिरज येथे भरविण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाचेवेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी माळी समाजाला उद्देशून केलेले भाषण.

मित्रहो ! भारतामधील अनेक जाती जमातींच्या परिषदा वेळो–वेळी भरून त्यात चर्चा व अडीअडचणींचा आढावा घेतला जातो. यासाठी मी या अशा समारंभांचे नेहमीच स्वागत करत आलो आहे. कारण संघटनेच्या कल्पनेतून राष्ट्राची जडणघडण जितकी चांगली होऊ शकते तितकी दुसऱ्या कोणत्याही कल्पनेतून होऊ शकणार नाही आणि म्हणून तशी भावना मनात ठेवूनच या कार्यक्रमाला मी हजर राहिलो आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत समृद्ध करण्याच्या दिशेने आजपर्यंत अनेकविध प्रयत्न झाले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासना–कडून भांडवल व साधनसामुग्री पुरविली जात आहे. परंतु भारतीय लोकशाहीला मानणाऱ्या राज्यात सामान्य जनतेच्या सुखासाठी व समृद्धीसाठी एक वेळ भांडवल व साधनांची थोडीशी कमतरता असली तरी फारसे अडणार नाही. पण जबाबदार नेते, कर्मचारी व समाज–

सेवक चारित्र्यसंपन्न असणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण शासकीय विकास योजना या कितीही चांगल्या असल्या तरी त्या योजना राबविणारी मने आणि मनगटे चारित्र्यसंपन्न असली पाहिजेत. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात हे घडले नाही. म्हणून तर देश धोक्यात येतो आहे. आज जी थोडीथोडकी चारित्र्यसंपन्न माणसे आढळून येतात ती माणसे सागरातील दीपस्तंभाप्रमाणेच टिकून आहेत.अशा चारित्र्यसंपन्न माणसावर देश टिकून राहिला आहे. नाहीतर चारित्र्यहननामुळे समाजातील सामान्य माणसाच्या सर्व प्रेरणा व स्वाभिमान केव्हांच संपुष्टात आला असता. गौरव व सत्कार समारंभामुळे माणसे मोठी होत नाहीत. कूळ व जात यावरही माणसांचे मोठेपण अवलंबून नाही. सद्‌गुण, स्वाभिमान व शील या त्रिसूत्रीवरच माणसाचे मोठेपण अवलंबून आहे असे मला वाटते.

एकात्मतेचा धागा

आज जातीय परिषदा स्थापन होतात व त्यानिमित्ताने लोक एका ठिकाणी येऊन काही विचारविनिमय करतात ही गोष्ट मला चिंताजनक वाटत नाही. कारण अशा परिषदांमधून विचारांची देवाणघेवाण होते, व त्या त्या समाजाच्या अडचणी समोर येऊन त्यांवर उपाय शोधणे सोपे जाते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशातील जातीजमाती कधीही नष्ट होणार नाहीत. कारण त्या शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या आहेत. खरे पाहता या जाती म्हणजे सुंदर सुगंधी व रंगीबेरंगी फुलासारख्या आहेत. अशा फुलामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा बळकट धागा ओवून सुरेख हार तयार करता येईल आणि मगच विविधतेमधील एकता शोभून दिसेल. आपण सर्वजण प्रथम भारतीय आहोत व नंतर एका विशिष्ट जातीचे किंवा समाजाचे आहोत, या उदात्त भावनेने आपण जर वागलो तरच भारत वैभवसंपन्न होऊ शकेल. आज या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाच्या निमित्ताने हा विचार मांडणे मला औचित्यपूर्ण वाटते.

श्रमदेवतेचे उपासक

मिरज येथे भरविण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाचेवेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी माळी समाजाला उद्देशून केलेले भाषण.

मित्रहो ! भारतामधील अनेक जाती जमातींच्या परिषदा वेळो–वेळी भरून त्यात चर्चा व अडीअडचणींचा आढावा घेतला जातो. यासाठी मी या अशा समारंभांचे नेहमीच स्वागत करत आलो आहे. कारण संघटनेच्या कल्पनेतून राष्ट्राची जडणघडण जितकी चांगली होऊ शकते तितकी दुसऱ्या कोणत्याही कल्पनेतून होऊ शकणार नाही आणि म्हणून तशी भावना मनात ठेवूनच या कार्यक्रमाला मी हजर राहिलो आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत समृद्ध करण्याच्या दिशेने आजपर्यंत अनेकविध प्रयत्न झाले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासना–कडून भांडवल व साधनसामुग्री पुरविली जात आहे. परंतु भारतीय लोकशाहीला मानणाऱ्या राज्यात सामान्य जनतेच्या सुखासाठी व समृद्धीसाठी एक वेळ भांडवल व साधनांची थोडीशी कमतरता असली तरी फारसे अडणार नाही. पण जबाबदार नेते, कर्मचारी व समाज–

सेवक चारित्र्यसंपन्न असणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण शासकीय विकास योजना या कितीही चांगल्या असल्या तरी त्या योजना राबविणारी मने आणि मनगटे चारित्र्यसंपन्न असली पाहिजेत. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात हे घडले नाही. म्हणून तर देश धोक्यात येतो आहे. आज जी थोडीथोडकी चारित्र्यसंपन्न माणसे आढळून येतात ती माणसे सागरातील दीपस्तंभाप्रमाणेच टिकून आहेत.अशा चारित्र्यसंपन्न माणसावर देश टिकून राहिला आहे. नाहीतर चारित्र्यहननामुळे समाजातील सामान्य माणसाच्या सर्व प्रेरणा व स्वाभिमान केव्हांच संपुष्टात आला असता. गौरव व सत्कार समारंभामुळे माणसे मोठी होत नाहीत. कूळ व जात यावरही माणसांचे मोठेपण अवलंबून नाही. सद्‌गुण, स्वाभिमान व शील या त्रिसूत्रीवरच माणसाचे मोठेपण अवलंबून आहे असे मला वाटते.

एकात्मतेचा धागा

आज जातीय परिषदा स्थापन होतात व त्यानिमित्ताने लोक एका ठिकाणी येऊन काही विचारविनिमय करतात ही गोष्ट मला चिंताजनक वाटत नाही. कारण अशा परिषदांमधून विचारांची देवाणघेवाण होते, व त्या त्या समाजाच्या अडचणी समोर येऊन त्यांवर उपाय शोधणे सोपे जाते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशातील जातीजमाती कधीही नष्ट होणार नाहीत. कारण त्या शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या आहेत. खरे पाहता या जाती म्हणजे सुंदर सुगंधी व रंगीबेरंगी फुलासारख्या आहेत. अशा फुलामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा बळकट धागा ओवून सुरेख हार तयार करता येईल आणि मगच विविधतेमधील एकता शोभून दिसेल. आपण सर्वजण प्रथम भारतीय आहोत व नंतर एका विशिष्ट जातीचे किंवा समाजाचे आहोत, या उदात्त भावनेने आपण जर वागलो तरच भारत वैभवसंपन्न होऊ शकेल. आज या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाच्या निमित्ताने हा विचार मांडणे मला औचित्यपूर्ण वाटते.

श्रमदेवतेचे उपासक

मिरज येथे भरविण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाचेवेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी माळी समाजाला उद्देशून केलेले भाषण.

मित्रहो ! भारतामधील अनेक जाती जमातींच्या परिषदा वेळो–वेळी भरून त्यात चर्चा व अडीअडचणींचा आढावा घेतला जातो. यासाठी मी या अशा समारंभांचे नेहमीच स्वागत करत आलो आहे. कारण संघटनेच्या कल्पनेतून राष्ट्राची जडणघडण जितकी चांगली होऊ शकते तितकी दुसऱ्या कोणत्याही कल्पनेतून होऊ शकणार नाही आणि म्हणून तशी भावना मनात ठेवूनच या कार्यक्रमाला मी हजर राहिलो आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत समृद्ध करण्याच्या दिशेने आजपर्यंत अनेकविध प्रयत्न झाले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासना–कडून भांडवल व साधनसामुग्री पुरविली जात आहे. परंतु भारतीय लोकशाहीला मानणाऱ्या राज्यात सामान्य जनतेच्या सुखासाठी व समृद्धीसाठी एक वेळ भांडवल व साधनांची थोडीशी कमतरता असली तरी फारसे अडणार नाही. पण जबाबदार नेते, कर्मचारी व समाज–

सेवक चारित्र्यसंपन्न असणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण शासकीय विकास योजना या कितीही चांगल्या असल्या तरी त्या योजना राबविणारी मने आणि मनगटे चारित्र्यसंपन्न असली पाहिजेत. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात हे घडले नाही. म्हणून तर देश धोक्यात येतो आहे. आज जी थोडीथोडकी चारित्र्यसंपन्न माणसे आढळून येतात ती माणसे सागरातील दीपस्तंभाप्रमाणेच टिकून आहेत.अशा चारित्र्यसंपन्न माणसावर देश टिकून राहिला आहे. नाहीतर चारित्र्यहननामुळे समाजातील सामान्य माणसाच्या सर्व प्रेरणा व स्वाभिमान केव्हांच संपुष्टात आला असता. गौरव व सत्कार समारंभामुळे माणसे मोठी होत नाहीत. कूळ व जात यावरही माणसांचे मोठेपण अवलंबून नाही. सद्‌गुण, स्वाभिमान व शील या त्रिसूत्रीवरच माणसाचे मोठेपण अवलंबून आहे असे मला वाटते.

एकात्मतेचा धागा

आज जातीय परिषदा स्थापन होतात व त्यानिमित्ताने लोक एका ठिकाणी येऊन काही विचारविनिमय करतात ही गोष्ट मला चिंताजनक वाटत नाही. कारण अशा परिषदांमधून विचारांची देवाणघेवाण होते, व त्या त्या समाजाच्या अडचणी समोर येऊन त्यांवर उपाय शोधणे सोपे जाते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशातील जातीजमाती कधीही नष्ट होणार नाहीत. कारण त्या शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या आहेत. खरे पाहता या जाती म्हणजे सुंदर सुगंधी व रंगीबेरंगी फुलासारख्या आहेत. अशा फुलामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा बळकट धागा ओवून सुरेख हार तयार करता येईल आणि मगच विविधतेमधील एकता शोभून दिसेल. आपण सर्वजण प्रथम भारतीय आहोत व नंतर एका विशिष्ट जातीचे किंवा समाजाचे आहोत, या उदात्त भावनेने आपण जर वागलो तरच भारत वैभवसंपन्न होऊ शकेल. आज या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजोन्नती परिषदेच्या समारोप समारंभाच्या निमित्ताने हा विचार मांडणे मला औचित्यपूर्ण वाटते.

हे तर समाज जीवनाचे व्याख्याते

यावेळी उपस्थित असलेल्या पत्रकार बंधूना उद्देशून मला असे सांगावेसे वाटते की, लोकशाही समाजवादाचा विचार यशस्वी करावयाचा असेल तर लोकांचे स्वयंकर्तृत्व आणि स्वाभिमान जागृत ठेवला पाहिजे. लोकांचे हे स्वयंकर्तृत्व जागृत ठेवण्यासाठी पत्रकारांनी व लेखकांनी आपली लेखणी सरसावून समाजाला गतिशील ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण लेखक व पत्रकार हे तर समाज जीवनाचे खरेखुरे व्याख्याते आहेत. यासाठी आजचा लेखक हा केवळ समाजाचे मनोरंजन करणारा विदूषक नसून तो प्रेरणा देणारा स्फुल्लिंग असला पाहिजे. देशप्रेमाचे, राष्ट्रीय एकात्मतेचे व समाजसेवेचे धडे त्याने समाजापुढे आपल्या लेखनाद्वारे ठेवले पाहिजेत. प्राचीन भारताच्या श्रेष्ठपरंपरांचा व संस्कृतीचा वारसा घेऊन पुढे सरसावलेल्या लेखकांनी स्वंयपूर्ण भारताचे सुंदर चित्र समाजापुढे उभे केले पाहिजे. असे बलशाली साहित्यच बलशाली भारत बनवू शकेल. अशा बलशाली स्वतंत्र प्रज्ञेच्या व समाजोपयोगी लेखकाबरोबरच पत्रकाराचे महत्त्वही अनन्यसाधारण असेच आहे. पत्रकार हा तर समाजाचा सांगाती. तो जितका प्रामाणिक, स्वाभिमानी, निःपक्ष व निरलस वृत्तीने कार्य करेल त्यावरच समाजमनाची निकोप जडणघडण अवलंबून आहे आणि म्हणूनच पत्रकाराला मी समाजजीवनाचा वाटाड्या समजतो. वाटाड्या जर विश्वासास पात्र नसेल तर वाटसरू धोक्यात आल्याशिवाय राहत नाही.

कर्म हाच धर्म

धर्म म्हणजे परंपरागत श्रद्धा, निष्ठा व मूल्ये यांचा संघात होय. कोणत्याही धर्मामध्यें मानवी जीवनाच्या हिताची बीजे असतात. कोणत्याहि धर्मामध्ये समाज–मंगलतेची भावना सामावलेली असते. समाज जीवनात स्वास्थ्य व शांतता निर्माण करण्याचे सामर्थ्यही धर्मभावनेत आढळून येते. कोणताही धर्म आपापसात भांडा व लढा

असे सांगत नाही. सर्वच धर्मांमध्ये समन्वय–साधनेचा आढळ होतो. ही समन्वय साधना मानवी-जीवनाच्या विकासाची पहिली पायरी होय. यासाठी समाज जीवनाला पोषक ठरेल असे जीवनतत्त्व मग ते कोण–त्याही धर्मात असो ते आपण आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा जेव्हा धर्म, वर्ण, वंश वगैरे संघर्ष निर्माण होतो, तेव्हा तेव्हा कोणीतरी श्रेष्ठ धर्मसंस्थापक जन्मास येतो असे आपली भगवत्–गीता सांगते. स्वातंत्र्योत्तर भारतात अनेक प्रकारचे संघर्ष निर्माण झाले. परंतु कोणी रामकृष्ण जन्मास आला नाही. आजच्या लोक–शाहीच्या काळात ५६ कोटी जनताजनार्दनच रामकृष्ण आहे. म्हणून आज कोणताही संघर्ष निर्माण झाला तर या ५६ कोटी जनता-जनार्दनाने पुढे ठाकले पाहिजे. निष्काम कर्मभावनेचे अमोघ साधन हाती धरून पुढे सरसावले पाहिजे, कर्म केल्याशिवाय कोणत्याही माणसाला जगण्याचा अधिकार नाही. ही गोष्ट आजच्या अणुयुगात शिरोधार्य मानली पाहिजे. कारण हे समाजवादी तत्त्व आहे आणि या तत्त्वावरच भारताची स्वतंत्र समाजवादी राज्यव्यवस्था आधारलेली आहे. म्हणून कर्म हाच धर्म मानून आपण सर्वांनी पुढे चालले पाहिजे. निष्काम भावनेने देशहितासाठी कर्म करणारे सर्वच लोक श्रमदेवतेचे खरेखुरे उपासक म्हटले पाहिजेत. अशा निष्काम कर्म भावनेवर भारताची समृद्धता अवलंबून आहे आणि म्हणून अशा उपासकांची उपेक्षा होता कामा नये. ज्या देशात खऱ्याखुऱ्या श्रमदेवतेच्या उपास–कांची आराधना आरंभिली जाते त्या देशातच लक्ष्मी नांदते याची सर्वांनी नोंद करून ठेवली पाहिजे.

नेतृत्वाचे त्रिदोष

आज ज्यांनी जनतेचे प्रतिनिधित्व पत्करले आहे त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. यासाठी पहिल्यांदा जनता प्रतिनिधींच्या मनात जनतेबद्दल आपुलकी निर्माण झाली पाहिजे. प्रति-निधीनी आपलेपणाने काही घडविण्याचा प्रयत्न केला तर जनतेचा चांगला प्रतिसाद मिळेल. पात्रता नसेल तर खुर्चीवर बसून त्याचा

काही उपयोग नाही. पात्रता पाहणे म्हणजे काही मूठभर वर्गाने राज्य करणे असा अर्थ नव्हे, तर प्राप्त ज्ञान, अनुभव व सचोटीबरोबर कल्पकतेची जोड देऊन जनहितासाठी काही करणे यातच प्रतिनिधीची पात्रता सामावलेली आहे.

कळकळ, पात्रता आणि सचोटी नसणे म्हणजे नेतृत्वाला कफ-वात व पित्त होणे होय. नेतृत्वाला जडलेले हे त्रिदोष प्रथम दूर केले पाहिजेत. जनतेविषयी केवळ अपार कळवळा व सहानुभूती असून चालणार नाही. शेवटी सक्रिय सहानुभूतीच कायम टिकून राहते. कोरडी सहानुभूती आळवावरच्या पाण्यासारखीच असते. यासाठी स्वतः श्रमप्रतिष्ठेचा स्वीकार करून नंतरच श्रमाची महती कार्यकर्त्याने सांगावी. खरे पाहता स्वतःच्या श्रमावर जगण्याची कल्पना म्हणजे समाजवाद होय. सगळेच काम न करता जगण्याचा प्रयत्न करू लागले तर श्रमाची किंमत राहणार नाही आणि हे असेच चालत राहिले तर राष्ट्र रसातळाला पोहोचण्याची भीती निर्माण होईल. भारतासारख्या गरिबीने वेढलेल्या राष्ट्रामध्ये श्रमाधिष्ठित समाजवादाचा जोराचा पुरस्कार झाला पाहिजे. आज अशा समाजवादाचा पुरस्कार श्रीमती इंदिराजी गांधी करीत आहेत. त्याला तुम्ही आम्ही साथ दिली पाहिजे. कारण पंतप्रधान इंदिराजी गांधीनी आजच्या समाजव्यथेचे मूळ ओळ-खून " गरिबी हटाव " ही घोषणा दिली आहे. या घोषणेमागे केवळ मत मिळविण्याचा हेतू नसून समाजव्यथेच्या निर्मूलनासाठी मूलभूत हेतूची सांगड आहे, हे सर्वांनी जाणून घेतले पाहिजे.

आपल्या महाराष्ट्र राज्य वीरशैव माळी समाजाच्या सर्व समस्या दूर करण्यासाठी मी यथाशक्ती प्रयत्न करणार आहे. कारण आज कोणत्याही समाजाच्या समस्या हया ज्या त्या समाजाच्याच राहिल्या नसून त्या देशाच्या जीवनाशी निगडित झाल्या आहेत. यासाठी आज आपण सर्वांनी देशापुढील समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे एवढेच मला शेवटी म्हणावयाचे आहे.

मिरज,
दिनांक १०-५-१९७३

हा माझा मार्ग एकला

यड्राव हे कोल्हापूर जिल्ह्यातील एक खेडे. या खेड्यात हरिजन समाज मंदिराच्या उद्घाटन-समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

पंचगंगेच्या परिसरातील यड्राव गावी हरिजन समाज मंदिराचा व प्राथमिक शाळेच्या पायाभरणीचा शुभारंभ करीत असताना मला अत्यानंद होत आहे. पंचगंगेच्या परिसरातील आपला गाव मी अनेक वर्षे पहात आलो आहे. अनेक वर्षापासून हे गांव "प्राब्लेम व्हिलेज" म्हणून मानले जात होते. हे शेतीप्रधान गांव अनेक वर्षांपासून औद्योगिक विकासाला व शिक्षणाला मुकलेले गांव आहे हे ही मला माहीत आहे. स्वातंत्र्योत्तर कालातही या गांवाकडे कोणाचे लक्ष गेले नाही म्हणा किंवा गांवकऱ्यांनीही विकास पावत असलेल्या अन्य गांवाकडे पाहिले नाही असे समजा. परंतु गेल्या चार–पांच वर्षात यड्राव गांवचा चेहरा–मोहरा पूर्ण बदलून गेला आहे. याची मुख्य कारणे दोन आहेत. पहिले कारण म्हणजे "पचगंगेच्या" दूरदर्शी दृष्टीतून आपला गांव सुटला नाही व दुसरे कारण म्हणजे आपल्या गावाशेजारूनच दुसरी एक "पंचगंगा" वाहत आहे – ती म्हणजे 'कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी' ही होय.

विशेषत: आपल्या गांवातील कांही धडाडीच्या कार्यकर्त्यांनी विरोधाला तोंड देऊन गांवाचा जो कायापालट करण्याचे काम मनावर घेतले आहे तेही अभिनंदनीय असेच आहे. एक काम पूर्ण करून लगेच दुसरे काम हाती घेण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद आहे. गावकऱ्यांचा आत्मविश्वास संपादन करून त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याची कार्यकर्त्यांची हातोटीही स्तुत्य आहे.

दुर्बलांना सबल बनवा

आजपर्यंत आपली अशी एक कल्पना होती की, खेडेगांव म्हणजे शेती व शहर म्हणजे उद्योगधंदा. परतु खेडेगांवात जीवनोपयोगी अनेक उद्योगधंदे करणाऱ्या बारा बलुतेदारांची गेल्या बारा वर्षांत कधी मोजदाद झाली नाही. त्यांच्या परंपरागत उद्योगधंद्याचा विकास साधण्याच्या दृष्टीकोणातून कधीही त्यांची दखल घेतली गेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बावीस वर्षांनी शासकीय गरिबी हटावच्या घोषणेतून निर्माण झालेल्या सवलतीचे लोण आता खेडेगांवापर्यंत पोहोचलेले आहे. या संधीचा फायदा घेऊन, कार्यकर्त्यांनी आता कामाला लागण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. समाजातील सुप्त–शक्तींना जागृत करून त्यांना सुसंधी प्राप्त करून दिली पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला " हा माझा देश आहे " असे वाटण्यासाठी त्यांच्या श्रमांतून त्यांचे जीवन व जीवनमान उन्नत व्हावयास पाहिजे. गांवाच्या श्रमाने गाव मोठा झाला पाहिजे. यासाठी सर्वच कार्यकर्त्यांनी एका ठिकाणी येऊन गांवच्या समस्यांचे व त्यावरील उपायांचे आकलन करून घेतले पाहिजे. हे सर्व विधायक कार्य करीत असताना लोकांतील जागृतीची दखल घेऊन समाजातील दुर्बल घटकांना सबल बनविण्याचा प्रथम प्रयत्न झाला पाहिजे. समाजातील सर्व घटकाना विकासाच्या एका विशिष्ट पातळीवर घेणे हेच " गरिबी हटाओ " या घोषणेतील खरे मर्म आहे. असे झाले तरच भारतीय समाजवाद केवळ ग्रंथनिष्ठ न राहाता वस्तुनिष्ठ राहील.

स्वतःचा उद्धार स्वतः साधा

आज समाजात कुठेही गेले तरी सामान्य माणसाच्या अनंत अडचणी असल्याचे दिसून येते. विशेषतः मानवी जीवनाशी निगडीत असलेल्या या अडचणी जेवढ्या गुंतागुंतीच्या तेवढ्याच गंभीर स्वरूपाच्या आहेत. देशातील असंख्य गरीबांना आकाश व जमीन याशिवाय कसालाहि आधार नाही. अशा वेळी सर्व जनतेच्या शक्तीची, त्यागाची व अेकीची नितांत गरज आहे. मग आपल्या भारतावर कसल्याही प्रकारचे संकट निर्माण झाले तरी देशातील गरीबी हटावची मोहीम मागे पडणार नाही. आपल्या देशातील गरीबीचे मूळ हे दैवी कृत्याचे मूळ नसून मानव निर्मित आहे. हे मूळ नष्ट करण्यासाठी सर्वांनी अेकदिलाने प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या देशातील संपत्ती ही तमाम नागरिकांची संपत्ती आहे. म्हणून गरजेपेक्षा अधिक संपत्ती आपल्या जवळ ठेवण्याचा अधिकार या देशात कोणालाही नाही. आणि म्हणून समाजवाद केवळ शासनाच्या मदतीने येईल ही भावना सर्वांनी सोडून द्यावी. खरे पाहता जनतेच्याच कार्यवाहीवर खरा समाजवाद निर्माण होईल. स्वतःची परिस्थिती दुसऱ्याच्या मध्यस्थीने न सुधारता स्वतःच्या हिमतीवर सुधारा. स्वार्थी मध्यस्थापासून सावध रहा. आपल्या सुखासाठी आपल्या शक्तीचा, बुद्धीचा व कल्पकतेचा संपूर्ण उपयोग करा. शासन कर्तव्य म्हणून मदत देईल, परंतु तुमच्या विकासाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी तुम्हीच सोडवा. " हा माझा मार्ग अेकला " म्हणून कामाला लागा.

माणूस हेच मंदिर

आपले लोकशाही राज्य चांगले चालावे, वाढावे व टिकावे असे जर आपणास वाटत असेल तर जो पददलित हरिजन समाज आहे त्याला हक्काचे, स्वाभिमानाचे आणि सन्मानाचे जीवन जगता आले पाहिजे. त्याचे दुःख दूर केले पाहिजे. गेल्या २५ वर्षात प्रयत्न करूनही जेवढी याबाबतीत प्रगती साधावयास पाहिजे होती तेवढी आपण साधू शकलो

नाही. सन १९५० साली घटना निर्माण करून अस्पृश्यता हटाव ही घोषणा घटनेने आमलात आणली. त्यासाठी कायदेही राबवले गेले, परंतु आज जे चित्र दिसत आहे ते फारसे समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. आज आपण प्रत्यक्षात अेका पाणवठ्यावर अेकत्रित येऊन पाणीसुद्धा भरू शकत नाही. याउलट हरिजनांच्यावर अनेक अन्यायही होत आहेत. यासाठी आज आपण समाजजीवनाचे चित्र समजावून घेतले पाहिजे. ज्या महात्मा गांधीनी हरिजनांची दुःखे जाणली व त्यांची सेवा केली त्या महात्मा गांधींच्या देशात आपण राहात आहोत याची जाणीव ठेवली पाहिजे. मानवतेविषयी अपार करुणा असलेल्या व मानव-मंगलतेविषयी झटलेल्या गौतम-बुद्धाच्या देशात आपण राहात आहोत याचे स्मरण ठेवले पाहिजे. गौतम ते गांधींपर्यन्तची आपल्या देशातील मानव-सेवेची थोर परंपरा ध्यानात घेऊन हरिजन हे " हरीचे जन " आहेत हे ध्यानात घेतले पाहिजे. माणूस हीच एक जात, माणूस हाच एक धर्म, माणूस हेच एक श्रद्धास्थान, माणूस हेच एक मन्दिर समजून आपण हरिजनांच्याकडे सहृदयतेने पाहण्यास शिकले पाहिजे, त्याना अभय दिले पाहिजे. तरच हा हरिजन समाज सन्मानाचे जिणे जगू शकेल. समाजवाद हा नुसत्या अक्षर उच्चाराने येणार नाही. त्यासाठी प्रयत्न पाहिजेत. समानता, सत्शीलता मानवता आदि श्रेष्ठ गुणांची आराधना केली पाहिजे. आज आपल्या समाजातील २५ ते ३० टक्के लोक पत निर्माण करून पतीवर प्रतिष्ठेचे जीवन जगतात. तर ६० ते ७० टक्के जनता दुर्बलांचे जीवन जगत आहे. ही वस्तुस्थिती आहे. यासाठी समाजातील सर्व घटकांनी दुजाभाव न धरता ही विषमता नाहीशी करावी आणि लोकशाहीचे राज्य हे कल्याणकारी राज्य आहे याची खात्री पटविण्यासाठी अस्पृश्यता हटाव ही घोषणा कृतीत आणावी अशी माझी आपणांस नम्र विनंती आहे.

यड्रावसारख्या लहानशा गावात उभे राहिलेले हे हरिजन समाज मंदिर म्हणजे येथील सर्व समाजाच्या सद्भावनेचे हे एक प्रतीकच आहे, असे मी समजतो. गाव संघटित झाला की किती मोठे कार्य करू शकतो

हे आज आपण सिद्ध करून दाखविले आहे. "गांव तेथे ग्रंथालय", "गाव तेथे शाळा" व "गाव तेथे मैदान" या गांवाच्या निकडीच्या गोष्टी आता तुम्हीच पूर्ण करू शकाल असे मला वाटते. कारण स्वातंत्र्योत्तर २२ वर्षांच्या कालखंडामध्ये समाजातील लहान लहान कामांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे लहान–लहान कार्यकर्ते मुख्य रस्त्यापासून दूर–दूर राहिले आहेत. पायातील खंबीर दगडावर आलिशान इमारत उभी राहिलेली असते या गोष्टीचा आज विसर पडला आहे. समाजाला सावली देणाऱ्या वटवृक्षांचा विसर पडून कुंडीतील रोपट्यांना खत–पाणी घालून वाढविण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. यासाठी आपल्या–सारख्या लहान–लहान कार्यकर्त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर येथील शाळेचा पायाभरणी समारंभ व हरिजनमंदिराचे उद्घाटन अशी लहान लहान कामे हाती घेऊन समाजहिताच्या दृष्टीने एक चांगला पायंडा पाडला आहे याबद्दल तुम्हा सर्वांना धन्यवाद.

यड्राव,
दिनांक १९–११–१९७१

साधुसंत येती घरा

सुखडीचे प्रवर्तक शेठ अरविंदभाई मफतलाल यांच्या सत्कार समारंभाचे वेळी जयसिंगपूर येथे भरलेल्या जाहीर सभेत दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांनी काढलेले उद्‌गार.

चित्रकूटचे संत रणछोडदासजी यांच्या प्रेरणेने व सद्‌गुरु सेवा संघाच्यावतीने शेठ अरविंदभाई मफतलालनी मानवतेची पूजा बांधण्याचे जे व्रत स्वीकारले आहे त्याचा सत्कार करण्यासाठी आज आपण येथे जमलो आहोत. आजपर्यंत मी अनेक प्रकारच्या सत्कार-समारंभाची अध्यक्षस्थाने स्वीकारली आहेत.परंतु दुष्काळाच्या आगीमध्ये सारा समाज पोळत असताना आयोजित केलेला हा सत्कार समारंभ काही आगळाच आहे. आगळा एवढ्यासाठी की येथे कोणी–कोणावर स्तुति–सुमनांचा वर्षाव करण्यासाठी जमलेला नसून मानवसेवेचे व्रत स्वीकारलेले महान आधुनिक संत सर्वश्री शेठ अरविंदभाई मफतलालच्या सेवाभावाचा कृतज्ञबुद्धीने उल्लेख करून आपणही त्यापासून स्फूर्ती घेण्यासाठी आजचा हा समारंभ आहे असे मला वाटते.

'सुखडी' चे प्रवर्तक

जेथे माणूस माणसाला ओळखत नाही अशा या माणुसकीच्या दुष्काळात संतांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या भक्तिभावनेतून मानव–

तेच्या दूताला शोभेल असे कार्य आज शेठ अरविंदभाईनी आरंभिले आहे. भक्तिभावाचे दर्शन होऊन त्यांनी मानवसेवेचे जे कार्य आरंभिले आहे, तसे काम, मी स्वतःला समाजवादी समाजरचनेचा भोक्ता समजतो, तरी मला सुद्धा ते जमणार नाही. " दाना " ऐवजी भक्तिमार्गातून झालेल्या प्रेरणमुळे अरविंदभाई श्रीमंत असून सेवाभावी वृत्तीचे बनले. म्हणूनच ते दरिद्री नारायणाची सेवा करण्यास प्रवृत्त झाले आहेत. आज त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना " सुखडी " पुरविण्याचे काम आरंभिले आहे. सद्गुरूंचा प्रसाद म्हणून त्यांनी ही"सुखडी" दुष्काळग्रस्तांना दिली. यामुळे त्यांनी "दान " केले असे होत नसून गरीब मनुष्य लाचार बनण्यापासून दूर राहतो आणि यातच शेठ अरविंदभाईंच्या कार्याचे खरे गमक आहे, असे मला वाटते. आजपर्यंतच्या आपल्या महाराष्ट्रीय संतांनी जनजागृती व सत्प्रवृत्तीच्या निर्मितीसाठी जीवन वेचले. परंतु भयंकर दुष्काळामुळे जेथे माणूसच जिवंत राहतो की नाही अशी स्थिती निर्माण झाली तेव्हा मंगळवेढ्याला संत दामाजीपंतांनी जे कार्य केले त्याच कार्याची शेठ अरविंदभाईनी आपणास आठवण करून दिली आहे. सद्गुरूच्या कृपाप्रसादाने माणुसकीच्या गहिवरातून शेठ अरविंदभाईनी 'सुखडी दाना' स प्रारंभ केला. आज 'सुखडी' चे प्रवर्तक म्हणून शेठ अरविंदभाईना मी आधुनिक कालातील संत दामाजीपंत समजतो.

हे तर माणुसकीचे आक्रंदन

चार घास खाऊन " हरे राम " म्हणणाऱ्या कुणब्याच्या दारासमोर ह्या दुष्काळाच्या भस्मासुराने तळ ठोकला आहे. त्यामुळेच हा कुणबी चिंतातूर झाला आहे. नाउमेद झाला आहे. तरीही त्याला जगण्याची आशा आहे. आज तो कर्जाचे व तगाईचे डोंगर डोक्यावर घेऊन रस्ता नेईल त्या शहराकडे सैरावैरा पळत आहे. भाकरीच्या तुकड्यासाठी वणवण फिरत आहे. गावाकडील त्याची शेते ओसाड पडलेली आहेत. विहिरी आटून गेल्या आहेत. त्यांच्या जनावरांची पोटे पाठीला लागली आहेत. ज्या मुक्या जनावरांनी कुणब्यांच्या समृद्ध

जीवनाला साथ दिली, ज्या जनावरांवर त्यांनी मुलाप्रमाणे प्रेम केले, त्या जनावरांना स्वतःच्या पोराबाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांच्यावर विकण्याची पाळी आली. त्यामुळे कुणबी ढसाढसा रडतो आहे. मला वाटते हे तर माणुसकीचे आक्रंदन आहे. कुणब्याच्या ढवळ्या-पवळ्याला कवडीमोल किंमत येत आहे. दुभती जनावरे तो मातीमोल किंमतीला विकायला तयार झाला आहे. परंतु विकत घ्यायला कोणीच तयार नाही. घरोघरी एकच दुःख, एकच आक्रंदन, एकच व्यथा व एकच कथा. परंतु अजूनही त्यांच्या मनात माणुसकीची धुगधुगी टिकून आहे. जगण्याची व जगू देण्याची भावना तग धरून आहे. अजूनही तो 'माणूस' म्हणून जगण्यासाठी धडपडत आहे. अशा या घायकुतीला आलेल्या कुणब्याला, दुष्काळाच्या धगधगत्या वाळवंटात सापडलेल्या लाखांच्या पोशिंद्याला मदतीचा हात देण्यासाठी पुढे सरसावलेले शेठ अरविंदभाई देवदूतासारखे आहेत. "साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा" असे पूर्वी म्हटले जाई. आजच्या काळातले खरे साधुसंत शेठ अरविंदभाई मफतलालच आहेत. त्यांच्या या 'सुखडी' च्या निर्मितीने श्रमिकांच्या घरांत आनंद भरून राहिला आहे.

एकमेका साहय्य करू

दर दोन चार वर्षांनी आपल्या देशात कुठे ना कुठे तरी दुष्काळाचे खग्रास ग्रहण लागते. महाराष्ट्रात तर गेली दोन-तीन वर्षे दुष्काळ तळ ठोकून बसला आहे. महाराष्ट्राला संकटकाळात दुसऱ्याच्या मदतीशिवाय प्राणपणाने झगडण्याची परंपरा आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे नीतिधैर्य व पराक्रम याचे मोजमाप कधी कुणाला सापडले नाही आणि म्हणूनच की, काय कोणास ठाऊक, कसोटीचा क्षण आला की महाराष्ट्र कधी कच खाऊन बसत नाही. संकटकाळाला धाडसाने तोंड देण्यामध्ये तो आपला पुरुषार्थ समजतो. माणुसकी विकून पोट भरण्यापेक्षा स्वकष्टाने व स्वावलंबनाने जगण्यात तो आनंद मानतो.

सर्वसामान्यपणे दुष्काळ आला की, पैसा ओतावयाचा व त्यावर मात करावयाची अशी सर्वसाधारण उपाययोजना असते. परंतु आपल्या

महाराष्ट्र शासनाने याबाबतीत शास्त्रीय दृष्टिकोन पत्करला आहे. जनतेने श्रम केले पाहिजेत. ते उत्पादक श्रम असले पाहिजे. आणि अशाच श्रमाचा मोबदला त्यांना दिला पाहिजे. हे या दृष्टिकोनाचे स्वरूप आहे. काम केल्याशिवाय पैसा मिळावा ही दृष्टी व्यक्तिविकासाला मारक आहे. अशा दुष्काळाच्या काळात सरकारने फुकट पैसा द्यावा असे म्हणणे देखील विनबुडाचे आहे. कारण सरकारजवळ पैसा हा समाजाने दिलेला ट्रस्ट आहे आणि म्हणूनच या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आपण विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत. यासाठी शासनाने व समाजाने हातात हात घालून पुढे चालले पाहिजे. विशेषत: दुष्काळाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढू न देणे, उत्पादकापासून घेतलेला माल ग्राहकापर्यंत पोहचविण्यासाठी विशेष वितरणाची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे व ज्याला काम मिळत नाही त्याला ते उपलब्ध करून देणे, अशा एक ना अनेक गोष्टी आहेत. या सर्व गोष्टी शासन करेल असे म्हणून चालणार नाही. त्यासाठी सोसायटया व ग्रामपंचायती यांच्या साहयाने गावोगावी विहिरी खोदल्या पाहिजेत. जनावरांसाठी पाणी पिण्याचे हौद बांधले पाहिजेत. दुष्काळाच्या काळात प्रत्येकाने आपल्या कामाचा वाटा तर उचलला पाहिजेच, शिवाय इतरांच्या मदतीसाठीही सामोरे आले पाहिजे. "एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" या भावनेनेच कामाला लागले पाहिजे. तरच दुष्काळात केलेली कामे ही दुष्काळाने समाजाला दिलेली देणगीच ठरेल.

आजचा हा शेठ अरविंदभाईंचा सत्कार समारंभ म्हणजे समाजाने कृतज्ञतेच्या भावनेने केलेली माणुसकीची पूजाच आहे असे मी समजतो. अशा या कार्यक्रमातून समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा नाश होऊन सत्प्रवृत्ती बळावतील याबद्दल मला दृढ विश्वास वाटतो.

जयसिंगपूर,
दिनांक १-८-१९७३

हरिजन समाज

टाकवडे हे कोल्हापूर जिल्ह्यातील एक खेडे. या खेड्यातील हरिजन समाज मंदिराच्या उद्घाटन समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

हरिजन समाज-मंदिराच्या उद्घाटनाच्या वेळी आयोजित केलेला हा आजचा समारंभ म्हणजे टाकवडे गावाने पुढे टाकलेले एक पाऊल आहे असे मला वाटते. आताच माझे मित्र श्री. बी. एच्. पाटील यांनी एका हरिजन शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्यासाठी त्यास चार बागायतदार शेतकऱ्यांनी दोन वर्षांसाठी दत्तक घेतल्याची हकिकत सांगितली. हे ऐकून मला आनंद वाटला. कारण आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जरी हरिजन विकासाचे अनेक कार्याद्वारे मंथन झाले असले तरी तो हरिजन समाज सावकारी पाशातून मुक्त झाला आहे असे म्हणता येणार नाही. आज हरिजनांना पतीवर पैसा मिळण्याची सोय उपलब्ध झालेली नाही. खरे पाहता आज निर्जीव पैशाला जेवढी पत आहे, तेवढी जिवत माणसांची पत नाही, हे आजच्या सामाजिक जीवनातील एक विडंबनच होय.

हरिजन समाजाच्या समस्या

भारत देशामध्ये हरिजन समाज या नावाने गणला गेलेल्या दलित समाजाची लोकसंख्या फार मोठी आहे. महाराष्ट्र राज्यातही

ही दलित समाजाची जनसंख्या तितकीच मोठी आहे. त्यांच्या समाज-जीवनातील अनेक अडचणी आहेत. आर्थिकदृष्टचा वहिष्कृत मानले गेलेले आहेत. शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्टचा मागासलेले आहेत. या दलित समाजाच्या माणुसकीला न शोभणाऱ्या या कमतरता आणि उणिवा दूर करण्याचे प्रयत्न निरनिराळ्या पातळ्यावर आतापर्यंत होत आलेले आहेत. त्यावावतीत बरेच काम झाल्यासारखे जरी दिसले तरी दलित समाजजीवनातील या मूलभूत उणिवा त्यांचे जीवन सुरक्षित होऊ शकेल इतपत कमी झालेल्या नाहीत. उलट त्यांची परिस्थिती सुधारण्यामध्ये परागतीच होऊ लागलेली आहे किंवा काय असे वाटू लागते. सर्वच दृष्टीने हा समाज हतबल असल्यामुळे त्याला केव्हाही आणि कुणाच्याही अत्याचाराला बळी पडावे लागते आणि अलीकडे दलित समाजावर निरनिराळ्या प्रकारचे अत्याचारही विदारक स्वरूपात होत असल्याची उदाहरणे नेहमी घडू लागलेली आहेत.

दलित समाजाची प्रगती करीत असताना त्यांची आर्थिक प्रगती आणि सामाजिक समता या दोन्ही गोष्टी मनासमोर उभ्या राहतात. यापैकी कोणती गोष्ट अगोदर करावी यासंबंधी भिन्न भिन्न मते व्यक्त केली जातात. दलित समाजाची प्रगती करीत असताना हे आधी का ते आधी या संबंधीचा शुष्कवाद घालण्यामध्ये मला काही स्वारस्य वाटत नाही. शरीराने आणि मनाने मनुष्य समर्थ असला तरच तो समाजातील अत्याचाराला तोंड देऊ शकतो. शरीर सामर्थ्य आर्थिक परिस्थितीतून निर्माण होऊ शकते. आणि मानसिक सामर्थ्य सामाजिक समतेच्या भावनेने निर्माण होऊं शकते. या दोन्हीही गोष्टी हातात हात घालूनच होत राहिल्या पाहिजेत असे मला वाटते. या गोष्टींचा आणखी थोडा बारकाईने विचार केल्यास दलित समाजाचे आर्थिक प्रश्न मोठ्या जोमाने सोडविले पाहिजेत असा निष्कर्ष निघतो. आर्थिक प्रश्न सुटले आणि तो आर्थिकदृष्टचा समर्थ ठरला तर समा-जातील अत्याचाराला तोंड देण्याचे त्याला सामर्थ्य आणि धैर्य प्राप्त होते. या गोष्टींचा विचार करूनच दलित समाजाच्या विकासाच्या-दृष्टीने अनेक योजना आखण्यात आलेल्या आहेत. आणि अंमलबजाव-

णीही चालू आहे. त्याला पैसाही बराच खर्च होतो. पण या सर्व प्रयत्नातून अपेक्षेप्रमाणे फलप्राप्ती होत नाही ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण शोधण्यासाठी फार दूर जावे लागत नाही. योजना चांगल्या आहेत, योजना करणाऱ्यांच्या भावना आणि हेतू चांगले आहेत, पण त्या योजनांची अंमलबजावणी नीट होत नाही. शिवाय बऱ्याच योजना स्वयंपूर्ण नसतात. म्हणून हरिजन विकासाच्या दृष्टीने ज्या अनेक योजना आखलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी चांगली होऊ शकेल व त्या त्या योजना स्वयंपूर्ण पद्धतीने पूर्ण होऊ शकतील असे कटाक्षाने पाहण्याची आणि तसा प्रयत्न होत राहण्याची नितान्त आवश्यकता आहे.

आणि म्हणून या ठिकाणी काही महत्त्वाच्या हरिजन विकासाच्या योजनाकडे आपले लक्ष वेधू अिच्छितो.

हरिजन विकासाच्या योजना

१) नोकरीमध्ये विशेष वाव करून देणे

या बाबतीत शासनाने चांगली योजना केलेली आहे. शासकीय आणि अर्ध शासकीय नोकऱ्यामध्ये आणि त्याचप्रमाणे सरकारी मालकीच्या आणि सहकारी क्षेत्रामधील उद्योगधंद्यामध्ये दलित समाजाला ३४टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत असे नियम करण्यात आले आहेत. या नियमाप्रमाणे निश्चितपणे ३४ टक्के नोकऱ्या दलित समाजाला मिळू लागल्या तर त्यांना पुष्कळ दिलासा मिळणार आहे. ३४ टक्क्याचे नोकरीतील प्रमाण हे कटाक्षाने अंमलात आणले पाहिजे. आणि सर्वसाधारण परिस्थितीची पाहणी करून ३४ टक्क्याचे हे प्रमाण वाढविण्याचेही प्रयत्न व्हावेत असे मला वाटते. त्याचप्रमाणे शासकीय, अर्ध शासकीय व सरकारी आणि सहकारी उद्योगधंद्यापुरतेच हे मर्यादित न ठेवता समाजात ज्या ज्या ठिकाणी नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात त्या त्या ठिकाणी दलित समाजासाठी नोकरीतील ही टक्केवारी राखून ठेवण्याची योजना झाली पाहिजे. दलित समाजातील लोकांना नोकऱ्या देण्याचे हे प्रमाण व्यापक करण्याची

आणि त्याची अंमलबजावणी चोख करण्याची नितान्त गरज आहे. आणि ते कोणत्याही परिस्थितीत झाले पाहिजे, या निर्धाराने या गोष्टीची अंमलबजावणी महाराष्ट्रात होत राहावी असे मला वाटते.

२) शेतजमीन विकास

हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. दलित व हरिजन मंडळीना व भूमिहीनाना अग्रक्रमाने व मालकीहक्काने शेतजमिनी उपलब्ध करून देण्याची चांगली योजना शासनाने आखली आहे. जी जी जमीन उपलब्ध होऊ शकेल ती जमीन अग्रक्रमाने हरिजन आणि दलित लोकांना कायम हक्काने देण्यात येते. अशी हजारो एकर जमीन आजपर्यंत हरिजन समाजातील लोकांना देण्यात आलेली आहे. पण ज्यांना त्या जमिनी मिळाल्या आहेत त्यांच्या आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्याची कारणे अगदी उघड आहेत. अशा देण्यात आलेल्या जमिनी या मुळातच निकृष्ट प्रतीच्या आहेत. केवळ जमिनी देऊन हे काम होणार नाही. निकृष्ट जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी करावा लागणारा खर्च करण्याची शक्ती त्या लोकांची नसते. शेतीधंद्याला भांडवल खूप लागते. अितरही साहित्यसाधने लागतात. या दृष्टीने विचार करता या दलित समाजाला शेती देताना भांडवल व इतर साहित्य पुरवण्याचे काहीच योजनाबद्ध प्रयत्न होऊ शकलेले नाहीत. म्हणून आजपर्यंत हजारो एकर जमीन हरिजन लोकांना देण्यात आली असली तरी ती जमीन जमिनीच्या ठिकाणी राहिलेली आहे आणि ती ज्यांना दिलली आहे ती मंडळी आर्थिकदृष्टचा ज्या परिस्थितीत होती त्याच परिस्थितीत आहेत. किंवहुना ती अधिकच अडचणीत आलेली आहेत. हरिजन समाजाकडे मूळच्या ज्या जमिनी आहेत, त्यापैकी बऱ्याच चांगल्या जमिनींचे हस्तांतर होऊन गेलेले आहे. हरिजनांना शेतजमीन देऊन त्यांची परिस्थिती सुधारण्याचा जो प्रयत्न होत आला आहे आणि होत राहिला आहे, त्याची चांगल्यारितीने फेरतपासणी झाली पाहिजे. आणि दिलेल्या जमिनी आणि यापुढे देण्यात येणाऱ्या जमिनी योग्य–

रितीने लागवडीखाली येऊ शकतील आणि त्यातून शेतीचे उत्पादन चांगले निघू शकेल अशा दृष्टीने त्यासाठी लागणारे भांडवल व इतर साहित्यसाधने अग्रक्रमाने देण्याचा विचार विनाविलंब व्हावा असे मला वाटते.

हरिजन विकासाच्या निरनिराळ्या अशा योजनांचा अधिक विस्ताराने उल्लेख करता येईल. पण मला ज्या अतिशय महत्त्वाच्या गोष्टी वाटल्या त्या दोन गोष्टींचा उल्लेख मी येथे केलेला आहे. या दोन योजनांची अंमलबजावणी चांगल्यारितीने व ठोकरितीने होऊ शकली तर हरिजन व दलित समाजाचा विकास होण्यास खूपच मदत होणार आहे, असे मला वाटते.

या योजनांची अंमलबजावणी केवळ शासनच करील असे समजून आपण स्वस्थ वसू नये. आपल्या गावातील सर्वश्री सातगोंडा पाटील, श्री. बाबू चौगुले व श्री. बी. एच्. पाटील ही कार्यकर्ती मंडळी यथाशक्ती हे कार्य करीतच आहेत. असे कार्य आपल्या देशातील प्रत्येक गावात जर झाले तर आजचा दलित समाज नवी उमेद घेऊन उभा राहील, याबद्दल मला आत्मविश्वास वाटतो.

टाकवडे,
दिनांक २१-१-१९७३

कुंभार : संस्कृतीचा शिल्पकार

कोल्हापूर येथील कॉलेज ऑफ कॉमर्सच्या सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्य कुंभार उद्योग परिषद सम्मेलन समारंभाचे वेळी उपस्थित असलेल्या कुंभार समाजाला उद्देशून दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मौलिक मार्गदर्शन.

आज आपण कुंभार समाजाच्या व्यवसायातील सुखदुःखांचा आढावा घेण्यासाठी येथे जमलो आहोत. कोणताही ग्रामीण व्यवसाय हा ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाचा प्रमुख मार्ग आहे. सर्वच ग्रामीण व्यवसाय ग्रामप्रधान भारत देशातील आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. यासाठी ग्रामोद्योगाच्या सर्वांगीण विकासाची रूपरेषा तयार करून भारत बलवान केला पाहिजे. भारत स्वयंपूर्ण व समर्थ करण्यासाठी ग्रामोद्योगाकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये हे व्यवसाय केवळ जिवंत कसे राहतील एवढ्याच दृष्टीने न पाहता भारतीय समाज जीवन समृद्ध करण्याच्या दृष्टिकोणातून या ग्रामोद्योगाची फेरआखणी केली पाहिजे.

भारत हा ग्रामप्रधान तसेच शेतीप्रधान देश आहे. १२ बलुतेदारांचा देश आहे. फार पुरातन कालापासून या बारा बलुतेदारांचे ग्रामीण व्यवसाय आपल्या देशात अखंडपणे सुरू आहेत. ग्रामीण समा-

जाच्या विकासाचे मूळ ग्रामोद्योगामध्ये सामावलेले आहे. ग्रामीण समाज हा परस्परावलंबी असतो. परस्पर सहकार्यातूनच त्यांचे सुखी जीवन आकार घेत असते. संपूर्ण ग्रामीण समाजाच्या अखंड वांधणीत या वारा बलुतेदारांचा सिंहाचा वाटा आहे, हे विसरता कामा नये.

ग्रामीण समाजोन्नतीचे रहस्य

सर्व ग्रामोद्योगामध्ये कुंभकाराचा व्यवसाय हा चिरंतन चालणारा व्यवसाय आहे. आज देखील शेतकऱ्याच्या घरामध्ये उभी असलेली "उतरंड" हे या चिरंतनतेचे प्रतीक म्हणता येईल. "उतरंड" म्हणजे शेतकऱ्याच्या वैभवाचे द्योतक होय, शेतकऱ्याच्या संस्कृतीचे चिन्ह होय. ईश्वर हा सृष्टीचा कुंभकार तर कुंभार हा संस्कृतीचा शिल्पकार होय. अशा परंपरागत शिल्पकारांच्या जीवनमानाचा व त्यांच्या उद्योग धंद्याचा पोहोच समाजाने ठेवला पाहिजे. कारण कुंभारांचे उद्योग धंद्याच्या रक्षणातच संस्कृतीचे खरे संवर्धन सामावलेले आहे. ग्रामीण समाजाच्या उन्नतीचे रहस्य या उद्योग धंद्यामध्ये आहे. कारण प्रत्येक ग्रामीण उद्योगधंदा हा ग्रामीण विकासाच्या मार्गावरील एक महत्त्वाचा दुवा आहे. हे आज विसरता कामा नये.

कुंभार व्यवसायावर कुऱ्हाड

भारतीय स्वातंत्र्याचे प्रवर्तक महात्मा गांधीनी समस्त समाजाला " खेड्याकडे चला " असा जो संदेश दिला त्या पाठीमागील भूमिका होती, स्वानुभूतीमधून स्वावलंबी समाजाची बांधणी. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या देशात झपाट्याने यांत्रिकीकरणाचे नवे पर्व जन्मास आले. त्यामुळे भारतात पुरातन कालापासून चालत आलेले विविध प्रकारचे ग्रामोद्योग आधुनिक युगातील यांत्रिकीकरणामुळे नष्टप्राय होतात की काय अशी भीती आज निर्माण झालेली आहे. तेव्हा कुंभार व्यवसायावर कोसळलेल्या या कुऱ्हाडीमुळे हा व्यवसाय समूळ नष्ट होईल किंवा काय अशी भीती निर्माण झालेली आहे. यासाठी आज हा कुंभार व्यवसाय केवळ जगविला पाहिजे, एवढेच नव्हे तर तो समृद्ध

केला पाहिजे. कारण हा व्यवसाय समाजाची अेक निकडीची गरज म्हणून जीवंत ठेवणे क्रमप्राप्त आहे. काळाच्या कठोर प्रहाराने मरणोन्मुख झालेल्या ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य केवळ शासनाचेच आहे असे नाही तर ते समाजाचेही आहे.

ग्रामोद्योगाचे आधुनिकीकरण व्हावे

कोणताही व्यवसाय समाजाची गरज म्हणून जन्माला येतो. परंतु काळाच्या ओघामध्ये काही व्यवसाय जिवंत राहातात तर काही व्यवसाय समूळ नष्ट होतात. आजच्या यांत्रिकीकरणाच्या काळातदेखील जिवंत असलेला कुंभार व्यवसाय समाजाची मूलभूत गरज म्हणून समाज जीवनाशी समरस झालेला व्यवसाय आहे हे नाकबूल करता येणार नाही आणि म्हणून बदलत्या काळामध्ये कोणताही ग्रामोद्योग बंद करण्याऐवजी त्याचा चेहरामोहरा बदलणे व त्याला सुस्थितीत आणणे अत्यंत आवश्यक आहे. 'समाज विकासासाठी ग्रामोद्योग' हे तत्त्व उराशी बाळगूनच कृती केली पाहिजे. यासाठी गांवोगांवी कुंभारांच्या सहकारी संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. शासनाने त्यांना जागा आणि जमिनी दिल्या पाहिजेत. अेखाद्या उद्योगासाठी शासन ज्याप्रमाणे जमीन, पाणी, वीज व कच्चा माल पुरविते, त्याप्रमाणे याही उद्योगाला शासनाने सहकार्याचा हात दिला पाहिजे. सहकारी तत्त्वावर नवनव्या वस्तूंची व वास्तूंची निर्मिती करून हा व्यवसाय जिवंत ठेवला पाहिजे. अशा पद्धतीने जुने उद्योग किफायतशीरपणे चालविण्यासाठी त्यांचे आधुनिकीकरण करणे क्रमप्राप्त झालेले आहे.

ग्रामोद्योग व संशोधन

सध्याच्या ग्रामोद्योगाचे अखिल भारतीय पातळीवर प्रथम संशोहोणे आवश्यक आहे. अशा संशोधनातून ग्रामीण उद्योगापुढे उभ्या ठाकलेल्या समस्या कोणकोणत्या आहेत व त्यावर काय उपाय योजना करता येतील हे ठरविले पाहिजे. खरे पाहता अशा संशोधनातून

ग्रामोद्योगांच्या उपयुक्ततेबद्दलची एक मानसिक प्रक्रिया समाजातील सर्व थरापर्यंत नेऊन पोहोचविता येईल.

भारतीय समाजामध्ये कुंभार समाजाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. कारण कुंभार हा मातीतून माणूस घडविणारा शिल्पकार आहे. तो भारतीय संस्कृतीचा खरा रक्षणकर्ता आहे. तेव्हा ही संस्कृती टिकविण्यासाठी शासनाकडून साहाय्य मिळविण्यासाठी आपण आवश्यक ते प्रयत्न करू. त्यासाठी माझेही सतत प्रयत्न राहतीलच. शासनाकडून केवळ घेण्याचाच दृष्टीकोण न ठेवता देण्याची भावनाहि ठेविली पाहिजे. आमचा हात देण्यासाठी वर असला पाहिजे घेण्यासाठी नव्हे. शासन आपल्या सर्व अडचणी दूर करील अशा भ्रमात न राहता स्वप्रयत्नाने आपणच आपल्या अडचणी सोडविल्या पाहिजेत. त्यासाठी ग्रामीण भागातील सामाजिक कार्यकर्त्यांनी जागृत राहिले पाहिजे. ग्रामीण उद्योग धंद्यामधील कुंभार कामाचे महत्त्व ओळखून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आपण सर्वांनी झटले तरच हा व्यवसाय आपल्या देशाचे भाग्य उजळून टाकणारा एक प्रमुख व्यवसाय ठरेल.

कोल्हापूर,
दिनांक ६-६-१९७०

विचारवंतांना आव्हान

सांगली येथील गुरुवर्य श्री. दत्तोपंत आपटे यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभाचे निमित्ताने उपस्थित समाजापुढे दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी मांडलेले उद्‌बोधक विचार.

गुरुवर्य दत्तोपंत आपटे यांच्या षष्टयब्दिपूर्ती समारंभाचे निमंत्रण मिळाल्यानंतर आज प्रत्यक्ष समारंभात राहण्याचे भाग्य मला लाभत आहे. गुरुवर्य आपटे यांचे कार्य व विचार सांगली जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभाव पाडून राहिले आहेत, याची मला कल्पना आहे. आज या ठिकाणी जमलेला जनसमुदाय पाहून असे वाटते की, हा समारंभ म्हणजे गुरुवर्य आपटे यांच्या सत्काराचा नसून त्यांच्या ठिकाणी असलेल्या सद्‌गुणांची पूजा बांधण्याचा समारंभ आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जेथे सद्‌गुणांची मोठी उणीव दिसू लागली तेथे सद्‌गुणांची पूजा बांधण्याचा हा समारंभ फार महत्त्वाचा समारंभ आहे, असे मला वाटते. अशी पूजा जेथे जेथे चाललेली असते तेथे तेथे उपस्थित राहताना मला आनंद वाटतो. स्वातंत्र्योत्तर काळात जेथे लोकांना स्वराज्याच्या स्वानुभूतीचा विसर पडत चाललेला आहे, राष्ट्रीय भावना ओसरत निघाली आहे व लोकशाहीच्या खऱ्या मूल्यांची अजून ओळख पटेनाशी झाली आहे. अशा या गंभीर व संक्रमणाच्या

काळात येथे जमलेल्या विचारवंतापुढे मला माझे मनोगत प्रकट करण्याची संधी मिळत आहे हे मी माझे भाग्य समजतो.

१५ ऑगस्ट, १९४७ साली आपला भारत देश स्वतंत्र झाला. भारतामध्ये स्वाभाविकपणेच नवचैतन्य निर्माण झाले. गेल्या २३ वर्षांत स्वराज्याचे सुराज्य करण्याचा आणि स्वातंत्र्याची अनुभूती सर्वसामान्यांना आणून देण्याचा प्रयत्न आपल्या देशामध्ये चालू आहे. परंतु या कार्याचे इच्छित ध्येय अद्याप फलद्रूप होऊ शकलेले नाही, ते फलद्रूप होण्याच्या दृष्टीने तीन महत्त्वाच्या गोष्टीची चिंता देशातील सर्व थरातील विचारवंतांनी करण्याची आज नितान्त आवश्यकता निर्माण झालेली आहे असे मला वाटते.

राष्ट्रीय भावनेचे संवर्धन

भारत देश स्वतंत्र झाला त्या वेळी देशाच्या त्या वेळेपर्यंतच्या वैभवशाली अशा इतिहासामध्ये कधीही घडून आल्या नव्हत्या अशा दोन मौलिक गोष्टीचा आविष्कार स्वातंत्र्यावरोवर आपल्या देशात घडून आला. भारत देश एका निशाणाखाली, एका घटनेखाली, एका शासनाखाली आला आणि एकसंघ भारत देश पूर्वी कधीही नव्हता, असा निर्माण झाला. ही घटना भारतीय इतिहासामध्ये अद्‌भुत अशीच घडून आली. भारत देश घटनेने एक झाला असला तरी तो अंतःकरणाने अद्याप एक झालेला नाही. फुटीर आणि देशविघायक अशा प्रवृत्ती वळावत चालल्या आहेत· राज्याला स्वतंत्र निशाणाची मागणी करण्यापर्यंत तामीळनाडूसारख्या प्रदेशात मजल गेली आहे. भाषाभेद जातीय वैमनस्य, प्रादेशिक भावना या फुटीरतेच्या मार्गाने विस्कळितपणा निर्माण करणाऱ्या गोष्टी रुजू पाहात आहेत. थोडक्यात राष्ट्रीय भावना भंग पावत असून एकराष्ट्रीयत्व निर्माण होऊ शकलेले नाही. जातीय भावनेचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणामध्ये होत चालला आहे. प्रादेशिक भावनेने वितुष्ट निर्माण होत आहे. राष्ट्रीय भावना, जातीय ऐक्य, प्रादेशिक एकता या भावना बळावण्याचा आणि सर्वांगपरिपूर्ण

राष्ट्रीय एकता कशी निर्माण होऊ शकेल याची चिंता जागृत विचारवंतांनी करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

लोकशाहीची जोपासना

१५ ऑगस्ट, १९४७ साली आपल्या भारत देशात स्वातंत्र्य निर्मितीबरोबरच दुसरी एक मोठीच अशी घडलेली घटना म्हणजे आपल्या भारत देशात या पूर्वी कधीही निर्माण झाले नव्हते असे लोकशाहीचे राज्य निर्माण झाले. सर्वसामान्य जनतेच्या मालकीचे राज्य प्रस्थापित झाले व मानवी जीवन फुलविणारी ही घटना घडून आली. परंतु स्वराज्य मिळाल्यापासून आतापर्यंत २३ वर्षात आपल्या देशात मनोमन लोकशाही निर्माण होऊ शकलेली नाही. लोकशाही राज्यातील महत्त्वाचा घटक "लोक" म्हणजेच जनता याचाच विसर पडत चाललेला आहे. "लोकभावना" कमकुवत होत निघाली आहे. अराष्ट्रीयतेची भावना देशात वाढत निघालेली आहे. लोकशाहीला हा फार मोठा धोका आहे. त्यासाठी लोकशाहीचे रक्षण आणि लोकशाहीची जोपासना खऱ्या अर्थाने आपल्या देशात कशी होऊ शकेल याची चिंता जागृतपणे भारत देशातील सर्व थरातील विचारवंतांनी करण्याची नितान्त आवश्यकता आहे.

स्वराज्याची स्वानुभूति

राष्ट्रीय अेकतेची भावना निर्माण करणे आणि लोकशाहीची जोपासना करणे यासाठी आपल्या देशाला मिळालेल्या अभिनव स्वराज्याची स्वानुभूती समाजातील सर्वसामान्यांना आणून देण्याची आवश्यकता आहे. सर्व सामान्यांच्या जीवनामध्ये आवश्यक असलेले सुखस्वास्थ्य निर्माण झाले तरच ही स्वराज्याची स्वानुभूती त्यांना लाभणार आहे. जनतेच्या सुखस्वास्थ्याबरोबरच त्यांच्यातील स्वाभिमानाची जोपासना होण्याची गरज आहे. लाचारीतून आणि परावलंबी भावनेतून निर्माण झालेले आर्थिक सुख व स्वास्थ्य माणसाला स्वाभिमानशून्य बनविते. लोकशाही राज्यव्यवस्थेत लाचारी आणि स्वाभिमानशून्यतेला स्थान नाही. आज आपल्या देशात एका बाजूला

दुर्दैवाने आर्थिक समता निर्माण करण्याच्या आवेशामध्ये राष्ट्रीय भावना, जातीय ऐक्य आणि लोकशाहीची जोपासना याला दुय्यम स्थान प्राप्त होऊ पाहात आहे. तर दुसऱ्या बाजूने राष्ट्रीय भावना आणि लोकशाही यांची जोपासना करण्याच्या आवेशामध्ये सर्वसामान्यांना स्वास्थ्य मिळवून देऊन स्वराज्याची स्वानुभूति त्यांना जाणवून देण्याच्या कामाची अवहेलना होत आहे. भारतीय स्वातंत्र्य आणि लोकशाहीचे राज्य अशा दुहेरी कैचीत सापडले आहे.

देशाला विघातक अशा दुहेरी कैचीतून सोडविण्यासाठी देशातील विचारवंतांनी खरी राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही जोपासन करणे, तसेच स्वराज्याची स्वानुभूति सर्वसामान्यांना आणून देण्यासाठी सर्वसामान्यांच्या जीवनाला स्वाभिमानपूर्ण व व स्वावलंबी असे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक सुखस्वास्थ्य निर्माण करुन देणे, या गोष्टींची चिंता तीव्रतेने करण्याची आज नितान्त आवश्यकता आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.

देशातील सध्याच्या परिस्थितीसंबंधी माझ्या मनातील विचार आणि भावना आजच्या श्री. आपटे गुरुजींच्या षष्टचब्दिपूर्ती समारंभ दिनानिमित्ताने येथे आपणासमोर व्यक्त केल्या आहेत. या सर्व गोष्टींचा विचार देशातील सर्व थरातील विचारवंतांनी करावा एवढीच माझी विनंती आणि अपेक्षा आहे. मा. श्री. दत्तोपंत आपटे गुरुजींच्या पुढील कार्याला सुयश चिंतून त्यांना परमेश्वराने उदंड आयुष्य आणि आरोग्य द्यावे अशी इच्छा व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

सांगली,
दिनांक २०-४-१९७२

हेचि फळ काय मम तपाला !

कोल्हापूर येथील साळुंखे नगरात दे. भ. रत्नाप्पा कुंभार व इतर दोन स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सीमावादावरून घडलेल्या घटनांचा दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी विषण्ण मनाने आपल्या भाषणात घेतलेला आढावा.

आज साळुंखेनगर सेवा मंडळातर्फे आम्हा स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार समारंभ आपण आयोजित केला ही जरी आनंदाची गोष्ट असली तरी लोकांची मने फाटलेली असताना, छिन्नविछिन्न झालेली असताना हा सत्कार स्वीकारणे मला योग्य वाटत नाही. गेल्या १५ दिवसात सीमावादाच्या संदर्भात घडलेल्या दुःखद घटनामुळे माझ्या मनाला अत्यंत वेदना झाल्या आहेत. खरे पाहता भाषावाद प्रांतरचनेची गांधीजीनी जेव्हा मांडणी केली, तेव्हा त्या त्या प्रांताची संस्कृती, विचार, भावना व भक्ती यांना कोठेही तडा न जाता त्याचे संवर्धन व्हावे हा मूळ विचार होता. परंतु या भाषावाद प्रांतरचनेत राजकारण शिरल्यामुळे हा प्रश्न गुंतागुंतीचा व लवचिक झाला आहे. भाषावाद प्रांत रचनेमागील गांधीजींच्या तात्त्विक व विधायक दृष्टिकोनाचा विसर पडल्यामुळे आज विध्वंसाला ऊत आला आहे. स्वातंत्र्य मिळविताना आम्हा स्वातंत्र्य सैनिकांच्या काळजाला घरे पाडणारा हा प्रसंग आहे. आणि म्हणून अेका बाजूला या सत्कारा-

बद्दल आनंद व दुसऱ्या बाजूला या गंभीर परिस्थितीची वेदना अशी माझी द्विधा मनःस्थिती झालेली आहे. तेव्हा अशा गंभीर स्थितीमुळे माझ्या मनाला झालेल्या वेदना सांगण्यासाठी मी आज येथे आलो आहे.

विध्वंसक प्रक्षोभ नको

" आता लवकरच सूर्योदय होईल व आपण मिटलेल्या कमळातून आपली सुटका करून घेऊ " अशी भाबडी आशा बाळगणाऱ्या भ्रमराला शेवटी जशी " हा हंत हंत " म्हणण्याची पाळी येते, तशीच काहीशी अवस्था गेली १७ वर्षे भिजत पडलेल्या सीमावादाच्या प्रश्नासंबंधी मराठी जनतेची झालेली आहे. महाराष्ट्र शासनाने हा प्रश्न केन्द्र सरकारकडे सोपविलेला आहे, केंद्र शासनाने या बाबतीत आता आपली जबाबदारी पार पाडावयाची वेळ येऊन ठेपलेली आहे. गेल्या १५ दिवसात कर्नाटक व महाराष्ट्रात घडलेल्या दुर्घटनांची नोंद घेऊन जरूर वाटल्यास पार्लमेंटची खास बैठक बोलावून केंद्र शासनाने अनेक वर्षे लोंबकळत पडलेला हा प्रश्न न्याय पद्धतीने त्वरित सोडवावा असे मला वाटते. कारण वस्तुस्थितीचा कानोसा घेतला तर या प्रश्नाबाबत महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यातील शासनाची आणि जनतेची भूमिका काय आहे हे आता जगजाहीर झालेले आहे, त्यामुळे ही दोन्ही राज्ये आपआपसात विचारविनिमय करून हा प्रश्न सोडवू शकतील असे मला वाटत नाही. याबाबतीत केन्द्रानेच पुढाकार घ्यावयास पाहिजे. आमचा पंतप्रधान इंदिराजी गांधीवर विश्वास आहे. त्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळेल याचीही खात्री आहे. तेव्हा सध्याच्या वातावरणाची दखल घेऊन या प्रश्नाची तातडीने सोडवणूक करणे हिताचे ठरणार आहे. आणि म्हणून आज महाराष्ट्रातील जनतेच्या प्रक्षोभाशी मी सहमत असलो तरी विध्वंसक वृत्ती मला मुळीच मान्य नाहीं. कारण विध्वंसक प्रक्षोभ सर्व नाशाचे मूळ असतो.

खरी कारणमीमांसा

एखाद्या प्रश्नासंबंधी आपल्या भावना कितीही तीव्र झाल्या तरी तो प्रश्न विध्वंसक वृत्तीने सोडविणे हितावह ठरणार नाही. कोणत्याही प्रश्नासाठी एका विशिष्ट टोकाला जाऊन ज्यावेळी दंगली होतात तेव्हा त्या पाठीमागील खरी कारणमीमांसा तुम्ही आम्ही जाणून घेतली पाहिजे. सन १९५६ मध्ये भाषावाद राज्यरचना करताना बेळगांव कारवार, सुपे, व हळयाळ आदि मराठी भाषिक विभाग हेतुपूर्वक महाराष्ट्रापासून तोडून कर्नाटकास जोडण्यात आले. वस्तुतः ज्या कारणासाठी भाषावार प्रांतरचना जन्मास आली, त्यानुसार हा भाग महाराष्ट्राला जोडणे अत्यावश्यक होते. परंतु बेळगांव, कारवार हा महाराष्ट्राचा दक्षिण सीमा भाग महाराष्ट्रापासून तोडण्यात आला. महाराष्ट्राच्या भाषिक गटाविषयीच्या मागण्या कितीही न्याय्य असल्या तरी त्या मानावयाच्याच नाहीत, या दृष्टिकोनातून महाराष्ट्रापासून बेळगांव, कारवार तोडण्यात आला. परंतु महाराष्ट्राची बेळगांव, कारवारची मागणी न्याय आहे हे गेल्या १६ वर्षामध्ये सीमा भागात ज्या ज्या निवडणुका झाल्या त्यावरून दिसून येते. सीमा भागातील मराठी नागरिकांनी लोकशाही संकेत व न्याय मार्गाने आपल्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली आहे. आणि म्हणून बेळगांव व इतरत्र मराठी भाषिकावर अन्याय झाल्याने त्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रभर होणे स्वाभाविकच होते. परंतु प्रतिक्रिया हिंसक कृती करून प्रकट करण्यामुळे आपल्या न्याय्य मागण्यांना वेगळे वळण लागण्याचा धोका असतो हेही आज आपण विसरता कामा नये.

इथल्या इथे व आताच्या आता

आज महाराष्ट्रातील जनतेच्या भावना जाणून घेतल्यानंतर सीमावादाची सोडवणूक किती निकडीची आहे हे दिसून येते या वादग्रस्त प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी वाटेल ते करण्याची माझी स्वतःची तयारी आहे. काही विरोधी पक्षातील मंडळी या प्रश्नावर राजीनामा

मागत आहेत. राजीनामा देऊन प्रश्न सुटणार असेल तरी राजीनामा देऊ अशी ग्वाही देण्यापेक्षा राजीनामा खिशात ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची माझी तयारी आहे. आम्ही राजीनामे खिशात ठेवून काम करीत राहणारी माणसे आहोत आणि म्हणून आज माझे तरी असे स्पष्ट मत आहे की, हा सीमावादाचा प्रश्न "इथल्या इथे व आताच्या आता" याप्रमाणे सोडविला पाहिजे. कारण आज गेली १७ वर्षे हा प्रश्न लोंबकळत पडला आहे, परंतु आता मात्र सीमा प्रश्नाची सीमा ओलांडण्याची वेळ आली आहे.

कृती व उक्ती यामध्ये मेळ पाहिजे.

सीमावादाच्या निमित्ताने जनतेने केलेल्या उग्र आंदोलनामागील हेतू लक्षात घेता जनतेची या प्रश्नावावतची सहनशक्ती संपुष्टात आलेली आहे असे मला वाटते. आणि म्हणूनच या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी न्याय्य मार्गाचा अवलंब करण्याची ही वेळ आहे. यासाठी आजच्या तरुणांनी विवेकशील वृत्तीने व व्यापक सहानुभूतीच्या भावनेने या प्रश्नाकडे पाहावे. स्वत:चे रक्त सांडून स्वराज्य मिळविणारी आम्ही मंडळी आहोत. आजवर आम्ही तरुण पिढीला दोषी ठरविण्यात व आपण करतो ते वरोवर आहे असे मानण्यात भूषण मानले. परंतु आम्ही त्यांच्यापुढे ध्येयवादी आदर्श ठेवला आहे का या गोष्टीचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे असे मला वाटते. आमचे बोलणे वेगळे व वागणे वेगळे आहे. जे करायला पाहिजे ते आम्ही बोलत नाही आणि जे बोलतो ते कधी करीतच नाही. तेव्हां कृती व उक्ती यांचा मेळ वसवायचा कसा? आणि म्हणून सीमावाद सोडविण्यासाठी आपण निर्धाराचा व संयमपूर्वक कार्यक्रम आखून तो सत्वर पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले पाहिजे.

आज देशाची परिस्थिती पाहून माझ्या मनाला सारखे वाटते की, "हेचि फळ काय मम तपाला!" आज सामान्य माणसामध्ये आढळणाऱ्या उत्कट देशभक्तीमुळेच देश टिकून राहिला आहे. सामान्य माण-

साच्या मनात जनतेबद्दल ज्या सद्भावना आहेत त्या भावनावरच देश आहे. आपण आज या ठिकाणी आमचा भावपूर्ण सत्कार केलात. या सत्कारातून तुम्ही जरी आम्हा स्वातंत्र्यसैनिकावरील प्रेम व्यक्त केले असले तरी या कार्यक्रमातून तुम्ही आम्हाला "आमच्या शुद्ध चारित्र्याला जपण्याविषयीचा" व समाज कार्याची फिरून उजळणी करण्याचा इशारा दिलेला आहात. तो इशारा मान्य करूनच माझ्या उजव्या व डाव्या बाजूला बसलेल्या सत्कार मूर्तीनी पण या इशाऱ्याची दक्षता घेऊन लोक कल्याणाच्या कामी आपले जीवन वेचावे अशी अपेक्षा बाळगून मी माझे भाषण संपवितो.

साळंखेनगर–कोल्हापूर
दिनांक २५–१२–१९७३

समाज आणि संस्कृति

उगार शुगर मिल येथील कामगार मंडळाच्या सांस्कृतिक केंद्राच्या उद्घाटनाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्मिक विवेचन

मित्रहो, आपल्या सांस्कृतिक मंडळाचे सेक्रेटरी श्री. भाऊसाहेब नाईक यांनी माझी ओळख करून देताना सांगितले की, अखिल भारतीय काँग्रेसमध्ये पोलादी पुरुष म्हणून गौरविलेले सरदार वल्लभभाओ पटेल, पुरुषोत्तमदास टंडन, बाबू राजेंद्रप्रसाद व काकासाहेब गाडगीळ वगैरे मान्यवर ध्येयवादी मंडळीच्या मालिकेतील व म. गांधीच्या विचारांचा ज्यांच्यावर फार मोठा पगडा आहे असे पाहुणे आज आपणास लाभलेले आहेत. जरी मी तेवढा मोठा नसलो तरी त्यांच्या वैचारिक बैठकीचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झालेला आहे असे मलाही आपणास अभिमानाने सांगावेसे वाटते. म. गांधीच्या शिकवणीमधील अहिंसक पुरुषार्थाच्या तत्त्वाची कास धरून आपण स्वराज्य मिळविले. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वीस वर्षांनी त्या अहिंसक पुरुषार्थापासून आपण वंचित होत आहोत ही चिंता करण्यासारखी गोष्ट आहे. म. गांधीचा स्वराज्य मिळविण्याच्या पाठीमागील हेतु व स्वराज्य मिळविण्यासाठी हिरीहिरीने भाग

घेणाऱ्या क्रांतीवीरांची चित्तथरारक जीवनगाथा यांचा आढावा घेतला की, आग्रहाने आपणापुढे असे प्रतिपादन करावेसे वाटते की, म. गांधीजींना स्वराज्याचे रामराज्य करून दाखवावयाचे होते. आणि अशा वेळी तुम्ही आम्ही सामान्य कार्यकर्त्यांनी अहिंसक पुरुषार्थाची अजूनही जाणीव असलेल्या सामान्य जनतेच्या सुखासाठी अधिक झटले पाहिजे, असे माझे अत्यंत प्रामाणिक मत आहे.

मराठी रियासतीच्या अस्तानंतर हाती तागडी घेऊन आलेल्या अिंग्रजांच्या हाती जरी भारताची सत्ता आली होती तरी भारतीयांच्या हृदयात छ. शिवरायांनी पेटविलेली स्वातंत्र्याची ज्योत संपूर्ण विझली नव्हती. भारतीय समाजातील फितुरीच्या दोषामुळे जरी हिंदवी स्वराज्य संपुष्टात आले असले तरी धगधगत्या अंतःकरणाने स्वाभिमान दुखवल्या गेलेल्या स्वातंत्र्यप्रिय वीरांच्या मनांत आग धुमसतच राहिली होती. त्याच्या ठिणग्या अिंग्रजांना सतत ग्रासून राहिल्या होत्या. स्वातंत्र्यलक्ष्मी झाशीच्या राणी लक्ष्मीबाईपासून म. गांधींच्या अखेरच्या "चलेजाव" च्या चळवळीपर्यंत देशांत अनेक लोकांनी वेळोवेळी आत्माहुत्या देऊन अिंग्रजी सल्तनतीला वारंवार हादरे दिले आहेत. या जुन्या अितिहासाची आठवण मला आज होत आहे.

सद्‌गुणांची जोपासना

आपण ज्याला समाज म्हणून समजतो तो समाज म्हणजे केवळ जनसमुदाय नव्हे. अनेक धर्म, भाषा, वर्ण, वंश व रीतिभातीनी एकसंघ असलेला जनमानस म्हणजे समाज होय. अशा समाजाची जडण घडण शतकानुशतके चाललेली असते. जगाच्या पाठीवर कोणताहि समाज ज्यावेळी जीवन जगतो आहे असे आपण जेव्हा म्हणतो याचा अर्थ काय ? समाज जीवन जगतो तो केवळ भौतिक सामर्थ्याच्याच जोरावर नाही तर शतकानुशतके त्याच्या जवळ असलेल्या सांस्कृतिक संपत्तीच्या जोरावर, सांस्कृतिक मूल्यांवर व सांस्कृतिक परंपरेवरच

तो जीवन जगत असतो. आपल्या देशाची सांस्कृतिक परंपरा व्यास–वाल्मिकीपासून सुरू होते. मुकुंदरायापासून कवि मर्ढेकरापर्यन्त किंवा ज्ञानोबापासून विनोबापर्यन्त आपल्या देशाची सांस्कृतिक परंपरा सांगता येईल. तेव्हा आजचा महाराष्ट्र संतांच्या, पंतांच्या, तंतांच्या, सेवकांच्या व साधकांच्या सांस्कृतिक परंपरेतून निर्माण झालेला आहे. अशा सर्वोच्च सांस्कृतिक परंपरेची प्रेरणा घेऊनच आपण स्वराज्यही मिळविले आहे. आज स्वातंत्र्योत्तर कालामध्ये आपल्या देशाच्या महान सांस्कृतिक परंपरांचा विसर पडू नये म्हणून, आज देशात सांस्कृतिक जीवनाशी निगडित अशा कार्याची पूजा आज बांधली जात नाही, म्हणूनच जनतेमध्ये लाचारी आणि स्वार्थी भावनांचा नंगानाच चाललेला आहे. स्वाभिमान, निर्भयता, औदार्य, देशनिष्ठा आणि प्रामाणिकपणा अशा सद्‌गुणांची जोपासना करण्याच्या उद्देशाने आपण स्थापन केलेल्या सांस्कृतिक मंडळास फार मोठे कार्यक्षेत्र आहे असे मी मानतो.

साखर कारखाना : संस्कृतीचे माहेरघर

मानवी जीवनाची धडपड सतत स्वतःच्या सुख–समृद्धीसाठी चालत आलेली आहे. परंतु मानवाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ संपत्तीवर करणे चुकीचे ठरेल. मानवाच्या ठायी निर्मळ अंतःकरणाचा अभाव असेल तर संपत्तीचा मोह कवडी-किंमतीचा ठरेल. आजचे साखर कारखाने आर्थिक उत्पादनातून अधिक संपत्ती निर्माण करू लागले आहेत हे खरे आहे. परंतु या संपत्तीचा उपयोग कारखान्याच्या परिसरातील खेडेगांवच्या संस्कृति–संवर्धनासाठी जोपर्यन्त होत नाही तोपर्यन्त ही संपत्ती व्यर्थ आहे. प्रत्येक साखर कारखान्याने आपल्या परिसरातील गावांचा आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास साधून संपूर्णपणे कायापालट घडवून आणला पाहिजे. मला आपणास येथे असे सांगावेसे वाटते की प्रत्येक साखर कारखाना हा शिक्षणाचे व संस्कृतीचे केन्द्र बनला पाहिजे. आणि म्हणूनच मला आवर्जून अेक विचार येथे मांडावासा वाटतो की, साखर कारखान्याचे काम समाजाच्या जडण-

घडणीचे काम आहे. प्रत्येक कारखाना आदर्श समाजाचा शिल्पकार म्हणून पुढे आला तर मला अभिमानाने आपणास सांगावे लागेल की प्रत्येक साखर कारखाना अेक समाज-मंदिरच आहे. अशा समाज मंदिरात संस्कृतीची पताका उंचविण्याचे कार्य आपला कारखाना करीत आहे ही अत्यंत गौरवपूर्ण गोष्ट आहे.

हा तर माणूस घडविण्याचा कारखाना

आपल्या देशातील समाजवाद लोकशाही मूल्यावर आधारलेला आहे. अशा समाजवादाच्या दिशेने आपण वाटचाल करीत आहोत. परंतु मला असे वाटते की स्वातंत्र्योत्तर काळामध्ये झपाट्याने बदललेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर समाजवादाची आता एक नवी व्याख्या केली पाहिजे. कारण खरा समाजवाद आज आपणाला समजलेला नसून आपल्या पूर्वापार भारतीय संस्कृतीचे चित्र पुसट बनत निघालेले दिसते आहे. अनेक राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक अस्थैर्याच्या वावटळीतून निर्माण झालेल्या वादळात सामान्य माणसाचे धैर्य व स्थैर्य टिकविण्यासाठीच आज देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी चळवळ सुरू केली पाहिजे असे मला वाटते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण समाजाची नव्या पद्धतीने बांधणी करीत आहोत. ही समाज–बांधणी घर–बांधणी सारखीच असते. घराची भित बांधण्यासाठी वापरावयाचा दगड मुळात ओवडधोबड असतो. तो बांधकामास अयोग्य असतो. तो मूळच्या अवस्थेतच बांध–कामासाठी वापरावयाचा ठरविले तर भित बांधता येणार नाही किंवा जे काही होईल त्याला बांधीव भित म्हणता येणार नाही. म्हणजे भितीमध्ये दगडास स्थान देण्यासाठी त्या दगडावर योग्य संस्कार करावे लागतात. त्या दगडाचे कोपरे, कंगोरे उडवावे लागतात आणि एका सरळ रेषेत चौकोनी, त्रिकोणी अशा आकाराचे घडवावयाचे असतात. मगच तो दगड बांधकामास योग्य होतो. असे दगड वापरून केलेले बांधकाम सुबक, सुंदर आणि चिरकाल टिकणारे असते. याचप्रमाणे समाजाची बांधणी करताना देखील अज्ञान, कुसंस्कार

आणि दुष्टपणा यांनी वेष्टिलेल्या माणसाला ज्ञान, संस्कार आणि प्रामाणिकपणाचा नवा आकार द्यावा लागेल. त्याची नव्याने जडण–घडण करावी लागेल. अशा तऱ्हेने बांधकामास घडविलेल्या दगडांची जेवढी आवश्यकता असते त्याहून कितीतरी पटीने राष्ट्राच्या उभारणीसाठी घडविलेल्या माणसांची गरज असते. हजारो वर्षाचा आपला प्राचीन इतिहास, परंपरा आणि संस्कृती असलेले आपले राष्ट्र नव उभारणीसाठी जेव्हा स्वप्ने पाहते, तेव्हा अशा प्रकारच्या घड–णीची आवश्यकता कितीतरी पटीने तीव्र होते.

आज आपण एवढे पूल बांधले व कारखाने काढले परंतु माणसा-माणसातील अंतर कमी करण्यासाठी सद्भावनेचे पूल कोठे बांधलेत व माणूस घडविण्याचा एक तरी कारखाना आपण काढला आहे का हो ? आणि माणसे घडविण्याचा कारखाना आपण जर काढला तर त्यामुळे इतर सर्व प्रकारचे कारखाने निष्प्रभ ठरतील. एवढचा योजना झाल्या, नियोजने झाली, परंतु बालवाडीच्या शिक्षणाचा अजून कोणी गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही. शिक्षणाचा, संस्काराचा पायाच असा कच्चा आणि ठिसूळ राहिला आहे. म्हणजे इमारतीच्या वरच्या मजल्याची तयारी जोरात, परंतु पायाच ठिसूळ ! " आधी कळस मग पाया " या म्हणीत निदान शेवटी ' पाया ' तरी आहे. परंतु आज सर्व क्षेत्रामध्ये आपले लक्ष आणि लक्ष्यही फक्त " कळस " च आहे.

म्हणून आजच्या राजकीय व सामाजिक जीवनामध्ये संपुष्टात आलेली माणुसकी आपल्या आचारात आणि विचारात उतरावयाची असेल तर आपण कारखान्यावर स्थापन केलेल्या सांस्कृतिक मंडळाला फार मोठे महत्त्व आहे. खऱ्या अर्थाने माणूस सुबुद्ध होईल की जेव्हा " माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे " हा जीवनाचा मूलमंत्र तो आपल्या कृतीमध्ये उतरवितो. असा सुबुद्ध राष्ट्रपुरुष निर्माण करण्यामध्यें आपल्या सांस्कृतिक मंडळाचा सिंहाचा वाटा राहील असे मला वाटते.

मानवी जीवनाच्या आर्थिक समस्या मिटविण्याचे दृष्टीने बल-वत्तर साधन म्हणून साखर कारखान्यासारखे उद्योग उभारले गेले आहेत असे मी मानतो. पण त्या उद्योगाच्या उभारणीत स्वार्थाचा भाग नसला तर त्यातून समाजोन्नतीचे दिव्य स्वप्न साकार होते याची प्रचिती मला येथील सांस्कृतिक केंद्राद्वारे आली आहे. ती दृष्टी येथील कार्यकर्त्यांच्या कार्यामधून दिसून आली आहे. "माणूस घडविण्याचे केंद्र" म्हणून मी या कारखान्याकडे पाहतो. अशा कार्यामुळें माझ्या-सारख्या सामान्य कार्यकर्त्याला स्फूर्ती व उत्साह मिळतो आणि म्हणू-नच आपण मला या ठिकाणी बोलावून माझे मनोगत मांडण्यास वाव दिलात यावद्दल मी आपला ऋणी आहे.

उगार खुर्द,
दिनांक २७-४-१९७१

सर्व धर्माचे सार : मानवता

जयसिंगपूर येथील अखिल भारतीय अनुव्रत समितीतर्फे आयोजित केलेल्या सर्व धर्म सद्भाव दिनाच्या निमित्ताने झालेल्या समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी अध्यक्षपदारून काढलेले मनोज्ञ उद्गार.

पूज्य मुनिवर्य आणि श्रोतेजनहो ! या समारंभास मला बोलविण्यापाठीमागील येथील मंडळीचे काय प्रयोजन होते हे समाजात नाही. पूज्य मुनिवर्य व त्यांच्या शिष्यगणापैकी प्रगल्भ विचारांची धार्मिक बैठक असणारी मंडळी येथे हजर असताना माझ्यासारख्या राजकारणी माणसाला तुम्ही येथे बोलावून काय साधले आहे ते कळत नाही. ते काही असो पण मला एक समाधान लाभले ते हे की, मुनिवर्यांचे मला दर्शन घडले. धार्मिक गोष्टीचा माझा तसा अभ्यास नाही. पण माझी धर्माची व्याख्या मानवसेवेच्या तत्त्वाशी निगडित आहे. धर्माचा थोडासा गंभीरपणे विचार केला तर असे आढळून येते की, धर्माच्या बाह्य रूपामध्ये देश व कालानुसार परस्पर विरोध दिसला तरी सर्व धर्मांच्या मूलभूत सिद्धान्तामध्ये परस्पर विरोध नाही. आपल्या महाभारतात हेच आवर्जून सांगितले आहे की, जो धर्म अन्य धर्माच्या विरोधी असतो तो धर्मच नव्हे. जो धर्म अविरोधी असतो तोच खरा धर्म.

जग उभे आहे ॲटमबाँबच्या उंबरठ्यावर

आज ज्यावेळी आपण म्हणतो की वर्तमान काळात धर्माने नवे रूप धारण केले पाहिजे, या म्हणण्याचा अर्थ आपण समजावून घेतला पाहिजे. वर्तमान काळात विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की, जेवढी मानवी इतिहासात यापूर्वी कधीही पाहावयास मिळाले नाही. निसर्ग भांडारातील शेंकडो शक्तीप्रवाहांचा त्याने शोध लावला आहे. या शक्तीच्या जोरावर तो देश आणि काल यावर मात करून राहिला आहे. इतकेच नव्हे तर आजच्या मनुष्याने चंद्रावरही आपले पाऊले ठेविले आहे. आता चंद्रावर वसती करण्याची स्वप्ने मानव रंगवीत आहे. परंतु इतकी वैज्ञानिक प्रगती साध्य करून देखील मनुष्य आत्मिक सुखाला वंचित झाला आहे. त्याच्या जीवन परिघामध्ये कोठेतरी एक पोकळी आढळते. असमाधानाच्या स्पर्शाने तो व्याकूळ झालेला दिसतो. पक्षाप्रमाणे आकाशात उंच उडणारा मनुष्य, माशाप्रमाणे सागरात पोहणारा मनुष्य, पृथ्वीवर पाय टेकल्यावरोबर "आपण मानवामध्ये सद्भावनेने राहाण्यास असमर्थ आहोत" हा विचार त्याच्या मनाला सारखा भेडसावित असतो. मानवामध्ये द्वेष, हिंसाचारी पराकोटीचा जंगलीपणा आजही आपणास दिसून येतो. जंगली जनावरे आपल्या नखांच्या आणि जवडचांच्या वळावर आपला मतलव सिद्ध करण्यास जशी सदैव तत्पर असतात, त्याप्रमाणे आज मनुष्यदेखील आपल्या ॲटमबॉम्बच्या वळावर आपली मनोभिलाषा पूर्ण करण्यासाठी तत्पर असतो. अशा तीव्र मिलापाला अंत नसतो. येथे मनःशांतीला थारा नसतो आणि म्हणूनच मला चिंतेने असे म्हणावेसे वाटते कीं ॲटमबॉम्बच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या जगाचा केव्हा कडेलोट होईल हे सांगता येणार नाही.

धर्माची आवश्यकता

आज पुढारलेल्या राष्ट्रामध्ये अण्वस्त्रांची स्पर्धा चालू आहे. त्यामुळे सर्व पुढारलेल्या राष्ट्रांना एकमेकाविषयी भीती निर्माण झाली आहे. कारण एखाद्या राष्ट्राने ॲटॅमबाँबचा उपयोग केला तर दुसऱ्या

राष्ट्राची राखरांगोळी होते. कोणत्याही एका राष्ट्राच्या हातून काही चूक घडली तर त्यामुळे किती मोठा अनर्थ ओढावेल हे सांगता येणार नाही. ॲटॅमबाँबचा वापर करणारे आजचे जग विनाशाकडेच निघाले आहे, असे मला म्हणावेसे वाटते. कारण वैज्ञानिक युगातील शोध जसे मानव विकासासाठी आहे तसे त्यांच्यामध्ये मानव विकासाचीही फार मोठी शक्ती सामावलेली आहे, हे विसरता येणार नाही आणि म्हणून या सर्व गोष्टी टाळण्यासाठी आज राष्ट्रामध्ये धर्माची आवश्यकता आहे असे मला वाटते.

मानवसेवा हीच प्रार्थना

भांडणाचे मूळ होऊन बसणारा धर्म मला अपेक्षित नाही. आज देशामध्यें कुसंस्कार, अज्ञान, भूक, रोग व फसवणुकीने थैमान मांडले असताना " मुक्ती " ची प्राप्ती हाच धर्म मानणाऱ्याना मी माणूस म्हणणार नाही.समाजातील अज्ञान,कुसंस्कार, रूढी, भूक, रोग व नाना-प्रकारच्या दुष्टभावना दूर करून मनुष्याचे जीवन सुखी आणि समा-धानी करणे यालाच मी " मुक्ती " समजतो. युद्ध, शोषण आणि अभावाग्रस्त समाजाला मनःशांती प्राप्त करून देण्याचीच आज आम्हाला गरज आहे असे मला वाटते. समाज जीवनावर परस्पर द्वेषाची चढ-लेली काजळी आज दयेच्या हळूवार हाताने पुसून टाकण्याची आव-श्यकता आहे. समाजात मंगल भावनांचे मळे फुलविण्याची आवश्यकता आहे. अशा वेळी धर्म, कर्म, वंश, वर्ण, भाषा आणि प्रदेश यांच्यामुळे समाजात उभ्या असलेल्या विद्वेषांच्या भिंती जमीनदोस्त झाल्या पाहि-जेत. जो भांडणे लावतो तो धर्म कसला ? भांडण्यासाठी जो प्रवृत्त करतो तो अधर्मच खरा ! म्हणून आज खऱ्या धर्माची जोपासना करावयाची असल्यास मंदिर, मस्जीद, किंवा चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करण्यापेक्षा तहाननेने व भुकेने व्याकूळ झालेल्या अज्ञान आणि कुसंस्काराने वेढलेल्या जीवघेण्या रूढीने व परंपरेने व्यापलेल्या तसेच लाचारी आणि फसवणुकीने भरडून निघालेल्या मानवाची सेवा हीच खरीखुरी प्रार्थना होय.

माणुसकीची त्रिसूत्री

मनुष्य हा मुळात चांगलाच असतो. परिस्थितीमुळे हा चांगुलपणा वाढतो अगर कमी पण होतो. कठोर वस्तुस्थितीशी मिळते जुळते घेत असताना चांगुलपणाला धक्का पोहोचतो. त्यामुळे चांगुलपणात अनेकदा उणिवा निर्माण होतात. त्यामुळे मनुष्याच्या हातून समाजाच्या दृष्टीने अहितकारक अशा गोष्टी घडू लागतात. अशाच भावनेतून जातीची, भाषेची, धर्माची, वर्णाची, वंशाची व प्रदेशाची त्रुटी निर्माण होते. व्यक्तिगत जीवनामध्ये तंटेबखेडे उद्भवतात आणि सारे समाजजीवन काळंवडून जाते. यासाठी मनुष्यानें चांगुलपणाची जपवणूक केली पाहिजे. समाजासाठी अहितकर गोष्ट करताना त्याला लाज वाटली पाहिजे. वाईट गोष्टी करताना अशी लाज वाटू लागली कीं विवेकाचा जन्म होतो. काय चांगले व काय वाईट, काय मंगल व काय अमंगल, काय धर्म आणि काय अधर्म, काय सुष्ट आणि काय दुष्ट, काय हितकारक व काय अहितकारक यामध्ये एक उज्ज्वल रेषा आखण्याचे कार्य मनुष्य सद्विवेकाच्या जोरावर करीत असतो. मानव जीवन एक " सामाजिक पूजा " बांधण्याचे साधन आहे. याचे त्यास आकलन होते. अेवढ्याचसाठी सदाचार, सद्भाव, सहानुभूती व विवेकशक्ती माणसातील माणुसकी जीवंत ठेवण्यास सहाय्यभूत होतील असे मला वाटते.

थोर माणसे जगाचे चिलखत

महात्मा गौतमबुद्ध ते महात्मा गांधीपर्यंतचा इतिहास आपण चाळला तर असे आढळून येईल कीं " दया हेच धर्माचे सार आहे " हा मूलमंत्र मनी बाळगून सर्व थोर लोकांपासून प्रेरणा घेऊनच आचार्य श्री. तुळशी यांनी अनुव्रत आंदोलनाच्या मार्गाने माणसातील सद्भावनांचे संशोधन सुरू केले आहे. धर्माची खरी खुरी व्याख्या ते समाजापुढे ठेवित आहेत. मला तर असे वाटते की, धर्म म्हणजे सत्य आणि संप्रदाय म्हणजे या सत्याच्या संदेशाला मूर्तस्वरूप देणारी एक संस्था होय. परंतु आज मानव धर्माच्या खऱ्याखुऱ्या अर्थाचा बोध करून

न घेता दुसऱ्याला धर्माशी, संप्रदायासी लोक अभद्र व्यवहार करीत आहेत. प्रत्येक माणसाला जसा जगण्याचा हक्क आहे, तसा प्रत्येक धर्मालाही आहे. "जगा आणि जगू द्या" या नीतीने जीवन व्यतीत करणारा मनुष्य आपल्या धर्माप्रमाणे इतर धर्माकडेही सहिष्णुतेने व सद्भावनेने पाहू शकेल. कारण जगातील सर्व धर्मानी एकच तत्त्व सांगितले आहे आणि ते म्हणजे दया, प्रेम आणि सत्य हे होय. धर्माची ही व्यापक भूमिका मनी बाळगूनच थोर माणसे उदयास आली आणि जगामध्ये ज्यावेळी धर्माच्या नावावर युद्धे सुरू झाली त्या त्या वेळी चिलखताप्रमाणें त्यांनी जगाचे रक्षण केले.


माणसांनी माणसाशी माणसासारखे वागावे

जगातील सर्वश्रेष्ठ साधकांनी असे सांगितले आहे की मनुष्य मूलतः अेक आहे आणि म्हणून धर्मदेखील अेकच आहे. यासाठी धर्मा-धर्मातील तत्त्वभिन्नतेसाठी भांडण्यापेक्षा धर्माधर्मातील तत्त्वैक्य आपण समजावून घेतले पाहिजे. त्यामुळे धर्म, वर्ण, वंश, भाषा व प्रदेश यासंबंधीची अेक समन्वयात्मक बुद्धी स्थापन होऊ शकेल. सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक आणि प्रादेशिक बाबतीमध्ये असा समन्वयात्मक दृष्टिकोण तयार झाला तर सर्व भांडणाचे मूळच मुळासकट उपटून निघेल. "हे विश्वची माझे घर" ही भावना निर्माण होईल. स्वार्थवश कोणी कोणाच्या हक्कावर गदा आणणार नाही. कोणी कोणाला फसविणार नाही. परस्परांच्या सद्भावनेतून सर्वांचे जीवन उजळेल. सर्वत्र निर्मळतेचे वातावरण निर्माण होईल. प्रत्येक मनुष्य प्रत्येक माण-साशी माणसारखा वागू लागेल आणि अेका अर्थाने माणुसकीबद्दलची आस्था वाढीस लागेल. असे झाले तरच खऱ्या अर्थाने सर्व धर्मातील श्रेष्ठ तत्त्वांचे रक्षण व संवर्धन केले असे होईल. सर्वश्रेष्ठ वैज्ञानिक अलमर्ट अैन्सटाअिनने आपल्या मृत्यूपूर्वी म्हटलेले वाक्य "आण्विक युद्धामध्ये जगाचा सर्वनाश निश्चित आहे." हे खोटे ठरण्याची शक्यता आहे.

आज अखिल भारतीय अणुव्रत समितीच्यावतीने जो सद्धर्म सद्भाव दिन येथे साजरा केला जात आहे. त्याच्या पाठीमागे या "सत्य" धर्माचे अधिष्ठान आहे हे आपणास विसरता येणार नाही. आज समाज–जीवनात ऐक्याचे, मांगल्याचे आणि सद्भावनेचे क्षण निर्माण करावयाचे असतील तर अखंड मानवसेवेचे यज्ञच आज सुरू केले पाहिजेत. मोफत नेत्रशस्त्र क्रिया शिबिराचे कार्य हे सर्वधर्म सद्भावना संवर्धित करण्याचे आहे. असे कार्यक्रम केव्हातरी अेकदाच करून चालणार नाही. अशा सत्कार्याची अेक मालिकाच समाजात चालू ठेविली पाहिजे. तरच काहीतरी तरुणोपाय आहे. अशा प्रकारे अखंड मानवसेवेतूनच माणुसकीची जोपासना करता येईल असे मला वाटते.

जयसिंगपूरसारख्या शहरात आपण व आपले इतर सहकारी मंडळी अशा धार्मिक पण समाजोपयोगी स्वरूपाचे कार्य करीत आहात त्याबद्दल मला आपणासंबंधी सततच धन्यता वाटत आली आहे. या कार्यक्रमास मी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहू शकलो हे मी महत्भाग्य समजतो. आपण सर्व मंडळींनी हा महत्त्वाचा कार्यक्रम घडवून आणलात त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो आणि माझ्या-संबंधी आपण सततच आपलेपणाच्या सद्भावना व्यक्त करीत आहात त्याबद्दल अंतःकरणपूर्वक आभार मानतो, आणि भाषण संपवितो.

जयसिंगपूर,
दिनांक ११–१०–१९७२



स्वातंत्र्य मिळविले, पण पुढे ?

मोहोळ, जिल्हा सोलापूर येथे भरलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मेळाव्यात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या भाषणात मांडलेले विचार.

माझ्या समकालीन स्वातंत्र्य संग्राम सैनिकांनो, आजचा हा मेळावा एक ऐतिहासिक मेळावा ठरावा. चळवळीच्यावेळी व नंतर स्वातंत्र्य संग्रामाचे चिंतन आणि मनन झालेले नाही. आपले स्वातंत्र्य मिळविण्याचे स्वप्न पुरे झाले. तेव्हा "आपले काम झाले" म्हणून गप्प बसून आपण आपआपल्या उद्योगाला लागलो. कुणी आपला विस्कटलेला संसार सांधण्याच्या प्रयत्नाला लागला, कुणी आपली राहिलेली कामे पूर्ण करण्याच्या उद्योगाला लागला, आपल्या स्वातंत्र्याचे भवितव्य काय ? याचे भान कुणाला राहिले नाही. आज २५ वर्षानी ते भान तुम्हा आम्हांला आले आहे. म्हणून हा मेळावा आपले आणि भारताचे भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे असे मला वाटते. आणि त्या दृष्टीनेच आज आपण विचार करणार आहोत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. स्वातंत्र्य मिळविले. लौकरच आपण स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवही साजरा करणार


आहोत. परंतु तत्पूर्वी स्वातंत्र्य मिळविण्यापाठीमागील घटनांचा शोध व बोध घ्यायला काहीच हरकत नाही.

सामान्यांची असामान्य चळवळ

स्वातंत्र्य चवळवळीतील सर्व घटनांची तारीखवार नोंद मी आपल्यापुढे सांगत बसणार नाही. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीची प्रेरणा घेऊन पुढे सरसावलेल्या क्रांतिवीरांच्या मनाचा मागोवा मात्र घेणार आहे. खरे पाहता, स्वातंत्र्याची चळवळ ही काही थोरामोठ्यांची किंवा राजेरजवाड्यांची चळवळ नव्हती. समाजातील सामान्य लोकांची ती चळवळ होती. देशातील सामान्य माणूस स्वराज्याची प्रेरणा घेऊन पेटून उठला होता. इंग्रजांच्या सत्तेखालील व आपल्या देशातील संस्थानिकांच्या सत्तेखाली पिचत असलेल्या गुलामांची गुलामगिरी काढून टाकण्यासाठी सामान्य जनतेच्या पराक्रमाला अेक वेगळीच धार आलेली होती. दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणे हुतात्म्यांनी स्वतःच्या जिवाची कुरबानी केली. सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडण्यासाठी संत्ताजी-धनाजीच्या काळातील गनिमी काव्याचे कौशल्यही या सामान्यजनानी सिद्ध केले. स्वातंत्र्याची चळवळ खऱ्या अर्थाने सामान्य माणसानेच सुरू केली होती. या सामान्यांनीच असामान्य पराक्रम करुन इंग्रजांना देशातून घालवून दिले. या स्वातंत्र्य यज्ञात अनेकांनी प्राणाहुती दिली. म्हणूनच आज भारतीय इतिहासकाराने या सामान्यांच्या असामान्य पराक्रमाची नोंद घेतली पाहिजे.

स्वराज्याची स्वानुभूति

स्वातंत्र्य संग्रामात बलिदान केलेल्या हुतात्मा मल्लाप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिसन सारडा व श्री. कुरबान हुसेन यांचे नाव अजरामर झाले. स्वातंत्र्य संग्रामाचेवेळी ज्या जिद्दीने व स्वाभिमानाने हे आणि इतर जे वीर लढले त्याला आपल्या इतिहासात दुसरी तोड असूच शकणार नाही असेच म्हणावे लागेल. आणि म्हणून गेल्या २२ वर्षांत आपल्या देशांत जरी अनेक स्थित्यंतरे घडून आली असली



स्वातंत्र्य मिळविले, पण पुढे ?

मोहोळ, जिल्हा सोलापूर येथे भरलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मेळाव्यात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या भाषणात मांडलेले विचार.

माझ्या समकालीन स्वातंत्र्य संग्राम सैनिकांनो, आजचा हा मेळावा एक ऐतिहासिक मेळावा ठरावा. चळवळीच्यावेळी व नंतर स्वातंत्र्य संग्रामाचे चिंतन आणि मनन झालेले नाही. आपले स्वातंत्र्य मिळविण्याचे स्वप्न पुरे झाले. तेव्हा "आपले काम झाले" म्हणून गप्प बसून आपण आपआपल्या उद्योगाला लागलो. कुणी आपला विस्कटलेला संसार सांधण्याच्या प्रयत्नाला लागला, कुणी आपली राहिलेली कामे पूर्ण करण्याच्या उद्योगाला लागला, आपल्या स्वातंत्र्याचे भवितव्य काय ? याचे भान कुणाला राहिले नाही. आज २५ वर्षांनी ते भान तुम्हा आम्हांला आले आहे. म्हणून हा मेळावा आपले आणि भारताचे भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे असे मला वाटते. आणि त्या दृष्टीनेच आज आपण विचार करणार आहोत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. स्वातंत्र्य मिळविले. लौकरच आपण स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवही साजरा करणार

आहोत. परंतु तत्पूर्वी स्वातंत्र्य मिळविण्यापाठीमागील घटनांचा शोध व बोध घ्यायला काहीच हरकत नाही.

सामान्यांची असामान्य चळवळ

स्वातंत्र्य चवळवळीतील सर्व घटनांची तारीखवार नोंद मी आपल्यापुढे सांगत बसणार नाही. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीची प्रेरणा घेऊन पुढे सरसावलेल्या क्रांतिवीरांच्या मनाचा मागोवा मात्र घेणार आहे. खरे पाहता, स्वातंत्र्याची चळवळ ही काही थोरामोठ्याची किंवा राजेरजवाड्यांची चळवळ नव्हती. समाजातील सामान्य लोकांची ती चळवळ होती. देशातील सामान्य माणूस स्वराज्याची प्रेरणा घेऊन पेटून उठला होता. इंग्रजांच्या सत्तेखालील व आपल्या देशातील संस्थानिकांच्या सत्तेखाली पिचत असलेल्या गुलामांची गुलामगिरी काढून टाकण्यासाठी सामान्य जनतेच्या पराक्रमाला अेक वेगळीच धार आलेली होती. दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणे हुतात्म्यांनी स्वत:च्या जिवाची कुरबानी केली. सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडण्यासाठी संताजी-धनाजीच्या काळातील गनिमी काव्याचे कौशल्यही या सामान्यजनानी सिद्ध केले. स्वातंत्र्याची चळवळ खऱ्या अर्थाने सामान्य माणसानेच सुरू केली होती. या सामान्यांनीच असामान्य पराक्रम करुन इंग्रजांना देशातून घालवून दिले. या स्वातंत्र्य यज्ञात अनेकांनी प्राणाहुती दिली. म्हणूनच आज भारतीय इतिहासकाराने या सामान्यांच्या असामान्य पराक्रमाची नोंद घेतली पाहिजे.

स्वराज्याची स्वानुभूति

स्वातंत्र्य संग्रामात बलिदान केलेल्या हुतात्मा मल्लाप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिसन सारडा व श्री. कुरबान हुसेन यांचे नाव अजरामर झाले. स्वातंत्र्य संग्रामाचेवेळी ज्या जिद्दीने व स्वाभिमानाने हे आणि इतर जे वीर लढले त्याला आपल्या इतिहासात दुसरी तोड असूच शकणार नाही असेच म्हणावे लागेल. आणि म्हणून गेल्या २२ वर्षांत आपल्या देशांत जरी अनेक स्थित्यंतरे घडून आली असली

तरीही स्वातंत्र्य–संग्राम सैनिकांत त्यांच्या निष्ठेत, त्यांच्या स्वाभिमानांत व त्यांच्या देशभक्तीत कसलाही बदल झालेला नाही. भारतीय स्वातंत्र्यासाठी जे जे लढले व आज जे हयात आहेत. तेच लोक स्वराज्याचे बांधणीची कामे करू शकतील असा मला दृढविश्वास वाटतो. म्हणूनच "स्वातंत्र्य मिळविले" या दोन शब्दातच स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचे मोल करून मी थांबणार नाही, तर स्वातंत्र्याचे सुराज्य करण्याची ही जवाबदारी स्वातंत्र्य सैनिकांच्यावर येऊन पडते आहे, असेही मी सांगू इच्छितो. आज तुमचा स्वाभिमानाचा पिंड निराशेने निस्तेज झाल्यासारखा वाटत आहे. परंतु हे निराशेचे चित्र पुसून टाकून ज्या त्वेशाने, ज्य जिद्दीने व ज्या पुरूषार्थाने तुम्ही मायभूमीस स्वतंत्र केले, त्याच पुरूषार्थाने आजही पुढे सरसावण्याची गरज आहे असे मला वाटते. आणि म्हणून केवळ स्वराज्य मिळवून स्वस्थ बसण्याची ही वेळ नसून आजही स्वातंत्र्य सैनिकानी लोकजीवनाशी समरस होऊन स्वराज्याची स्वानुभूति सामान्य लोकाना आणून देण्याचे कार्य करण्याची खरी वेळ येऊन ठेपलेली आहे.

चळवळीचे यश निरपेक्ष भावनेत

कोणतीही चळवळ आणि विशेषत: गुप्त चळवळ भूमीगत राहून चालत असताना अनेक पथ्ये पाळावी लागतात. भूमीगत चळवळीमध्ये कोण काय काम करतो, याची दखल जाहीरपणे मिळत नसते. अशा वेळेला चळवळीतील शुद्धत्ता राखण्याचे काम कठिण असते. आणि ते खंबीरपणे पाळले तरच त्यामध्ये यश येते. हजारो सामान्य माणसांच्याद्वारा हजारो हातानी कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा या महाराष्ट्रातील जिल्ह्यामध्ये भूमिगत चळवळ चालली होती. एवढचा विस्तारपूर्ण भूमिगत चळवळीमध्ये पराक्रम दाखविण्याची नितांत गरज होती. तो पराक्रम सर्व थरातील कार्यकर्त्यानी तर दाखविलाच पण भूमिगत चळवळीतील शुद्धता राखण्याचे कार्य लहान थोर आणि सर्व थरातील कार्यकर्त्यानी गौरवपूर्णरितीने पार पाडले हे येथे नमूद करताना मोठा अभिमान वाटतो. जेव्हा बार्शी लाइट रेल्वे

लुटण्यात आली, तेव्हा त्यामध्ये कार्यकर्त्यांना अनेक मौल्यवान वस्तू मिळाल्या. त्यामध्ये एका शाळेच्या हिंदी परीक्षेच्या सर्टिफिकेट्स्चा पुडका होता. तो सर्टिफिकेटस्चा पुडका कार्यकर्त्यांनी पोष्टाने त्या शाळेकडे पाठवून दिला. अशी अनेक उदाहरणे देता येतील. परंतु येथे एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, कोणत्याही राजकीय किंवा सामाजिक चळळीचे यश हे त्यामधील कार्यकर्ते किती शुद्ध भावनेने कार्य करतात, स्वतः किती निरपेक्ष भावनेने प्रामाणिक राहतात यावरच अवलंबून असते.

काही मौलिक धागे

गत अितिहासातील पराक्रम मला रोमांचकारी वाटतो. परंतु त्यामध्ये माझे मन फारसे रमत नाही. गत अितिहासांतील पराक्रमी प्रसंगातील मूलभूत धागे धरून वर्तमानकाल रंगवावा व तो रंगविताना भविष्य काळ कसा उज्वल होईल ते पहावे. या भावना माझ्या मनामध्ये तीव्रतेने येत असतात ! यादृष्टीने भारतीय गत चळवळीतील कोणते मौलिक धागे आहेत याचा शोध आणि बोध घ्यावा असे मला वाटते. येथे दोन तीन मौलिक धागे नमूद करावयास काहीच हरकत नाही.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपणास स्वातंत्र्य मिळाले. सर्व भारत देश एका निशाणाखाली आला. एका घटनेखाली, एका राज्य व्यवस्थेखाली आला. याचा अर्थ सर्व भारतवर्ष एकसंघ बनला. दुर्दैवाने पाकिस्तान निर्माण झाले. ही एवढीच दुखःद घटना सोडली तर उर्वरीत भारत देश एकसंघ म्हणून निर्माण झाला. या भावनेने भारत बांधला गेला खरा, परंतु घटनेला अनुरूप अशा प्रकारची राष्ट्रीय भावना अद्यापही निर्माण होवू शकली नाही. भाषेच्या, जातीच्या, धर्माच्या, फुटीरतेच्या भावना कमी न होता त्या आज फोफावत आहेत. या फुटीरतेच्या भावना जरी वाढत गेल्या असल्या तरीही आज भारतीय अंतःकरण मजबूत आहे. एकसंघ आहे, याची प्रचिती भारतावर

आलेल्या संकटाचेवेळी आलेली आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर केवळ २३ वर्षात भारतावर तीन युद्धे लादण्यात आली. हे युद्ध चीनच्या बरोबर असो, अगर पाकिस्तान बरोबर असो. या युद्धामध्ये भारती-यांची राष्ट्रीय भावना तावून सुलाखून निघाली. देश एक राहिला. आणि त्याचे विशेष स्वरूप नुकत्याच होवून गेलेल्या भारत पाकिस्तानच्या युद्धामध्ये प्रकर्षाने दिसून आले. हा धागा धरून तुम्ही आम्ही यापुढे राष्ट्रीय ऐक्याची भावना मनोभावे जपली पाहिजे. क्षुद्र स्वार्थ सोडून दिला पाहिजे. भ्रष्ट व्यवहार टाकून दिले पाहिजेत. ज्या दिवशी स्वातंत्र्य मिळाले, त्या दिवशी देश एकसंघ होण्याची जी जी घटना घडून आली तिच्या पाठीमागे १०० वर्षांच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा सोनेरी धागा होता, हे विसरून चालणार नाही. स्वराज्य मिळताना दुसरी एक महत्त्वाची घटना घडून आली. तशी घटना भारताच्या अितिहासात यापूर्वी कधीच घडली नव्हती. देश स्वतंत्र झाला. राज्यघटना तयार झाली, आणि घटनेने जनतेला सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळाला. परंतु ज्याप्रमाणे एकसंघ राष्ट्र जनतेच्या अंतःकरणापर्यंत पोहोचू शकलेले नाही, त्याचप्रमाणे लोकशाही राज्याची भूमिका घटनेच्या दृष्टीने जनतेच्या अंतःकरणापर्यंत पोहोचू शकलेली नाही. आपल्या भारतांत लोकशाही आहे. सामान्य लोकांचे लोकांनी लोकांच्या हितासाठी चालविलेल्या राज्यपद्धतीला आपण लोकशाही राज्य समजतो. असे लोकशाही राज्य एक जीवननिष्ठा म्हणून बनावे असे वाटत असेल तर या लोकशाही राज्याचे मूलभूत स्वरूप समजावून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. लोकशाही राज्याची पहिली कसोटी म्हणजे ते सत्ताधिष्टित न राहता लोकाधिष्ठित राहिले पाहिजे. लोकशाही राज्य समर्थ बनवावयाचे झाल्यास लोकांच्या स्वयंप्रेरणा जिवंत ठेवल्या पाहिजेत. लोक स्वावलंबी बनले पाहिजेत. परावलंबी आणि लाचार बनता कामा नये. परंतु आज आपल्यामध्ये फार भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती कोणी बुद्धीपुरस्सर बनवत आहे असे मला म्हणावयाचे नाही. परंतु लोकांच्या ठिकाणी आज स्वाभिमान, स्वावलंबन व स्वयंप्रेरणा या संपुष्टात येऊ लागल्या आहेत असे मला सांगावयाचे आहे. समाज जीवनाचे परीक्षण

केल्यानंतर जे भासते, तेच मी सांगत आलो आहे. अर्थात ही गोष्ट कोणीही नाकारू शकणार नाही. आणि म्हणून लोकांच्या स्वयंप्रेरणा जिवंत ठेवण्याच्या दृष्टीकोनांतून लोकानीच चालवावयाच्या लोकशाही राज्यव्यवस्थेचा हा मूलभूत धागा धरून त्याची जोपासना सर्व संबंधितानी करण्याची नितांत गरज आहे. असे मला वाटते.

स्वातंत्र्य चळवळीतील आणि गत अितिहासातील आणखी एक महत्त्वाचा धागा म्हणजे जे बोलावयाचे ते करावयाचे आणि जे करता येईल तेवढेच बोलावयाचे हा आहे. भूमिगत चळवळीमध्ये कोणतीही गोष्ट करावयाची ठरल्यानंतर ती तितक्याच निर्धाराने पार पाडली जात होती. " चलेजाव " ही गांधीजींची घोषणा किती निर्धाराची होती. गांधीजींच्या दोन वारीक बोटांनी " चले जाव " ची घोषणा दिली गेली. परंतु त्या दोन बोटांच्या पाठीमागे साऱ्या भारतीय जनतेची ताकद उभी होती. परंतु स्वराज्याच्या गेल्या २३ वर्षात त्या निर्धाराच्या भावना प्रकर्षाने राहू शकल्या नाहीत. आपण बोलतच राहिलो, फार बोललो. जे बोललो– ते संपूर्ण होऊं शकले नाही. आणि जे होऊं शकणार नव्हते– ते बोलत राहिलो. त्यामुळे आपण आज कुठे आहोत, व कोठे चाललो आहोत हे न समजताच चालत राहिलो. मनात होते एक– आणि घडत गेले ते दुसरेच. आज गरीव अधिक गरीव झाले– आणि सामान्य माणसापर्यंत स्वराज्याची अनुभूती अद्याप पोहोचू शकली नाही. या गोष्टीची जाणीव येऊन पंतप्रधान श्रीमती अिंदिराजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली जे बोलू तेच करू आणि होणार तेच बोलू अशा वचनपूर्तीच्या राजकारणांतील झलक थोडीशी सुरू झाल्यानंतर गेल्या २–४ वर्षांत वीज चमकावी त्याप्रमाणे वातावरणात खळबळ सुरू झालेली आहे. स्वातंत्र्य चळवळीतील हा निर्धाराचा धागा श्रीमती अिंदिराजी गांधीजीनी हातात घेतला आहे. त्याची जोपासना सर्वाकडून होण्याची आवश्यकता आहे. लोकशाही व वचनपूर्तीच्या राजकारणात सर्वांचे हात तितक्याच निर्धाराने ध्येयाशी, कार्याशी अेकरूप झाले पाहिजेत. राष्ट्रीय अैक्याचा, देशाच्या एक संघत्वाचा, लोकशाहीतील स्वयंप्रेरणेचा

स्वसामर्थ्याचा धागा जसा महत्वाचा आहे– तसाच निर्धाराचा आणि वचनपूर्तीचा धागाही महत्त्वाचा आहे. या धाग्याची सांगता जेवढ्या कसोशीने, प्रामाणिकपणे, आणि निर्धाराने या पुढच्या काळांत देशात होत राहील तेवढ्याच प्रमाणात स्वातंत्र्य चळवळीतील मिळालेल्या यशाचा वाटा सामान्य माणसापर्यंत पोहोचू शकेल.

दोन गुणधर्म

ज्या देशात स्वातंत्र्य मिळविणाऱ्यांची व रक्षण करणाऱ्यांची प्रतिष्ठा टिकते व टिकविली जाते तोच देश स्वातंत्र्य टिकविण्यास समर्थ ठरतो. स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचे मोल करीत असताना स्वातंत्र्य सैनिकांच्या भावना काय होत्या, कोणत्या गुणांची पूजा ते स्वातंत्र्य सैनिक करीत होते, आणि कोणता विचार ते आचारात आणित होते, या गोष्टीचे सर्वांनीच स्मरण केले पाहिजे. याच संदर्भात महात्मा गांधीजीनी साऱ्या जगास जे दोन गुणधर्म शिकविले तेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

गांधीजीनी स्वराज्य मिळवून दिले म्हणून आपण त्यांना युग-पुरूष मानतो. परंतु त्याहीपेक्षा त्यांनी शिकविलेला महत्त्वाचा पहिला गुण म्हणजे मनुष्य स्वाभिमानी राहिला पाहिजे. ज्यावेळी भारती-यांच्या मनात स्वाभिमान जागृत झाला त्यावेळी ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता असे बलाढ्य ब्रिटिश राज्य देश सोडून गेले. ४० कोटी भारतीय जनता जागृत झाल्यानंतर ब्रिटीशांनी आपला झेंडा उतरविला व ते निघून गेले. परंतु स्वातंत्र्यानंतर पुढे काय झाले ? लोकामधील सत्तेच्या व संपत्तीच्या मोहामुळे स्वाभिमान जिवंत राहू शकला नाही. माणसा माणसामध्ये लाचारी व परावलंबन निर्माण झाली. एखाद्या कामासाठी पैसे देताना उपकाराची भावना ठेवणेपर्यंत आली. लोकांचे काम हे आपले कर्तव्य आहे व ते मानले पाहिजे अशी परिस्थिती असावयास पाहिजे होती. लोकांनी तो माझा हक्क आहे असे समजावयास पाहिजे होते. पण ते झाले नाही. म. गांधीजीनी ज्या स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलीत केली ती

स्वातंत्र्य सैनिकानी यापुढे जागृत ठेवली पाहिजे, असे मला म्हणावयाचे आहे.

गांधीजीनी दिलेला दुसरा गुणधर्म म्हणजे निर्भयता होय. अन्यायाच्या विरुद्ध उभे राहून स्वाभिमानाने जगावयाचे असेल तर, निर्भयता असणे आवश्यक आहे. सच्चा भारतीय कधी अन्याय सहन करणार नाही. हे स्वातंत्र्य सैनिकानी सिद्ध करून दाखविले आहे. आणि म्हणूनच स्वराज्य मिळविणारी व टिकविणारी स्वातंत्र्य सैनिकांची एक जात आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आज माझेसमोर असलेल्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकात ४० वर्षे वयाच्या सैनिकापासून ७० वर्षाच्या घरांत असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांचा समावेश आहे. तुम्हां आम्हांला आज उशिरा जाग आलेली आहे, तरीसुद्धा अजूनही वेळ गेलेली नाही. सगळेच स्वातंत्र्य सैनिक आज जरी पिकलेल्या पानासारखे दिसत असेल तरी तो पिकलेल्या पानांचा मुरलेला मुरंबा आहे. स्वातंत्र्य सैनिकात जो स्वाभिमान व प्रामाणिकपणा होता तोच स्वाभिमान व प्रामाणिकपणा स्वातंत्र्य टिकविण्यासाठी उपयोगी पडेल. "वाघ मरेल पण गवत खाणार नाही." त्याप्रमाणे तुमच्या जवळही स्वाभिमान आहे, हिम्मत आहे, मर्दुमकी तर आहेच आहे. आणि म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात विधायक आणि विकासाच्या कामात देश समृद्ध करणेसाठी तुम्ही आम्ही प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. स्वयंप्रेरणेनें व स्वतःच्या कर्तबगारीने प्रत्येक स्वातंत्र्य सैनिक देशाच्या विकास कार्यात जेव्हा उतरेल तेव्हा देशाचे सोने व्हावयास फारसा विलंब लागणार नाही. स्वातंत्र्य सैनिकानी यापुढे आपल्या हातापायात जोम आहे तोपर्यंत ही जाणीव उराशी बाळगावी अशी या प्रसंगी मी आपल्यापुढे विचारसरणी ठेवून माझे हे लांबलेले भाषण संपवितो.

मोहोळ,
दिनांक २१-११-१९७१

वृत्तपत्र : लोकशाहीचे नेत्र

कोल्हापूर येथील महानगरपालिकेच्या शाहू सभागृहामध्ये सायं. 'दै. लोकसेवक' चा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्षपदावरून 'वृत्तपत्रांचे लोकशाहीतील महत्त्व व कार्य' यासंबंधी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्मिक विवेचन.

सायं. दैनिक 'लोकसेवक' चा आजचा हा प्रकाशन समारंभ मला फारच औचित्यपूर्ण वाटतो आहे. कारण राजर्षी शाहू जन्मशताब्दीच्या वर्षामध्ये 'लोकसेवक' लोकासमोर येत आहे. त्याशिवाय आजचा दिवस ही लोकजीवनाची अस्मिता जागृत असल्याची आठवण करून देणारा आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपणा सर्वांना जो आनंद झाला होता त्याची आठवण आज १५ ऑगस्ट १९७४ रोजी होते खरी. तथापि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्यापुढे ज्या अडचणीचे डोंगर उभा राहिले, त्यांमधून मार्ग काढीत असताना तुम्हा आम्हाला ज्या यातना होत आहेत, त्याही देशप्रेमाच्या पोटी विसरून जात आहोत. नव–नव्या अडचणीतून नवीन जीवनाच्या आकृतिबंधाचा कोठे तोल जाणार नाही, या गोष्टीचीही तुम्ही आम्ही काळजी वाहत आहोत. अशा या संक्रमणाच्या काळात सायंदैनिक

'लोकसेवक' पदार्पण करीत आहे. त्याचे मी मनःपूर्वक स्वागत करीत आहे. आज सायं. दैनिक 'लोकसेवक' च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले हे जाहीर करीत असताना मला अत्यानंद होत आहे.

राजर्षी शाहू : समाजकंटकांचे शिकारी

मी आताच आपणास असे सांगितले की राजर्षि शाहू जन्मशताब्दीचे वर्षी राजकवि भोसले सायं. दैनिकाचे प्रकाशन करीत आहेत. राजकवि भोसले यानी अखंड ३४ वर्षे साप्ताहिक 'लोकसेवक' चालवून ते आज सायं. दैनिकात त्याचे रूपांतर करीत आहेत. आपल्या कार्यावर निष्ठा ठेवून समाजाची सेवा करणे हे राजकवि भोसले यांचे ब्रीद आहे. करवीर नगरीत एकदा का समाजहितासाठी रोपटे लावले की ते सतत वाढत जाते. हा गुण करवीरच्या मातीचा आणि त्या रोपट्यांना वाढविणाऱ्या माणसांचा आहे. राजर्षि शाहूनीच सर्व प्रथम या करवीरच्या मातीतून समाज मंगलतेचे मळे निर्माण व्हावेत म्हणुन खूप कष्ट केले. समाज- विकास साधत असताना त्यांनी त्यावेळच्या समाजाची दुखणी कोणती आहेत याचा प्रथम अभ्यास केला. या दुखण्यावर औषध शोधताना त्यांनी कोणत्याही वैद्याचा सल्ला घेतला नाही. समाज–कंटकच समाज विकासाचे खरे शत्रू आहेत, हे ओळखून राजर्षी शाहू महाराजानी समाज–कंटकांचीच शिकार करावयास सुरवात केली. महात्मा फुलेनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे राजर्षि शाहू हे पहिले पाईक असल्यामुळे त्यांनी समाजगत रोगांचे सत्य– शोधन करून निदान बांधले. आणि मग जाति, वर्ण, वंश, धर्म व भाषा समाज विकासाच्या आड येऊ नयेत, म्हणून सत्य, सद्भावना व मानव सेवा यांची कास धरली.

प्रश्न आहे दुर्दम्य आशा-आकांक्षेचा

राजकवि भोसले यांचे सायंदैनिक लोकजीवनाची एक निकडीची गरज म्हणून जन्मास आले आहे. आज जग एवढ्या झपाट्याने बदलत आहे की, बदलत्या जगाचा चेहरा–मोहरा समाजापुढे ठेवण्या-

साठी सकाळप्रमाणे संध्याकाळीही वर्तमानपत्रांची आवश्यकता आहे. आपल्या लोकशाहीप्रधान देशात वर्तमानपत्रांची संख्या वाढत आहे म्हणून चिंता करावयाची गरज नाही. ज्यावेळी ज्या गोष्टीची गरज भासते त्यावेळी राजकवी भोसले दंड थोपटून समाजापुढे उभे राहतात, या गोष्टीची मला चांगलीच प्रचीति आहे. संस्थाने नष्ट व्हावीत म्हणून मी जेव्हा प्रयत्न करीत होतो तेव्हा राजकवी भोसलेही दुसऱ्या बाजूला संस्थाने राहावीत म्हणून प्रयत्न करीत होते. त्यावेळी आमच्या दोघांच्या प्रयत्नांची दिशा वेगळी, ध्यास वेगळा आणि ध्येयेही वेगळी म्हणून आम्ही दोघांनीही आमच्या कार्यावरील निष्ठा कधी ढळू दिली नाही. आम्ही ध्येयवेडे बनून कार्य करीत राहिलो. त्यांत यश कोणाला मिळाले व अपयश कोणाला मिळाले हा भाग माझ्या दृष्टीने फारसा महत्वाचा नाही. समाजहिताच्या दृष्टीने चांगले काय व वाईट काय एवढाच भाग महत्वाचा असतो. त्यामुळे आज मी आणि राजकवी भोसले फार दिवसानी एकाच स्टेजवर बसलो आहोत याबद्दल अनेकांना नवल वाटत असेल. परंतु मित्रहो ! मला आपणाला असे आग्रहपूर्वक सांगवयाचे आहे की व्यक्ती संदर्भ जेथे ठेवला जात नाही तेथे व्यक्तीव्देषाला थाराच उरत नाही. आपल्या भारतीय समाजाची अशी धारणा आहे कीं, **" Not failure, but low aim is crime "** आणि म्हणून तुमच्या आमच्यापुढे खरा प्रश्न आहे तो दुर्दम्य आशा–आकांक्षेचा.

लोकशिक्षण : लोकशाहीची गुंतवणूक

वर्तमानपत्रे म्हणजे लोकशिक्षण देणारे खरे शिक्षक होत. स्वराज्य मिळाल्यानंतर लोकमताची व लोकमानसाची जाणीव ठेवून लोकशिक्षणाची दिशा आखण्यास मी फार मोठे महत्त्व देतो. आज 'माणूस' समृद्ध, स्वावलंबी व स्वाभिमानी बनावा यासाठी लोकशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. आज आपल्या लोकशाहीला अनुरूप असेच शिक्षण पाहिजे आहे. मग असे शिक्षण शाळेत मिळेते आहे कां? शालेय पाठ्यपुस्तकात स्वातंत्र्याचे प्रतिबिंब दिसते का? आज शालेय विद्यार्थ्यापुढे असे एकादे उत्तुंग व चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व उभे आहे

का? या गोष्टींचा आपण जरा अंतर्मुख होऊन विचार करू लागलो तर कोणालाही चिंताच वाटेल. यासाठी माझ्या मते लोकशाहीत लोकशिक्षणाला फार मोठे महत्व आहे. लोकशाही टिकावयाची असेल तर लोकांना केवळ सुशिक्षित करून सोडले म्हणजे कार्य संपले असे म्हणता येणार नाही. लोकशाहीतील नागरिक केवळ ज्ञानी असून चालणार नाही. ज्ञानाच्या डोळ्यांनी चांगले काय व वाईट काय, सत्य काय व असत्य काय, इष्ट काय व अनिष्ट काय हे त्याला ओळखता आले पाहिजे, सुजाण, सुबुद्ध व सुसंस्कृत नागरिक तयार करणे, हे लोकशाहीतील शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. अशा ध्येय–धोरणांनी आखलेली शिक्षणाची व्यवस्था ही लोकशाहीतील फार मोठी गुंतवणूक आहे.

वृत्तपत्र : समाजजीवनाचे दर्पण

माझे मित्र राजकवी भोसले हे जातिवंत कवी आहेत व व्यवसायाने पत्रकार आहेत. कवीचे जग हे कल्पनेचे जग असते. परंतु कल्पनेच्या आधाराने मानव–जीवनाचे शाश्वत सत्य शोधणे हेच त्यांचे काम असते. यासाठी एक कवि वर्तमानपत्र चालवितो, म्हणून ते चांगले चालेल का नाही, अशी शंका कविमनात येऊच नये असे मला वाटते. राजकवि अनेक संकटांना तोंड देवून तावून सुलाखून बाहेर निघाले आहेत. आज कागद टंचाईच्या काळातदेखील त्यानी हे धाडस आरंभिले आहे. कागदाच्या एवढ्या महागाईच्या काळातही समाजात माणुसकीची महागाई वाढू नये म्हणूनच राजकवि भोसले यांनी वृत्तपत्राच्या क्षेत्रात हा नवा यज्ञ आरंभिला आहे. माणुसकीची जोपासना करून समाज सतत जागृत ठेवणे हेच कागदाचे कार्य आहे. माझ्या मते कागद हा लोकशाहीचा आत्मा आहे. कागदाची नाकेबंदी म्हणजे लोकशाहीची मुस्कटदाबी होय. आणि म्हणून लोकशाही जर टिकवावयाची असेल तर प्रथम वर्तमानपत्रे जगविली पाहिजेत. कारण वृत्तपत्रे म्हणजे समाज-जीवनाला आकार देणारे महत्त्वाचे साधन आहे. साहित्य संस्कृति, धर्म, नीति, कला व संगीत यातील सौंदर्य व सामर्थ्य समाजा-

पर्यंत पोहचविणे हे वर्तमान पत्रांचे प्रथम कर्तव्य आहे. यासाठी खऱ्या वर्तमानपत्रात समाज–जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब दिसले पाहिजे. समाज–जीवनाचे ते स्वच्छ दर्पण असले पाहिजे. आणि अशा वृत्त–पत्रासच मी गतीशील लोकशाहीचे नेत्र मानतो. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्या देशाच्या वाटणीत अशा वृत्तपत्रांचे महत्व फार मोठे आहे. स्वातंत्र्यपूर्ण भारत कसा होता, तो कसा स्वतंत्र झाला, स्वातंत्र्योत्तर भारताची कशी घडण जडण झाली, कशी होत आहे व कशी व्हायला पाहिजे यांचे योग्य ते चित्र समाजापुढे ठेवणारा ज्ञानवंत बुद्धिवंत व दृष्टा असा संपादक आज हवा आहे. राजकवि भोसले हे सौंदर्यपूर्ण दृष्टि असलेले व एक समर्थ तथा नेटके व्यक्तिमत्त्व असलेले असे संपादक आहेत. कवि जन्मसिद्ध असावा लागतो, तो तयार करता येत नाही असे म्हणतात. याचप्रमाणे संपादकही जन्मसिद्ध असावा लागतो. तो तयार करण्याचे कारखाने अद्याप आपल्या देशात निघालेले नाहीत. राजकवी भोसले हे जन्मसिद्ध कवी व संपादक आहेत, त्यामुळे सायं. दैनिक 'लोकसेवक' हे लोकसेवेच्या ध्येयातून आणि ध्यासातून सतत पुढे चालेल याविषयी मला मोठा आत्मविश्वास वाटतो.

ही तर वृत्तपत्रांची बांधीलकी

'वर्तमानपत्र म्हणजे राजकारण' अशी सर्व सामान्य माणसा-पर्यंतची समजूत आहे. परंतु केवळ राजकारणाला वाहून घेतलेली वर्त-मानपत्रे समाजाचे किती भले करतील हे सांगणे कठीणच आहे. ज्या वर्तमानपत्रात राजकारणाबरोबर समाजकारण, अर्थकारण व साहित्यकारण यांचाही परामर्श घेतला जातो त्या वर्तमानपत्राकडून समाजाच्या बऱ्याचशा अपेक्षा फलद्रुप होतील, असे मला वाटते. कारण वर्तमानपत्रांचा वाचक हा बहूरंगी व बहूढंगी असतो, यासाठी सर्व-थरातील वाचकाला काय वाचावयाला द्यावे या बरोबरच काय वाचावयाला देऊ नये या गोष्टीचाही विचार करावयास हवा. वर्त-मानपत्रात आठवड्याचे राशिभविष्य छापल्यामुळे लोकांचा कार्य-वादावरील विश्वास उडेल,उत्तानशृंगारपूर्ण चित्रें छापल्यामुळे लोकांची


कामवासना भडकेल, केवळ पैसे मिळतात म्हणून जाहिराती छापण्यावर भर दिल्यामुळे वाचक विटून जातील, हे वर्तमानपत्रावरील सर्वच आक्षेप तथ्यहीन आहेत असे मलाही वाटत नाही. आणि म्हणून "जसे वाचक तसे वर्तमानपत्र" असे न होता "जसे वर्तमानपत्र तसे वाचक" असे चित्र निर्माण झाले पाहिजे. कारण जाहिरातीपासून ते अग्रलेखा-पर्यंतचे सर्व लेखन समाजहिताच्या दृष्टीने कसे दर्जेदार ठेवता येईल, यावर कुशल संपादकाने नजर ठेवली पाहिजे. यांचा अर्थ समाजाचे खरेखुरे दर्शन वर्तमानपत्रात घडू नये, असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. समाजातील दुष्ट प्रवृत्तीना प्रकाशात आणून समाजातील सुष्ट प्रवृत्ती वाढीस लावल्या गेल्या पाहिजेत. जे अनिष्ट आहे, क्षुद्र आहे, त्याज्य आहे, ते झटकून टाकलेच पाहिजे. जे इष्ट आहे, उदात्त आहे, ग्राह्य आहे ते झटकन् स्वीकारलेही पाहिजे. यासाठी स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रावर फार मोठी जबाबदारी येवून पडलेली आहे. लोकशाहीप्रधान भारत देशाची जडणघडण करण्याचे कार्य आजच्या वृत्तपत्रांचे आहे असे मला वाटते आणि म्हणून लोकशाहीतील समाज-हिताची बांधीलकी मान्य करून सायं. दैनिक लोकसेवक कार्य करेल अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

कोल्हापूर,
दिनांक १५ ऑगस्ट १९७४

सहकाराविषयक विचार

सुचिता, सद्भाव व सदभिरूचि यांच्या संगमावर साकार झालेल्या सहकार पंढरीचे पूज्य दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी घडविलेले सम्यक् दर्शन.

— रा. तु. भगत



आधी केले मग सांगितले

'सहकारी संस्थातील परस्पर संबंध या विषयावर प्राचार्य श्री. य. द. देशपांडे व 'सहकार' प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री.प्र.द.येरवडेकर वांनी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांची मुलाखत घेतली. त्या मुलाखतीत श्री पंचागंगा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात झालेल्या विकासाच्या संदर्भात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी व्यक्त केलेले विचार.

मी नागपूरला आलो ते आपल्या धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयाने आयोजित केलेल्या परिसंवादाचे अध्यक्षपद स्वीकारायला. परंतु त्याचवेळी 'एक पंथ दो काज' या म्हणीप्रमाणे आपण 'सहकारी संस्थातील परस्पर संबंध' या विषयावर माझी मुलाखत घेण्याची गोष्टही सुनिश्चित केलेली आहे, याची मला पूर्व कल्पनाही नाही. परंतु 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने आम्ही पंचगंगा सहकारी साखर कारखान्यात यासंबंधी जे केले आहे तेच सांगतो.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास मुख्यतः संख्यात्मक स्वरूपाचा असून सहकारी संस्थांची वाढ उदग्र स्वरूपात झालेली

आहे. परंतु सहकारी संस्थांच्या प्रगतीबद्दल कधी-कधी भुरळ पाडणारे वर्णन केले जाते व ते लोकांनाही पटत असते. यामुळे सहकारी संस्थातील अंतर्गत कामकाजाचे कच्चे दुवे व त्यांचे परस्पर संबंध तपासून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. सर्व सामान्यपणे असे आढळते की, सहकारी संस्थेची प्रगती तिच्या नेत्याभोवती केंद्रित झालेली असते. तो नेतासुद्धा आपल्याभोवती असे केंद्रीकरण स्वत:च्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने निर्माण करीत असतो. त्यामुळे सामान्य सभासद व जनता खऱ्या विकासापासून दूर राहते. काही काळानंतर या दोन्ही घटकाकडून असमाधान व सहकारी चळवळीवर निष्कारण टीका असा भाग दृष्टोत्पत्तीस येतो. म्हणून व्हिएन्ना येथे १९६६ साली भरलेल्या जागतिक सहकारी परिषदेने सहकारी संस्थातील परस्पर संबंध असे नवीन सहकारी तत्त्व म्हणून स्वीकारले हे खरोखरीच स्वागतार्ह होय. महाराष्ट्रातील सहकारी कार्यकर्त्यांना आंतरराष्ट्रीय सहकारी तत्त्व आयोग डॉ. द. गो. कर्वे यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आल्याबद्दल अभिमान वाटावयास पाहिजे. नागपूर येथे १९५८ साली भरलेल्या राज्य सहकारी परिषदेने या विषयावर एक समिती नियुक्त करण्याची शिफारस केली. त्याबद्दल नागपूरकरांनाही अभिमान वाटावा. महाराष्ट्र राज्य सहकारी संघसुद्धा समितीचे काम पूर्ण केल्याबद्दल व समितीचा अहवाल प्रसिद्ध केल्याबद्दल आमच्या धन्यवादास पात्र आहे

संघटनेतील अंतर्गत संबंध

सुरवातीला मी असे म्हणेन की, सहकारी संघटनेतच परस्पर संबंधीच्या काही पद्धती पाळल्या जातात. प्रत्येक सहकारी संस्थेच्या सहकारी कायद्यातील तरतुदीप्रमाणे आपल्या सभासदांची वार्षिक साधारण सभा बोलाविणे अनिवार्य आहे. कायद्यात या सभेसमोर कमीत कमी कोणते विषय असावेत हे सांगितले आहे. तसेच व्यवस्थापक समितीने संस्थेचे झालेले कामकाज सभासदांना समजावून देणे व सभासदांनी लोकशाही अधिकार वापरणे हे अपेक्षित आहे. मी

सहकारी संस्थांना प्रथमतः व्यावसायिक संघटना मानतो. तसेच सहकारी संस्था सामाजिक संस्था असल्याने त्यांचे आर्थिक व्यवहारविषयक व्यवस्थापन टाटा व बिर्लांच्या कार्यक्षम व्यवस्थापनापेक्षाही जास्त कार्यक्षम असावयास पाहिजे. ठराविक दराने लाभांश वाटणे हा सभासदांना संतोष देणारा एक भाग आहे. जेव्हा मी संघटनेतील अंतर्गत परस्पर संबंध म्हणतो, त्यावेळी व्यवस्थापकीय वर्गाचे सभासदांशी, मजुरांशी इतर बाह्य संस्थांशी संबंध आणि सभासदांचे सामान्य जनतेशी संबंध हा अर्थ मी घेतो.

व्यवस्थापक व सभासद

साधारण सभा ही सहकारी संस्थेत सर्वोच्च अधिकार असलेली सभा होय. परंतु लोकशाही संकेताच्या मर्यादेमुळे ही सभा वर्षातून एकदाच भरत असते. पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या साधारण सभेला ७५ टक्के उपस्थिती असते. व्यवस्थापकांचे सभासदांशी संबंध वाढावेत म्हणून आम्ही खेड्यांना भेटी देण्याची पद्धत सुरू केली आहे. या कारखान्याच्या अंतर्गत १०० खेडी आहेत. या भेटीचे वेळी संचालक मंडळाचे सभासद, व शेतकी अधिकारी बरोबर असतात. प्रत्येक खेड्यात ३–४ तासपर्यंत कारखान्याच्या कामकाजाबद्दल, यात आर्थिक व्यवहार, ताळेबंदाचा तपशील, नवीन सुधारणा, योजना इत्यादीबाबत सविस्तर चर्चा केली जाते. सभासदांच्या अडचणीबाबत मार्गदर्शन केले जाते. याप्रमाणे भेटी घेताना प्रत्येक खेड्यात काही निष्ठावान सभासदांची यादी करून घेतली जाते आणि त्यांना ३ किंवा ४ महिन्यातून एकदा कारखान्यात बोलाविले जाते. आमचा उद्देश कारखान्याच्या कामकाजाचा सर्वच तपशील त्यांचेसमोर मांडणे हा आहे. यामुळे दोन लोकशाही कारखान्यांचे खरे मालक म्हणून आम्ही त्यांच्यासमोर नम्रतेने झुकतो. तर दुसऱ्या बाजूने हे एक सामाजिक शिक्षणाचे साधन आहे. तिसरा व फार महत्त्वाचा भाग म्हणजे यामुळे आम्ही जाहीर रीतीने वचनबद्ध होतो. या पद्धतीचा मोठा भाग म्हणजे निवडणुकीद्वारा व्यवस्थापक

समिती बनविण्याची तरतूद असूनही सभासदांनी निवडणुकीचा आग्रह कधी धरला नाही.

व्यवस्थापन

सहकारी साखर कारखान्यात व्यवस्थापनाची प्रमुख कामे म्हणजे साखरविक्री, यंत्रसामुग्री खरेदी करणे, इ. संशयाला जागा राहू नये म्हणून एक नियम पाळला जातो व तो म्हणजे अध्यक्ष किंवा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही बाबतीत अधिकार प्रदान न करणे होय. दुसरा नियम असा पाळला जातो की, पुरवठा करणाऱ्या कडे जावयाचे नाही तर त्यालाच कारखान्यात बोलवावयाचे. कारखान्यात ती व्यक्ती आल्यावर सर्वच संचालक मंडळाचे सदस्य त्यांचेबरोबर चर्चा करतात व निर्णय घेतात. या पद्धतीत वेळ जास्त जातो म्हणुन कोणीही टीका करतील व अध्यक्षांना किंवा व्यवस्थापकापैकी कोणाला तरी अधिकार प्रदान करणे हाच योग्य मार्ग आहे असे म्हणतील. मी हा मार्ग स्वीकारणार नाही. कारण अधिकार प्रदान केल्याने संचालक मंडळातील सभासदांचा व्यवस्थापनातील सहभाग कमी होतो व असा सहभाग वाढविणे ही सहकारी संस्थातील लोकशाहीची मूळ आवश्यकता आहे. असा सहभाग वरील पद्धतीचा साखर विक्रीचे वेळी अवलंब केल्यास आणखी वाढतो.

या अवघड अशा पद्धती आहेत. परंतु ही लोकशाहीची किंमत आहे असे मी मानतो.त्यामुळे सहकारी संस्था खाजगी संस्थापेक्षा चांगल्या काम करू शकतील. या पद्धतीत दबावामुळे निर्णय घेण्याची प्रथा जाऊन त्याऐवजी सभासदात जाणीवपूर्वक निर्णय घेण्याची दक्षता वाढेल.

व्यवस्थापन व कामगार

कामगार हेही एक क्षेत्र, आणि त्याचा विचार आतापर्यंत विवेचनात झालेला नाही. कामगारांच्या बाबतीत सहकारी साखर कार-

खान्यांनी स्वत:ला आदर्श मालक समजले पाहिजे. सरकारने केलेल्या नियमानुसार जे काही कामगारांना द्यावे लागते त्याव्यतिरिक्त आमचा कारखाना एकूण पगाराच्या ३० टक्के इतकी रक्कम बोनस म्हणून कामगारांना देत असतो.

आम्ही स्वत:ला कार्यक्षमतेच्या निकषातून वगळू इच्छित नाही. कारण आम्ही सहकारी क्षेत्रात आहो. आम्ही पक्षांची माणसे आहोत. मंत्रीवगैरे आहोत. मला संस्थेच्या कामकाजविषयक मूळ तांत्रिक मुद्द्याशी तडतोड करणे मान्य नाही.

सर्वसामान्य जनतेशी संबंध

ज्यावेळी सीतेने हनुमानाला हिऱ्याची अंगठी दाखविली, त्यावेळी हनुमानाने हिऱ्याच्या पैलूत रामाचे प्रतिबिंब कोठे दिसते का, याबद्दल शोध घेतला. तसेच आम्ही कारखान्यात काम करताना स्वत:ला प्रश्न विचारला पाहिजे आणि समाजातील गरीब लोकांबद्दल नेहमी आठवण ठेवली पाहिजे. त्यांचे आर्थिक कल्याण साधणे हाच आपल्या प्रत्येक कार्यवाहीचा परिणाम असला पाहिजे. आमच्या परोपकारी कृत्यामुळे लोकांचे मानसिक परिवर्तन होऊ शकते. त्यांच्यातील संस्कृती वाढीला लागू शकेल असे मी मानतो. लोकांच्याच पैशातून साखर कारखाना उभारला जात असल्यामुळे विकासाच्या क्षेत्रात सामाजिक प्रभावाचे तंत्र वाढीस लावणे ही आमची नैतिक जबाबदारी ठरते. समृद्धीमुळे सभासदांच्या जीवन–सवयी जसे, चांगले घर, वाहन ठेवणे वगैरे बदलविण्याचे बाबतीत मर्यादा नाही, परंतु त्यांच्यावरील सामाजिक जबाबदारीला त्याला उत्तर द्यावे लागेल हे नेहमी त्याने लक्षात ठेवले पाहिजे. सभासदांचे मन सामाजिक जबाबदारीचे दृष्टीने तयार केले पाहिजे. हे घोषणा व भाषणे देऊन साध्य होणार नाही तर विचारपूर्वक योजना करूनच साध्य होऊ शकेल.

याबाबत पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे कार्य पाहणे अप्रस्तुत ठरणार नाही. ऊंस उत्पादनासाठी व उत्पन्न वाढविण्यासाठी

जलसिंचनाची सोय करणे आवश्यक आहे. जवळपास शेकडा ८५ टक्के सभासदांची जमीन साधारण १ एकराचे जवळपास आहे. कारखान्याकडून स्वतःच्या खर्चाने मोफत गरीब शेतकरी व हरिजन सभासदासाठी जलसिंचनाची सोय कमी केली जाते. कारखान्याचे नवीन शेअर्स फक्त नवीन लोकांनाच दिले जातात. जेव्हा सहकारी सूत गिरणी स्थापन करण्याचे योजले त्यावेळी सूत गिरणीचे शेअर्स साखर कारखान्यात आधी सभासद असलेल्या लोकांना देणे शक्य झाले. आम्ही मात्र नवीन लोकांनाच सभासद होण्यास प्रवृत्ती करतो. हे मुलाखतीसाठी अर्ज बोलावून व खेड्यातील प्रमुख लोकासमोर मुलाखत घेऊन केले जाते. प्रत्येक शेअरची किंमत रु. ५००।– आहे. नवीन सभासदांची पैसे देण्याची कुवत लक्षात घेऊन रु. १० लाख सरकारी भांडवलातून निम्मी रक्कम किंवा पूर्ण रक्कम देऊन दिले जातात. आम्ही सरकारी आर्थिक सवलतीचे वाटप करण्याची पद्धती प्रात्यक्षिकाद्वारे दाखविली आहे.

या संदर्भात आम्ही दिलेल्या मदतीची आणखी काही उदाहरणे देणे सयुक्तिक होईल. माध्यमिक शाळांना इमारती, खेळांचे साहित्य व प्रयोगशाळा आवश्यक असतात. माध्यमिक शाळांनी योजना तयार केल्यास प्रत्येक खोलीला रु. ११,००० व प्रयोगशाळांच्या उभारणीच्या खर्चाचा ५० टक्के भाग कारखान्याकडून दिला जातो. खेळाचे नवीन मैदान घेण्यासाठी खर्चाच्या $\frac{1}{4}$ रक्कम व अस्तित्वात असलेल्या मैदानाची दुरुस्तीवगैरे करण्यासाठी $\frac{1}{2}$ रक्कम दिली जाते. शेतकी शाळासाठी शेतीक्षेत्र असावे म्हणून काही खर्च केला जातो. याबाबत कारखाना ठराविक खेड्यातील आपल्या सभासदांना जादा मदत देण्यासाठी प्रवृत्त करीत असतो. या व्यतिरिक्त प्रत्येक शाळेला रु. २५०।– याप्रमाणे ग्रंथालयासाठी रक्कम दिली जाते. सभासदांनी अशी अतिरिक्त मदत देणे परोपकार नसून त्यांचे कारखान्याप्रती हे कर्तव्यच ठरते. शिवाय संस्थेच्या कार्यात त्यांनी सहभागी होणे होय, याची प्रेरणा केंद्रस्थानी असलेल्या कारखान्याकडून मिळते. या दृष्टिकोनातून मी सभासदांचा इच्छित सहभाग लक्षात घेतो.

सहभागाचे प्रकार

सभासदांचा सहभाग अनेक प्रकार वाढविण्यासाठी पुष्कळ वाव आहे. आम्ही मुक्या व बहिऱ्या तरुणांची पाहणी करण्यासाठी पुणे येथून तज्ज्ञ बोलविले होते. या तज्ज्ञाचा खर्च कारखान्याने दिला व प्रत्येकाचा ऐतिहासिक आढावा तयार करण्यात आला. असे दिसून आले की, ४०० मुलांपैकी १०० मुले शाळेत पाठवून दुरुस्त होऊ शकतात. कारखान्यानी अंध- मुक्या मुलांच्यासाठी येथील न्यू एज्युकेशन सोसायटीला रु. २५,०००।– दिले. कारखान्याने ऐकण्याचे साहित्य खरेदी करण्यासाठीही खर्च केला आहे. डॉ. मोदी डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्याचे शिबिर आयोजित करतात. त्या प्रत्येक शिबिरासाठी रु. ५००० प्रमाणे मदत दिली जाते.

वरील मार्गाशिवाय गरीब लोकांच्या मुलामधील सुप्त गुणांना वाव मिळवून देणे आवश्यक आहे. म्हणून पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी या संस्थेला अशा विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन पात्र विद्यार्थी त्यांचे संस्थेत दाखल करण्याची विनंती करण्यात आली. या संस्थेच्या निदेशकाने ५ मुलांची निवड ५ व्या वर्गात दाखल करण्यासाठी केली. ही मुले ११ व्या वर्गापर्यंत या संस्थेत शिकू शकतील. पुढील सात वर्षात प्रत्येक वर्षी ५ मुले दाखल करून कारखान्याने रु. ३५,०००।– खर्च करण्यास संमती दिली आहे. प्रत्येक मुलामागे दर महिन्याला रु. १००।– कारखाना देतो व बाकी रु. २५।– मुलांचे पालक सहन करतात. शाळांच्या मुख्याध्यापकांनी मुलांना चांचणी परीक्षेत बसविण्यासाठी स्वतःच्या खर्चाने प्रवास केला हे स्पृहणीय आहे. प्रबोधिनी संस्थेत ३५ मुलांना लागणाऱ्या जागेच्या प्रश्नावरून गोंधळ निर्माण झाला. कारखान्याने वसतिगृह बांधण्याचा खर्च सोसण्याचे कबूल केले आहे.

मदतीचे क्षेत्र बुद्धिमान मुलापुरते मर्यादित न ठेवता सर्वसामान्य बुद्धिमत्तेची मुले व त्यांचे शिक्षक यांच्याशी बौद्धिक विकासाचा कारखान्याने विचार केलेला आहे. कारखान्याने प्राथमिक शाळांच्या शिक्ष-

कांना व ग्रंथालय सुरू करण्यासाठी काही रोख रक्कम उत्तेजनार्थ देण्याची योजना सुरू केलेली आहे. आमच्या बुद्धिमान ५ मुलांची निवड करण्याच्या योजनेमुळे निरनिराळ्या धर्माची मुले समोर येत आहेत हे स्पष्ट झालेले आहे.

बुद्धिवान मुलांची निवड करण्याखेरीज कारखान्यांनी निरनिराळे खेळ सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिलेले आहे. उसाची कापणी करण्यासाठी सहा विभाग पाडले आहेत. प्रत्येक विभागात दर वर्षी दोन कुस्त्यांचे सामने घेतले जातात. या कार्यक्रमासाठी दर वर्षी रु. ३०,०००।– खर्च केले जातात. प्रत्येक सामन्यासाठी रू. २,५००।– खर्च केले जातात. कुस्त्यांच्या सामन्यासाठी व ग्रंथालयासाठी ग्रामीण भागात समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

जर हरिजनांना सामूहिक सभास्थान बांधावयाचे असेल तर अंदाजित खर्चाच्या ½ रक्कम कारखान्याकडून दिली जाते. बाकी रक्कम हरिजन खेड्यातील इतर सभासदांकडून जमवितात.

क्षेत्रीय विकास

सहकारी साखर कारखान्यावर काही सामाजिक बंधनेही असतात. मंत्री निधी समितीने प्रत्येक टनाला रू. १ याप्रमाणे क्षेत्र विकास निधीकरिता अंशदान घेण्यास मंजुरी दिली आहे. आणखी रु. १ संशोधन निधीकरिता घेतला जातो. कानपूर येथील प्रयोगशाळेसारखी प्रयोगशाळा सहकारी साखर कारखान्यात असणे आवश्यक आहे.

दुसरे वैशिष्ट्य असे की, उपसा सिंचन योजनाद्वारा २० टक्के जमीन लागवडीखाली आणण्यात आली आहे. शेतांच्या पृष्ठभागावरील रस्ते म्हणजे शेती उत्पादनाच्या जीवनरेखा होत. परंतु हे रस्ते वाईट अवस्थेत आहेत व त्यांचा विकास करणे अत्याअवश्यक आहे. कारखान्याने, सरकारने प्रत्येक टनाला रु. १४ प्रमाणे घेतलेल्या खरेदी करातून रु. १.२५ परत मिळविण्यात यश मिळविलेले आहे. असे

रु. ६ लाख जमविले असून त्यात कारखाना २ लाख आपले घालीत असतो. या मदतीतून कारखान्याने दरवर्षी ३० मैलाचे रस्ते दुरुस्त करण्याची योजना तयार केली आहे. ही योजना ५ ते ९ वर्षात पूर्ण होईल.

कारखाना सहकारी क्षेत्रात कागद कारखाना काढण्यासाठी प्रवर्तनाचे कार्य करीत आहे. यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सात सहकारी कारखान्यांची सभा बोलाविली असून या सात कारखान्याकडून ३५ कोटी रुपयाचा कागद कारखाना सुरू केला जाईल.

शेतीचा संकलित विकास

कारखान्याच्या क्षेत्रात होणारी पाच प्रमुख पिके याप्रमाणे आहेत.:– (१) ऊंस (२) भुईमुग (३) तंबाखू (४) ज्वारी (५) कापूस. १९५८ साली उसाचे दर एकरी उत्पादन २५ टन होते. १९७३ साली ते ४० टनापर्यंत गेले आहे. परंतु बिगर सभासदांचे ते २५ टनच राहिले आहे. कारखाना प्लॉटस् पुरवून बियाणे गोळा करीत असतो. सुरवातीला सिंचनाची सोय फक्त २० टक्के जमिनीइतकीच मर्यादित होती. नंतर कारखाना सुरू झाल्यावर आणखी २० टक्के जमिनीला सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. आता एकूण ४० टक्के जमीन सिंचनाखाली आहे. यावरून महाराष्ट्रातील तुटपुंज्या सिंचन प्रमाणावरून या मूळ गरजेचे महत्त्व लक्षात येईल.

समपातळीवरील परस्पर संबंध

मी सुरवातीलाच म्हटल्याप्रमाणे सहकारी चळवळीची उदग्र स्वरूपात प्रगती झालेली आहे. आर्थिक व्यवस्थेत तीन महत्त्वाची क्षेत्रे असतात. उत्पादन, वितरण आणि मधला दुवा म्हणजे विपणन होय. मूलभूत सहकारी संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होत आणि उत्पादनासाठी त्यांना मदत करणाऱ्या सहकारी बँका त्यांच्या बाजूच्या

वर्गात मोडतात. परस्पर संबंध स्थापन करण्यासाठी त्यांच्यामधील सद्‌गुणांची वाढ करणे आवश्यक आहे. म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात परस्पर संबंधाची व्याख्या करण्याची वेळ आलेली आहे. सहकारी कायद्यात एका व्यक्तीने किती ठिकाणी पदे भूषवावीत याबद्दल बंधने घातली आहेत. आणि म्हणून ही आवश्यकता आहे. जरी अशी बंधने अधिकाराचे व शक्तीचे केंद्रीकरण टाळण्यासाठी व इतर लोकांना संधी प्राप्त करून देण्यासाठी घालून देण्यात आली असली तरीही कायद्यात परस्पर संबंधाबद्दल महत्त्व प्रतिपादन केलेले नाही. तसेच समपातळीवरील सहकारी संस्थांच्या अशा रूढी सर्व संस्थांच्या सामान्य सभा बोलावून आणि कामकाजाची आणि अंतर्गत संबंधाची सामान्य तत्वे चळवळीच्या वाढीसाठी ठरवू शकतात.

उपसंहार

पंचगंगा सहकारी साखर कारखान्याने वर सांगितल्याप्रमाणे सभासदांशी व मजूरांशी व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून संबंध प्रस्थापित केले आहेत. तसेच सांस्कृतिक व सामाजिक जीवनात सभासदांना सहभाग वाढविण्यासाठीही कारखान्याने प्रोत्सहान दिलेले आहे. असा सहभाग त्यांनी सर्वसाधारण प्रसंगी द्यावयाच्या आर्थिक अंशदानाव्यतिरिक्त असतो. यामुळे सामाजिक बंधने निर्माण होतात आणि एका बाजूला व्यवस्थापक समितीचा सभासदांशी वागण्यात मानसिक बदल शक्य होऊ दिलेले नाही. सहकारी सूत गिरणी, कागद कारखाना, चलचित्रपट संस्था व इतर संस्था स्थापन करण्यासाठी कारखान्याची व्यवस्थापक समिती एखाद्या झऱ्यासारखी मदत पुरवीत होती. खेळांची व ग्रंथालयाची प्रगती व्हावी म्हणून तज्ज्ञ व्यक्तींच्या समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. कायद्याचे वितरण करण्यासाठी गरजू व्यक्ती पूर्वग्रहदूषित न होता राजकीय संबंध व जात–पातीकडे लक्ष न देता असाधारण स्वरूपाचे तत्त्व स्वीकारले गेलेले आहे. शेवटी माणुसकीकरता आर्थिक, सामाजिक व संस्कृतिक प्रगती लहानपणी किंवा वाढत्या वयात होणे महत्त्वाचे असते. पुढील पायरी म्हणजे संस्थांचे समपातळीवरील व उदग्र स्वरूपात संबंध स्थापन

होणे होय. सहकारी संस्थांच्या मूलभूत घटकात परस्पर संबंध स्थापन होणेसाठी योग्य ती चौकट निर्माण होणे आवश्यक आहे, असे मला वाटते. यामुळे योग्य व सुदृढ प्रकारचे वातावरण निर्माण होईल आणि व्यापक प्रमाणावर कार्य हाती घेण्यासाठी व परिणामकारक समपातळीवरील व उदग्र स्वरूपाचे परस्पर संबंध स्थापन होण्यासाठी संधी उपलब्ध होईल. यामुळे संस्थेच्या सभासदांचा तर विकास होईलच परंतु सर्वसामान्य जनतेचाही विकास होऊ शकेल.

नागपूर,
दिनांक १५-१-१९७४

संजीव सहकार

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या तालुक्याच्या ठिकाणी चालू असलेल्या दि आजरा अर्बन-को-ऑप. बँकेच्या नव्या वास्तुच्या उद्घाटन प्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी मांडलेले विचार.

या समारंभाचे महत्त्व आगळे आणि वेगळे आहे. आपल्या दि आजरा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या नव्या बांधलेल्या वास्तूच्या उद्–घाटनाला आपण मला निमंत्रित केले. या बँकेच्या संबंधी माझ्या मनांत नेहमीच आपुलकीच्या व समाधानाच्या भावना आहेत. बँका या भांडवलावर चालतात. भांडवल म्हणजे पैसा असे आपण समजतो. आपली बँक पैशाच्या भांडवलाने चांगली चालली आहेच. त्याशिवाय सामान्य जनांची दुःखे समजावून घेणे, त्यांचे हित पाहणे आणि ते सोडविणेसाठी प्रयत्न करणे, हा प्रयत्न प्रामाणिकपणे करणे, या भांड–वलावर तुमची बँक चालूं आहे. अशा तऱ्हेने चालणाऱ्या बँकांच खरा समाजवाद आणू शकतील. आपली बँक गेल्या दहा वर्षात वरील दृष्टी नजरेसमोर घेऊन काम करीत आली आहे. मला माहित आहे की या काळात या बँकेला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले आहे. पण तुमच्या बँकेजवळ वरील लोकहितैषी दृष्टी असल्यामुळे तुमची बँक सर्व संकटा–तून तावून सुलाखून निघाली असून आज तेजस्वीपणे ही वास्तू बांधून वाटचाल करीत आहे.

देशाचे खरे शत्रू

आज आपल्या देशातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीचा आढावा घेतला तर असे म्हणावे लागेल की स्वतःला समाजधुरीण समजणाऱ्या लोकांच्या आचारात आणि विचारात फारकत झाली आहे. शब्द आणि कृती यांची कधी गाठभेटच पडत नाही. कष्ट न करता जगण्यात प्रतिष्ठा आहे. अशा लोकांची मक्तेदारी देशातील सर्व क्षेत्रात बोकाळलेली आहे. खऱ्या अर्थाने विनाकष्टाची अशी प्रतिष्ठा मिळवू पाहणारी माणसेच देशाचे खरे शत्रू होत आणि म्हणून आज माझा असा ठाम विश्वास आहे की समाजात मांगल्य निर्माण करणाऱ्या समाज सुधारण्याच्या जीवनाला स्पर्श करणारा सुबुद्ध व सुदृढ मानव समाजजीवन सुधारू शकेल. तेव्हा अशा शुद्ध, निरलस व उदात्त भावनेने समाजसुधारक जेव्हा काम करू लागेल तेव्हाच समाजात तो मांगल्याचे मळे निर्माण करू शकेल.

सहकार : दुधारी शस्त्र

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये "विना सहकार नही उद्धार" हा राष्ट्रीय विकासाचा मूलमंत्र मनी बाळगून सहकार क्षेत्रात कार्यकर्त्यांचे अेक नवे पर्व उदयास आले. सहकारी चळवळ ही काही अेखाद्या विशिष्ट पक्षाची चळवळ नाही. मूलतः ही लोकशाहीची चळवळ आहे. मानवी विकासाच्या मूलगामी तत्त्वाचे अधिष्ठान या चळवळीच्या पाठीशी आहे हे विसरता कामा नये. यासाठी ही चळवळ कार्यान्वित होत असताना लोकशाहीची प्रतिमा कोठेही डागळणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे. सामान्य माणसाच्या आणि शोषित समाजाच्या गरजा भागविणे, त्यांच्या उपयोगी पडणे, त्यांचे जीवन समृद्ध करणे हाच या सहकारी चळवळीचा प्राण आहे. आणि म्हणूनच लोकशाहीच्या दृष्टीकोनातून या चळवळीकडे निरलस नजरेने पाहिले पाहिजे. आज सहकार चळवळीने जो जोर पकडलेला आहे त्याचे मुख्य कारण सहकारी चळवळीमध्ये आर्थिक विकासाची शक्ती आहे हे होय. आपल्या शासनाने आर्थिक

प्रगतीचे अेक प्रबल साधन म्हणून सहकाराचा स्वीकार केला आहे. या चळवळीत जशी आर्थिक प्रगती आहे तशी आर्थिक सत्ता देखील आहे. त्यामुळे जिल्हानिहाय सत्तेची केन्द्रे उदयास आली आहेत. जेथे जेथे सत्तेचे केंद्र असेल तेथे तेथे लोकशाहीचा अंकुश असलाच पाहिजे. तसे नसल्यास समाजाच्या विकासाचे हे साधन समाजाच्या विनाशाचे दुधारी शस्त्र ठरेल.

दुष्ट चौकट

परंतु आज दुर्दैवाने मला आपणास असे सांगावेसे वाटते कीं. आपल्या देशात चालू असलेला सहकार हा ' समृद्ध सहकार ' नाही. तेथे पण मक्तेदारी घुसलेलीच आहे. अशा या परिस्थितीमुळे गरीब असोत अगर भांडवलदार असोत सगळेच पेचात पडले आहेत आणि म्हणूनच समाजातील ही दुष्ट चौकट उखडून काढण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण अेकमेकांची अंतःकरणें समजून घेऊन सर्वांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात सामावून घेतले पाहिजे. माणसा-माणसात स्वाभिमान निर्माण होअील अशा 'सजीव सहकारा' ची आपल्या देशाला आवश्यकता आहे आणि म्हणून संस्काराशिवाय सहकार साधता येणार नाही, हे मला आपणास आग्रहाने सांगावेसे वाटते. भारतातील गरिबीची तूट भरून काढावयाची असेल तर सहकारातील प्रत्येक कार्यकर्त्याने प्रामाणिकपणाची कास धरून कामाला लागले पाहिजे. ज्यांचे ठिकाणी असा प्रामाणिकपणा आहे, त्यांना मी हात जोडून प्रणाम करेन आणि सहकारातील हा प्रामाणिकपणा दि आजरा अर्बन को–ऑप. बँकेने गेल्या दहा वर्षात आपल्या कर्तृत्वाने उजळ केला आहे. म्हणूनच या संस्थेबद्दल माझ्या मनात आदर आणि जिव्हाळा आहे.

अशी माणसे आज दुर्मिळ

फक्त समाजवादाची भाषा समाजात आज बोलणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. समाजवाद उभारणीसाठी कष्ट करण्याची गरज

आहे. हे कष्ट म्हणजे बुद्धिकौशल्याने प्रचलित पद्धतीवर टीका करणे नव्हे अगर केवळ बोलकेपणाने लोकहिताची भाषा बोलणे नव्हे. कष्ट या शब्दाची व्याख्या थोडीशी व्यापक करणे जरूर आहे, हे मी समजतो, परंतु केवळ लोकांचा बुद्धिभेद करणे अगर प्रश्नांचे गांभीर्य दडविण्यासाठी संभावितपणाचा आव आणणे बरोबर नाही. समाजात आज अशाच लोकांची मक्तेदारी सर्वत्र बोकाळली आहे. त्यांच्या या समाज हितद्रोही गोष्टीची जाणीव सामान्य जनाला होणे मोठे अवघड असते. तरीपण समाजात या लोकांच्यापासून दूर राहण्याची भावना जागृत केली पाहिजे. या लोकांची ही कृत्ये समजून घेण्याची प्रेरणा तयार केली पाहिजे आणि ही प्रेरणा समाज डोळस झाल्याशिवाय कळणार नाही. या डोळसपणाचे शिक्षण समाजास देण्याची आज गरज आहे. ज्या दिवशी समाजाला हा डोळसपणा येईल तो दिवस आपल्या देशाच्या दृष्टीने सुदिन आहे. यासाठी तनाने, मनाने व धनाने प्रयत्न करण्यांची गरज आहे. असे प्रयत्न करणारी माणसे आज दुर्मिळ आहेत. हे जरी खरे असले तरी तुम्ही सर्व या बँकेचे काम करणारी मंडळी हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून काम करता ही समाधानाची गोष्ट आहे. म्हणूनच तुमची बँन्क ही खऱ्या अर्थाने जनतेची बँन्क आहे व ती नेहमी राहावी आणि या वास्तूत हे लोकहिताचे काम नेहमी चालावे अशी माझी अपेक्षा आहे.

आजरा,
दिनांक १६-६-१९७०

सहकार व समाजपरिवर्तन

रत्नागिरी जिल्हा सहकारी बोर्डाच्या परिषदेचे उद्घाटन करताना रत्नागिरी येथे दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी कार्यकर्त्यांसमोर केलेले मार्गदर्शनपर भाषण.

मित्रहो, सहकाराद्वारे समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकशाहीला अनुरूप अशी घटना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तयार झाली. शासनाने त्याला समाजवादाचे गोंडस स्वरूप दिले. पण भारताला अनुरूप असा समाजवाद कोणता हे खऱ्या अर्थाने किती जणांनी समजावून घेतला आहे, हे मला माहित नाही. आज अिंग्लंड अमेरिका व रशियाचे राजकर्तेसुद्धां समाजवादी राज्य–व्यवस्थेची टिमकी वाजवतात. पण भारताच्या समाजवादाची भाषा मी समजलो, ती अशी आहे कीं, व्यक्तीस्वातंत्र्य अबादित ठेवून लोककल्याणासाठी चाललेले राज्य होय. अशा समाजवादी समाजरचनेचे चांगल्या तऱ्हेने पोषण करावयाचे झाल्यास त्याला सहकारी तत्वाची सांगड घालावी लागेल. त्याशिवाय समाज परिवर्तन घडवून आणणे मुष्कील होईल असे मला वाटते. आणि त्या दृष्टीने विचारांची देवाणघेवाण करण्यासाठीच ही परिषद बोलावली असावी असे मला वाटते.

स्वातंत्र्योत्तर भारत झपाटयाने बदलत आहे. विशेषत: सहकारी क्षेत्रातही आमूलाग्र बदल घडून येत आहेत. या गोष्टीची जाणीव सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे. स्वराज्य प्राप्तीनंतर आपल्या ध्येयधोरणात बदल झाला असून काही गोष्टींना आपण वचनबद्धही झालो आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजात आमूलाग्र बदल होअील असा आपला अंदाजही होता. समाजाला उपकारक व हितकारक अशा गोष्टी घडून येतील व प्रत्येक नागरिकाला मानाने राहता येअील. प्रत्येक व्यक्तीचे महान् शक्तीचे दरवाजे खुले होतील व प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येअील असा आमचा अंदाज होता. परंतु मला मोठ्या खेदाने असे म्हणावेसे वाटते की, हा आमचा अंदाज पूर्ण चुकला आहे.

सहकारी अर्थव्यवस्था

लोकांचे, लोकासाठी आणि लोकानी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य होय. अशी अब्राहम लिंकनने लोकशाहीची व्याख्या केलेली आहे. या व्याख्येस मी अेक औपचारिक व्याख्या समजतो. आपण जर मला लोकशाहीची व्याख्या विचारली तर मी असे म्हणेन की, लोकांच्या परस्पर विचारसरणीने चालविलेले राज्य म्हणजेच लोकशाही राज्य होय. या व्याख्येतच लोकशाही राज्याचे खरे गमक आहे असे मला वाटते. तेव्हा लोकशाही म्हणजे शासनाचा एक विशिष्ट प्रकार नसून लोकांच्या मूलभूत प्रश्नांचा विचार करून परस्परांच्या विचारविनिमयातून सतत आकार घेणारी एक गतिशील शासन प्रक्रिया आहे.

आपण समाजवादाविषयी ज्या ज्यावेळी बोलतो, त्या त्या वेळी तुम्हाआम्हांला केवळ मार्क्सने सांगितलेला समाजवाद अपेक्षित नसतो. खरे पाहता एखादे नाणे व्यवहारातील भरपूर वापराने जसे गुळगुळीत होते, तसा तुम्हा लोकांचा समाजवादाकडे पहावयाचा दृष्टिकोन गुळगुळीत झालेला आहे. त्यामुळे मार्क्सने सांगितलेला तेवढाच समाजवाद काही आमच्या अंगवळणी पडलेला नाही. मार्क्सच्या मतानुसार मी आपणाला हेही सांगू अिच्छतो की, ग्रंथबद्ध

समाजवाद खरा मानावाच असे नाही. आणि म्हणून आपल्या भारतातील समाजवादाची व्याख्या ग्रंथनिष्ठ असता कामा नये. ती अनुभवसिद्ध असली पाहिजे. ज्या समाजवादाला अनुभवाचे अधिष्ठान आहे, तोच खरा समाजवाद होय, असे मला वाटते. म्हणून तुमची आमची आजची समाजवादाची व्याख्या भारतातील साठ कोटी जनतेच्या अनुभव विश्वासातून शद्धबद्ध होणार आहे. आकार घेणार आहे. अनुभूतीचे तेज असलेला व लोकशाही मूल्यावर आधारलेला असाच आपला समाजवाद आहे.

स्वराज्यानंतर आपला देश विकासाच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करू लागला. नियोजनबद्ध आर्थिक विकास घडवून आणण्याचा आराखडा आपण स्विकारला. हा असा विकास करावयाचा असेल, तर हुकुमशाही राज्यच आवश्यक असते. अशी काहीची कल्पना जगातील काही उदाहरणावरून दिसून येते. भारतात लोकशाही राज्य आहे. आणि म्हणूनच या लोकशाही राज्यव्यवस्थेतून भारताला विकास साधावयाचा आहे. हुकुमशाही अर्थव्यवस्थेत काही बदल किंवा सुधारणा अधिक गतीने होत असतात. परंतु आपल्या देशात लोकशाही आहे, आणि लोकशाही मार्गाने आर्थिक विकास कसा घडवून आणता येईल, हाच तुमच्याआमच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. तेव्हा आपणास आर्थिक विकास घडवून तर आणावयाचा आहे. आणि तोही व्यक्तीस्वातंत्र्याला कोणताही बाध न आणता साधावयाचा आहे. ही मर्यादा लक्षात घेता, आपल्याला एखाद्या नव्या माध्यमाची शोधाशोध करण्याची आवश्यकता भासते. या सर्व गोष्टींचा विचार करता आपल्याला आज प्रचलित असलेली व देशाचा विकास घडवून आणणारी एकमेव अर्थव्यवस्था दिसून येते, आणि ती म्हणजे सहकारी अर्थव्यवस्था होय. सहकारी अर्थव्यवस्थेमुळेच आपल्याला राज्यघटनेचे लोकशाही समाजवाद हे तत्त्व साध्य करता येईल.

सहकार हाच सुवर्णमध्य

आज सेवासंस्थामधून उच्च पातळीवरील सहकारी संस्थामध्ये एकसूत्रीपणा कसा आणता येईल हे पाहणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

कोणताही सिद्धान्त कितीही चांगला असला, तरी त्याची अम्मल-बजावणी जोपर्यंत चांगली होत नाही तोपर्यंत त्या सिद्धान्तातील तपशीलाला काही अर्थ राहणार नाही. यासाठी दृढनिश्चयानेच आपणास पुढे पाऊल टाकले पाहिजे. आज सहकार ही बलवत्तर, उपकारक, व सर्वांना हितकारक होईल अशी यंत्रणा असून तिच्यात नितान्त पावित्र्य आले पाहिजे. जेव्हा जेव्हा आपण आर्थिक समतेबद्दल बोलतो तेव्हा तेव्हा साम्यवादी कल्पना लोकांच्या मनात येत असताना आपणास दिसून येत आहेत. भांडवलशाहीमध्ये समाजहिताला वाव नाही. परंतु सहकारी चळवळ म्हणजे भांडवलशाही व साम्यवाद या दोन्हीतील दुर्गुण नाहीसे करून समाजवादाची प्रगती साधणारी अशी चळवळ आहे. सहकार म्हणजे साम्यवाद व भांडवलशाही यामधील सुवर्णमध्य आहे. आज सामान्य माणसानेदेखील या गोष्टीचा विचार करून सहकारी अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला पाहिजे.

नियोजनबद्ध समाजपरिवर्तन

लोकशाहीत नियोजनबद्ध समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे कार्य सहकारी चळवळीद्वारे होऊ शकेल. नियोजनबद्ध समाजविकास चांगला व्हावयास पाहिजे असेल तर माणसांची मने चांगल्या विचाराने बांधली जावयास पाहिजेत. सहकारी कार्यकर्त्यांचेवर ही मोठी जबाबदारी आहे. यासाठी सिद्धान्त व तपशील याची सांगड घातली गेली पाहिजे. सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे काम मोठे पवित्र व समाजकल्याणकारी असे आहे. तेव्हा सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांची अशी प्रार्थना पाहिजे की, सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी पावित्र्य दे, हिंमत दे, आणि हे शुद्ध भावनेने जाणले तर जमाखर्च लिहिताना चूक होणार नाही. सहकारी क्षेत्रात अर्थसंचय होत नाही, परंतु हा अर्थसंचय सामुदायिक स्वरूपाचा असतो. लोकशाही समाजवाद साध्य करण्याचे ध्येय सहकाराने साध्य होणार आहे. यासाठी सहकारी क्षेत्रात चारित्र्य आणि पावित्र्य याची फार मोठी आवश्यकता असते. हे सहकारी कार्यकर्त्यांनी कधीही विसरू नये. कारण चारित्र्य–

हीन व पावित्र्य–हीन सहकारात समाजकल्याणाची भावना शून्यवत् असते.

सहकारी फलोद्यान

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऊस पिकविणारा शेतकरी दिसून येतो. त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये फळ पिकविणारा शेतकरी दिसून येतो. कोल्हापूरचा ऊसवाला व रत्नागिरीचा फळवाला असे समीकरण येत्या चार वर्षात दिसले पाहिजे. सहकारी साखर कारखान्याच्या ऊस दरामध्ये चाळीस ते पन्नास रुपयांची तफावत शेतकऱ्याला जेव्हा दिसून आली, त्यावेळी त्यांनी आपला ऊस सहकारी कारखान्याकडे देण्याचे ठरविले. सहकारामुळे निश्चित फायदा दिसून आला की, जनता सहकारामध्ये स्वत:हून पुढाकार घेते. यासाठी सहकारी संस्थांनी सेवेबरोबर नफ्याचाही विचार लक्षात घेतला पाहिजे. रत्नागिरी जिल्ह्याचा भौगोलिक विचार करता लहान लहान पाटबंधारे योजना हाती घेऊन या सहकारी संस्था कार्यक्षम करता येतील. रत्नागिरी जिल्ह्यात सहकारी फलोद्यान सोसायटया स्थापन करून समाजविकास साधता येईल. त्या दृष्टीने जिल्ह्यातील कार्यक्षम सहकारी कार्यकर्त्यांनी विकासाचा आराखडा तयार करून तो कार्यान्वित केल्यास आपला जिल्हा वैभवशाली होण्यास वेळ लागणार नाही, असे मला वाटते.

सहकाराचे भांडवल

आज गरीबातील गरीब माणूस सहकारी चळवळीचा कसा फायदा घेईल, याचा विचार सहकारी कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. परस्परांना सहकार्य करूनच सर्वांनी सुपंथ अवलंबित केला पाहिजे. गरीबातील गरीब घटक सहकारी चळवळीतील अंग कसे बनेल याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. यासाठी त्याच्यावर काही संस्कार घडवून आणले पाहिजेत. अशा संस्काराशिवाय उद्धार नाही, हे सहकारी कार्यकर्त्यांनी पक्के लक्षात ठेवले पाहिजे. सहकार युगाचा हाच मूलमंत्र त्यानी नित्य मनात

बाळगला पाहिजे. संस्काराशिवाय सहकारी चळवळीला फुलोरा येणार नाही. तेव्हा सहकारच्या वाढीसाठी संस्कार ही अत्यावश्यक गोष्ट आहे. सहकारी चळवळीमध्ये काम करताना संस्कार या आधाराला बाजूला ठेवून चालणार नाही. कारण लोकशाहीत संस्काराला मौलिक स्वरूपाचे महत्त्व असते. खरे पाहता सहकारामध्ये भांडवलाला महत्त्व नसून माणसाला आणि माणसातील चारित्र्याला अधिक महत्त्व आहे. चारित्र्य आणि प्रामाणिकपणा हेच सहकाराचे खरेखुरे भांडवल आहे.

सहकाराचे गमक

सहकारी चळवळीच्या मुख्य तीन कसोट्या असून या कसोट्यावरच ही चळवळ आजपर्यंत यशस्वी झाली आहे, असे मी मानतो. पहिली कसोटी म्हणजे उद्योगधंद्यातील शास्त्र जाणून घेऊन तो उद्योग शंभर टक्के कार्यक्षमतेने चालविणे ही होय. दुसरी कसोटी म्हणजे समाजातील दुर्बल, दलित व गरीब घटकांना मदत करून त्यांना समर्थ करणे. आणि तिसरी कसोटी म्हणजे माणसांचा सांस्कृतिक व वैचारिक विकास करणे होय. या तीन कसोट्यावरच सहकारी चळवळीच्या यशस्वितेचे मूल्यमापन केले पाहिजे. यासाठी सहकारी क्षेत्रात निष्ठेने, सचोटीने कार्य करणाऱ्या चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांची नितान्त आवश्यकता आहे.

अशा सहकारातूनच समाज जीवन फुलवावयाचे आहे. लोकसंख्येसारख्या प्रचंड भूकंपाला तोंड देण्यासाठी सहकाराचा आधार घेतला पाहिजे. आज हा सहकार समाजपरिवर्तनाचा प्रमुख आधार आहे. सहकारी हीच समाजजीवन पद्धती आहे. मानवी जीवनात मूलभूत मूल्यांचा आविष्कार करण्याचे सहकार हे प्रधान साधन आहे. या सहकाराच्या चळवळीद्वारेच आपण समाजाला सुखी, समृद्ध व संपन्न करू शकू असा मला दृढविश्वास वाटतो.

रत्नागिरी जिल्ह्याचा अेकूणच विकासाचा प्रश्न ज्या ज्या वेळी बोलून दाखविला जातो, त्यावेळी या जिल्ह्यातील साधनसंपत्तीबाबत

आमचे दुर्लक्ष झाले आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. समाजपरिवर्तन घडविण्यासाठी, सहकारी तत्त्वाचा प्रचार करण्यासाठी कार्यकर्त्यांचे मोहोळ या जिल्ह्यात निर्माण होऊ शकले नाही. अथला पुरुषवर्ग मार्गदर्शन न मिळाल्यामुळे उद्योगासाठी आपले घर सोडून मुंबईकडे धावला. त्यातूनच या जिल्ह्याकडे पाहण्याची दृष्टी असणारा सामाजिक कार्यकर्ता अितरत्र धावल्यामुळे हा प्रश्न ज्या तऱ्हेने हाताळणे शक्य झाले असते, ते झाले नसावे. पण आता सहकाराचे मूळ या जिल्ह्यात धरू लागले आहे. जिल्ह्यात आहे त्या साधनसंपत्तीचे संगोपन करून त्यांचे मोठ्या उद्योगधंद्यात रूपांतर करण्याचे प्रयत्न सुरू होत आहेत. त्यादृष्टीने या परिषदेचे महत्त्व समजून घेऊन देशाच्या विकासात रत्नागिरी जिल्हादेखील पाठीमागे नाही याची प्रचिती आणून द्यावी लागेल.

आज आपल्या रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व सहकारी कार्यकर्त्यांच्या समोर मला माझे विचार मांडण्याची संधी मिळाली याबद्दल मी स्वतःला धन्य समजून या परिषदेच्या संयोजकांचे आभार मानतो.

रत्नागिरी,
दिनांक १-२-१९७३

बहुजन हिताय बहुजन सुखाय

नासिक जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांच्या मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्गदर्शनपर उद्बोधक भाषण.

आज नासिक जिल्हा परिषदेच्यावतीने जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांचा भरलेला हा मेळावा म्हणजे अेक अैतिहासिक मेळावा आहे, असे वाटते. स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळ झपाटयाने पसरली अेवढेच म्हणता येणार नाही, तर ती चळवळ महाराष्ट्राच्या मातीमध्ये पक्की रुजली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ठिकाणी असलेल्या शील, सचोटी आणि प्रामाणिकपणा या गुणामुळे महाराष्ट्राच्या मातीत सहकार वृक्षाला गोड फळे लागली आहेत. या गोड फळांचे रसास्वादन करताना सहकारवृक्षाला कडू फळे लागणार नाहीत, याचीही आपण खबरदारी घेतली पाहिजे, आणि म्हणून सहकारी क्षेत्रातील भल्याबुऱ्याचा आढावा घेण्यासाठी भरलेला हा मेळावा मला अैतिहासिक वाटतो.

सहकार : अेक जीवन पद्धती

सहकारी चळवळ सर्वगामी वाढत आहे. विशेषत: महाराष्ट्रात तर ही चळवळ स्वाभिमान वाटावा अशी वाढली. विविध अंगांना स्पर्श

करणाऱ्या सहकारी संस्था निघाल्या, परंतु विविध अंगांचा स्पर्श समजावून घेणारे कार्यकर्ते आज अत्यंत कमी आहेत. महाराष्ट्रातील ही सहकारी चळवळ अेकसंघ आहे असे मानणारे कार्यकर्ते किती आहेत याचा विचार करू लागलो तर यासंबंधी निराशाच पदरी येण्याची शक्यता अधिक आहे. खरे पाहता याबाबत आपण अत्यंत जपून बोलले पाहिजे. सहकारी क्षेत्रातील गुणाबरोबरच दोषासंबंधी जेव्हा आपण बोलतो अगर ती चळवळ सुधारावी म्हणून आपण सूचना करतो तेव्हा विरोधक त्याचा फायदा घेतात आणि सगळ्या चळवळीवर घातक टीका करतात. त्या दृष्टीने आज आपण संघर्षाच्या अेका टोकावर उभे आहोत आणि म्हणून सहकारी क्षेत्रातील काम किती चांगले आहे हे सांगण्यासाठी वेळ घालविण्याची जरूरी नाही. कारण ती अेक जीवन-पद्धती आहे हे शाबीत झालेले आहे. मात्र त्याची अंमलबजावणी कशी होणार हाच खरा महत्त्वाचा भाग आहे

विश्वास : सहकाराचे मूळ भांडवल

सध्या सर्वत्र विश्वासाचा अभाव निर्माण झाला आहे. परस्परा-वरील अविश्वासाच्या वातावरणात सहकारी संस्थांचा वृक्ष फोफावू शकत नाही. सहकारी क्षेत्रातील कामात मूलभूत सिद्धान्तावर विश्वास आहे आणि तो आज डळमळीत झाला आहे. ज्याला आपण शील म्हणतो ते शील आपल्यात किती आहे याचा सहकार चळवळीतील प्रत्येक कार्यकर्त्याने अंतर्मुख होऊन शोध आणि बोध घ्यावा. शीलाची व्याख्या फक्त पैसे खाणे अथवा न खाणे अेवढीच मी करीत नाही. आज धंदा करण्यासाठी सरकार शेअर भांडवल देते. असे हे शेअर भांडवल सरकार संस्थेच्या संवर्धनासाठी देते. त्यातून संस्था काढाव्या व त्यांचे संगोपन करावे ही सरकारची अपेक्षा असते. परंतु सभासदांना डिव्हिडंड द्यावा लागतो म्हणून तो न वाटणे हे शीलाला धरून आहे काय ? विशेषत: ऑडिटमध्ये संस्थेचे मूल्यमापन कसे असू शकते याची आपणास सर्वांना माहिती आहे. असे ऑडिट हे व्हौचर ऑडिट आहे. तुमच्या शीलाचे ऑडिट नाही. ते शील आपणच बनविले पाहिजे.

सहकारातील उणिवा

शासन आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधावरदेखील ही चळवळ अवलंबून आहे. सहकारी चळवळ एक जीवनपद्धती म्हणून आपण जेव्हा पाहतो, त्यावेळी शासनाचे समाजाशी असलेले संबंध नजरेआड करता येत नाहीत. याशिवाय या चळवळीबद्दल मी जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा तेव्हा या चळवळीच्या मार्गात मला तीन भयंकर उणिवा दिसून येतात. गरीब आणि श्रीमंत ही पहिली उणीव होय. ही उणीव दूर करण्याचे कार्य आजपर्यंत समर्थपणे कोणीच करू शकले नाही. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत गेले आणि गरीब गरीबच राहिले. आज मात्र हे अंतर भरून काढण्यासाठी सहकारा–शिवाय दुसरा सर्वोत्तम मार्ग नाही असे मला वाटते. ज्ञानी व अज्ञानी ही दुसरी उणीव होय. आपल्या देशात गेल्या २०–२२ वर्षाच्या प्रयत्नानंतरही ज्यास्तीतजास्त २५ ते ३० टक्के लोक साक्षर झाले आहेत. हा काही आपल्या देशातील भूषणावह कार्यक्रम आहे असे मी म्हणणार नाही. वडीलधारी पिढी आणि तरुण पिढी ही तिसरी उणीव होय. ही गोष्ट अत्यंत नाजूक आणि धोक्याची आहे. तरुणांना वाटते ही वडीलधारी पिढी कालबाह्य आहे व वडीलधारी मंडळी म्हणतात की आजचे तरुण कुचकामी बनत चाललेले आहेत आजच्या समाजाने ही उणीव जर समजून घेतली नाही तर यातून किती भयानक स्फोट होईल हे सांगता येणार नाही आणि म्हणून या तिन्हीही गोष्टीतील संघर्ष समूळ नष्ट झाल्याशिवाय सहकारी चळवळ सर्वार्थाने यशस्वी होणार नाही. जीवनाच्या सर्व गोष्टीशी आपल्या सहकारी चळवळीचा स्पर्श हवा. सहकारी चळवळीसाठी आम्ही संख्येने किती एकत्र आलो आहोत, यापेक्षा आपण मनाने पर–स्परांच्या किती जवळ आलो आहोत यावरच सहकारी चळवळीचे यश अवलंबून आहे असे मला वाटते.

सहकारातील काही पथ्ये

सहकार क्षेत्रात आईच्या ममतेने काम करणे जरूर आहे. विचाराने आधी एक होणे जरूर असून जीवननिष्ठा पायाशुद्ध

भूमिकेवर आधारलेली असली पाहिजे. सहकारी संस्थेत जर काम चांगले व्हावयाचे असेल तर सहकारातील काही पथ्ये आपण पाळलीच पाहिजेत. यातील पहिले पथ्य म्हणजे ज्या संस्थेचे काम हाती असेल त्या संस्थेला अनुरूप असलेल्या सर्व नियमांची काटेकोरपणे जोपासना केली पाहिजे. बॅलन्सशीट चोख निघाला, आर्थिक व्यवहार चोख निघाला आणि तो सर्व सहकाऱ्याना चोखपणे कळला असे झाले पाहिजे. दुसरे पथ्य म्हणजे या सहकारी चळवळीतून गरीवांचा किती उद्धार होतो हे पाहिले पाहिजे. सीतेने दिलेल्या हाराच्या प्रत्येक हिऱ्यात राम दिसतो का हे जसे मारुतीने पाहिले तसे सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक कामात गरीब दिसतो का हे पाहिले पाहिजे. यासाठी केवळ–टाटा बिर्लासारखे औद्योगिक समूह निर्माण करून देशाचे भले होणार नाही. अगर ठराविक सभा–सदांच्या मालकीचे अनेक उद्योग समूह मग ते सहकारी पद्धतीचे असले तरी निर्माण करून चालणार नाहीत. तिसरे पथ्य म्हणजे कोणत्याही धंद्यात विशेष व्यक्तीला, स्थान न देता त्यात सामान्य माणसाला देखील स्थान मिळावे म्हणून त्याच्या समृद्धीबरोबरच त्याला मनानेही मोठा केला पाहिजे. सहकारी संस्थांची दृष्टी " बहुजन हिताय बहुजन सुखाय " अशीच असली पाहिजे. असा समाजाभिमुख दृष्टिकोनच सहकारी संस्थांच्या उज्ज्वल भवितव्याला कारणीभूत ठरेल असे मला वाटते.

आज माझ्याबरोबर महाराष्ट्रातील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ पां. वा. गाडगीळ हे पण या मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी येथे उपस्थित आहेत. त्यांनी उत्पादन वाढविणारा शेतकरी व ग्राहक यांच्यात परस्पर संबंध स्थापन होण्याची आवश्यकता, त्यांच्यामधील व्यापारी हा दुवा काढून टाकण्याची मागणी, लोकसंख्येवर नियंत्रण, भाववाढ व चलन फुगवटा यांच्यातील परस्पर संबंधाचे मोठे मार्मिक विवेचन आपणापुढे केलेले आहे. या सर्व विचारमंथनाचे सार अेवढेच की समाजातील दुर्बल, दलित व गरीब घटक सबल व समर्थ बनला पाहिजे. आपल्या जिल्हचातील सर्व सहकारी कार्यकर्ते ही गोष्ट मनात

रूजवून घेऊन कामाला लागतील अशी मी अपेक्षा केली तर वावगे ठरणार नाही.

नासिक,
दिनांक १८-११-१९७१

अवघे धरू सुपंथ

नागपूर येथील धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयात "सहकारी संस्थातील परस्पर संबंध" या विषयावर एक परिसंवाद आयोजित केलेला होता. या परिसंवादात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

"सहकारी संस्थातील परस्पर संबंध" या सहकारी चळवळीत नव्याने समाविष्ट झालेल्या तत्त्वावर येथील धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयाने परिसंवाद आयोजित करून फार मोठे औचित्य साधले आहे. सहकारी चळवळीत क्रियाशीलपणे भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांना या परिसंवादातून फार मोठा लाभ होणार आहे. या परिसंवादात भाग घेणे एवढाच उद्देश कार्यकर्त्यांनी न बाळगता येथे जे विचारमंथन झालेले आहे त्यानुसार काही तरी कृती निर्माण व्हावयास पाहिजे. कारण आज महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा जनमानसावर होणारा परिणाम व त्याचे अस्तित्व अवलंबून आहे. सहकाराविषयी भारताच्या कानाकोपऱ्यात चांगले वाईट अैकावयास मिळत असतानाच सहकाराचा विशुद्ध विचार जनमानसी बिंबविण्याच्या हेतूने आज येथे जो परिसंवाद आयोजित केला गेला आहे, त्या पाठीमागे संयोजकांची दूरदृष्टी स्पष्ट दिसून येते. प्रथम या

परिसंवादाच्या या संयोजकांना धन्यवाद देऊन मी माझ्या विषयाकडे वळतो.

सहकार म्हणजे काय ?

महाराष्ट्रामध्ये "सहकार" हा शब्द केवळ रूढ झाला आहे असे नव्हे तर तो लोकजीवनाचे एक प्रमुख अंग होऊन बसला आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्यामुळे सहकार हा शब्द महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासाचा परवलीचा शब्द होऊन बसला आहे. मानवामध्ये उपजतच परस्परास मदत करण्याची जी प्रवृत्ती असते तिलाच सहकार म्हटले तर अयोग्य ठरणार नाही. काही समान साध्यासाठी एकत्र येऊन विचार-विनिमय करून जेव्हा जनहितासाठी कृती केली जाते तेव्हा तिला सहकार असे म्हणतात, ही सहकार विषयीची मूळ अभिप्रेत कल्पना माझ्या मनात अनेक दिवस बिंबून राहिली आहे. तेव्हा जनकल्याणकारी अशा सामुदायिक प्रयत्नात सहकाराची मूलभूत कल्पना सामावलेली आहे. फार वर्षापासून जनहितासाठी जे अनेक सामुदायिक प्रयत्न झाले आहेत, होत आहेत त्यातील सर्वमान्य होणारा प्रयत्न म्हणजे हा सहकार होय.

सहकाराची गरज

पैसा हे विनिमयाचे प्रमुख साधन असल्यामुळे समाजातील वेगवेगळ्या घटकांचा परस्पर संबंध दुरावत गेला. विशेषतः उत्पादक, वितरक आणि उपभोगता हे सारे वेगवेगळे घटक बनले. त्यामुळे फार थोड्या लोकांच्या हातात समाजजीवनाच्या नाड्या केंद्रित होऊ लागल्या. अन्य समाज दिवसभर परिश्रम करूनही दैन्यावस्थेत राहू लागला, अशा समाजाच्या परिश्रमाचा काही थोडे लोक फायदा घेऊ लागले, त्यामुळे काही थोडे लोकच अधिक शक्तिशाली झाले. समाजाच्या परिश्रमातून निर्माण होणाऱ्या पैशाचे मालक झाले. त्यामुळे समाजातील सामान्य व्यक्तीची स्वायत्तता, क्रयशीलता, उत्साह, आनंद व अभिमान या सगळ्यांचा कोंडमारा होऊ लागला. स्वतःच्या परिश्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीच्या विनियोगाशी

व्यक्तीचा संबंध दुरावत चालल्यामुळे एकतऱ्हेची स्फोटक परिस्थिती निर्माण होऊ लागली.

अशा या परिस्थितीमध्ये व्यक्तीची स्वायत्तता, क्रयशीलता, आनंद व अभिमान जर टिकवावयाचा असेल तर सहकाराची नितान्त गरज आहे असे मी म्हणेन. कारण अशा सहकारामुळे समाजातील दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक आधार देणे जरूरीचे आहे. लघु उद्योगाचा आधार घेऊन त्यांचा आर्थिक पाया भरभक्कम करता येणेही शक्य आहे. त्या योगे सहकारी यंत्रणेत आलेले सर्व दुर्बल घटक सहकार्याने उत्पादन वाढवून आपले जीवनमान सुधारू शकतात.

सहकाराचा उदय

कोणत्याही ज्ञान शाखेचा उगम शोधताना आपणास पाश्चात्य ज्ञानाकडे धावपळ करण्याची सवय लागली आहे. त्यामुळे सहकाराचे मूळ शोधताना असे घडले तर त्यात काय नवल? खरे पाहता नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये असे म्हणतात. परंतु असे मूळ शोधणाऱ्याचे खूळ काही लोकांना लागलेले असते. आणि असे जे जर मूळ सापडले नाही तर "हे पाश्चात्य आहे" असा शेरा मारून ते लोक मोकळे होतात. आपण थोडा डोळसपणे विचार केला तर सहकाराचे मूळ शोधण्यासाठी भारत सोडून जाण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. अगदी अलीकडे सापडलेल्या शिलालेखावरून असे शाबीत झालेले आहे की, प्राचीन भारतात चांभार, कुंभार, सोनार आणि सावकार यांच्या संघटना ग्रामीण आणि नागरी भागात काम करीत होत्या. त्यामुळे आम्हा भारतीयांना "सहकार" हा शब्द व त्याचा अर्थ नवीन वाटावा असे नाही. परंतु ज्या अर्थाने आजच्या भारतात "जय सहकार" म्हणून जो सर्वत्र सहकाराचा उदोउदो चाललेला आहे तो सहकाराचा अर्थ आपल्या पूर्वीच्या पिढ्यांना कदाचित माहित नसेल परंतु सहकाराची भावना व सहकाराची जीवन पद्धती त्यांना माहित नसेल असे म्हणणे जरा धाडसाचेच होईल. "जुनीच दारू नव्या बाटलीत" भरून विक्रीस ठेवल्यास

जशी प्रसिद्धी मिळते तशी स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीस प्रसिद्धी मिळालेली आहे. " सहकारी जीवन पद्धती म्हणजे काम करण्याची सांस्कृतिक पद्धती होय " असे म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूनी या सहकार चळवळीचा जोरदारपणे पुरस्कार केला तर " सहकाराशिवाय मला अननुभूत शक्तिमान व सामाजिक उद्दिष्टे असलेला दुसरा मार्ग माहित नाही " असे म्हणून श्रीमती इंदिरा गांधीनी या चळवळीस पुष्टी दिली.

आधुनिक विचारप्रणालीच्या दृष्टिकोनातून सहकाराचे मूळ म्हणजे अर्थ व्यवस्थेचा उगम होय. या उगमाचा अुमज पहिल्यांदा म्हणजे सन १८९४ मध्ये अिंग्लंडमध्ये रॉशडेल पायोनियर्सनी स्थापना केलेल्या दुकानावरून आढळून आला. " सामान्य माणसाचे शोषण होते व ते शोषण थांबविले पाहिजे " याच विचारातून या दुकानाने आकार घेतला आणि येथेच सहकार चळवळीचा प्रथम उदय झाला असे म्हणावे लागेल. खऱ्या अर्थाने रॉशनडेलाच सहकाराचे खरे पायोनियर म्हणावे लागतील. परंतु आजची सहकारी चळवळ राबर्ट ओवेनलाच सहकाराचा आद्य जनक म्हणून मानते. कारण रॉबर्ट ओवेननेच सर्व प्रथम सामाजिक व आर्थिक संघटन करण्याचे आवाहन केले. त्याच बरोबर खाजगी नफ्याच्या रूपाने चाललेले समाजाचे शोषण बंद व्हावे व सामुदायिक उत्पादन वाढवून होणाऱ्या सामुदायिक नफ्यातून सर्व समाजाचे भले व्हावे अित्यादी गोष्टींचे त्याने जोरदार प्रतिपादन केले. सहकाराचे मूळ शोधण्याच्या या प्रयत्नातून सार काढावयाचे झाल्यास असे म्हणता येअील की, सामान्य माणसांच्या गरजा आणि आशा–आकांक्षा यांच्या पूर्तीचे सुवर्णमाध्यम म्हणूनच सहकार पद्धतीचा उगम झाला, असा हा सहकार आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या घटकांना आर्थिक दृष्ट्या संपन्न असणाऱ्या घटकांच्या जाचातून मोकळे करतो.

सहकाराचे ध्येय

व्यक्तिस्वातंत्र्य आबाधित ठेवून व्यक्तीचा विकास करण्याच्या हेतूने सहकारी चळवळ उदयास आली. माणसामाणसातला फरक

नाहीसा करून अेकत्र काम करण्याच्या विचारातून सहकार जन्माला आला. अशा सहकाराचे खरेखुरे ध्येय समाजातील दुर्बल आणि निराधार व्यक्तीचे हित साधणे हेच आहे. दुर्बल घटकांना सबल बनविण्याच्या कल्पनेतच या सहकाराचे ध्येय सामावलेले आहे. या संदर्भात मला अेक गोष्ट आठवते म्हणून सांगतो. " रावणाने सीतेला पळवून नेले व तिला अशोकवनात ठेवले. रामाच्या आज्ञेनुसार सीतामाईची भेट घेण्यासाठी हनुमान अशोकवनात हजर झाले. सीतामाईने हनुमानाला बक्षीस म्हणून मोत्याची माळ दिली. हनुमान त्या माळेतील प्रत्येक मणी फोडून बघू लागला. तेव्हा सीतामाईनी माळेतील मणी फोडण्याचे कारण विचारले. त्याबरोबर हनुमान म्हणाले की " या माळेतील मण्यामध्ये " राम "आहे किंवा नाही हे मी पाहात होतो." याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्याला सहकारी कार्यात " गरीब माणूस " दिसला पाहिजे. खरे पाहाता " गरीब माणसाचे " कल्याण हेच सहकाराचे अंतिम ध्येय होय.

सहकाराची तत्त्वे

कोणतीही सहकारी संस्था घेतली तर ती काही नियमाची बांधलेली असते. जगातील पहिली सहकारी संस्था म्हणजे, " रॉशेनडेल सोसायटी " होय. या सोसायटीच्या संचालकांनी सोसायटी चालविण्यासाठी काही नियम केले. हेच नियम पुढे सहकारी संस्थांची तत्त्वे म्हणून संबोधण्यात आली. विशेषतः सन १९६४ साली आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने बोर्नमाऊथ येथे आंतरराष्ट्रीय काँग्रेस भरविली. तेथे अेक खास आयोग नियुक्त करण्यात आला. या आयोगाने रॉशेनडेल सोसायटीच्या तत्त्वांचीच परंतु आधुनिक युगाशी सुसंगत अशी सहकारी तत्त्वांची पुनर्मांडणी केली. ती म्हणजे (१) खुले व अैच्छिक सभासदत्व (२) लोकशाही नियंत्रण (३) भांडवलावर मर्यादित व्याज (४) सहकारी शिक्षण (५) वाढाव्याची न्याय वाटणी. या पाच तत्त्वाशिवाय आणखी अेक सहावे तत्त्व मांडण्यात आले. ते म्हणजे संस्था-संस्थामधील परस्पर सहकार्य होय. या तत्त्वाचे प्रत्यक्ष शब्दां-

कनही लक्षात ठेवण्यासारखे आहे. या सहकारातील सहा तत्त्वांचा सर्व प्रकाराच्या संघर्षाशी तोंड देण्याच्या हेतूने पाठपुरावा करणे आवश्यक आहे. घरोघरी सहकार्याची चळवळ बलवत्तर करण्याच्या दृष्टीने या सहाव्या तत्त्वाचा आपण सर्वांनी कटाक्षाने अंमल केला पाहिजे.

सहकाराचे घटक

सहकारी चळवळीमध्ये शेतकरी हा महत्त्वाचा घटक म्हणून मानला गेला आहे. इतकेच नव्हे तर सहकारी चळवळीचा आत्मा म्हणून शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. सहकारी चळवळीचे जीवन म्हणून " शेतकऱ्या " चे स्थान मान्य केल्यानंतर ही चळवळ कृषिऔद्योगिक विकासासाठी प्रत्येक खेडेपातळीवर विकसित झाली पाहिजे. त्यामुळे आपल्या श्रमातून आपले फळ मिळविण्यासाठी तो शेतकरी समर्थ होईल. आणि म्हणूनच सहकारी संस्थांची खऱ्या अर्थाने वाढ व्हावयाची असेल तर त्यासाठी शेतकऱ्यांची क्रियाशील निष्ठा आवश्यक आहे.

दुर्बल घटकांना संरक्षण देण्याच्या हेतूने सहकारी चळवळ सुरू झाली हे मान्य केल्यानंतर शेतकऱ्याप्रमाणेच सहकारी चळवळीचा दुसरा घटक म्हणजे कामगार होय हे नाकबूल करून चालणार नाही. सहकारी औद्योगिक प्रक्रियेला मदत करणारा खरा घटक कामगार आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा बारकाईने विचार केल्यास असे दिसून येईल की, सहकारातील " कामगार " हा घटक दुर्लक्षित आहे. समाजातील दुर्बल घटकाना सर्व बाजूनी मदत करून त्यांना सबल बनविणे आवश्यक आहे ही भूमिका सहकाराने अेकदा मान्य केल्यानंतर जो कामगार श्रम करतो त्याला योग्य मोबदला मिळतो की नाही,त्याची आर्थिक सुधारणा होते की नाही व तो जीवनावश्यक गरजांची पूर्ती करण्यास समर्थ झाला आहे की नाही, हे पाहणे क्रम-प्राप्त होते. सहकार ही केवळ समर्थांची तलवार नसून तो असमर्थांची ढाल आहे हेही या संदर्भात आपण सर्वांनी लक्षात ठेविले पाहिजे.

सहकाराची वाटचाल

महाराष्ट्रात झपाट्याने वाढणारी सहकारी चळवळ आता पूर्ण वयात आली आहे असे मी म्हणेन. सामान्य माणसांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सहकारी चळवळीचे जे कार्य झाले आहे ते व्यापक असले तरी, मोजण्याइतकेच आहे आणि म्हणून सहकाराच्या वाटचालीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांचा मला अभिमानाने उल्लेख करावासा वाटतो. सहकारी यशातला पहिला वाटा राज्यपातळीवरील व जिल्हा पातळीवरील सहकारी बँकांनी उचलला आहे. केवळ कर्ज पुरवठा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या अनंत अडचणी सोडविण्याच्या प्रयत्नात या सहकारी बँका प्रयत्नशील राहिल्या आहेत. याच संदर्भात दुसरे नाव भूविकास बँकांचे घ्यावे लागेल. महाराष्ट्रातील अनेक अेकर कोरडवाहू जमिनीला पाण्याची गाठभेट घालून देण्यात या बँकेने मोठा वाटा उचललेला आहे. विशेषत: महाराष्ट्रातील शेतकरी सहकारी साखर कारखान्यानी या सहकारी क्षेत्रात डोळ्यात भरण्यासारखे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात खरी क्रांती घडवून आणली आहे. ग्रामीण समाजाची सर्वांगीण उन्नती करण्यामध्ये साखर कारखान्याचे स्थान मोठे आहे. याशिवाय खरेदी विक्री संस्था, ग्राहक भांडारे व सहकारी कर्मचारी वर्ग यांचे सहकारी चळवळीतील कार्य विसरता येणार नाही. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजवादी रचना व लोकशाही यांनी बद्ध झालेल्या भारताला सामाजिक व आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने सहकाराचे स्थान फारच उच्च आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सहकारी चळवळ आणि कल्याणकारी राज्य या दोहोमध्ये असणाऱ्या समाज उद्देशांची जाणीव होय.

सहकारातील परस्पर संबंध

एकत्र येऊन कार्य केल्यास कार्यशक्ती वाढते व या उलट एकटेपणाने कार्य केल्यास कार्यशक्ती क्षीण होते, हे अलिखित तत्त्व सहकाराने मान्य केले आहे. त्याप्रमाणे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेले घटक एकत्र येऊन आर्थिकशक्ती वाढविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करू

लागल्या आहेत. अशा विविध सहकारी संस्थांनी परस्पर व्यापारसंबंध प्रस्थापित करून उत्पादन, वितरण व सेवा यामध्ये चांगली सुकरता निर्माण करता येईल. त्यामुळे उत्पादक, संस्था व वितरण व्यवस्था करणाऱ्या संस्था या दोन्हींचाही आर्थिक फायदा होईल. या दोन संस्थामधील मध्यस्थांचेही सहज उच्चाटन होईल. उत्पादक संस्था व वितरण व्यवस्था करणाऱ्या संस्था एकत्रित आल्यामुळे कायमस्वरूपाची आर्थिक प्रक्रिया संघटित होऊ शकेल व काही नवीन व्यवसायही हाती घेता येईल. यामुळे ग्रामीण व नागरी भागातील सहकारी कार्यकर्त्यांचे एकत्रीकरण होऊन त्यांच्यामध्ये सहकाराची भावना वाढत राहील, उत्पादनाचा वेगही वाढेल व वितरणात नैतिक तत्त्वांना महत्त्वही दिले जाईल. तेव्हा या फायद्यासाठी सहकारी संस्थातील परस्पर संबंधांचे महत्त्व फार मननीय आहे. या सहकारी संस्थातील परस्पर संबंधामुळेच सहकारी संस्थांचा एक संघ दुसऱ्या संघावरोबर भागीदारी करून दीर्घ मुदतीचा व्यापारासंबंधी करार करून किंवा संघटनात्मक करार करून नवनवे उद्योग हाती घेऊ शकेल.

सहकारातील समन्वय

आज आपण " सहकारी संस्थातील परस्पर संबंध " या विषयावर जेव्हा विचार करतो तेव्हा त्याचा मूळ आधार सहकारी तत्त्वांचा आहे हे विसरता कामा नये. तत्त्वामध्ये तडजोड नसते. तेव्हा समन्वय म्हणजे तडजोड असा आपण अर्थ करू नये. आर्थिक विकास साधण्यासाठी कच्चा माल पुरविणारा, भांडवलदार, कामगार, ग्राहक व काम करून घेणारा यांच्यामध्ये समन्वय साधण्याची आज नितान्त आवश्यकता आहे. अशा समन्वयांची साखळी गुंफता आली तर सहकारी संस्थांचा आर्थिक विकास होईल.

सहकारातील माणुसकी

जगातील सर्वच व्यवहार व मानवामानवामधील संबंध याचा आपण जरा बारकाईने विचार केला तर असे दिसून येईल की, जगा-

सहकाराची वाटचाल

महाराष्ट्रात झपाट्याने वाढणारी सहकारी चळवळ आता पूर्ण वयात आली आहे असे मी म्हणेन. सामान्य माणसांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सहकारी चळवळीचे जे कार्य झाले आहे ते व्यापक असले तरी, मोजण्याइतकेच आहे आणि म्हणून सहकाराच्या वाटचालीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांचा मला अभिमानाने उल्लेख करावासा वाटतो. सहकारी यशातला पहिला वाटा राज्यपातळीवरील व जिल्हा पातळीवरील सहकारी बँकांनी उचलला आहे. केवळ कर्ज पुरवठा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या अनंत अडचणी सोडविण्याच्या प्रयत्नात या सहकारी बँका प्रयत्नशील राहिल्या आहेत. याच संदर्भात दुसरे नाव भूविकास बँकांचे घ्यावे लागेल. महाराष्ट्रातील अनेक अेकर कोरडवाहू जमिनीला पाण्याची गाठभेट घालून देण्यात या बँकेने मोठा वाटा उचललेला आहे. विशेषतः महाराष्ट्रातील शेतकरी सहकारी साखर कारखान्यानी या सहकारी क्षेत्रात डोळ्यात भरण्यासारखे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात खरी क्रांती घडवून आणली आहे. ग्रामीण समाजाची सर्वांगीण उन्नती करण्यामध्ये साखर कारखान्याचे स्थान मोठे आहे. याशिवाय खरेदी विक्री संस्था, ग्राहक भांडारे व सहकारी कर्मचारी वर्ग यांचे सहकारी चळवळीतील कार्य विसरता येणार नाही. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजवादी रचना व लोकशाही यांनी बद्ध झालेल्या भारताला सामाजिक व आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने सहकाराचे स्थान फारच उच्च आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सहकारी चळवळ आणि कल्याणकारी राज्य या दोहोमध्ये असणाऱ्या समाज उद्देशांची जाणीव होय.

सहकारातील परस्पर संबंध

एकत्र येऊन कार्य केल्यास कार्यशक्ती वाढते व या उलट एकटेपणाने कार्य केल्यास कार्यशक्ती क्षीण होते, हे अलिखित तत्त्व सहकाराने मान्य केले आहे. त्याप्रमाणे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेले घटक एकत्र येऊन आर्थिकशक्ती वाढविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करू

लागल्या आहेत. अशा विविध सहकारी संस्थांनी परस्पर व्यापारसंबंध प्रस्थापित करून उत्पादन, वितरण व सेवा यामध्ये चांगली सुकरता निर्माण करता येईल. त्यामुळे उत्पादक, संस्था व वितरण व्यवस्था करणाऱ्या संस्था या दोन्हींचाही आर्थिक फायदा होईल. या दोन संस्थामधील मध्यस्थांचेही सहज उच्चाटन होईल. उत्पादक संस्था व वितरण व्यवस्था करणाऱ्या संस्था एकत्रित आल्यामुळे कायमस्वरूपाची आर्थिक प्रक्रिया संघटित होऊ शकेल व काही नवीन व्यवसायही हाती घेता येईल. यामुळे ग्रामीण व नागरी भागातील सहकारी कार्यकर्त्यांचे एकत्रीकरण होऊन त्यांच्यामध्ये सहकाराची भावना वाढत राहील, उत्पादनाचा वेगही वाढेल व वितरणात नैतिक तत्त्वांना महत्त्वही दिले जाईल. तेव्हा या फायद्यासाठी सहकारी संस्थातील परस्पर संबंधांचे महत्त्व फार मननीय आहे. या सहकारी संस्थातील परस्पर संबंधामुळेच सहकारी संस्थांचा एक संघ दुसऱ्या संघाबरोबर भागीदारी करून दीर्घ मुदतीचा व्यापारासंबंधी करार करून किंवा संघटनात्मक करार करून नवनवे उद्योग हाती घेऊ शकेल.

सहकारातील समन्वय

आज आपण " सहकारी संस्थातील परस्पर संबंध " या विषयावर जेव्हा विचार करतो तेव्हा त्याचा मूळ आधार सहकारी तत्त्वांचा आहे हे विसरता कामा नये. तत्त्वामध्ये तडजोड नसते. तेव्हा समन्वय म्हणजे तडजोड असा आपण अर्थ करू नये. आर्थिक विकास साधण्यासाठी कच्चा माल पुरविणारा, भांडवलदार, कामगार, ग्राहक व काम करून घेणारा यांच्यामध्ये समन्वय साधण्याची आज नितान्त आवश्यकता आहे. अशा समन्वयांची साखळी गुंफता आली तर सहकारी संस्थांचा आर्थिक विकास होईल.

सहकारातील माणुसकी

जगातील सर्वच व्यवहार व मानवामानवामधील संबंध याचा आपण जरा बारकाईने विचार केला तर असे दिसून येईल की, जगा-

तील सर्वच व्यवहार संघर्षावर आधारलेले नसून सहकारावरही आधारलेले आहेत. आणि म्हणूनच प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलने मानवाची व्याख्या करताना "मानव एक सामाजिक प्राणी आहे" अशी केली आहे. म्हणजे सहकार आणि मानवी जीवन यांचा संबंध एकाच नाण्याच्या दोन बाजूसारखा आहे. तेव्हा सहकार म्हणजे जीवन व जीवन म्हणजे सहकार असे म्हटले तर फारसे वावगे व्हावयाचे नाही. कै. वैकुंठभाई मेहता यांनी सहकार व मानवी जीवन यांचे समीकरण फार मोठ्या मार्मिक शब्दात व्यक्त केले आहे. त्यांच्या मते "सहकार सहजीवनाचा आत्मा आहे व सहजीवन मानव जीवनाचा आत्मा आहे." शुचिता, सद्भाव व सद्भिरूची यांच्या त्रिवेणी संगमात सहकार जन्मास येतो. जीवन म्हणजे सहजीवन व सहजीवन म्हणजे सहकार होय. हे मानवी जीवनाचे समीकरण होय. कै. मेहतानी मांडलेल्या या विचाराच्यापुढे एक पाऊल जाऊन मला असे म्हणावेसे वाटते की, सहजीवन आणि सहकार या दोन विचारसरितांच्या संगमावर उभे असलेले मानवी जीवन एक तीर्थस्थान आहे. या तीर्थस्थानाचे पावित्र्य सहकारविषयक तत्त्वप्रणालीच्या काटेकोर अवलंबनात सामावलेले आहे.

सहकार ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या ना त्या रूपाने सहकार हा येतोच. जेथे सहकारात सामंजस्य असते तेव्हा तो सहकार आनंदजनक असतो. सहकारात संघर्ष निर्माण झाला की, तो दुःखदायक होतो. सहकारी चळवळीचे खरे यश सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी "सहकार एक जीवननिष्ठा आहे" या भावनेने काम करण्यात आहे. सहकारावरील ही निष्ठा ढळू लागली की त्या सहकाराचे तीनतेरा केव्हा वाजतील हे कळावयाचे नाही.

माणसाचे माणसाजवळ येणे हे प्रगतीचे द्योतक आहे. माणसा-माणसातील सद्भाव, सद्भिरूची व शुचिता यांचे शिखर जसे उंचावते तशी माणसे परस्पराशी एकजीव होतात. माणसा-माणसांच्या या

एकजीव होण्याच्या प्रक्रियेलाच मी सहकार असे समजतो. असा सहकार जेथे नांदत असतो, तेथे गरीबांची गरीबी व श्रीमंतांची श्रीमंती कमी कमी होत एका समान भूमिकेवर येऊन ठेपते. येथेच सहकाराने सगळे जीवन उजळून निघते.आर्थिक विषमता संपून विकास मार्गाकडे सगळ्यांची पाऊले पडत असतात. माणसा-माणसातील "सहकार" हाच येथे "देव" बनतो. सहकार हाच नव्या युगातला नवा धर्म बनतो. मग येथे माणसा-माणसातल्या वैरभावनेला वाव उरत नाही. द्वेषाला थारा मिळत नाही, अहंकार वाढत नाही आणि भ्रष्टाचाराला साहाय्य लाभत नाही. अशा ठिकाणी सगळेच सहकार पंढरीचे वारकरी, शुचिता आणि सद्भाव हेच त्यांचे टाळमृदंग "एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ" हाच त्यांचा अभंग.

नागपूर,
दिनांक १४-१-१९७४

एक क्रांतीकारक योजना

महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केट फेडरेशनच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्यावेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी केलेले अध्यक्षीय भाषण.

मित्र हो, " अेकाधिकार " हा शब्द स्वातंत्र्य प्राप्तीनंतर २०–२२ वर्षानी म्हणजे गेल्या २–३ वर्षांत आपल्या कानावर आला आहे. देशातील शेतकरी वर्गाचा म्हणजे उत्पादकाचा आर्थिक कायापालट करण्याच्या अत्यंत आवश्यक अशा प्रथेचा जन्म २–३ वर्षापूर्वी झाला. शेतकरी वर्गाला नाडणारा जो मध्यस्त,जो व्यापारी, अगर भांडवलदार वर्ग असतो त्याचे उच्चाटन करून उत्पादकाची आर्थिक घडी सुस्थिर बसविण्यासाठी अेकाधिकार खरेदी आणि विक्रीची प्रथा भारतात मूळ धरू लागली आहे. अेकाधिकार प्रथेची आजची अवस्था लहान मुलाला दात निघायला सुरवात होते त्यावेळेसारखी आहे. दात येत असलेल्या मुलाला ज्याप्रमाणे त्याची आई स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करते त्याच भावनेने अेकाधिकार कापूस खरेदी योजना ही सर्वार्थाने शेतकऱ्याला स्वावलंबी व समर्थ बनविण्यासाठी सुरू करण्यात आलेली आहे. आपला देश शेतीप्रधान आहे. यासाठी आपल्या देशामध्ये आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक समता निर्माण व्हावयाची

असल्यास आपल्या देशातील शेती धंद्याला स्थिरता आणि मजबूती येण्याची गरज आहे शेतीमधून अधिक उत्पादन निघाले पाहिजे आणि निघालेल्या मालाला शाश्वत आणि योग्य किंमत मिळाली पाहिजे. महाराष्ट्रात ही गोष्ट घडून येण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुरोगामी धोरण स्वीकारले असून त्यासाठी निरनिराळचा योजना आखण्याचे प्रयत्न होत आहेत. शेती मालाच्या उत्पादनासाठी पीक कर्ज, खताचा पुरवठा, तांत्रिक ज्ञान, शास्त्रशुद्ध रितीने आणि विशेष पद्धतीने करून देण्याचे कार्य सुरू झालेले आहे. शेती माल बाजार समित्या, सहकारी विक्री संस्था व सहकारी प्रक्रिया संस्थाद्वारे शेती मालाला शाश्वत व चांगली किंमत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व्यवस्था चालू आहे.

सहकारी तेल गिरण्याची निवड

अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न असला तरी अेवढचाने शेती मालास शाश्वत आणि योग्य किंमत देण्याची पूर्तता संपूर्णपणे होवू शकणार नाही याची जाणीव ठेवून शेती मालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार हा अेकाधिकार पद्धतीने व्हावा असे धोरण ठेवून प्रथम ज्वारी आणि इतर धान्यांची खरेदी विक्रीची व्यवस्था अेकाधिकार पद्धतीने आपल्या देशात महाराष्ट्रामध्येच पहिल्यांदा अवलंबिण्यात आली. आज ती यशस्वीपणे चालू आहे. महाराष्ट्रात ज्वारी, भात व कडधान्या-बरोबरच पैशाची इतर महत्त्वाची पिके म्हणजे ऊस, कापूस भुईमूग आणि तंबाखू ही पिके आहेत. या पैशाच्या पिकांना शाश्वत आणि योग्य किंमत मिळवून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सहकारी साखर कारखान्यांचे चांगले जाळे महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले आहे. हे सहकारी साखर कारखाने कार्यक्षमतेने चालू आहेत त्यामुळे ऊस पिकाला महाराष्ट्रात शाश्वत आणि योग्य किंमत मिळविण्यामध्ये चांगले यश मिळाले आहे. अेकूण भारताच्या साखरेच्या उत्पादनामध्ये महाराष्ट्र राज्याचा फार मोठा हिस्सा आहे. साखर कारखान्याप्रमाणे महाराष्ट्रात सहकारी तेल गिरण्याही काढण्याचा प्रयत्न झाला, परंतु तो तितका यशस्वी झालेला नाही. त्याबाबत नवे धोरण आणि नव्या योजना खंबीरपणे आखण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

कापूस उत्पादन व उद्‌बोधन

ऊस आणि भुईमूग या पिकापेक्षा महाराष्ट्रातील कापसाचे पीक फारच महत्वाचे आहे. या कापसाचा क्षेत्र विस्तारहि फार मोठा आहे. महाराष्ट्र राज्यात जवळ जवळ सर्वच जिल्ह्यात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात होत आहे. कापसाचे पीक जेवढे महत्वाचे, जेवढे विस्ताराचे आणि व्यापकतेचे आहे, तेवढ्याच मोठ्या प्रमाणात या पिकाच्या उत्पादनाची आणि त्याच्या विक्री व्यवहाराची आज हेळसांड होत आहे. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा कापूस पिकांच्या किंमतीची शाश्वती आणि स्थिरता कधीच निर्माण होऊ शकलेली नाही आणि म्हणून आजपर्यंत कापसाच्या शेतीचे स्वरूप अक्षरशः जुगारासारखेच होते असे मला म्हणावयाचे आहे.

देशातील कापसाच्या लागवडीखालील क्षेत्र जवळ जवळ २ कोंटी एकरपर्यन्तचे आहे. त्यापैकी १/३ म्हणजे ६८ ते ७० लाख एकर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. देशातील प्रतीवर्षी कापसाचे उत्पादन सरासरी ५८ ते ६० लाख गाठीपर्यंत होते. त्यापैकी आपल्या महाराष्ट्र राज्यात सरासरी उत्पादन प्रतिवर्षी १५ ते १६ लाख गाठीपर्यंत होत आहे. म्हणजे कापसाच्या लागवडीखालील क्षेत्र १/३ असले तरीसुद्धा देशाच्या सरासरी उत्पादनापैकी फक्त १/४ इतका कापूस महाराष्ट्र राज्यात होत आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे बागायती लागवडीखालील क्षेत्र फक्त अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे आणि सातारा ह्या जिल्ह्यामध्ये असून राहिलेल्या भागातील बहुतांशी कापसाचे उत्पादन नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून आहे. कापसाची लागवड महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात खानदेश, विदर्भ, मराठवाडा येथील जिराइत क्षेत्रामध्ये होत आहे. कापसाच्या लागवडीखालील क्षेत्र मोठे असले तरी सरासरी प्रती एकरी उत्पादन फक्त ६८ पौंड कापसाचे आहे. देशातील कापसाचे प्रती एकरी उत्पादन ११४ ते ११५ पौंड आहे. म्हणजे महाराष्ट्र राज्यात प्रती एकरी उत्पादन वाढविण्यासाठी वाव आहे. प्रती एकरी कापसाच्या उत्पा-

दनामध्ये आपण किती मागे आहोत हे परदेशी कापसाच्या उत्पादनाशी तुलना करतानाच आपणाला कळून येईल.

शासन पुरस्कृत योजना

देशातील कापसाचे उत्पादन कमी असल्यामुळे त्याच्या पूर्ततेसाठी प्रत्येक ८० ते ९० कोटी रुपयेच्या ६ ते ७ लाख कापसाच्या गाठी विदेशातून आयात कराव्या लागतात. आणि म्हणून कापसाचे उत्पादन वाढविणे हीच आपली आज प्रमुख बाब होवून बसली आहे. त्यासाठी शेतकऱ्याना अधिक उत्पादन देणाऱ्या बियाणांचा पुरवठा खत, व कीटक नाशक औषधांचा पुरवठा वेळेवर होणे आवश्यक आहे. अनुभवाने असे सिद्ध झाले आहे की कापसाच्या लागवडीच्या वेळी रासायनिक खतांचा योग्य वापर केल्यास प्रती एकरी उत्पादन २० ते २५ टक्केपर्यन्त वाढू शकते. त्याचप्रमाणे कीटक नाशक औषधांचा वापर केल्यास प्रती एकरी १५ ते २० टक्के पर्यंत वाढू शकेल म्हणजे रासायनीक खते व कीटक नाशक औषधांचा पुरवठा तसेच सुधारीत बियाणांचा वापर पद्धतशीर करण्याचे शेतकऱ्याना शिक्षण देणे अत्यंत जरूरीचे आहे. मात्र सुधारीत बियाणे आणि रासायनिक खते किंवा कीटक नाशक औषधांचा उपयोग करण्यासाठी शेतकऱ्याना अधिक भांडवल गुंतवावे लागणर आहे. त्यासाठी उत्पादित केलेल्या कापसाची रास्त किंमत मिळवून देण्याची हमी व किंमतीची शाश्वती मिळणे आवश्यक आहे. आतापर्यंत उत्पादन केलेल्या कापूस शेतकऱ्यांना खाजगी आडते अथवा व्यापाऱ्यामार्फत तो विकावा लागत होता. कापसाच्या उत्पादनाचे प्रमाण कमी जास्त झाल्यावरोबर किंवा कापसाची मागणी गिरण्याकडून कमी जास्त झाल्यावरोबर कापसाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात चढउतार होत असे. कापसाचा खप जरी संबंध वर्षापर्यंत होत असला तरी शेतकऱ्योना मात्र कापसाची विक्री तावडतोब करावी लागत असते. प्रत्यक्षात गेल्या दोन कापूस हंगामात राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे कापसाचे एकंदर उत्पादन कमी झालेले आहे. तरीसुद्धा केंद्र सरकारने गिरण्यावर लादलेला साठा, त्यासंबंधीचे नियंत्रण व रिझर्व्ह बँकेने आर्थिक पुरवठ्यावार

घातलेल्या नियंत्रणामुळे शेतकऱ्याना कापसाची रास्त किंमत मिळाली नाही. चालू वर्षी मात्र राज्याचे कापसाचे उत्पादन कमी झाले तरी सुद्धा देशातील गुजरात, पंजाब व इतर राज्यामध्ये कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे गिरण्याकडून कापसाची मागणी कमी झाली. त्यामुळे कापूस हंगामात शेतकऱ्याना कापूस विकणे कठीण झाले. काही ठिकाणी खरेदीदारांच्या अभावी विक्रीसाठी आणलेला कापूस बरेच दिवस पडून राहिला. कांही ठिकाणी कृषि उत्पन्न बाजार समित्यांना कापसाचे बाजार बंद ठेवणे भाग पडले. विक्री केलेल्या कापसाच्या किंमतीसुद्धा शेतकऱ्याना वेळेवर मिळाल्या नाहीत. अशा वेळी शेतकऱ्याच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने भारतीय कापूस महामंडळाला राज्यातील कच्च्या कापसाची खरेदी करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे कापूस महामंडळाने ठरवून दिलेल्या किंमतीमध्ये मार्केटिंग फेडरेशनने महाराष्ट्र राज्यात ४२ खरेदी केंद्रे उघडून कच्च्या कापसाच्या खरेदीस सुरवात केली आणि जवळ जवळ ३५ हजार गांठी इतक्या कच्च्या कापसाची खरेदी मार्केटिंग फेडरेशनने एप्रिल आणि मे महिन्यामध्ये केली.राज्यातील सहकारी संस्थानी शेतकऱ्याच्या मूलपद्धतीने एकत्र केलेल्या व प्रक्रियेनंतर तयार झालेल्या कापसाच्या गांठीची विक्री फेडरेशनने कापूस महामंडळाला करून दिली त्यामुळे राज्यातील विक्रीअभावी पडून असलेल्या कापसाची विल्हेवाट करण्याची व्यवस्था होवू शकली. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कांही प्रमाणात रास्त किंमत मिळाली. तरीसुद्धा त्यामुळे शेतकऱ्यांचे कापूस विक्री संबंधीचे प्रश्न तात्पुरतेच सोडविण्यात आले आहेत असे म्हणता येईल. प्रत्यक्षात अशी परिस्थितीती गेल्या वर्षापासून आपण पाहात आहात आणि त्यामुळे या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने ही नवी एकाधिकार कापूस खरेदीची योजना अंमलात आणण्याचे ठरविले आहे.

तेव्हा या नव्या योजनेप्रमाणे शासन किंवा शासनामार्फत कापूस खरेदी केला जात नसून तो शेतकरी लोकांच्याच सहकारी संस्था-

मार्फत अेकत्रित केला जातो आहे. त्यावर प्रक्रिया करून त्याची योग्य भावात विक्री केली जात आहे. आणि म्हणून ही सर्वच योजना खऱ्या अर्थाने शेतकऱ्याना स्वावलंबी बनविण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

जिनिंग व प्रेसिंगचे कार्य

सर्व शेतकऱ्याना आपला कापूस १५ मैलापेक्षा जास्त नेण्याची आता गरज भासणार नाही. कारण यापुढे फेडरेशनचे धोरणावर दर १५ मैलावर कापूस खरेदी केन्द्र स्थापन करण्याचे आहे. शेतकऱ्यांना सकाळी केंद्रावर आल्यावर संध्याकाळपर्यंत परतता यावे व निश्चित दिवशी त्याना पैसे मिळावे हाही उद्देश या पाठीमागे आहेच. शक्यतो कापूस खरेदी केंद्र असलेल्या ठिकाणीच कापूस पिंजण्याची व गाठी बांधण्याची व्यवस्था होणेही आवश्यक आहे. तेव्हां यादृष्टीने एकाधिकार पद्धतीने खरेदीलेल्या कापसाच्या जिनिंग व प्रेसिंगचे काम सहकारी क्षेत्रातच करण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेले आहे आणि अशा केंद्राच्या पुढे सहकारी फॅक्टरी होतील असेहि पाहिले जाणार आहे.

एकाधिकार कापूस खरेदी हे कापूस उद्योगाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने टाकलेले एक क्रांतीकारक पाऊल आहे. कारण या योजनेमुळे तेजीमंदीत गुरफटलेला कापूस पिकविणारा शेतकरी आता मुक्त होणार आहे. या योजनेमुळें कधीही व्यापार न केलेला शेतकरी आता व्यापारी बनण्याच्या मार्गावर आहे. चांगला ऊस पिकविणारा शेतकरी साखरेचा कारखानदार होऊ शकतो हे जसे महाराष्ट्राने सिद्ध करून दाखविले आहे तसे उत्तम कापूस पिकविणारा शेतकरीही उत्तम व्यापारी होऊ शकतो हे सिद्ध करून दाखविण्याची वेळ आता आली आहे असे मला वाटते. तेव्हा एकाधिकार कापूस खरेदी योजनेद्वारे महाराष्ट्राच्या शेतकऱ्याच्या जीवनास आशादायक असे तेजस्वी पर्व निर्माण झाले आहे. आता शेतकऱ्यांनी या योजनेद्वारे आपले

जीवन समृद्ध करून उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करावी असे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

एकाधिकार कापूस खरेदी विक्री योजनेचा एवढा गोषवारा सांगितल्यानंतर ही योजना राबविणारी महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशनच्या परिसरात संस्थेशी निकटवर्ती असलेल्या कर्मचारी व शेतकरी वर्गास या योजनेमागील हेतू व महत्त्व समजावून सांगता आले पाहिज. सहकाराच्या भावनेने या क्षेत्रात जपून वागले पाहिजे. या योजनेमुळे दुखावला गेलेला घटक जो व्यापारी त्याला पण या योजनेमध्ये सामावून घेता आले तर या योजनेला अधिक उजाळा येणार आहे. तसा प्रयत्न यापुढे होण्याची अत्यंत गरज आहे, अशी एक सूचना करून मी आपली रजा घेतो.

मुंबई,
दिनांक १५-२ १९७१

कर्मण्येवाधिकारस्ते

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्यातर्फे आखण्यात आलेल्या जलसिंचन योजनेपैकी घालवाड येथील जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याच्या शुभप्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

आमचा देश शेतीप्रधान आहे. ही गोष्ट डोळ्यासमोर ठेवून शासनाने पहिली पंचवार्षिक योजना केवळ शेती विकासासाठी राबविली. परंतु हा विकास आपण साधू शकलो नाही, म्हणून दुसऱ्या योजनेत शेती आणि उद्योग यांना प्राधान्य दिले गेले. यावेळी दोन्हींचाही समाधानकारक विकास होऊ शकला नाही. कारण शेती आणि पाणी यांची वेळीच भेट घालून देण्यात आपण असमर्थ ठरलो. त्यामुळे उद्योग विकासाची राबवणूक नीट होऊ शकली नाही. म्हणून तिसऱ्या योजनेमध्ये केवळ शेती विकासाचाच कार्यक्रम आखला गेला. या योजनेला धरून श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याने शेती विकासाच्या पूर्ततेसाठी जलसिंचन योजनेचा कार्यक्रम हाती घेतला. या योजनेपैकी घालवाडची ही अेक जलसिंचन योजना होय. ती आज कार्यान्वित होत आहे, याचा मला अत्यंत आनंद होत आहे.

शेतीचा प्रश्न अनेक तोंडांचा प्रश्न

शेती हा पिढ्यान् पिढ्या चालत आलेला आणि आपल्या देशातील ८० टक्के लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. खेड्यातील सर्व

समाजाच्या उन्नतीशी निगडित असलेला प्रश्न म्हणजे शेतीचाच प्रश्न होय. या प्रश्नाचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. सर्व समाजाशी निगडित आहे. खरे पाहता मला असे वाटते की, शेतीचा प्रश्न हा हिंदुस्थानातील ४० कोटी जनतेच्या तोंडांचा प्रश्न आहे. परमेश्वराने प्रत्येक माणसाला दोन हात व एक तोंड दिलेले आहे. दोन हातानी भरपूर परिश्रम करावेत आणि एका तोंडाची भूक भागवावी हाच हेतू त्या पाठीमागे असेल. परंतु मृगनक्षत्रापासून ते हस्त नक्षत्रापर्यंत मेघ राजाच्या कृपेवर किंवा अवकृपेवर शेतकऱ्याच्या मनातील सुखदुःखाचे विचारमंथन सुरू होते. हे आपण अनेक पिढ्यान् पिढ्या पाहात आलो आहे. अशा स्थितीमध्ये जेव्हा जेव्हा मेघराजाच्या अवकृपेची छाया शेतकरी जीवनावर पडते तेव्हा तेव्हा कष्ट करण्यासाठी आतुर झालेल्या हातांची शक्तीही नष्ट होऊन जाते. हातांना कामच उरत नाही आणि ज्यावेळी हातांना काम नसते त्यावेळी डोक्यामध्ये अनेक भुते नाचत असतात. पोटाचा प्रश्न सोडविण्यासठी ही भुते माणसाच्या हातून हवे ते घडवून आणतात आणि मग माणसातला " माणूस " दुरावत जातो. अशा वेळी माझी पक्की खात्री होते की असंख्य तोंडाशी संबंधित असलेल्या या प्रश्नाशी पाण्याचा निगडित संबंध आहे. पाणी हे केवळ मनुष्याचे जीवन नाही तर ते शेतीचेही जीवन आहे. पाणी पिऊन तृप्त झालेली शेती मोत्याचे पीक देते हे विसरून चालणार नाही. यासाठी योग्य वेळी शेतीची आणि पाण्याची भेट झाली पाहिजे.

जमीन व पाणी यांचो सांगड

आपल्या शास्त्रामध्ये सर्वश्रेष्ठ पूजा निसर्गपूजा मानली जाते. पंचमहाभूतामधील निसर्ग देवता म्हणून मानण्यात आलेल्या पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पाच देवताना मानव निरनिराळ्या स्वरूपात पूजनीय समजतो. त्यापैकी पृथ्वी म्हणजे जमीन व आप म्हणजे पाणी होय. आज आपल्या घालवाड गावातील जलसिंचन योजनेच्या पूर्णतेतून जमीन व पाणी यांची सांगड घालून स्वातंत्र्योत्तर

काळात आपण पाण्याची ही नव्या स्वरूपात पूजा करीत आहोत. श्रमसुमनानी केलेली ही पूजा अन्य सर्व पूजेहून सर्वश्रेष्ठ आहे. पाण्याची ही नवी पूजा म्हणजे आपण आरंभलेली समाजाची महापूजाच होय. अशी महापूजा प्रत्येक खेड्यात बांधली गेली पाहिजे. जमीन व पाणी यांची सांगड घालून दिली गेली पाहिजे. त्यातच सुखी व समृद्ध समाज-जीवनाचे रहस्य सामावलेले आहे.

सहस्र हातांचा सहकार

आज आपल्या देशामध्ये अशा जलसिंचन योजनांची अत्यंत आवश्यकता आहे. तुम्ही सर्व गावकरी लोकांनी कष्ट करून व पैसा खर्च करून ही योजना उभारली. ही आधुनिक युगाची आधुनिक किमयाच होय. या किमयेचे मोल खऱ्या अर्थाने पदरात पाडावयाचे असेल तर या पुढचेच काम कठीण आहे असे मला वाटते. तुम्ही सर्वांनी खांद्याला खांदा भिडवून भगीरथ प्रयत्नाने पाणी वर काढले. परंतु त्या पाण्याचा उपयोग योग्य तऱ्हेने होतो आहे किंवा नाही हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वांच्या जमिनीला ते पाणी पोहोचते आहे किंवा नाही याची कार्यकर्त्यांनी खबरदारी घेतली पाहिजे. कारण या योजनेमार्फत पाण्याचे अमृत बनविण्याऐवजी अितर काही घडले तर अशा योजनांचा आपणास काहीही उपयोग होणार नाही. पाण्यामधून गावामध्ये काही किलिमष निर्माण होणार नाही याची आपणास खूपच काळजी घेतली पाहिजे. या पाण्यामधून सर्व शेतकऱ्यांचे जीवन प्रफुल्लित करावयाचे आहे. हे आपणास विसरून चालणार नाही. सहस्र हातांनी सहकाराचे काम अविरत चालावे अशी माझी मनापासून इच्छा आहे.

घालवाड जलसिंचन योजनेच्या पूर्णतेमागे माझी कोणावर उपकार करण्याची तिळमात्र भावना नाही. माझ्या मनात वसत असलेल्या जनहिताच्या कळकळीतूनच या योजनेने आकार घेतला आहे. आपण सर्वजण माझ्यावद्दल आदर, प्रेम व कृतज्ञता बाळगता हे ठीक आहे. परंतु कोणी कोणावर उपकार करीत नाही आणि करू नये, या मताचा

मी आहे. कोणावर उपकार करण्याच्या भावनेने मी सामाजिक कार्य कधीच हाताळले नाही. शेतकरी वर्ग सुखी व्हावयाचा असेल तर त्याने बांधावर अुभे राहून शेती करण्याच्या प्रयत्नाला बगल दिली पाहिजे. निढळच्या घामातून व मातीतून मोती पिकवून देशाला समृद्धीकडे नेण्यासाठी तसेच या जलसिंचन योजनेतून मिळणारे थेंब अन् थेंब पाणी उपयोगात आणून तुम्ही आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. अेवढेच मला आपणा सर्व सभासदांना आवर्जून सांगावयाचे आहे. शेती आणि उद्योगाची सांगड घालणाऱ्या या जलसिंचन योजनेचे मी स्वागत करतो आणि या कामी ज्यानी ज्यानी आपले कर्तृत्व पणाला लावले त्यांचे अभिनंदन करून माझे भाषण संपवितो.

घालवाड,
दिनांक २१-७-१९७०

लोकजीवनाची वारणा

वारणा खोऱ्यातील सामाजिक जीवनाशी एकरूप झालेले दे.भ. श्री तात्यासाहेब कोरे यांनी कार्यान्वित केलेल्या 'अमृत दुग्धालयाच्या' कोनशिला समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार अध्यक्ष होते. त्यांचे हे भाषण.

मी ज्या ज्या वेळी वारणेच्या परिसरात पाऊल ठेवतो त्या त्या वेळी येथील विकास कार्याच्या नवस्पर्शाने भारावून जातो. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी येथे एक साखर कारखाना उत्कृष्टपणे आपली कामगिरी बजावत आहे. कोणत्याही एका सहकारी प्रकल्पाने समाजात चांगले मूळ धरले की त्या मुळापासून फोफावणाऱ्या वटवृक्षाच्या अनेक शाखा-उपशाखा पसरतात. आज वारणा सहकारी साखर कारखाना एखाद्या वटवृक्षाप्रमाणे ग्रामीण विभागातील समाजाला समृद्धीची सावली देत आहे. खरे पाहता वारणा खोऱ्यात उभारलेल्या या साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध केले आहे. ग्रामीण जीवनात आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्टचा आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. समाजाच्या निकोप बांधणीमध्ये आपला कारखाना अग्रेसर आहे. आपल्या कारखान्याने सहकाराच्या

मार्गाने ज्या ज्या प्रकल्पाची सिद्धी करून दाखविली; त्यातून समाज जीवन केवळ सुखी व समृद्ध झाले आहे; एवढेच नाही तर समाजाच्या आशाआकांक्षाना नव्या दिशा दिल्या आहेत. येथे नवमानव घडत आहे. मानवी मनाची उंची वाढत आहे. नवचैतन्याने मानवी मनाचा वेध घेतलेला आणि प्रयोगशीलतेमधून प्रयोगसिद्धतेकडे जाण्यासाठी मानवी मन व मनगट तयार केले जात आहे. आज वारणेच्या परिसरात " अमृत " दुग्धालयाच्या कोनशिला समारंभाच्या निमित्ताने याच मानवविषयक श्रेष्ठ विचारांची जाणीव करून देण्याच्या हेतूने मी येथे आलो आहे. आपण माझे विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून जे मनोरंजन, उद्‌बोधन व स्वागत केले त्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

सहकार : सोन्याची अंडी देणारी कोंबडी

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून आज २५ वर्षे झाली, परंतु स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा व भोगलेल्या हालअपेष्टांचा अर्थ आज फारच कमी लोकांना कळतो आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य एवढाच मर्यादित अर्थ स्वातंत्र्य मिळविण्याच्या पाठीमागील भावनेमध्ये नव्हता. लोकशाही मार्गाने विकास व्हावा व सामान्य माणसाला त्याचा जास्तीत जास्त लाभ मिळावा ही त्या मागची मूळ भूमिका आहे. या मनोभूमिकेतून स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सहकारी संस्थांचे जाळे पसरले. सहकारातून सामान्य माणसाचा विकास साधावयाचा हा सहकाराचा मूळ हेतू होय. सहकारातून पहिल्यांदा जन-मनाची मशागत करावी व नंतर जन-जीवनाचे मळे फुलवावेत. यासाठीच सहकार हे साधन मानून समाज जीवनाचा सर्वांगीण विकास केला पाहिजे. खरे पाहता सहकार ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. तुम्ही सर्वांनी मनोभावे तिचे संगोपन केले तर ती अधिक अंडी नक्कीच देईल. परंतु या सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीलाच फस्त करण्याचे काम आज सहकारात चालू आहे. आज सहकारामध्ये भांडवलदारीला शोभेल अशी मालक आणि कामगारातील दुराव्याची परिस्थिती तयार होत आहे. सहकारी क्षेत्रात

अधिक उत्पादनावर भर देऊन अधिक फायद्याची योजना अमलात आणली व त्याचा फायदा समाजातील सर्व थराला सारखा वाटला गेला तर केवळ आर्थिक परिस्थिती सुधारली जाईल असे नसून एकमेकांची मने सांधली जातील. प्रत्येकाच्या जीवनात स्थैर्य निर्माण करता येईल. तेव्हा सहकारातून अशा प्रकारचे सामाजिक हित साधले गेले तरच सहकाराचा समाजाला काही उपयोग झाला असे म्हणता येईल.

दुधात साखर

आपला भारत कृषिप्रधान देश आहे. कृषिप्रधान देशामध्ये मुबलक समृद्धीसाठी प्रथम पाण्याची व नंतर मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता असते. मनुष्याच्या समृद्ध बुद्धीच्या आधाराने पाण्याचा प्रश्न आपण सोडवित आहोत. मनुष्यबळाची आपल्या देशात मुळीच वाण नाही. आणि म्हणून जमीन, पाणी आणि मनुष्यबळ यांची वेळीच भेट झाली तर आपण जमिनीतून सोने काढून भारतासारख्या सुपीक जमीन असलेल्या देशात कमी भांडवलात अधिक उत्पादन देणाऱ्या व शेती धंद्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग प्रकल्पांचा योग्य तऱ्हेने मेळ बसविला गेला तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशाचा आर्थिक विकास साधणार आहे. त्या दृष्टीने पाहिल्यास माझे मित्र श्री. तात्यासाहेब कोरे यांनी वारणा खोऱ्यात नवा इतिहास निर्माण केला आहे. आज वारणा खोऱ्यात साखर कारखाना तर आहेच, त्याशिवाय नव्याने निघणारा हा दूध प्रकल्प म्हणजे 'दुधात साखर' असाच अमृतयोग साधला गेला आहे. हा नवा दूध प्रकल्प उभारून वारणेच्या परिसरातील सामान्य शेतकरी सुखी आणि समृद्ध करण्याचे महान् परंतु अवघड कार्य श्री. कोरे यांनी अंगीकारले आहे.

पंचवार्षिक योजना : एक आढावा

गेल्या २५ वर्षांमध्ये आपल्या देशात पूर्ण झालेल्या तीन पंचवार्षिक योजनांचा आपणास डोळे उघडून विचार केला पाहिजे. या योजनातून काय साधले ? किती विकास घडून आला ? का विकास झालाच नाही ? झाला तो विकास कसा झाला आणि जो विकास झाला नाही

तो का झाला नाही. या गोष्टींची तपासणी करण्याची फूटपट्टी आपण तयार केली पाहिजे. या तीन योजनाची तपासणी करता असे दिसून येते की नियोजनवाल्यानी या कामी जनतेचे साहाय्य न घेता सरासरीच्या कोष्टकावर योजना राबविल्या. सरासरीने गरीबाचे पोट भरत नाही. त्यामुळेच गरीबी अधिक वाढली आहे. पंजाब व हरियानामध्ये निसर्गाचा योग्य उपयोग करून घेतल्यामुळे शेती विकासाला गती मिळाली आहे. तसा उपयोग महाराष्ट्रात करून घेतला पाहिजे. आणि म्हणूनच समाज उद्दिष्टांची पूर्ति करण्याच्या बाबतीत आपल्या तीन पंचवार्षिक योजना याहून अधिक सफल झाल्या पाहिजे होत्या.

मनाचे राष्ट्रीयकरण

आताच बँक ऑफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.जगदीश सक्सेना यानी आमच्या बँकेच्या उद्दिष्टाप्रमाणे व या परिसरातील जनतेच्या विकासासाठी म्हणून आपल्या नव्या दूध प्रकल्पासाठी बिना हमीचे कर्ज देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. या मनोदयापाठीमागील भावना व्यक्त करताना ते असेही म्हणाले की वारणेच्या या 'अमृत' प्रकल्पातून ही 'अमृत' नगरी 'गोकुळा' सारखी समृद्ध व्हावी. आज आपण कोणत्याही 'गोकुळ' नावाच्या हॉटेलात गेला तर वाटीभर दूधही मिळत नाही. मग ही नगरी 'गोकुळा' सारखी समृद्ध व्हावी या श्री. सक्सेना यांच्या सदिच्छेपाठीमागे या दूध प्रकल्पाच्या सिद्धतेविषयीचा दृढ संकल्प आहे. वारणेच्या दूध प्रकल्पाच्या बाबतीत श्री. जगदीश सक्सेना यानी बँकेच्या धोरणात एक नवे व स्तुत्य पाऊल उचलले आहे. बँकेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी वर्गाच्या मनाचे राष्ट्रीयकरण झाले तर बँक राष्ट्रीयकरणामागील मूळ उद्देश सफल होणार आहेत. स्वराज्य मिळण्यासाठी आम्ही ब्रिटीशाना बाजूला सारले व एक नवे शासन निर्माण केले. नव्या शासनात भांडवलवादाची समस्या आजही आपल्यापुढे आहेच. व्यापारी मध्यस्त वर्ग संपविला पण व्यापार आपला आपणच करावयाचा आहे. परंतु हे करताना सुद्धा आज आपण स्वतःचीच फसवणूक करून घेऊ लागलो आहोत. विकास कार्यात निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्या-

साठी गेल्या पंचवीस वर्षात जे कार्य झाले नाही ते कार्य आता पाच वर्षात करण्याचा आपला संकल्प आहे. यासाठी जनतेमध्ये आज विश्वास निर्माण करण्याची फार मोठी आवश्यकता आहे. वारणा दूध प्रकल्पासाठी बँकेच्यावतीने श्री. जगदीश सक्सेना हे एक अत्यंत प्रामाणिक व कळकळीचे मध्यस्त आपणास भेटले हे मी सुचिन्ह समजतो. आणि म्हणूनच आपल्या या प्रकल्पाबद्दल मला आशादायक खात्री वाटते.

'दूध' हेच 'अमृत'

देशामध्ये ज्या वेळी कोणताही नवा प्रकल्प आकार घेतो त्यावेळी त्याच्यामुळे समाज उद्दिष्टांच्या पूर्तीचे स्वप्न तरळत असते. हे स्वप्न साकार करण्यासाठी प्रकल्प योजकाकडे योजना-चातुर्य व समाजाभिमुख दृष्टी असावी लागते. या दृष्टीतूनच समाजहिताविषयीची कळकळ जन्मास येत असते. श्री. तात्यासाहेब कोरे यांनी 'अमृत' दुग्धालयाचा जो नवा प्रकल्प हाती घेतला आहे तो मात्र समाज विकासाच्या व्यापक दृष्टीने घेतला आहे. आपण आपल्या दुग्धालयास 'अमृत' हे नाव फारच सार्थ दिलेले आहे. समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देवानी प्राशन केले. त्यामुळे आज 'दूध' हेच 'अमृत' आहे. या अमृताचे कुंभ आज आपल्यापुढे भरून आहेत. हे अमृत तुम्ही प्राशन करा. ज्या अमृताचे कुंभ आज तुमच्याजवळ नाहीत ते शोधा. शोधा म्हणजे सापडेल. आणि जे शोधूनही सापडत नाही ते निर्माण करा. श्री. तात्यासाहेब कोरे यांनी येथे नव्या काळातील नव्या अमृताच्या निर्मितीस प्रारंभ केला आहे. या अमृतानेच वारणेच्या परिसरातील लोकजीवनाची वारणा समृद्ध होणार आहे. दुथडी भरून वाहणार आहे. आणि म्हणूनच अमृताचे कुंभ घरोघरी पोहोचविण्याचे कार्य आपल्यासारख्या जिद्दीच्या, तळमळीच्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांनीच करावयाचे आहे.

वारणानगर;
दिनांक ३-६-१९७३

अर्थविषयक विचार

विविध वर्गातील आर्थिक विकास –
आवश्यक असलेले रचनात्मक बदल –
समाजवादाच्या साफल्याचा सम्यक विचार –
आणि
पूज्य दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या
भाषणातून केलेले मार्गदर्शन.

– रा. तु. भगत



आर्थिक विकासाची मर्मस्थाने

भगवान महावीरांची शिकवण डोळ्यासमोर ठेवून चालणाऱ्या कोल्हापूर येथील महावीर बँकेची शाखा नांदणीसारख्या छोट्याश्या पण संपन्न गावात सुरू झाली त्यावेळीं दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी उद्घाटन प्रसंगी काढलेले मनोवेधक उद्गार.

बदलत्या काळाचा रोख लक्षात घेऊन समाजाभिमुख राहण्याचे धोरण अवलंबिल्याशिवाय भारतीय समाजाचे दुःख संपणार नाही. विकासाची छोटी कामे सामान्य समाजापर्यंत पोहोचवावयाची झाल्यास, समाजाची दुःखे संपवावयाची झाल्यास समाजाकडे आईच्या ममतेने हळुवारपणे पाहण्याची जरूर आहे. ती दृष्टी भगवान् महावीरांच्या ठायी होती.म्हणून त्यांच्या तत्त्वाला जगन्मान्यता मिळाली. धर्मकारणातून समाज-कारणाचा ठाव घेणारा लोकोत्तर महापुरुष भगवान महावीरांच्या नावाने चालणाऱ्या तुमच्या बँकेचे धोरणही त्या नावाला साजेसे चालले आहे, हे पाहून मला संतोष वाटतो. भगवान् महावीरांचे समतेचे तत्त्व घेऊन आज महावीर जयंतीच्या दिवशी कोल्हापूर येथील महावीर को–ऑप. अर्बन बँकेच्या नांदणी येथील शाखेचे उद्घाटन करताना मला अत्यानंद होत आहे. भगवान् महावीर हे संन्यस्त वृत्ती धारण करण्यापूर्वी राजे होते. त्यांनी समाजाची हीन दीन दशा

पाहिली. समाजोन्नतीसाठी राजेपणाला तिलांजली दिली. मानवी मनाला आपल्या उपदेशाने गती देण्याचे महान् कार्य त्यांनी केले. आजदेखील भगवान् महावीरांच्या सम्यक् दृष्टीचा सामाजिक, आर्थिक व व्यवहारिक कार्यात अवलंब केल्याशिवाय यापुढे तरुणोपाय नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

शेतकरी जगला तर जग जगेल

बँका खेडेगावात येण्यापूर्वी बहुतेक सर्व खेडेगावात सावकारी पद्धतीचा अवलंब केला जात असे. अितकेच नव्हे तर राजेमहाराजांचे-वेळी देखील नगरशेठ अस्तित्वात होते. परंतु आज काळ बदललेला आहे. परतंत्र भारतात शेतकरी वर्ग लुबाडला जात होता. परंतु स्वतंत्र भारतात " शेतकरी जगला तर जग जगेल " अशी घोषणा केली गेली आहे. या शेतकऱ्याला साधन म्हणून आता बँका खेडेगावात आल्या आहेत. शेतकऱ्यांना शेतीसाठी वेळीच मदतीचा हात पुढे करण्याच्या हेतूने महावीर बँक नांदणीत आलेली आहे. नांदणी येथील सर्व शेतकऱ्यांनी या बँकेचा लाभ घेऊन धान्योत्पादनाच्या-बाबतीत उच्चांक गाठला पाहिजे.

नांदणी : अेकीची चांदणी

ही बँन्क केवळ कर्जवाटप करण्यासाठी तुमच्या गावात आली नसून सेवाभावीवृत्तीने तुम्हास साधन निर्माण करून देण्यास आली आहे. या बँकेच्या नांदणीमध्ये सुरू होत असलेल्या शाखेच्या कार्या-मागील मुख्य हेतू पैशातून पैसा निर्माण करून त्याचा फायदा ग्रामीण जनतेला अधिक कसा मिळेल हे आत्मीयतेच्या दृष्टीने हाताळणे हा आहे. नांदणी गावात काटकसरीने वागणरा शेतकरी आहे. काटकसर ही तर संपन्नतेची पहिली पायरी होय. आपल्या गावाचा हा लौकिक मला माहित आहे. हा लौकिक ओळखूनच कोल्हापूरच्या मंडळीनी ही शाखा येथे उघडलेली दिसते. नांदणी म्हणजे अेकीची चांदणी. असा गौरव केला जात आहे, त्या गावाला महावीर बँक आपल्या आर्थिक

बळाची साथ देत आहे ही गौरवपूर्ण गोष्ट आहे. महावीर को-ऑप. बँकेची खेडेगावात निघणारी ही पहिलीच बँक आहे. शासनाने "अेक प्रयोग" म्हणून बँक काढण्यास परवानगी दिलेली आहे. तेव्हा हा प्रयोग तुम्ही गावकरी लोकांनी सफल करून दाखवावयाचा आहे.

गरीबी हटाव

समाजात निरनिराळी बलस्थाने असतात. त्यात पैसा हेच समाजाचे सर्वात मोठे बलस्थान आहे. पैसा हीच सर्वसमाजात परिवर्तन घडवून आणणारी मोठी शक्ती आहे. परंतु या बलस्थानाचे पैसापात्र माणसाशीच लग्न लागले आहे. परंतु यापुढे माणुसकीच्या पतीशी हे लग्न झाले पाहिजे. जोपर्यंत आर्थिक पत पाहूनच पैसा देण्याचे धोरण बँका ठेवतील, तोपर्यंत "गरीबी हटाव" ही घोषणा सार्थ होणार नाही. व स्वातंत्र्याचा खरा हक्कही सामान्य जनतेला प्राप्त झाला असे म्हणता येणार नाही. २५ वर्षापूर्वी स्वातंत्र्य मिळवतानाच आम्ही ही घोषणा दिली होती. त्याच्या पूर्तीसाठी आम्ही प्रयत्नशीलच आहोत. याबाबतीत आज शासनसुद्धा प्रयत्नशील आहे. असे असूनही गरीबी हटलेली नाही हे स्पष्ट आहे. आमच्यामध्ये चारित्र्यसंपन्नतेचा व प्रामाणिकपणाचा तुटवडा अधिक वाढला असल्यामुळे आम्ही गटांगळ्या खात आहोत. यातून बाहेर पडण्यासाठी भगवान् महावीरांच्या शिकवणीतील सद्भावनेच्या विचाराप्रमाणे कृतीने आम्ही समाजवादाकडे वळले पाहिजे. आणि भगवान् महावीरांच्या जयंतीच्या शुभदिनी आपण खऱ्या समाजवादाकडे वाटचाल केली पाहिजे. आपल्या देशातील आर्थिक उत्कर्षाचे सर्व प्रयत्न कसे यशस्वी होतील यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कोणत्याही देशाची आणि समाजाची खरी प्रगती त्या देशाच्या आणि समाजाच्या आर्थिक विकासावरच अवलंबून असते. या गोष्टीची खरी आठवण न ठेवता देश आणि समाज यांच्या प्रगतीचा प्रयत्न ज्यावेळी बंद होतो त्यावेळी देश आणि समाज उद्योगपतीकडे वळला जातो. हे आजपर्यन्तच्या इतिहासावरून अनेकवेळा दिसून आले आहे. आणि म्हणून आपल्या देशातील

आर्थिक विषयासंबंधाचे व परिस्थितीचे खरे आकलन करून घेण्याचा आजचा काळ आहे. माझ्या मते आर्थिक प्रगती करीत असताना त्यामधील तीन महत्त्वाची मर्मस्थाने आपण ओळखली पाहिजेत.

तीन मर्मस्थाने

(१) कोणत्याही आर्थिक विकासाच्या केंद्रासाठी सर्वप्रथम समाजातून मोठ्याप्रमाणामध्ये ठेवी जमा झाल्या पाहिजेत. यामुळे पैसा उपलब्ध होऊन त्याचा विकासकार्याला उपयोग करून घेता येतो. समाजामध्ये स्वतःच्या पैशाने उद्योगधंदा आणि अितर उत्पादनाचे कार्य करण्याची विधायक प्रवृत्ती जेव्हा निर्माण होते तेव्हा बँकामध्ये ठेवी कमी झाल्या म्हणून भीती बाळगण्याचे कारण नाही असे मला वाटते. समाजामध्ये अनाठायी जेव्हा पैसा खर्च होतो, आणि तो बँकेमध्ये जेव्हा येऊ शकत नाही, त्यावेळी मात्र चिंता करण्याची निश्चितच आवश्यकता आहे. म्हणून ठेवी जमा करताना अनाठायी खर्च होणाऱ्या पैशाचा ओघ त्यामध्ये येऊ शकेल असा कटाक्षाने प्रयत्न झाला पाहिजे.

(२) देशातील मालाच्या किंमतीची पातळी योग्य रीतीने राखणे आणि ती स्थिर करणे हे आर्थिक प्रगतीच्या क्षेत्रातील फार मोठे गमक आहे, असे जरी असले तरी ती देश विकसनशील अवस्थेमध्ये आहे. आणि त्या अवस्थेमध्येही जो देश स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी त्या देशांत उत्पादन होणाऱ्या मालांच्या किंमती स्वाभाविकपणे वरच्या पातळीवर असतात. अशा अवस्थेत मालाच्या किंमती जरी थोड्याबहुत प्रमाणात वर जात असल्या तरी त्या संबंधी भीती बाळगण्याची आवश्यकता असू नये. परंतु अितर कारणामुळे म्हणजे साठेबाजी व मालाचा अकृत्रिम तुटवडा निर्माण करणे वगैरे समाजविघातक ज्या प्रवृत्ती आहेत, त्यामुळे मालाच्या किंमती वाढत राहिल्या तर मात्र आपल्या आर्थिक विकासाला फार मोठा धोका आहे. आणि म्हणूनच देशाच्या मालाच्या किंमतीतील पातळी योग्य अशी राखण्याचा प्रयत्न करीत असताना या दोन्ही

गोष्टींचा विचार अत्यंत जागरूकपणे करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

(३) ध्येयबद्धरीतीने आणि मानवी मूल्याना अनुसरून समाजाचे परिवर्तन ज्यावेळी प्रखरपणे घडविण्याचा प्रयत्न होतो, त्यावेळी प्रस्थापित आर्थिक पद्धतीमध्ये झपाटचाने बदल होतो. काही वेळेला प्रस्थापित पद्धती आणि नव्या निर्माण होणाऱ्या पद्धती यामध्ये संघर्ष निर्माण होतो. असा संघर्ष वेळीच शहाणपणाने टाळणे आवश्यक असते. आज नव्याने राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका आणि सहकारी बँका यांच्या कामामध्ये चढाओढ आणि संघर्ष निर्माण होईल अशी भीती व्यक्त केली जाते. राष्ट्रीयकृत बँका त्यांच्या कामाची व्याप्ती आणि क्षमता व सहकारी बँकाची कार्यपध्दती आणि शक्ती यांचे नीट आकलन करून घेतले नसल्यामुळेच हा संघर्ष होईल असे वाटते.

यासाठी राष्ट्रीयकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या कार्याचे क्षेत्र स्पष्ट करून देणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचे योग्य विभाजन झाल्यास राष्ट्रीयकृत बँकातील पैसा आणि सहकारी बँकातील पैसा व सहकारी बँकाचे ग्रामीण भागातील प्रस्थापित झालेले संघटन यांचा चांगला मेळ बसेल. तेव्हा आर्थिक विकासाची वाटचाल करताना ही तीन महत्त्वाची मर्मस्थाने आपण आपल्या दृष्टीसमोर ठेवून पुढे जाल तर आपल्या नांदणी गावच्या महावीर को-ऑप. बँकेच्या विकासाचे साधन सहज साध्य होईल असा मला आत्मविश्वास वाटतो. सामान्य समाजाला विकासाप्रत नेण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा हा बँकिंगचा धंदा ठरावा असे मला वाटते. समाजावर स्वातंत्र्योत्तर कालात चढलेली निष्क्रियतेची पुटे झटकून समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी सामान्य माणसाची पत वाढविण्याचा प्रयत्न आता नांदणीसारख्या छोटया गावात महावीर बँकेद्वारे होत आहे, यासारखी दुसरी समाधानाची कोणती गोष्ट असू शकेल. ?

नांदणी,
दिनांक ८-१-१९७१

समाज जीवनाचे माहेरघर

हातकणंगले तालुक्यातील रुकडी येथील दि रत्नाकर बॅन्क लि.,च्या आठव्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

आज रुकडी येथे सुरू होणारी दि रत्नाकर बँकेची ही शाखा म्हणजे गरीबांच्या झोपडीपर्यंत जाणारी आर्थिक विकासाची पाऊलवाट होय. स्वातंत्र्यपूर्व कालात कर्जबाजारी होणे हे पाप समजले जात होते. त्या काळात सामान्य माणूस सावकारी-पाशाखाली दडपला गेला होता. सावकारीपाशात अडकलेला माणूस फिरून पुन: कधी उठू शकत नव्हता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात लोकांचे राज्य निर्माण झाल्यामुळे लोकांच्या पैशाचा विनियोग लोक-कल्याणासाठीच केला पाहिजे हा विचार मूळ धरू लागला. लोकांनी लोककल्याणाच्या हेतूने मिळविलेले राज्य म्हणजे लोकराज्य होय. अशा या लोकराज्यात सधनांचा पैसा निर्धनासाठी देऊन त्यांचा विकास घडविण्याचे कार्य सुरू झालेले आहे. आज येथे स्थापन होत असलेल्या दि रत्नाकर बँकेच्या नव्या शाखेमुळे रुकडी येथे व्यापक लोककल्याणाची मुहूर्तमेढ रोवली जात आहे, याचा मला अत्यंत आनंद होत आहे.

आपण ज्या ज्या वेळी आर्थिक प्रश्नाबाबत बोलत असतो त्यावेळी आपण समाज-विकासाचाच प्रश्न हाताळत असतो. मनुष्य हा समाजाचा मूळ घटक होय. तेव्हा आर्थिक प्रश्नांची उकल करताना "माणूस" हा घटक आपल्या डोळ्यासमोर प्रथम उभा राहतो. सर्वसामान्य माणसाच्या गरजांचे समाधान, हा प्रश्न आता सर्व बँकिंगच्या कक्षेतला होऊन बसला आहे. यासाठी आज पतीच्या धोरणावर कर्जरूपाने पैसा उपलब्ध करून देण्याची पद्धत बदलून पत नसणाऱ्या परंतु प्रामाणिक असणाऱ्या सामान्य माणसाला आपली आर्थिक उंची वाढविण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची भावना दि रत्नाकर बँकेसारख्या संस्थेवर येऊन पडलेली आहे.

प्रामाणिक माणसांची संघटना पाहिजे

सामान्य माणसाच्या गरजांचे समाधान ही कल्याणकारी राज्यातील शासनाची पहिली कसोटी आहे. या कसोटीची पहिली फूटपट्टी म्हणजे समाज-विकासासाठी जन्म घेतलेल्या किती संस्था समाजविकासाचे कार्य करीत आहेत ही होय. ज्या संस्था अशा प्रकारे समाजविकासाचे कार्य करीत नाहीत,त्या कोणत्या तरी दुष्टचक्रात सापडलेल्या आहेत असे म्हणावे लागेल. कारण आपण जेव्हा आजच्या आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास करतो तेव्हा आपणास असे आढळून येते की या क्षेत्रात देखील मक्तेदारीचेच दुष्टचक्र फिरत आहे. यासाठी लोकशाही अर्थव्यवस्थेला जडलेली ही मक्तेदारीची कीड निपटून काढण्याची आज फार मोठी आवश्यकता आहे असे मला वाटते. यासाठी समाजातील सामान्य माणसातसुद्धा एक दृढ विश्वास निर्माण केला पाहिजे. निर्भयता आणि निर्भीडपणा निर्माण केला पाहिजे. तेव्हा असा विश्वास वाढविण्याचे कार्य अशा खेडोपाडी निघणाऱ्या बॅन्कामार्फत होईल असे मला वाटते आणि म्हणून बॅन्कांना खऱ्या अर्थाने सामाजिक-विकास साधावयाचा असेल किंवा सामाजिकक्रांती घडवून आणावयाची असेल तर समाजातील सामान्य परंतु प्रामाणिक माणसांची संघटना निर्माण केली पाहिजे.

समाज जीवनाचे माहेरघर

हातकणंगले तालुक्यातील रुकडी येथील दि रत्नाकर बॅन्क लि.,च्या आठव्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

आज रुकडी येथे सुरू होणारी दि रत्नाकर बँकेची ही शाखा म्हणजे गरीबांच्या झोपडीपर्यंत जाणारी आर्थिक विकासाची पाऊलवाट होय. स्वातंत्र्यपूर्व कालात कर्जबाजारी होणे हे पाप समजले जात होते. त्या काळात सामान्य माणूस सावकारी-पाशाखाली दडपला गेला होता. सावकारीपाशात अडकलेला माणूस फिरून पुन: कधी उठू शकत नव्हता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात लोकांचे राज्य निर्माण झाल्यामुळे लोकांच्या पैशाचा विनियोग लोक-कल्याणासाठीच केला पाहिजे हा विचार मूळ धरू लागला. लोकांनी लोककल्याणाच्या हेतूने मिळविलेले राज्य म्हणजे लोकराज्य होय. अशा या लोकराज्यात सधनांचा पैसा निर्धनासाठी देऊन त्यांचा विकास घडविण्याचे कार्य सुरू झालेले आहे. आज येथे स्थापन होत असलेल्या दि रत्नाकर बँकेच्या नव्या शाखेमुळे रुकडी येथे व्यापक लोककल्याणाची मुहूर्तमेढ रोवली जात आहे, याचा मला अत्यंत आनंद होत आहे.

आपण ज्या ज्या वेळी आर्थिक प्रश्नाबावत बोलत असतो त्यावेळी आपण समाज-विकासाचाच प्रश्न हाताळत असतो. मनुष्य हा समाजाचा मूळ घटक होय. तेव्हा आर्थिक प्रश्नांची उकल करताना "माणूस" हा घटक आपल्या डोळ्यासमोर प्रथम उभा राहतो. सर्वसामान्य माणसाच्या गरजांचे समाधान, हा प्रश्न आता सर्व बँकिंगच्या कक्षेतला होऊन बसला आहे. यासाठी आज पतीच्या धोरणावर कर्जरूपाने पैसा उपलब्ध करून देण्याची पद्धत बदलून पत नसणाऱ्या परंतु प्रामाणिक असणाऱ्या सामान्य माणसाला आपली आर्थिक उंची वाढविण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची भावना दि रत्नाकर बँकेसारख्या संस्थेवर येऊन पडलेली आहे.

प्रामाणिक माणसांची संघटना पाहिजे

सामान्य माणसाच्या गरजांचे समाधान ही कल्याणकारी राज्यातील शासनाची पहिली कसोटी आहे. या कसोटीची पहिली फूटपट्टी म्हणजे समाज-विकासासाठी जन्म घेतलेल्या किती संस्था समाज-विकासाचे कार्य करीत आहेत ही होय. ज्या संस्था अशा प्रकारे समाज-विकासाचे कार्य करीत नाहीत,त्या कोणत्या तरी दुष्टचक्रात सापडलेल्या आहेत असे म्हणावे लागेल. कारण आपण जेव्हा आजच्या आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास करतो तेव्हा आपणास असे आढळून येते की या क्षेत्रात देखील मक्तेदारीचेच दुष्टचक्र फिरत आहे. यासाठी लोकशाही अर्थव्यवस्थेला जडलेली ही मक्तेदारीची कीड निपटून काढण्याची आज फार मोठी आवश्यकता आहे असे मला वाटते. यासाठी समाजातील सामान्य माणसातसुद्धा एक दृढ विश्वास निर्माण केला पाहिजे. निर्भयता आणि निर्भीडपणा निर्माण केला पाहिजे. तेव्हा असा विश्वास वाढविण्याचे कार्य अशा खेडोपाडी निघणाऱ्या बॅन्कामार्फत होईल असे मला वाटते आणि म्हणून बॅन्कांना खऱ्या अर्थाने सामाजिक-विकास साधावयाचा असेल किंवा सामाजिकक्रांती घडवून आणावयाची असेल तर समाजातील सामान्य परंतु प्रामाणिक माणसांची संघटना निर्माण केली पाहिजे.

चारित्र्य सिद्ध करावे

बँका हच्या सार्वजनिक विश्वासाचे एक ठिकाण म्हणून ओळखल्या जातात. सामान्य समाजाच्या सर्व सुखाचे मूळ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आज बँकाकडे सुखी-समाज-जीवनाचे एक माहेरघर म्हणून बोट दाखविले जाते. कारण सामान्यातल्या सामान्य माणसाचे भले कसे होईल याचा ध्यास बँकेस लागलेला असतो. तेव्हा कार्यक्षम बँन्केने आपला पैसा सामान्य माणसासाठी देताना त्याचा अंगभूत व्यवसाय, त्यामधील त्याचे कसब, तो व्यवसाय हाताळण्याची त्याची पद्धती, त्या व्यवसायाची समाजास असणारी गरज आणि त्याचे चारित्र्य या सर्व गोष्टींचा अवश्य विचार करावा. केवळ त्याच्याकडे असलेली मालमत्ता किंवा त्याची स्थावर जंगम जिंदगी यांचा विस्तार पाहून जी पत ठरविली जाते ती आज बदलत्या कालमानानुसार बदलली पाहिजे. आजच्या बँका जनताभिमुख झालेल्या असल्यामुळे त्याचा फायदा सामान्य जनतेने घेऊन आपली पत व चारित्र्य सिद्ध करावे.

समाजवादाची सफलता

आज आपण ग्रामीण भागाकडे नजर फिरविली तर अनेक क्षेत्रामध्ये असंतोष धुमसत असलेला दिसून येतो. ग्रामीण भागातील बहुजन समाजात धुमसत असलेल्या असंतोषाची कारण-मीसांसा करताना कधी कधी प्रकर्षाने आढळून येते ते असे की, या असंतोषाच्या मुळाशी आर्थिक प्रश्नाची गुंतागुंत आहे. ग्रामीण समाजातील विविध थरातील व वर्गातील आर्थिक संबंधात जोपर्यंत रचनात्मक बदल घडून येत नाही तोपर्यंत हा असंतोषाचा अग्नी भडकतच राहील असे मला वाटते. माझे असे ठाम मत आहे की विविध वर्गामधील आर्थिक विकासाच्या बाबीमध्ये रचनात्मक बदल घडवून आणण्यामध्येच समाजवादाची खरी सफलता सामावलेली आहे.

रत्नाकर बॅन्केची पावले मी वर म्हटलेल्या सर्व तत्त्वाच्या आधारावर पडत आहेत. या बॅन्केचा कारभार जी मंडळी समतोल-

पणे सांभाळत आहेत त्या मंडळीमध्ये प्रामाणिकपणा, जिद्द आणि सात्त्विकता असल्यामुळे या बॅन्केचा व्यवहार सामान्य समाजाच्या हिताचा होईल याबद्दल मला शंका वाटत नाही. रत्नाकर बँकेच्या या नव्या शाखेच्या सहाय्याने रुकडीमधील जागरुक नागरिकानी आपली पत आपल्या कर्तृत्वामधून सिद्ध करून आपला विकास साधून आपले जीवन समृद्ध करून घ्यावे ही उमेद बाळगून मी माझे भाषण संपवितो.

रुकडी,
दिनांक ११-७-१९७०

चारित्र्य सिद्ध करावे

बँका ह्या सार्वजनिक विश्वासाचे एक ठिकाण म्हणून ओळखल्या जातात. सामान्य समाजाच्या सर्व सुखाचे मूळ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आज बँकाकडे सुखी-समाज-जीवनाचे एक माहेरघर म्हणून बोट दाखविले जाते. कारण सामान्यातल्या सामान्य माणसाचे भले कसे होईल याचा ध्यास बँकेस लागलेला असतो. तेव्हा कार्यक्षम बँन्केने आपला पैसा सामान्य माणसासाठी देताना त्याचा अंगभूत व्यवसाय, त्यामधील त्याचे कसब, तो व्यवसाय हाताळण्याची त्याची पद्धती, त्या व्यवसायाची समाजास असणारी गरज आणि त्याचे चारित्र्य या सर्व गोष्टींचा अवश्य विचार करावा. केवळ त्याच्याकडे असलेली मालमत्ता किंवा त्याची स्थावर जंगम जिंदगी यांचा विस्तार पाहून जी पत ठरविली जाते ती आज बदलत्या कालमानानुसार बदलली पाहिजे. आजच्या बँका जनताभिमुख झालेल्या असल्यामुळे त्याचा फायदा सामान्य जनतेने घेऊन आपली पत व चारित्र्य सिद्ध करावे.

समाजवादाची सफलता

आज आपण ग्रामीण भागाकडे नजर फिरविली तर अनेक क्षेत्रामध्ये असंतोष धुमसत असलेला दिसून येतो. ग्रामीण भागातील बहुजन समाजात धुमसत असलेल्या असंतोषाची कारण-मीसांसा करताना कधी कधी प्रकर्षाने आढळून येते ते असे की, या असंतोषाच्या मुळाशी आर्थिक प्रश्नाची गुंतागुंत आहे. ग्रामीण समाजातील विविध थरातील व वर्गातील आर्थिक संबंधात जोपर्यंत रचनात्मक बदल घडून येत नाही तोपर्यंत हा असंतोषाचा अग्नी भडकतच राहील असे मला वाटते. माझे असे ठाम मत आहे की विविध वर्गामधील आर्थिक विकासाच्या बाबीमध्ये रचनात्मक बदल घडवून आणण्यामध्येच समाजवादाची खरी सफलता सामावलेली आहे.

रत्नाकर बॅन्केची पावले मी वर म्हटलेल्या सर्व तत्त्वाच्या आधारावर पडत आहेत. या बॅन्केचा कारभार जी मंडळी समतोल-

पणे सांभाळत आहेत त्या मंडळीमध्ये प्रामाणिकपणा, जिद्द आणि सात्त्विकता असल्यामुळे या बँन्केचा व्यवहार सामान्य समाजाच्या हिताचा होईल यावद्दल मला शंका वाटत नाही. रत्नाकर बँकेच्या या नव्या शाखेच्या सहाय्याने रुकडीमधील जागरुक नागरिकानी आपली पत आपल्या कर्तृत्वामधून सिद्ध करून आपला विकास साधून आपले जीवन समृद्ध करून घ्यावे ही उमेद बाळगून मी माझे भाषण संपवितो.

रुकडी,
दिनांक ११-७-१९७०

कृषिकेन्द्रित अर्थव्यवस्था

म्हैसाळ हे मिरज तालुक्यातील एक संपन्न खेडेगाव. या खेडेगावातील दि रत्नाकर बॅन्क लि. शाखेच्या उद्घाटन समारंभाचे वेळी दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्गदर्शनपर भाषण.

मी एका वर्षापूर्वी म्हैसाळ गावी आलो होतो. तेव्हा म्हैसाळ गावच्या विकासासंबंधी येथील शिंदे, पाटील वगैरे कार्यकर्त्यांशी विस्ताराने चर्चाही केलेली होती. या गावचा आर्थिक, सामाजिक व शेतीविषयी कायापालट करण्यासंबंधी काही योजनाही मी त्यांच्यापुढे मांडल्या होत्या. आज माझ्या मार्गदर्शनाची फलश्रुती पाहात असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

एकदिलाने व एकविचाराने बांधलेला म्हैसाळचा समाज आज विकासाच्या दिशेने आपली पावले टाकीत आहे. पुरातन काळात राजा भगीरथाने दीर्घ प्रयत्नाने जशी गंगा पृथ्वीवर आणली, त्याप्रमाणे आपल्या म्हैसाळ येथील जनतारूपी भगीरथाने म्हणजे शेतकऱ्याने कृषिक्षेत्रात अनेक गंगा म्हैसाळच्या भूमीवर अवतीर्ण केल्या आहेत. जमीन आणि पाणी यांचा मेळ बसल्याशिवाय कृषिक्रांती होणार नाही ही गोष्ट म्हैसाळकरांनी फारच लवकर ताडली. अशा

या कृषिक्रांतीच्या वाटेवर आर्थिक मदतीचा हात देण्यासाठी रत्नाकर बँक तुमच्यापुढे येत आहे. तो हात हातात घेऊन तुम्ही तुमच्या परिसरात विकासाच्या मंदिरावर कळस चढवाल यात तिळमात्र शंका वाटत नाही.

अर्थव्यवस्थेचा कणा

पूर्वीपासूनच आपला भारत देश कृषिप्रधान देश म्हणून प्रसिध्द आहे. तसे पाहिले तर आपल्या देशातील कोणत्याही उद्योगाचा मूलाधार शेती हाच आहे. शेतीतून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाच्या सुबत्तेवरच अनेकविध उद्योगाचे भविष्य अवलंबून असते, हे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. दुष्काळ किंवा अन्य नैसर्गिक कारणाने जेव्हा नापिकी होते तेव्हा उद्योगांना मंदीला तोंड द्यावे लागते, इतकेच नव्हे तर काही महत्त्वाचे उद्योग आणि त्यातील उत्पादन गडगडते, हा अनुभव आपल्या गाठी आहेच. परंतु आपण पाश्चात्य उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे आकर्षित होऊन आपल्याकडेही उद्योगधंद्यावर अवास्तव भर देऊन शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी त्याची कटू फळे अन्नटंचाईच्या स्वरूपात साऱ्या देशाला भोगावी लागत आहेत. म्हणून कृषीकेंद्रित अर्थव्यवस्थेचा जोमाने पुरस्कार करून त्यास उर्जितावस्था आणल्याशिवाय हा कोसळता डोलारा सावरता येणे शक्य नाही असे मला वाटते. मी जरी अर्थशास्त्रज्ञ नसलो तरी आज आपणास आत्मविश्वासाने असे सांगू इच्छितो की, ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी उद्योग धंद्यांचे जाळे विकेंद्रित अर्थव्यवस्थेच्या धर्तीवर विणल्याशिवाय भारताची समृद्धी होणार नाही. ग्रामीण अर्थव्यवस्था पायाभूत मानल्याशिवाय कोणताही " इझम " यशस्वी होणार नाही अशी माझी ठाम भूमिका आहे. आणि म्हणून आपला देश आर्थिक दृष्टया समर्थ व मजबूत करावयाचा असेल तर देशाचा जो प्रमुख धंदा असेल तो मजबूत करण्याची गरज आहे.

वस्तुनिष्ठ निष्कर्ष

आपल्या भारतात जेव्हा पंचवार्षिक योजनांचे युग अवतरले तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून

शेतीला अग्रक्रमाचे स्थान वहाल केले. पहिल्याच योजनेत भाक्रा, हिराकूड व दामोदर यासारखी मोठमोठी धरणे झाली. व या धरणामुळे शेती सुजलाम् सुफलाम् होण्याची वाटचाल सुरू झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात आपल्या देशासमोर बेकारीची समस्या निर्माण झाली. त्यामुळे उद्योगधंद्यांना प्राधान्य द्यावे लागले. तरी पण शेतीचे प्राधान्य काढून घेण्यात आले नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत तर आम्ही शेती आणि उद्योग या दोन्हीना समान स्थान दिले. असे होऊनही अन्नधान्याचा अपुरेपणा राहिलाच. याचे कारणही उघड आहे की या देशाचा विस्तार मोठा व प्रश्न व्यापक, त्यामुळे कोटयावधी रुपये खर्च होऊनही विकास, प्रगती आणि समृद्धी यासंबंधीच्या अपेक्षा अपुऱ्या राहिल्या आणि पंचवार्षिक योजनांच्या उत्क्रांतीचा हिशोब झाला आणि त्यामध्ये शेतीधंद्याकडे पूर्ण लक्ष दिले गेले नाही असा निष्कर्ष वस्तुनिष्ठ पाहणीतून निघाला.

सुधारीत शेती एक निकडीची गरज

भारतातील शेती व्यवसायात ७० टक्क्याहून अधिक लोक काम करीत आहेत. परंतु शेती समृद्ध होण्यासाठी लोकांचे अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. असा नियोजनकारांचा एक अंदाज होता. परंतु शेती धंद्यातील लोकाना विकासाची संधीच दिली नाही तर त्यांचे सहकार्य मिळावे कसे ? पिढ्यान् पिढ्या जे लोक शेती धंद्यात आहेत तो धंदा त्यांच्याच सवयीचा आहे आणि ज्यांच्यामध्ये हा धंदा विकसित करण्याची संभाव्यता आहे त्यांना आवश्यक ती संधी प्राप्त करून देण्यानेच या व्यवसायाचे क्षेत्र रुंदावणार आहे, या गोष्टीचा विसर पडू देऊन कसे चालेल ? विशेषत: उद्योगाची वाढ करण्याचे प्रयोगही आपल्या देशात झाले. परंतु अशा उद्योगात काम करण्याची पात्रता असलेल्या व काम करू अिच्छणाऱ्या सर्वांना त्यात मुरविता येणे शक्य झाले नाही. पैशांच्या दृष्टीने राष्ट्र तेवढे समर्थही नाही. हा आपला अनुभव आहे. अिंग्लंडसारख्या उद्योगधंद्यावर भर देत असलेल्या राष्ट्राप्रमाणे आपणासही तसे करता येईल असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही. कारण अिंग्लंड, जर्मनीसारख्या देशाची जडणघडण उद्योगावर आधार-

लेली आहे, ही गोष्ट जेवढी खरी आहे तेवढीच त्या देशाची भौगालिक रचनाही त्याला कारणीभूत आहे हे विसरता कामा नये. परंतु आपल्या भारताची भौगोलिक रचना वेगळी, येथील लोकसंख्येचा प्रश्न वेगळा, त्यामुळे अन्नधान्याचीही गरज मोठी, तेव्हा भारतासारख्या विकसनशील देशाच्या समस्याच वेगळ्या आहेत हे विसरून चालणार नाही. आणि म्हणून याच संदर्भात सुधारित शेतीला अग्रक्रम मिळणे ही या देशाची निकडीची गरज आहे.

कसणाऱ्याची जमीन

शेतीच्या धंद्याला स्थिरता येण्यासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री, पाणी, खत अवजारे आणि सुधारित बीबियाणे यांची मुबलकता निर्माण होणे हे त्याचे एक आवश्यक अंग आहे. याचबरोबर शेतीतील काम करणारा जो माणूस आहे त्याला शेतीचे आकर्षण निर्माण होण्यासाठी शेतीची मालकी त्याच्याकडे देणे, कसणाऱ्याची जमीन हे तत्त्व लागू करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे त्याचे सारे महत्त्वाचे अंग आहे. उत्पादन वाढविण्यास मदत व्हावी, सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी महाराष्ट्राने जमीन धारणेचे कायदे केले. क्षेत्रफळावर बंधन आणले, साधने पुरविण्यासाठी कायदेही केले पण या कायद्यांची काटेकोरपणाने अंमलबजावणी होत नाही ही लोकांची तक्रार आहे. उत्पादन वाढविण्यासाठी आणि शेतीला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्राने शेतमालाला किफायतशीर किंमत देण्याचाही कायदा केला पाहिजे. आणि माल विक्रीतील आडते दलाल कमी होण्यासाठी खरेदीविक्री संघ व शेतीमालबाजार समित्याही स्थापन केल्या. किंमतीची स्थिरता निर्माण झाल्याने उत्पादनही वाढले. परंतु शेतीधंदा हा धंदा म्हणून किफायतशीर होण्यासाठी आपण येथेच थांबलो तर शेती एका विवक्षित बिंदूवरच थांबविण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

आणखी एक समस्या

शेतीधंद्यात लहान शेतकरी आणि शेतमजूर ही एक आणखी फारच मोठी समस्या आपल्या देशात आहे. लहान शेतकऱ्यांना शेती

धंदा हा परवडत नाही, तो आपल्या शेतीत जो कच्चा माल तयार करतो त्यातून त्याच्या जीवनाच्या गरजा पूर्ण होत नाहीत. त्याच्या शेतीत उत्पादित होणारा कच्चा माल बाहेर जाऊन प्रक्रिया होऊन जो परत येतो तो खरेदी करणे त्याला परवडत नाही. याचा अर्थ असा की, आज आपण शेतकऱ्याना त्याच्या कच्च्या मालासाठी जरी किफायतशीर किंमत दिली तरी तेवढ्यानेच शेतीमधील उत्पादन वाढेल असे म्हणता येणार नाही. शेतीच्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्याची प्रक्रिया ही आज शेती उत्पादन करणाऱ्यांच्या हातात नाही. कच्च्या मालात जेवढे पैसे मिळतात त्यापेक्षा प्रक्रिया केलेल्या मालाचे पैसे अधिक मिळतात. परंतु प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांची मालकी शेतकऱ्यांची नाही तर ती आहे भांडवलदारांची. प्रक्रिया करण्याचे उद्योग शेतकऱ्यांच्या मालकीचे झाले तरच शेतकऱ्यांची आर्थिक कुवत वाढणार आहे आणि त्यामुळे शेतीधंदा संपन्न होणार आहे.

प्रक्रियात्मक उद्योगात शेतकऱ्यांची मालकी निर्माण होण्याचा आणखी मोठा फायदा बेकारी कमी होण्यात आहे. शेतकरी लहान असो अथवा मध्यम असो शेतात तो चार महिने काम करतो आणि आठ महिने बेकार राहतो. लहान शेतकरी आणि शेत मजूर यांना किमान वेतन द्यावयाचे म्हटले तरी शेतीधंद्याला आज ते परवडत नाही, अशी वस्तुस्थिती आहे. जे वेतन त्याला मिळते त्यातून त्याच्या जीवनाच्या प्राथमिक गरजाही भागत नाहीत. सरकारी साखर कारखान्याच्या क्षेत्रात ऊस तोडण्याचे व वाहण्याचे काम करणारा जो मजूर आहे त्याला एक टन ऊस तोडणीला चार ते सव्वाचार रुपये मिळतात. याचा अर्थ महिन्याला त्याचे उत्पन्न १२५ ते १५० रुपयापर्यन्त पोचते. संबंध दिवस राबणाऱ्या मजुराला हे पैसे पुरत नाहीत, हे तर खरेच परंतु ऊसवाल्या शेतकऱ्यालाही ते देणे परवडत नाही, कारण वेतनासाठीच त्याचा पैसा खर्च होत राहिला तर शेतीमधील उत्पादनाच्या वाढीसाठी त्याच्याजवळ आवश्यक आर्थिक सामर्थ्य उरत नाही त्यामुळे त्याची शेतीही मजबूत होत नाही.

जोड धंद्याची गरज

शेती मजबूत होण्यासाठी परवडण्यासाठी आणि मजूरांचे जीवन-मान सुधारण्यासाठी शेतीला अनुरूप अशा उद्योगाचे जाळे ग्रामीण भागात पसरवून द्यावे लागेल. शेतीमधील कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग तेथे वाढविले तरच अनेकांना काम उपलब्ध होईल. यामुळे बेकारी तर कमी होईलच, शिवाय शेतीला जोड धंद्याचे सहाय्य लाभल्याने प्रक्रिया केलेल्या मालाच्या किंमतीचा काही लाभ शेतकऱ्यानाही मिळू लागेल. शेतीवरील बोजा कमी करण्यासाठी त्याला त्याची मदत होईल. विकेन्द्रित स्वरूपात प्रक्रियात्मक उद्योग-धंदे ग्रामीण भागात वाढले तर लहान शेतकऱ्यांच्या आणि शेत मजू-रांचा ८ महिने शहराकडे कामाकडे वळणारा ओघ कमी होऊन शहरीकरणाच्या भेडसावणाऱ्या प्रश्नांची तीव्रता काहीशी कमी होऊ शकेल.

शेतीला अनुरूप असे जोडधंदे कोठे आणि कोणते सुरू करावेत या प्रश्नाने गांगरून जाण्याचे कारण नाही. आपले धोरण जर सुसंवादित राहील तर जोडधंद्यासाठी क्षेत्राचा शोध घेण्याचे कारण राहणार नाही. ऊस हळद, मिरची, भुईमूग, तंबाखू, नारळ,काजू,आंबे.द्राक्षे,संत्री, मोसंबी,करडी.गळिताची धान्ये, भात आणि डाळीची द्विदल धान्ये यांची उत्पादने महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील सव्वा लक्ष एकरात उसाचे पीक घेतले जाते.गुऱ्हाळे, हळद व मिरची यांची पूड करणे,भुईमूग व करडीचे तेल काढणे, फळांचा उपयोग करून ते पेटीबंद करणे, भात भरडणे, डाळी तयार करणे, दूध उत्पादन करणे आणि कुक्कुटपालनासारखे जोडधंदे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांना अशक्य नाही. हे सर्व घडावयाचे तर कृषी उद्योगावर आधारित अर्थव्यवस्था निर्माण होण्याची अत्यंत गरज आहे. देशाचा समतोल विकास साध्य होण्या-साठी आधुनिक पद्धतीने यांत्रिकी शेती करून उत्पादन वाढवावे लागेल आणि त्या उत्पादनावर आधारित जोड धंदे सुरू करावे लागतील.

केवळ उत्पादन वाढवूनही थांबता येणार नाही. जीवनाच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी मालाचा पुरवठा करावाच लागेल परंतु त्याबरोबर त्या मालाचा उपभोग घेणाऱ्या ग्राहकांची शक्तीही वाढविण्याची गरज आहे. प्रक्रियात्मक उपयोगाची ग्रामीण भागात वाढ झाली तरच येथील ग्राहकशक्ती वाढेल. वास्तविक पाहता जोड धंद्यांच्या सर्वच गरजा मूलभूत स्वरूपाच्या आहेत. केवळ मृगजलाच्या पाठीमागे धावून त्या सुटणाऱ्या नाहीत, त्यासाठी अर्थव्यवस्था बदलावी लागेल आणि म्हणूनच मला या आपल्या रत्नाकर बॅन्केच्या उद्घाटनाच्या निमित्ताने असे आत्मविश्वासाने म्हणावे लागते की, कृषिउद्योगावर आधारित अर्थव्यवस्था उभी करणे हाच देश आर्थिक दृष्टचा समर्थ करण्याचा एक उपाय आहे.

रत्नाकर बॅन्केच्या संचालकांनी म्हैसाळ येथे आपल्या बॅन्केची शाखा उघडण्यात फार मोठे औचित्य दाखविले आहे असे मला वाटते, कारण बँक चालण्यास ज्या ज्या गोष्टी साधन म्हणून लागतात त्या येथील शेतकरी वर्ग हेरूनच येथे बँकेची शाखा उघडली आहे हे स्पष्ट दिसून येते. म्हैसाळ हा गाव मुळातच शेतीप्रधान गाव आहे. असा हा गाव समृद्ध व्हावा यासाठी सर्वश्री आबासाहेब शिंदे-सरकार, बी. बी. चौगुले, देवल सेवा सोसायटीचे श्री. शिंदे, व मिरज नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. गाडवे यांचे चौफेर प्रयत्न चालू आहेत हे दिसून येते. आपला उत्कर्ष आपणच साधावयाचा आहे या दृष्टीने गावकऱ्यांची पावले पडत आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. आज तुमच्या म्हैसाळ गावाजवळील धरणात पाणी साचविले गेले आहे. त्या पाण्याचा उपयोग पुरेपूर करून घेण्यासाठी आर्थिक व्यवस्था पूर्ण करण्याचे कार्य रत्नाकर बँकेने केलेले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २५ वर्षांनी आज जनतेच्या चेहऱ्यावर स्वयंप्रेरित झाल्याची जी जाग आलेली आहे ती निश्चित आशादायक आहे असे मला वाटते. आज येथे रत्नाकर बँकेचे चेअरमन श्री. बी. एन्. गरगटेही जातीने हजर आहेत. रत्नाकर बँकेने म्हैसाळ येथे आपल्या बँकेची १२ वी शाखा उघडून एका तपाची सीमा गाठलेली आहे. या तपाच्या अनुभवाचे फळ त्यांच्या

हातात पडल्याशिवाय राहाणार नाही. आज या शुभदिनी रत्नाकर बँकेच्या पदाधिकाऱ्यांना व गावकऱ्यांना त्यांच्या कार्यात सुयश लाभत राहो अशी शुभेच्छा व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

म्हैसाळ,
दिनांक ९-१०-१९७१

एक यक्षप्रश्न

कोल्हापूर येथील जनता कंझ्यु. को-ऑप. स्टोअर्स लि. च्या अद्यावत बेकरी मशीनच्या उद्घाटन समारंभाचेवेळी दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्गदर्शनपर भाषण.

जनता कंझ्यु. को–ऑप. स्टोअर्सने आजपर्यंत जीवनाच्या अनेक क्षेत्रात गौरवास्पद कार्य केले आहे. ग्राहक चळवळीमध्ये जनतेला उत्तम मान देऊन जनतेचा विश्वास संपादन करण्याचे कार्य ही संस्था अनेक वर्षे करीत आहे, हे मला माहीत आहे. आज आपण समाज-जीवन तपासून पाहिले तर सर्वत्र भेसळ आणि भ्रष्टाचार बोकाळ-ल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत जनतेला केवळ निर्भेळ आणि सात्त्विक माल पुरवून चालावयाचे नाही तर जनता स्वावलंबी कशी होईल याकडेही लक्ष पुरविले पाहिजे. या दृष्टिकोनातून आपल्या संस्थेने अद्यावत बेकरी मशीन घेऊन जनता ब्रेडचे उत्पादन करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो स्तुत्य आहे. काळाची गरज म्हणून असे प्रकल्प भराभर उभे राहिले पाहिजेत. त्यासाठी कोणी कोणाची वाट पाहात थांबू नये. शासनाला वाटते सर्वच कामे आपण करावीत. जनतेलाही वाटते की हे काम शासनाचेच आहे. परंतु ही प्रवृत्ती लोकशाहीला अत्यंत विघातक आहे. आणि म्हणून काळाची 'पावले

कशी पडतात हे ओळखून सहकाराच्या तत्त्वावर येथे जो नवा 'जनता ब्रेड' निर्माण होणार आहे त्याचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

भाववाढीचा भस्मासूर

जीवनावश्यक वस्तू आणि इतर तदनुषंगिक वस्तू यांच्या किंमती निर्धारित करण्याचा प्रश्न हा नेहमीच महत्त्वाचा आहे. सध्या तर हा प्रश्न यक्षप्रश्न होऊन राहिलेला आहे. या किंमती निर्धारित करण्याचा, त्या स्थिर ठेवण्याचा, सामान्य लोकाना झेपतील अशी त्याची मर्यादा ठेवण्याचा, एकाबाजूने जोरदार प्रयत्न होतो आहे, असे दिसते. पण त्या किंमती प्रत्यक्ष वाढत असल्याचेच दुसऱ्या बाजूला चित्र दिसू लागते. पंढरपूरला जाण्यासाठी निघालेला मनुष्य हा राजापूरला पोहोचावा असा या किंमतीबाबतचा प्रश्न विचित्र होऊन राहिलेला आहे. भयानक स्वरूपात वाढत निघालेल्या किंमतीमुळे सर्व समाज-जीवनच विस्कळीत झालेले आहे. मूळ लोकशाहीचा आधारच डळमळू लागल्यासारखा दिसत आहे.अन्नासाठी दंगली होऊ लागल्या तर लोक-शाहीचा पायाच उखडून निघण्याचा संभव असतो. विदारक भाव-वाढीचा परिणाम भारतीय समाजजीवनावर खोलवर जाऊन पोहोचलेला आहे. उपाशी पोटाने कोणतेही तत्त्वज्ञान जगवता येत नाही. आपल्या देशातील सर्वच वातावरण मोठे विचित्र आणि चिंतेचे झालेले आहे.

अर्थक्षेत्रातील तत्त्वज्ञान : स्वरूप व पर्याय

मालाचे उत्पादन कमी झाले म्हणजे भाव वाढतात, मालाचे उत्पादन अधिक झाले म्हणजे भाव घसरतात, या त्रिकालाबाधित अर्थक्षेत्रातील तत्त्वज्ञानाचा उल्लेख नेहमीच केला जातो. नियोजनबद्ध रितीने समाजजीवन विकसित करण्याचे ध्येयधोरण अवलंबून नियो-जनबद्ध अर्थव्यवस्था जेव्हा निर्माण करण्याचा प्रयत्न होतो त्यावेळी अर्थक्षेत्रातील वरील सर्वंग तत्त्वज्ञान सांगणे योग्य होईल असे मला वाटत नाही. नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचा अर्थच हा आहे की त्यामध्ये कमीतकमी असंतुलन निर्माण होऊ शकेल अशी त्यामध्ये व्यवस्था असावी लागते. एकाबाजूला नियोजन करतो म्हणणे आणि दुसऱ्या

बाजूला मागणी आणि पुरवठा या अर्थशास्त्राला समाजजीवन बिघडू देण्याला मार्ग मोकळा करून देणे योग्य होणार नाही. पाऊस पडला नाही म्हणून पिकले नाही, लोकानी संप केला म्हणून उत्पादन घटले या गोष्टी सांगून भाववाढीच्या पापातून योजनाबद्ध अर्थव्यवस्था करणाऱ्याना सुटका करून घेता येणार नाही. भूकंपासारखी एखादी मोठी आपत्ती आली तर प्रश्न वेगळा.पण नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचे त्याला सामर्थ्यच असे असले पाहिजे की, आकस्मिक येणाऱ्या संकटातूनसुद्धा त्याला निभावून जाता आले पाहिजे. मोटारीला ज्याप्रमाणे शॉक ॲब्सॉर्बर असतात त्याप्रमाणे नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमध्ये आकस्मिक धक्के सोसण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. अशा सामर्थ्यशाली नियोजनाचे स्वरूप निर्मळ, निःपक्षपाती आणि गुणावगुणांची कदर करणारे असले पाहिजे. नियोजनामधील अग्रक्रमही तितकेच भक्कम असले पाहिजेत.

अर्थव्यवस्थेची काही पथ्ये

योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे सध्याचे युग आहे. योजनाबद्ध अर्थव्यवस्था यशस्वी व्हावयाची असेल आणि विशेषतः लोकशाही समाजव्यवस्थेमधील नियोजनबद्ध अर्थव्यवस्था यशस्वी करावयाची असेल तर त्याला खूप पथ्ये पाळण्याची आवश्यकता आहे. समाजामध्ये स्वयंशिस्त निर्माण करण्याची गरज आहे. " चॅरिटी बिगिन्स ॲट होम " या म्हणीप्रमाणे ज्यांच्यावर योजना आखण्याची, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे, त्यांच्यापासूनच स्वयंशिस्त निर्माण होण्याची गरज आहे. कुंपणच शेत खाऊ लागले आणि रखवालदारच लूट करू लागला तर काय अवस्था होते ? त्याचप्रमाणे जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनीच स्वयंशिस्त सोडली तर काय राहणार आहे ? अशी आजची परिस्थिती झालेली आहे. नियोजनबद्ध अर्थव्यवस्था म्हणजे बंधनातील अर्थव्यवस्था मानणे हे चुकीचे आहे. अर्थव्यवस्थेला बंधने पाहिजेत. अर्थव्यवस्था यशस्वी होण्यासाठी स्वयंशिस्त पाहिजे. मात्र याचा अर्थ समाजाची आणि लोकांची स्वयंप्रेरणा घालवणे असे नव्हे. लोकांचे स्वयंकर्तृत्व दाखविण्याची मुभा त्यांना असली पाहिजे. त्याची स्वयंप्रेरणा जिवंत राहिली पाहिजे आणि

त्यांच्यामध्ये लोकशाहीला अनुरूप अशी स्वयंशिस्तही निर्माण झाली पाहिजे.

या पार्श्वभूमीवर आधारून भाववाढ-नियंत्रण करण्याचे प्रयत्न प्रामाणिकपणे होऊ शकले तर त्यामध्ये निश्चित यश येऊ शकेल. त्यासाठी सर्वांना समान न्याय मिळतो अशीच समाजाची मनोमन भावना निर्माण होण्यास मदत होऊ शकेल अशाच पद्धतीचा अवलंब झाला पाहिजे. त्यादृष्टीने मी या ठिकाणी काही सूचना करीत आहे.

लोकशाही समाज व्यवस्थेतील नियोजन

सर्वच क्षेत्रातील उत्पादन वाढीच्या कामामध्ये निर्धारित पद्धत अवलंबण्याची गरज आहे. कोणताही धंदा असला तरी तो धंदा करणारी मंडळी, मग ती सरकारी क्षेत्रातील असोत, सहकारी क्षेत्रातील असोत अगर खाजगी क्षेत्रातील असोत तो धंदा चांगला चालण्यासाठी आणि जिवंत राहण्यासाठी त्या धंद्यातून निर्माण होणाऱ्या मालातून काहीतरी निश्चित नफा मिळण्याची आवश्यकता आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने निरनिराळ्या उद्योगातील हा नफा किती प्रमाणात घ्यावा याचेही काही अर्थशास्त्र आहे. किंबहुना उद्योगधंद्यातील या नफ्याचे प्रमाण निश्चित करून घेता येईल. त्या त्या उद्योगधंद्यातील माल उत्पादन करण्यासाठी किती उत्पादनखर्च होतो हेही निर्धारित करून घेता येईल आणि उत्पादनखर्चावर त्या त्या धंद्यातील निर्धारित करता आलेल्या नफ्याची मिळवणी केली आणि त्या मालाच्या वितरणाचा खर्च समाविष्ट केला की, त्या मालाच्या विक्रीची किंमत स्वाभाविकच निर्धारित होते.

काही धंद्यातील पक्का माल हा इतर धंद्यातील कच्चा माल होऊ शकतो अशा निरनिराळ्या उद्योगधंद्यातील कच्च्या आणि पक्क्या मालाच्या किंमती निर्धारित होत गेल्या आणि हा नियम सर्वच क्षेत्रातील उत्पादनाला समतोल मानाने आणि प्रामाणिकपणे लावण्यात आला तर कोणतीही वस्तू अकल्पितपणे महाग केली जाते आणि अधिक किंमतीने घ्यावी लागते असे वातावरण समाजात राहणार नाही. काही माल स्वस्त, काही माल महाग, काही माल दुर्मिळ अशी

परिस्थिती रहाणार नाही. मात्र त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे सर्वच मालाच्या उत्पादनामध्ये दूरदृष्टीचे आणि अग्रक्रमाचे नियोजन असावे लागते. लोकशाही समाज व्यवस्थेतील नियोजन हे सतत जागृत स्वरूपात ठेवावे लागते.

या दृष्टीने प्रयत्न होत राहिले तर आपल्या देशातील निसर्ग शक्ती आणि मानवी श्रमशक्तीचा उपयोग चांगल्या तऱ्हेने करून घेता येईल. निसर्गसंपत्ती आणि मानवी श्रमशक्ती यांचे संतुलन साधता येईल. किंबहुना हे संतुलन साधणे आमच्या भारतीय नियोजनाचा आधारभूत मूळ पाया आहे असे मानूनच नियोजन करीत राहिले पाहिजे. या पद्धतीने मालाचे उत्पादन, त्यावरील फायदा आणि त्यातून निर्धारित होणाऱ्या किंमती यासंबंधीची स्पष्ट माहिती जनतेला स्पष्टपणे होत राहिली तर भाववाढीसंबंधी कुणाचीही तक्रार राहणार नाही आणि भाववाढ काही प्रसंगातूनच निर्माण झाली तर तो सोसण्याची समाजाची मानसिक तयारी होऊ शकते. आपल्या देशातील भाववाढीचा प्रश्न थातूरमातूर करून सोडवता येणार नाही. तर त्यासाठी काही मूलभूत स्वरूपाचे विचारच करावे लागणार आहेत. त्याच दृष्टीने माझे हे विचार मी मांडलेले आहेत.

आतापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या किमती निर्धारित करण्याबाबत मी माझे काही विचार आपल्यापुढे मांडले हे विचार आपणापुढेच मांडले पाहिजेत. कारण आपण जीवनावश्यक वस्तूंची निर्मितीकरता सहकारी चळवळीच्या आधाराने बाजारातील भाववाढ रोखण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे तसेच भेसळपणा व नफेबाजी वगैरे अपप्रवृत्तीनाही आळा घातला पाहिजे. जनता को-ऑप. कंझ्यु. स्टोअर्सच्या कार्यकर्त्यांनी समाजाची सेवा करीत असताना एवढा जरी निर्भेळ विचार ध्यानात ठेवला तरी पुरे झाले.

कोल्हापूर,
दिनांक ६-५-१९७२

भारताच्या भाग्यरेषा

तालुका शिरोळ येथे भरलेल्या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन-प्रसंगी सर्व शेतकऱ्यांना उद्देशून दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले मार्गदर्शनपर भाषण.

आपल्या भारत देशातील पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या कामाची फलप्राप्ती लक्षात घेऊन भारताची आर्थिक व्यवस्था बळकट करण्याकरिता चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये भारतीय नियोजनकार आणि भारत सरकार यानी शेती उत्पादनाला अग्रक्रम दिलेला आहे, आणि ते योग्यही आहे. गेल्या दोन वर्षाच्या कालात आपल्या देशात अनेक क्रांतिकारी घडामोडी घडून आल्या. भारतीय जनतेच्या मनोभावना ढवळून निघाल्या. समुद्रमंथनातून अमृत हे चौदावे रत्न ज्याप्रमाणे निघाले त्याप्रमाणे गेल्या दोन वर्षात आपल्या देशात झालेल्या निरनिराळ्या घटनांच्या मंथनातून 'गरीबी हटाव' या गोष्टीचा मनोमन साक्षात्कार झाला आणि आज नवे भारतीय सरकार हा साक्षात्कार घेऊन नव्या जोमाने देशसमृद्धीच्या कामाला लागणार आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत शेती उत्पादनाला देण्यात आलेल्या अग्रक्रमात 'गरीबी हटाव' या साक्षात्काराची पूर्ती होणार आहे.

पाणंद रस्त्याची बांधणी

'गरीबी हटाव' ची पूर्ती करण्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये योजनेचे परिशीलन झपाट्याने चालू आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेचे त्या दृष्टीने परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न जोराने सुरू झाला आहे. निरनिराळे उपक्रम सांगण्यात येत आहेत. त्यामध्ये शेती उत्पादनाचा अग्रक्रम तर आहेच, पण शेती उत्पादनाची यशस्विता घडवून आणण्यासाठी लागणाऱ्या गोष्टीमध्ये पाणीपुरवठा, खत पुरवठा, योग्य बी-बियाणे यांचा पुरवठा या गोष्टी पुनर्घोषित होत आहेत ही चांगली गोष्ट आहे. शेती उत्पादनाला खऱ्या अर्थाने स्थैर्य यावयाचे असेल तर ज्याप्रमाणे पाणीपुरवठा, खतपुरवठा, अवजराची उपलब्धता, तांत्रिक ज्ञानाची व्यवस्था आणि शेती मालाच्या किंमतीची शाश्वती वगैरे मूलभूत गोष्टींची व्यवस्था करून घ्यावी लागते. त्याचप्रमाणे या सर्व गोष्टींच्या आधाराने शेती उत्पादनाचे काम व्यवस्थित व्हावयाचे असेल तर मूलभूत गरजेची गोष्ट म्हणून खेडचातून शेतीवाडीत जाणाऱ्या पाणंद रस्त्याची बांधणी आणि दुरुस्ती या गोष्टींचा त्यामध्ये समावेश होणे आवश्यक आहे. शेती उत्पादनाच्या नव्या विचारात या रस्त्याच्या आवश्यकतेबद्दलही वरिष्ठ पातळीवर विचार चालू आहेत, याबद्दल समाधान वाटते.

रस्ते म्हणजे विकासाची खुली द्वारेच

सध्या आपल्या देशात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची विभागणी राष्ट्रीय रस्ते, राज्य रस्ते, जिल्हा रस्ते आणि जोड रस्ते याप्रमाणे करण्यात आलेली असून सरकारी यंत्रणेमधून निरनिराळ्या स्वरूपामध्ये सदरील रस्ते बांधण्यासाठी आणि दुरूस्तीसाठी पैसा खर्च होत असतो. वरील रस्त्यांची रचना आणि व्यवस्था पाहिल्यास राष्ट्रीय रस्त्यांची रचना चांगली व पहिल्या प्रतीची असते. त्याच्या खालोखाल राज्य रस्ते, जिल्हा रस्ते आणि जोड रस्ते अशी त्यांची गुणवत्ता सांगता येईल. आज आपल्या देशातील प्रत्येक खेडेगावाला बाहेरील

प्रदेशाशी दळणवळण जोडू शकेल अशा जोड रस्त्यांची व्यवस्था पूर्ण झालेली नाही. आपल्या देशातील प्रत्येक खेडयाला जोडणारा एकतरी रस्ता मिळू शकेल अशा प्रकारची महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे. यावरूनही खेडेगावाला आवश्यक असणाऱ्या रस्त्यांची व्यवस्था कोणत्या स्वरूपात आहे याची कल्पना येईल. खरे पाहता खेडेगावाना जोडणारे रस्ते म्हणजे खेडेगावाच्या विकासाची खुली द्वारेच होत.

गावागणिक पाणंद रस्ते

आपला देश शेतीप्रधान आहे. अैंशी टक्क्याहून अधिक लोकांचा दैनंदिन व्यवसाय आणि व्यवहार हा शेतामध्ये होत असतो आणि शेती धंदा करणारा आपल्या देशातील समाज विखुरलेल्या अशा लहान मोठ्या खेडेगावात राहात असतो. खेडयात राहून त्यांचा शेतीचा धंदा अतिशय अवघड परिस्थितीमध्ये त्यांना करावा लागतो. गावामध्ये तयार झालेला शेतीचा माल बाहेरगावी नेण्यासाठी ज्याप्रमाणे प्रत्येक गावाला जोडरस्त्याची आवश्यकता आहे त्याहूनही अधिक प्रमाणामध्ये प्रत्येक गावामधून त्या त्या गावाच्या शेतीवाडीत जाणारे जे पाणंद रस्ते आहेत त्या रस्त्याची दुरुस्ती अग्रहक्काने होणे आवश्यक आहे. कारण शेतात न्यावयाचा माल व शेतातून गावात आणावयाचा माल यासाठी पाणंद रस्त्याना फार मोठे महत्त्व आहे. गावोगावी अशा पाणंद रस्त्याची भयानक परिस्थिती पाहिल्यानंतर कोणाच्याही अंगावर शहारे येतील. असे रस्ते वर्षातून बरेच दिवस त्यावरून जाण्यायेण्यासारखे नसतात. काही पाणंद रस्ते दोन्ही बाजूच्या अतिक्रमणाने अधिकच दुर्घट झालेले असतात. शेतीप्रधान देशाची खरीखुरी प्रगती व्हावी असे वाटत असेल तर गावागणिक अशा पाणंद रस्त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या भविष्याचे आधारस्तंभ

अशा या पाणंद रस्त्यांचा सरकारी दप्तरी कोणत्याही योजनेखाली अंतर्भाव झालेला नाही. ग्रामपंचायती त्या रस्त्यावर खर्च करू

शकत नाहीत. खर्च करावयाचा म्हटलाच तर ग्रामपंचायतीकडे पुरेसा पैसाही असू शकत नाही. अशा वेळी स्वावलंबनाने शेतकऱ्यांनी स्वतःच्या श्रमाने सदरचे रस्ते दुरुस्त करावेत अशीही कदाचित कोणाची कल्पना असू शकेल. परंतु सर्वसाधारणपणे सदर रस्ते संपूर्णपणे तयार करण्याची शक्ती शेतकऱ्यामध्ये असू शकणार नाही. सदर रस्त्यावर होणाऱ्या अतिक्रमणाची तर अतिशय गुंतागुंतीची बाब असते. काही गावातून अशा रस्त्यावरील अतिक्रमणे दूर करण्याच्या प्रयत्नामुळे कायमचे वितुष्ट निर्माण झालेले आढळून येते. आणि म्हणून या रस्त्यांच्या बांधणीकडे आणि दुरुस्तीकडे सरकारकडून खास लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तथापि लोकांची आवश्यक ती साथ व आवश्यक तेवढे माणूसबळही या रस्त्यांच्या उभारणीसाठी अपेक्षित आहे. कारण शेतकऱ्यांचे भविष्य उजळ करणारे शेतवाडीत जाणारे हे पाणंद रस्ते म्हणजे खऱ्या अर्थाने भारताच्या उज्ज्वल भाग्य रेषाच आहेत. आणि म्हणून या पाणंद रस्त्यांच्या कामाला योग्य ती गती मिळण्यासाठी काही मूलभूत गोष्टींचा तातडीने विचार करण्याची नितान्त आवश्यकता आहे असे माझे ठाम मत बनून राहिले आहे.

राष्ट्रीय नियोजनात स्थान

राष्ट्रीय रस्ते, राज्य रस्ते, जिल्हा रस्ते आणि जोड रस्ते या जोडीला पाचवा वर्ग म्हणून शेतवाडीत जाणारे पाणंद रस्ते म्हणून रस्त्याच्या बांधणी आणि दुरुस्तीच्या कामाचा समावेश सरकारच्या खास योजनेमध्ये करण्यात यावा. जोड रस्त्यांच्या सरकारी योजनेप्रमाणे या पाणंद रस्त्याची योजना बजेटामध्ये अग्रहक्काने धरण्यात यावी. या कामाच्या पूर्ततेसाठी लोकमदतीची अटही आवश्यकतेप्रमाणे शासनाने घालावी. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील नियोजनामध्ये या गोष्टीचा समावेश करण्यात यावा

अतिक्रमणे दूर करावीत

खेडेगावात शेतवाडीत जाणारे पाणंद रस्ते मुळातच नादुरूस्त आहेत. या त्यांच्या नादुरूस्तीच्या अडचणीमध्ये अधिकच भर म्हणून

या रस्त्यांच्या दोन्ही बाजूनी फार मोठ्या प्रमाणामध्ये अतिक्रमणे झाली आहेत. काही ठिकाणी तर रस्ता जवळ जवळ संपुष्टातच आलेला असतो. सदरचे पाणंद रस्ते सरकारकडून ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. परंतु सदर रस्त्यावर झालेले आक्रमण दूर करणे ग्रामपंचायतीच्या आवाक्याबाहेरचे होऊन राहते. त्यासाठी कायदेशीर इलाज करावयाचा झाल्यास नियमाप्रमाणे सदरची अतिक्रमणे निघणे कठीण होऊन जाते आणि अडचणी तशाच वाढत राहतात.आणि म्हणून सरकारनेच आपणहून खेडेगावातील पाणंद रस्ते यावरील झालेली अतिक्रमणे दूर करून देण्याची व्यवस्था करावी.

केन सेसमधून मदत

आपल्या देशातील साखर कारखान्यामध्ये गळीत होणाऱ्या उसावर प्रत्येक टनामागे ५/– रुपये याप्रमाणे साखर कारखान्याकडून केनसेस म्हणून वसूल करण्यात येत होता. आता या केनसेसचे रूपांतर परचेस टॅक्समध्ये झाले असून आपल्या देशातील सर्व साखर कारखान्याकडून प्रत्येक टनामागे हा कर वसूल केला जात आहे. केवळ महाराष्ट्राचाच विचार केला तर सन १९६९–७० साली गळीत झालेल्या एकूण ९६,८४,४२८ ऊस टनावर प्रत्येक टनास ५/– रुपयेप्रमाणे रुपये ४,८४,२२,१४० एवढी रक्कम जमा झालेली आहे. पूर्वी ज्यावेळी केनसेस म्हणून ही रक्कम जमा केली जात होती त्यावेळी कार्यक्षेत्रातील रस्ते दुरुस्ती करणे आणि ऊस उत्पादनाला सर्व दृष्टीने मदत करणे हा हेतु होता.त्यामुळे काही प्रमाणात का होईना, परंतु केन सेसची रक्कम त्या कामासाठी खर्च होत होती.पण गेल्या कांही वर्षात या केनसेसची रक्कम आणि आता परचेस टॅक्स म्हणून वसूल करण्यात येत असलेली रक्कम त्या त्या राज्यातील सार्वजनिक कर म्हणून जमा होते. महाराष्ट्रापुरतेच बोलावयाचे झाल्यास या परचेस टॅक्सचा उपयोग त्या त्या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतवाडीत जाणाऱ्या पाणंद रस्त्यासाठी काही प्रमाणात होऊ शकला तर हे रस्ते चांगले होऊ शकतील. म्हणून उसावर परचेस टॅक्स म्हणून वसूल करण्यात येत

असलेल्या रक्कमेपैकी काही भाग या पाणंद रस्त्यासाठी देण्याची काही तरी खास व्यवस्था व्हावी, असे मला वाटते.

पंचगंगेचे प्रयत्न

शेतवाडीत जाणाऱ्या या पाणंद रस्त्यांची बांधणी आणि दुरूस्ती या कामासाठी श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याने हाती घेतलेल्या कामाची माहिती येथे आपणास देणे अस्थायी ठरणार नाही. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जवळजवळ १०० गावे आहेत. या गावातून शेताशेतातून ऊस वाहतूक करताना शेतवाडीत जाणारे रस्ते चांगले नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाल्या. त्या दूर व्हावयाच्या असतील तर शेतवाडीत जाणारे पाणंद रस्ते दुरुस्त झाले पाहिजेत, असा विचार करून त्याबाबतीमध्ये श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याने खास लक्ष घातले आणि या सर्व गावातील शेतवाडीत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे प्लॅन्स आणि अेस्टिमेटस् तयार करून घेण्याचे काम हाती घेतले. आतापर्यंत ५० गावाहून अधिक गावातील अशा रस्त्यांचे प्लॅन्स आणि अेस्टिमेटस् पूर्ण झाले आहेत. त्यावरून साधारण असा निष्कर्ष निघतो की, प्रत्येक गावांतील हे पाणंद रस्ते बांधणे आणि दुरुस्त ठेवणे या कामासाठी प्रत्येक गावाला साधारणपणे ३० ते ४० हजार रूपयेपर्यंत खर्च होऊ अकेल. हे रस्ते तयार करण्याची जबाबदारी संबंधित शेतकरी, साखर कारखाना आणि राज्य शासन यांच्या भागीदारीमध्ये पूर्ण करून घेता येअील. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावातील हे पाणंद रस्ते तयार करण्यासाठी साधारणत: २५ ते ३० लाख रूपये खर्च होतील. या रस्ता कामाची पाच वर्षाची योजना आखली तर वर्षाला ५ लाख रूपये खर्च करावे लागतील. यापैकी १/४ रक्कम साखर कारखाना आणि संबंधित शेतकरी यांनी मिळून खर्च करावी आणि ३/४ रक्कम राज्य शासनाने घ्यावी म्हणजे वर्षाला प्रत्येक साखर कारखान्याला सुमारे ३ ते ४ लाख रूपये शासनाला द्यावे

लागतील. आणि संबंधित शेतकरी व साखर कारखाना लाख दीड लाख खर्च करतील. आणि याप्रमाणे योजना झाल्यास महाराष्ट्रातील नवे जुने आणि सर्व खाजगी आणि सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतवाडीत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांच्या बांधणी आणि दुरुस्तीचा प्रश्न चांगल्या तऱ्हेने सुटू शकेल.

या सर्व गोष्टींचा विचार करून शेतवाडीत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे महत्त्व ओळखून देश समृद्धीच्या या कार्याला आपण सर्वांनी चालना द्यावी अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

नृसिंहवाडी,
दिनांक १५-१-१९७३

असा आहे हा साखर धंदा

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या १२ व्या गळीत हंगामाच्या अग्निप्रदीपन समारंभाचेवेळी कारखान्याचे सभासद, कामगार व कर्मचारी वर्ग यांचे पुढे दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

देशप्रगतीच्या दृष्टीने स्वराज्य मिळाल्यानंतर विधायक कार्याचा पहिला टप्पा म्हणून सहकारी तत्व अवलंबून जेव्हा सामाजिक कार्याचा मी विचार केला त्यावेळी जनतेच्या कर्तृत्वावर स्वराज्याचा विकास करण्यासाठी साखर उद्योग सर्वंकष योग्य आहे असा विचार करूनच या साखर कारखान्याची उभारणी करण्याचे ठरले. साखर कारखाना उभारण्यापूर्वी या माळरानावर कोणती परिस्थिती होती याचे चित्र डोळ्याममोर उभे राहिले म्हणजे माझ्या मनःपटलावर जी चित्रे उमटतात त्याचा विचार केला म्हणजे 'सहकार' काय करू शकतो याचे रम्यचित्र डोळ्यासमोर उभे राहते. एका तपात इकडचे विश्व तिकडे करण्याचे सामर्थ्य " सहकारातून " घडू शकले याचे आत्मीय समाधान आज मला अनुभवायास मिळते आहे. बाराव्या गळीत हंगामाची सुरवात करताना या सर्व मनःपटलावरील चित्रपटाची उजळणी करावी लागते आहे.

आज आपल्या पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या १२ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ आपण आयोजित केला आहे. अशा वेळी ११ व्या गळीत हंगामापर्यंतचे एक मनोज्ञ चित्र माझ्या डोळ्यासमोरून पुढे सरकत आहे. आपल्या कारखान्याने आतापर्यंतचे ११ गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण केले. प्रतिवर्षी कारखान्याने उत्पादनात भरीव प्रगती केली आहे. आरंभीच्या वर्षी साखरेचे उत्पादन केवळ ४१०० पोत्यांचेच होते. गेल्या ११ व्या गळीत हंगामात एकूण ४ लाख ६५ हजार पोती साखर उत्पादन केले आहे. या आकडेवारीवरून कारखान्याच्या साखर उत्पादनातील नेत्रदीपक प्रगतीचे चित्र सहज लक्षात येते.

उसात साखरेचे प्रमाण वाढवा

आज आपल्या देशातील साखरेची अवस्था ही एक समस्या आहे. ते एक आव्हान आहे. हे आव्हान आमच्या ऊस उत्पादकानी तेवढ्याच जमिनीत, तेवढ्याच खर्चात अधिक शास्त्रशुद्ध उत्पादन वाढीचे भरीव प्रयत्न करून स्वीकारले तर ऊसभाव कमी का अधिक हा प्रश्नच निर्माण होणार नाही. कारखान्यातील प्रत्येक कामगारापासून तो ऊस उत्पादक शेतकऱ्यापर्यंत सर्वानीच हे आपल्या घरचे काम आहे या जिव्हाळ्याच्या सद्भावनेने या गळीत हंगामात आपण काम करावे.

आज ग्राहकाला कमी दराने साखर हवी आहे. ती त्याला स्वस्त दराने मिळाली पाहिजे असे माझे मत आहे. एकीकडे साखरेचे दर कमी व्हावेत अशी मागणी होत आहे आणि एकीकडे ऊसाचे भाव घसरत आहेत. अशी जरी स्थिती असली तरी शेतकऱ्यांनी चिंताग्रस्त होण्याचे कारण नाही तर त्यानी ऊस उत्पादन कसे वाढेल, तद्वतच उत्पादन होणाऱ्या ऊसात साखरेचे प्रमाण कसे वाढेल, याकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवावे म्हणजे स्वाभाविकच शेतकऱ्याला त्याच्या ऊसाचा योग्य भाव मिळेल.

साखर धंदा स्थिर पायावर उभारा

साखर धंदा हा आपल्या देशातील दोन नंबरचा प्रधान उद्योग असला तरी साखर कारखान्याची अवस्था म्हणावी तशी चांगली नाही. साखरेचे दर उतरत चालल्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य तो दर देणे कारखान्याना शक्य होत नाही म्हणून सरकारने जास्तीत जास्त साखर निर्यात करावी व अबकारी कर कमी करावेत. कारण शेतीस उपयोगी असणारे खत, पाणी व तेल या वस्तूचा दर तर वाढतच आहे. परंतु यापेक्षा मजुरीचा दरही अधिक वाढला आहे. हा खर्च कमी न होता ऊसाला मिळणारा दर मात्र उतरला असल्याने ऊसाची शेती आज तितकीशी फायद्याची राहिली नाही. आणि हा तर साखर कारखान्याना ऊस पुरवठा करणाऱ्या दोन कोटी शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. सन १९६८-६९ हे वर्ष विचारात घेतले तर असे दिसते की या वर्षी सहाशे पन्नास कोटी रुपयांचे साखर उत्पादन झाले. त्यापैकी शेतकऱ्यांना तीनशेसाठ कोटी रुपये मिळाले. केंद्र आणि राज्य सरकारच्या तिजोरीत एकशे चाळीस कोटीचौ भर या धंद्याने टाकली आहे. असा हा महत्त्वाचा साखर धंदा स्थिर पायावर उभा राहावयाचा असेल तर त्याचे काही प्रश्न सोडविले गेले पाहिजेत. म्हणजेच शेतकऱ्यांना व ग्राहकांना त्यांचे भरीव फायदे मिळतील.

साखर कारखाना : अेक विद्यापीठ

साखर धंद्यातून आपणास केवळ आर्थिक उन्नतीच साधावयाची नाही. यावेळी मला असे स्पष्ट सांगावयाचे आहे की प्रत्येक साखर कारखाना शिक्षण व संस्कृतीचे केंद्र बनला पाहिजे आणि याच उद्देशाने पंचगंगा सहकारी साखर कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रातील शंभर गावांचा आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कायापालट करण्याचे कार्य स्वीकारले आहे. ग्रामीण समाज-जीवन सर्वार्थाने समृद्ध करण्याचा आमचा हा दृढ मानस आहे. यासाठी प्रत्येक गावातील माध्यमिक विद्यालये, वाचनालये व तालीम संस्था यांची व्यवस्था सर्व दृष्टीने उत्तम व्हावी यासाठी पंचगंगा सहकारी साखर कारखाना कटिबद्ध आहे. प्रत्येक खेडेगावातून ज्ञानगंगा खळबळून राहिली पाहिजे. मन

आणि शरीर याचा संपूर्ण विकास झाला पाहिजे. शरीर संवर्धनाची विविध साधने उपलब्ध झाली पाहिजेत. या सर्व शैक्षणिक व शारीरिक विकासाच्या साधनातून निकोप आणि आदर्श नागरिक तयार झाला पाहिजे आणि म्हणून पंचगंगा सहकारी साखर कारखाना जनतेपर्यंत जाऊन जन विकासासाठी भगीरथ प्रयत्न करीत आहे. खऱ्या अर्थाने आपला साखर कारखाना " जनता-विद्यापीठ " म्हणून गौरविला गेला पाहिजे.

आम्ही सहकार-पंढरीचे वारकरी

आपला देश शिक्षणाच्या व संस्कृतीच्या उज्ज्वल परंपरेमुळे अेकेकाळी गौरवशाली बनून राहिला होता. परंतु आज आपल्यामधील सेवाभावच संपत चालला आहे. " जग हे देवाचे घर असून प्रत्येक माणूस अेक यात्रिक आहे " असे मानणाऱ्यापैकी मी अेक आहे. अशा यात्रिकांचा अेकमेकावरील विश्वास संपुष्टात आल्यामुळे आज आम्ही दुःखाच्या खाअीत लोटले जात आहोत. आणि म्हणून दृढ विश्वासाने सेवाभावाची कास धरूनच आपणास विकास साधता येईल.

सहकार-पंढरीला निघालेल्या दिंडीच्या मार्गावरील अेक यात्रेकरू म्हणून मी या कारखाच्या परिसरात सेवाभावी वृत्तीने प्रामाणिकपणाची शिदोरी घेऊन निघालो आहे. वाटेत भेटणारा शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील प्रत्येक यात्रिक या दिंडीत सामील झाला आहे व सहकाराच्या सामर्थ्यावर अधिष्ठित पांडुरंगाच्या पायाजवळ आम्ही येऊन पोहोचलो आहोत. हे पाय सोडावेसे कसे वाटतील ? हा मार्ग कधीही न संपणारा मार्ग आहे. स्वराज्याचे सोने करण्याचे दृष्टीने हा मार्ग आक्रमत पुढे जाण्याची शक्ती तुम्हा आम्हाला लाभो अेवढीच शेवटी विनंती जनतारूपी पांडुरंग-चरणी करून मी माझे भाषण संपवितो.

गंगानगर,
दिनांक ११-१०-१९७०

माती आणि माणूस

महाराष्ट्र राज्य कुंभारकाम उद्योग परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे वेळी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांचे अध्यक्षीय भाषण.

पुरातन कालापासून चालत आलेल्या एका महत्त्वाच्या उद्योगा-संबंधी विचार करण्याकरिता आज आपली ही महाराष्ट्र राज्य कुंभारकाम उद्योग परिषद जळगावच्या प्रशांत वातावरणात भरत आहे. मातीशी निगडित असलेल्या या व्यवसायाला माती इतके पुरा-णत्व नसले तरी माणसाला मातीतून जगावयाचे कसे हे कळले तेव्हा पासूनचे प्राचिनत्व या धंद्याला खासच आहे. हा धंदा केवळ माणसाने धंदा म्हणून निर्माण केला नाही; तर माणसाच्या गरजेतून हा धंदा जन्माला आला आहे. जो जन्माला आला आहे त्याचा या धंद्याशी संबंध आल्याशिवाय राहात नाही इतके सर्वकषत्व या धंद्याला आहे. चंद्रावरची माती, शुक्रावरची वाळू आणि मंगळावरचे पाणी गोळा करावयास निघालेल्या आजच्या युगातील मानवालाही या धंद्यापासून दूर होता आलेले नाही अगर या कुंभार धंद्याची गरज संपलेली नाही. गेल्या साली मी परदेश दौरावर गेल्यावेळी न्यूयार्क शहरामध्येही काही घरावर मी हातकौले पाहिली आणि दक्षिण अमेरिकेमध्ये कोलं-

बिया देशामध्ये माणसाच्या स्वत:च्या मांडीच्या साच्यावरच हातकौले तयार होत असताना मी पाहिली.

समाजातील क्रयशक्ती

समाजातील आणि विशेषत: मागासलेल्या देशातील समाजातील आर्थिक क्रयशक्तीची परिस्थिती पाहिल्यास आणि समान आर्थिक परिस्थिती सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याची जगातील चालू असलेली धडपडीची आणि क्रांतीची जाणीव ठेवूनही वास्तववादी दृष्टी असलेल्या मंडळीना समाजातील क्रयशक्ती सर्वसाधारण सामान्य पातळीवर येण्यास किती दिवस लागतील याचा अंदाज काही करता येणार नाही आणि म्हणून समाजातील क्रयशक्ती आणि सर्वसाधारण परिस्थिती लक्षात घेता चंद्रावर, शुक्रावर आणि मंगळावर स्वारी करत असलेल्या प्रगतीपथावरील आधुनिक युगातही या कुंभार धंद्याला चालावयाला काही हरकत येणार नाही. किंबहुना मानवी जीवनातील एक महत्त्वाची गरज म्हणून तो धंदा चालू राहण्याची आवश्यकता आहे. तेव्हा माणसाच्या जीवनमरणापासून हौसहसण्यापर्यंत निगडित असलेल्या या धंद्याचे स्वरूप जसे विविध आहे तसे या धंद्याचे प्रश्नही विविध व वेगवेगळचा स्वरूपाचे आहेत. त्या सर्वांचा सर्वांगपरीपूर्ण विचार होऊन त्यावर समर्थ असे मार्ग शोधून काढण्यात नामदार सदाशिवरावजी बर्वे व नामदार विठ्ठलरावजी पागे यांच्या उपस्थितीत आणि समर्थ मार्गदर्शनाखाली भरत असलेली आपली ही परिषद यशस्वी व्हावी अशी माझी स्वाभाविक अपेक्षा आहे. अशी महत्त्वाची परिषद आजच्या महत्त्वाच्या कालात आयोजित करणाऱ्या जळगावच्या संबंधित सर्व कार्यकर्त्यांना मी पहिल्यांदा अंत:करणपूर्वक धन्यवाद देतो.

शूरा मी वंदिले

परिषदेपुढील प्रश्नाकडे वळण्यापूर्वी आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणे माझे कर्तव्य समजतो. आपल्या देशातील

परिषद, सभा, संमेलने असे कोणतेही प्रसंग असोत, चीन आणि पाकिस्तान याचेबरोबर आपल्या भारत देशाचा चालू असलेला युद्धमय संघर्ष, देशातील अन्नधान्याची तूट आणि दुष्काळी परिस्थिती याची छाया जनमनावर पडल्याशिवाय राहात नाही. चीन आणि पाकिस्तानच्या युद्ध संघर्षात आपल्या भारतीय जवानानी दाखविलेली मर्दुमकी, आपल्या भारत देशाचे राज्यकर्ते आणि राष्ट्रनेते यांनी घेतलेली खंबीर भूमिका यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. अन्नधान्याची तूट आणि भयानक दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असतानाही भारताच्या स्वातंत्र्य रक्षणाकरिता जवान आणि राष्ट्रनेते यांनी चालविलेल्या युद्ध प्रयत्नामध्ये समर्थ साथ देण्यासाठी आपल्या देशातील सारी जनता एकराष्ट्र म्हणून उभी ठाकलेली आहे. देशात निर्माण झालेल्या राष्ट्रतेजाने सारा भारत देश उजळून निघालेला आहे. या वेळी युद्ध आघाडीवर जवानानी दाखविलेल्या मर्दुमकीचे मी कौतुक करतो. आणि त्यांच्या शौर्याला अभिवादन करतो. त्याचप्रमाणे मातीमध्ये मळलेला आणि माती एवढीही अंगावरती कळा नसलेला महाराष्ट्रातील कुंभार समाज हा आपल्या राष्ट्रनेत्यांच्या खंबीर भूमिकेशी समरस होऊन मारू किंवा मरू या उमेदीने पाठिंबा देण्यास उभा आहे, अशी मी येथे ग्वाही देतो आणि परिषदेपुढील प्रश्नासंबंधी माझे विचार आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न करतो.

कुंभार धंदा : स्वरूप आणि समस्या

आपल्या या धंद्याचे स्वरूप विखुरलेले आहे. त्याचप्रमाणे हा धंदा विस्कटलेलाही आहे. खेड्यापाड्यातून ग्रामीण भागात चालणाऱ्या या धंद्याला व्यक्तिप्राधान्यही आहे. वारा वलुत्यांच्या स्वरूपामध्ये चाललेला हा धंदा व्यक्तीव्यक्तीच्याद्वारा लहानशा खोपटाखोपटातून चालत आला आहे. या धंद्याला लागणारा कच्चा मालही हाताशी माती, डोक्याशी जळण व पायाशी पाणी अशा निसर्गातून सहज व सुलभ रितीने उपलब्ध होणारा असाच आहे. पण आज

बदलेल्या परिस्थितीत निसर्गामधून सहज व सुलभ रितीने उपलब्ध होणाऱ्या या कच्च्या मालाची गावागावातून निर्माण झालेली दुर्मिळता पाहून मन सुन्न झाल्याशिवाय रहात नाही. गावठाणातील सरकारी मालकीच्या जमिनीतून आणि त्याचप्रमाणे खासगी व्यक्तीच्या जमिनीतून आजपर्यंत कुंभार लोकाना मुबलक रितीने माती उपलब्ध होत होती. पण आज शेतकरी लोक त्यांच्या शेतातून माती देऊ शकत नाहीत आणि गावठाणातील माती मिळणे हे गावातील मुखंड कार्यकर्त्यांच्या लहरीवर व मर्जीवर आणि त्याचप्रमाणे त्यांचे हात ओले करण्यावर अवलंबून राहिले आहे. त्याचप्रमाणे पाण्याचीही अवस्था आहे. तसेच काम करण्यास लागणाऱ्या जागेचीही स्थिती तितकीच विचित्र झालेली आहे. गावात भट्टी लावू देत नाहीत. गावाबाहेर जागा मिळत नाही. गावागावातील कुंभार कामाला लागणारी माती, पाणी आणि जागा याची सध्याची परिस्थिती पाहिल्यावर मन विषण्ण होते.

याप्रमाणे या आपल्या कुंभार धंद्याला निसर्गामधून सहज, सुलभ रितीने उपलब्ध होणे आवश्यक असलेल्या माती, जळण, पाणी व जागा मिळणे किती दुर्लभ झाले आहे याचे चित्र खरोखरच भयानक आहे. आपल्या देशात सामान्य लोकाना जीवन चरितार्थ चालविण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याचा योजनाबद्ध प्रयत्न चालू असतानाही मानवी जीवनाला उपयुक्त असलेल्या व पुरातन कालापासून चालत असलेल्या आपल्या कुंभार धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाची परिस्थिती पाहिल्यानंतर आपले योजनाबद्ध प्रयत्न अपुरे पडतात. या प्रश्नासंबंधी परिषदेमध्ये संपूर्ण विचार झाला पाहिजे. आजपर्यंत खूप विचार होत आला आहे. पण या परिषदेमध्ये केवळ विचारावरच न थांबता या प्रश्नाची सोडवणूक करून घेण्यासाठी काहीतरी निर्धारपूर्वक निर्णय घेतला गेला पाहिजे असे मला वाटते.

कच्च्या मालामधील अडचणीप्रमाणेच हा धंदा करणाऱ्या कारागिराना लागणाऱ्या भांडवलाचीही तितकीच दुर्मिळता आहे. केवळ

भांडवल नाही म्हणून तयार झालेला माल अर्ध्याहून कमी किंमतीला विकावा लागतो आणि वर्षावर्षाला कर्जाची वाढच होत राहते आणि या कारागिरांची दारिद्र्यातून सुटका कधीच होत नाही. धंदा मोडकळीला येतो, दारिद्र्य वाढते, घरे मोडतात. आज गावागावातील कुंभार समाजातील कुटुंबाची पाहणी केल्यास आदिवासी, वार्ली आदि गिरिजनांच्या पेक्षाहि त्यांची वाईट परिस्थिती असल्याचे दिसून येईल. या धंद्याला भांडवलही काही फार लागत नाही. पण जेवढे लागते तेवढे सुलभ रितीने व योग्य वेळेला आणि योग्य प्रमाणामध्ये मिळण्याची गरज आहे.

ग्रामोद्योग : गावच्या रक्तवाहिन्या

स्वराज्य मिळाल्यानंतर आपल्या देशात देश पातळीवर खादी कमिशन स्थापन झाले आणि त्याच्याखाली राज्य पातळीवर खादी आणि ग्रामोद्योग मंडळे स्थापन झाली आहेत. या संस्थाच्याकडून काही प्रमाणात या कुंभार धंद्याला चांगले वळण लावण्याचा प्रयत्न चालू आहे या संस्थांच्याकडून काही प्रमाणात भांडवलाचा थोडावहुत पुरवठाही होत आहे. महाराष्ट्र राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे काम नामदार विठ्ठलरावजी पागे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर कमीजास्त प्रमाणात चांगल्या प्रकारे चालू आहे. राज्य मंडळाच्यावतीने चालू असलेल्या या कामाची व्याप्तीही हळूहळू वाढत आहे. महाराष्ट्रात सन १९५७-५८ चे दरम्यान राज्य मंडळाकडून केवळ ४।६ कुंभार सोसायटचाना मदत दिली गेली होती. १९६२-६३ सालचे दरम्यान ही मदत ५७ सोसायटचाना दिली गेली व सुमारे ५ लाख रुपयांचे उत्पादन नोंदले गेले. १९६३-६४ साली ७८ सोसायटचांना मदत दिली गेली व ९ लाख रुपयांचे दरम्यान उत्पादन नोंदण्यात आले. तथापि महाराष्ट्र राज्यातील या धंद्याच्या व्याप्तीच्या मानाने आणि १० लाखाहून अधिक जनसंख्या या धंद्यामध्ये गुंतलेली असल्याने खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने चालू असलेले प्रयत्न हे तोकडे वाटतात.कारण आता सांगितल्या गेलेल्या उत्पन्नापेक्षा कितीतरी

सोसायटचा राज्य मंडळाच्या बाहेर आहेत. आज महाराष्ट्रात जिल्हा-वार किती सोसायटचा रजिस्टर झाल्या आहेत याची संख्या उपलब्ध नाही. मार्गदर्शनाअभावी सदर सोसायटचा कोणत्या अवस्थेत आहेत, याची माहिती नाही. ही सर्व संकलित माहिती घेऊन त्याना योग्य मार्गदर्शन करून उपलब्ध भांडवल त्यांच्यापर्यन्त हळूवार हाताने पोचविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने भांडवल पुरवठा करणे आणि धंद्यासंबंधी मार्गदर्शन करणे या कामी राज्य मंडळाला अद्याप खूप काम करता येण्यासारखे आहे. आणि ते त्यांच्याकडून योजनाबद्ध रितीने होत रहावे अशी माझी अपेक्षा आहे. कारण सर्व ग्रामोद्योग म्हणजे गावच्या रक्तवाहिन्या-सारखे आहेत.

भांडवल पुरवठा

राज्य मंडळाची व्याप्ती वाढली आणि भांडवलाच्या पुरवठ्यामध्ये भर पडत गेली तरी तेवढ्यानेच या धंद्याला लागणाऱ्या सर्व भांड-वलाची व्यवस्था आणि तीही व्यापक प्रमाणात होणे स्वाभाविक-पणेच कठीण जाणार. भांडवल पुरवठ्यासाठी केवळ राज्य मंडळावरच अवलंबून राहणे शक्य होणार नाही. राज्य मंडळाच्या आणि त्या पातळीवरून होणाऱ्या मदतीला मर्यादा आहेत. त्या दृष्टीने मला या ठिकाणी परिषदेला एक विशेष महत्वाची सूचना करावयाची आहे. या धंद्याला योग्य प्रमाणात भांडवल पुरवठा करण्याकरिता राज्य पातळीवरील मध्यवर्ती अशी "कुंभारकाम औद्योगिक सहकारी बँक" स्थापन करावी असे मला वाटते. एकूण या धंद्याचा व्याप लक्षात घेता माझी ही सूचना गैरवाजवी अगर अस्थानी आहे असे वाटण्याचे कारण रहाणार नाही. या मध्यवर्ती संस्थेला "औद्योगिक बँक" नामाभिदान देण्यास कदाचित् काही तांत्रिक अडचणी आल्यास या संस्थेला राज्य पातळीवरील "क्रेडिट सोसायटी" म्हणण्यासही मला काही प्रत्यवाय वाटत नाही. या धंद्याला पैसा पुरवणारी मध्य-वर्ती अशी राज्य पातळीवरील संस्था झाल्यामुळे खास लक्ष देऊन

या धंद्याला गावागावापर्यंत आणि व्यक्तीव्यक्तीपर्यंत चांगल्या तऱ्हेने भांडवलाचा पुरवठा करता येऔल असे मला खात्रीने वाटते. अशा या आर्थिक संस्थेची स्थापना, तिची जिल्हावार व्यवस्था वगैरे तपशीलाच्या गोष्टी या ठिकाणी विशद करून सांगण्याची आवश्यकता नाही. तपशीलाच्या गोष्टी त्या त्या पातळीवर ठरवून घेता येतील. या मध्यवर्ती संस्थेचे स्वरूप चांगले विशद झाल्यानंतर आणि त्याला वळकटी आल्यानंतर खादी आणि राज्य मंडळ यांचेकडून वितरित होत असलेल्या भांडवलाचा पुरवठाही या मध्यवर्ती आर्थिक संस्थेमार्फत करावयालाही काही प्रत्यवाय येऊ नये असे मला वाटते.

कलात्मक वस्तूंची निर्मिती

या धंद्याला लागणाऱ्या कच्चा मालासाठी सरकारच्या खास मदतीची अपेक्षा करता येईल. भांडवल पुरवठ्यासाठी सरकार आणि त्याचप्रमाणे खादी कमिशन व राज्य मंडळ या सारख्या निम-सरकारी संस्था यांच्या मदतीची बऱ्याच प्रमाणामध्ये अपेक्षा करता येईल. पण या धंद्याचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी तितक्याच निर्धाराचा प्रयत्न लोकपातळीवरून या धंद्यामध्ये गुंतलेल्या लोकानीच खास रितीने करणे आवश्यक आहे. मी सुरूवातीस म्हटल्याप्रमाणे आधुनिक युगामध्ये कितीही यांत्रिकीकरण झाले, चंद्रावरही आम्ही जावू शकलो तरी आपला हा कुंभारधंदा निश्चितपणे टिकूनच राहणार आहे,समाजाला त्याची आवश्यकता आहे आणि म्हणून घरावर घालण्यासाठी पन्हाळी पत्रे आणि सिमेंटचे पत्रे तयार झाले म्हणून आपल्या कौलाचा धंदा चालणार नाही, पितळेची, तांब्याची, स्टेनलेस स्टीलची भांडी स्वयंपाक घरात आली म्हणून आपल्या मातीच्या भांड्याचा धंदा बसणार असे वाटण्याचे कारण नाही. पण त्यासाठी आपणाला नव्या दृष्टीची आवश्यकता आहे. नव्या उपकरणाचा वापर करण्याची आवश्यकता आहे. आजच्या धंद्याचे स्वरूप परंपरागत परिस्थितीच्या पलीकडे फारसे गेलेले नाही. खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत यासाठी काही प्रयत्न निश्चित झाले आहेत. पण ते अपुरे राहिले आहेत.

अवजारावाबतच पहावयाचे झाले तर नवीन चक्राबाबत दिसून येईल. आज या नव्या चक्राच्या क्षमतेचा विचार केला तर बॉल बेअरिंगचे हे चाक अेका मिनिटाला २०० फेरे सहजी घेत असून अेका वेळेला १०० पौंडाचे वजन ते सहज पेलू शकते. या चाकावर २ फूट उंच व दीड फूट रूंदीचे काम सहज करता येते. पण या चक्राची प्रियता आजअखेर महाराष्ट्रात निर्माण करता आलेली नाही. तसेच कलात्मक वस्तूंच्या निर्मितीत आम्ही प्रगति केलेली नाही. लाखेची झिलई देऊन वस्तु निर्माण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात झालेले नाही. मातीच्या पाइप्स अगर पोकळ विटा, तसेच मंगलोरी कौले तयार करण्याच्या कामाला आपण प्रयत्नपूर्वक व योजनाबद्धतेने सुरूवात केलेली नाही. याशिवाय मातीचे रेफ्रिजरेटर्स, शेगड्या, संडासाची भांडी या वस्तूचीही आज समाजात मागणी आहे. सुधारलेल्या समाजात आज वस्तूची आवड जोराने वाढत आहे. या कलात्मक वस्तूच्या निर्मितीसाठी राज्य मंडळाने व कमिशनने खास मदतीची योजनाही केलेली आहे. त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. या सर्व गोष्टी झपाटचाने होणे आवश्यक आहे तरच या कुंभार कामाची शान वाढणार आहे आणि कारागिरांच्या अंगावरील अवकळा दूर होणार आहे.

एकमेका सहाय्य करू

आताच सांगितल्याप्रमाणे या धंद्याचे मूळ स्वरूप व्यक्तिप्रधान आहे हे खरे आहे. पण निरनिराळचा प्रकारच्या दुर्धर अडचणी लक्षात घेता या धंद्यातील व्यक्तिप्रधान भाव एकदम टाकून दिला पाहिजे आणि " एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ " याप्रमाणे सहकारी तत्त्वावर आपण सर्व कारागिरानी संघटित झाले पाहिजे. आज महाराष्ट्रात सहकारी पद्धतीने निश्चित मूळ धरले आहे. आपल्या या मूळ धंद्यातही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कुंभारकाम औद्योगिक सहकारी सोसायटचा निघालेल्या आहेत. पण त्यांची अवस्था काय आहे ? काही मोडल्या आहेत, काही लिक्विडेशनमध्ये गेल्या आहेत, अफरातफरीने काही डागळल्या आहेत,

भांडवलाअभावी काही थवकून राहिल्या आहेत. योग्य मार्गदर्शन नाही, प्रामाणिकपणा नाही, अनुभव नाही, ज्ञान नाही अशा अवस्थेत या सहकारी सोसायटयांचा कारभार चालू आहे. हा सर्व प्रकार एकदम बंद करण्याची आवश्यकता आहे. स्थापन झालेल्या, मोडकळीस आलेल्या सोसायटयांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करण्याकरिता, नव्या सहकारी सोसायटया स्थापन करण्याकरिता, या सोसायटयाना आणि कामगाराना कामाची नवी दृष्टी देण्यासाठी, उत्पादन झालेल्या मालाची योग्य रितीने विक्री करण्याची चांगली व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये जिल्हावार सहकारी औद्योगिक केंद्रे संघटित करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये अशा प्रकारची जिल्हा सरकारी सेवा केंद्रे स्थापन करण्याचा आणि त्यांना चांगले मूर्त स्वरूप आणण्याचा विचारही या परिषदेमध्ये निर्धारपूर्वक व्हावा असे मला वाटते. या जिल्हावार औद्योगिक सेवा केंद्रामध्ये त्या जिल्हयातील सोसायटयाच्या जवळपासची माती, त्याचे पृथःकरण, त्यातून तयार होणाऱ्या वस्तूचे मार्गदर्शन, नवीन अवजाराचे प्रात्यक्षिक व अनुभवी लोकाकडून या धंद्यातील नूतनीकरणाचे शिक्षण या गोष्टी निश्चितपणे पार पाडता येतील असा मला विश्वास वाटतो. या जिल्हावार सहकारी औद्योगिक केंद्राचा आर्थिक संबंधहि मी वर सुचविलेल्या राज्य पातळीवरील आर्थिक पुरवठा करणारी मध्यवर्ती सहकारी बँक अगर क्रेडिट सोसायटी यांचेशी सहज जोडता येईल आणि त्या मध्यवर्ती भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या एका अर्थाने जिल्हावार शाखाच होतील.

मध्यवर्ती औद्योगिक केंद्र

औद्योगिक सहकारी सोसायटयामार्फत गावगन्ना आणि जिल्हा पातळीवर या कुंभार धंद्याची बैठक नव्या स्वरूपात बसवून घेता येणे शक्य आहे हे वरील विवेचनावरून दिसून येईल. तथापि एवढयाच प्रयत्नाने महाराष्ट्र राज्यातील या धंद्याला यावे तसे स्वरूप येण्याला कठीण जाईल. हा धंदा जसा लहान स्वरूपात चालतो

तसाच हा धंदा मोठ्या स्वरूपातही चालविता येणे शक्य आहे आणि तो तसा चालवणेही आवश्यक आहे. निरनिराळ्या भारी, कलात्मक ज्या वस्तु आहेत किंवा मंगलोरी कौलासारखा एक विशेष प्रकारचा मोठा धंदा आहे, अशा मालाचे उत्पादन राज्य पातळीवर मध्यवर्ती अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात करण्याची योजना झाली पाहिजे असे मला वाटते. बेंगॉल पॉटरी ज्या स्वरूपात चालते, त्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात उत्पादन करणारे एक मोठे राज्य पातळीवरील कुंभार धंद्यातील निरनिराळ्या वस्तु उत्पादन करण्याचे केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. या मध्यवर्ती उत्पादन केंद्रामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या मालाचे उत्पादन तर होईलच, पण त्याचबरोबर जिल्हावार आणि गाववार निरनिराळ्या प्रकारच्या कुंभार धंद्यामध्ये उत्पादन होणाऱ्या मालाच्या राज्य पावळीवरील विक्रीचे संघटनही या मध्यवर्ती केंद्रामार्फत करता येईल. कोणता माल कुठे खपेल, कोणत्या पद्धतीचा माल काढावा वगैरे कार्यक्षम व प्रत्यक्ष अनुभवाचे मार्गदर्शनही या केंद्रामार्फत करता येईल. या मध्यवर्ती उत्पादन केंद्रामध्ये अवजरांचे व त्याचप्रमाणे मातीपासून होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या मालाचे संशोधन करता येईल. विभागवार कारागिराना या धंद्यातील प्रशिक्षण देण्याची व्यवस्थाही या केंद्रामध्ये करता येईल. याप्रमाणे स्वत.चे उत्पादन करू शकेल, राज्यातील या धंद्यातील मालाचे विक्रीबाबत मार्गदर्शन करू शकेल, संशोधन आणि शिक्षण याची व्यवस्था करू शकेल अशा प्रकारचे सर्वांगपरिपूर्ण असे राज्य पातळीवरील कुंभार धंद्याचे एक औद्योगिक केंद्र निर्माण करणे आवश्यक आहे असे मला वाटते. याला लागणाऱ्या भांडवलाची शेअर्स भांडवलाच्या रूपाने आणि त्याचबरोबर राज्य सरकार आणि मध्यवर्ती सरकार या दोघाकडीलही शेअर भांडवल अगर कर्ज आणि जरुरीप्रमाणे फायनान्स कॉर्पोरेशनकडील कर्ज उभारून व्यवस्था करता येईल. मध्यवर्ती औद्योगिक केंद्राची ही कल्पना मोठी तर आहेच पण ती तितकीच भव्य आणि आवश्यक आहे. कुंभार धंदा म्हणजे खेडचातला व टाकावू धंदा. अशा पूर्व परंपरागत पद्धतीच्या विचाराने या धंद्याकडे पाहिल्यास हे एवढे मोठे व भव्य केंद्र उभारणे कुणाला, कदाचित् अशक्य वाटण्याचा

संभव आहे. पण या धंद्यासंबंधीच्या सर्व विवेचनावरून अशा प्रकारच्या मध्यवर्ती उत्पादनकेंद्राची केवळ शक्यताच आहे असे नसून त्याची आवश्यकताही आहे. या स्वरूपात महाराष्ट्रात या कुंभार धंद्याची उभारणी होण्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे वैभवही वाढणार आहे आणि म्हणून या गोष्टीकडे सरकार व समाजातील विचारवंत मंडळी खास लक्ष देऊन कुंभारांच्या या कल्पनेला साथ देऊन साहाय्य करतील अशी माझी अपेक्षा आहे. आपणही जिद्द धरून ही परिषद आणि महाराष्ट्रातील आपला समाज यानी हे केंद्र उभारण्याचे कार्य पुरे करावे असे माझे सर्वाना आवाहन आहे.

ग्रामोद्योगाची घडी बसवा

भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाला आणि तेव्हापासून पद्धतशीर नियोजनाच्या मार्गाने आपल्या देशाची आर्थिक आणि औद्योगिक घडी वसविण्याचा आपल्या देशामध्ये राज्यकर्त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठीं आपल्या देशातील लहानमोठे उद्योगधंदे वाढविण्याचे आणि स्थिर करण्याचे काम चालू आहे. आपला देश मोठा आहे, लोकसंख्या मोठी आहे. त्याचप्रमाणे आपला देश अविकसित आहे. बेकारीही मोठी आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या देशातील उद्योगधंद्याचे विकसन करीत असताना अनेक गोष्टी लक्षात घेण्याची गरज आहे. मोठ्याच उद्योगधंद्याने आमचे प्रश्न सोडवता येणार नाहीत. म्हणून लघु उद्योग आणि ग्रामोद्योग याच्याकडेही तितक्याच सम दृष्टीने आणि शहाणपणाने पाहण्याची आवश्यकता आहे. तसा काही प्रयत्नही होत आहे. पण मोठे उद्योगधंदे, लघु उद्योगधंदे आणि ग्रामीण उद्योगधंदे यांच्या मधला समतोलपणा मात्र जेवढा राखणे आवश्यक आहे, तेवढा राखला जात नाही आणि त्यामुळेच पूर्वापार चालत आलेला हातमागाचा धंदा, कुंभारकामाचा उद्योग वगैरे ग्रामीण स्वरूपाचे धंदे विस्कळित झाले आहेत. अडचणीत आले आहेत आणि हे धंदे बसल्यामुळे देशामधील बेकारी वाढत आहे आणि शहरे आवाक्यावाहेर मोठी होत आहेत. याला कोठेतरी आळा घाल-

ण्याची आणि तातडीने आळा घालण्याची आवश्यकता आहे. हातमागाचा धंदा मोडकळीला आला, त्याकडे सरकारने लक्ष दिले, त्या धंद्यासाठी स्वतंत्र हँडलूम बोर्ड स्थापन केले आणि तो धंदा संपूर्ण जरी नसला तरी बऱ्याच प्रमाणामध्ये सावरला गेला आहे आणि लाखो विणकरी त्या धंद्यामध्ये टिकून राहिले आहेत आणि त्यांच्यातील बेकारीची छटा कमी झाली आहे. याचा अर्थ ते संपूर्ण सुखी झाले आहेत असे नाही. त्यांच्याकडेही वरेच लक्ष देणे आवश्यक आहे.

स्वतंत्र बोर्ड स्थापा

या गोष्टीचा या ठिकाणी सविस्तरपणे उल्लेख करण्याचे खास कारण आहे म्हणूनच त्याचा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र राज्यातील, किंबहुना भारत देशातील कुंभारकाम उद्योग उर्जितावस्थेला आणावयाचा असेल तर मध्यवर्ती सरकारच्या पातळीवर या धंद्यासंबंधी विशेष विचार होण्याची आवश्यकता आहे. आतापर्यंत माझ्या भाषणात व्यक्त केलेल्या सूचना यामध्ये राज्य पातळीवरील सरकारी प्रयत्न, खादी कमिशन व राज्य मंडळे या स्तरावरील निमसरकारी प्रयत्न व खास लोकानी करावयाचे प्रयत्न या संदर्भात केले आहेत. त्या सर्व सूचना आणि प्रयत्न चांगल्या तऱ्हेने पूर्ण व्हावयाचे असतील तर या कुंभारकाम उद्योगासंबंधी भारत सरकारने थोड्या अधिक आपुलकीने विचार करण्याची जरूरी आहे. हा धंदा गावगन्ना चालतो म्हणून त्याला ग्रामोद्योगी स्वरूप देऊन अगदीच लहान धंद्यामध्ये त्याची गणना करण्यात आलेली आहे. कुंभार धंदा हा केवळ ग्रामोद्योगी आहे, असे न मानता त्याची गणना लघुउद्योगामध्ये (स्मॉल स्केल इंडस्ट्रीमध्ये) करण्यात येऊन मध्यवर्ती सरकारच्या पातळीवर हातमाग धंद्यासाठी ज्याप्रमाणे स्वतंत्र हँडलूम बोर्ड नियुक्त केले आहे त्याप्रमाणे भारतातील कुंभारकाम उद्योगासाठी एक स्वतंत्र बोर्ड नियुक्त करण्यात यावे आणि या धंद्याला थोड्या वरच्या पातळीवर उचलून घ्यावे असे मला भारत सरकारला नम्रपणे सुचवावयाचे आहे. या

कामी महाराष्ट्र राज्य सरकारनेही खास प्रयत्न करावेत म्हणून त्यानाही माझे आवाहन आहे.

सामान्यतः कसणाऱ्याला जमीन पाहिजे असे आपण म्हणतो. त्याप्रमाणे मळणाऱ्याला माती द्या, भट्टी घालणाऱ्याला खर व जळण द्या, हा उद्योग करणाऱ्याला राहावयाला व धंद्याला जागा द्या असे मी सुचविले आहे. जिल्ह्यातील प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा पातळीवर औद्योगिक सहकारी सेवा केंद्रे स्थापावीत अशी मी अपेक्षा व्यक्त केली आहे. या धंद्याची योजनाबद्ध व सुसूत्र उभारणी करण्यासाठी सोसायटचाना व कारागिराना आवश्यक ते भांडवल उभारण्याला सहाय्य करण्याची गरज सांगितली. धंद्यांतील अवजारामध्ये सुधारणा घडवून आणून त्याचा वापर सर्वत्र व सामूहिकपणाने करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे सांगितले. तसेच या उद्योगालाच भांडवल पुरवणारी एक मध्यवर्ती सहकारी बँक अगर क्रेडिट सोसायटी असावी अशी सूचना केली आहे. जिल्हा सहकारी सेवा केंद्राना निगडित असे राज्य पातळीवरील मध्यवर्ती उत्पादन, संशोधन व प्रायोगिक केंद्र असावे असे प्रतिपादले.त्याचप्रमाणे या धंद्याकडे पाहाण्याची सरकारची व त्यांच्या कर्मचाऱ्यांची दृष्टी मूलगामी असावी व देश पातळीवर या धंद्यासाठी स्वतंत्र बोर्ड असावे अशी मागणी केली आहे.

माझी अपेक्षा

हे सर्व निवेदन करण्यामागील माझा हेतु एकच आहे. या धंद्याच्या वाढीचा सूत्रबद्ध प्रयत्न व्हावा. हा मातीचा उद्योग आहे आणि तो अजून कच्च्या मातीच्या अवस्थेत आहे. विश्वकर्मा विश्व घडवत निघाला आहे. तसेच या धंद्याचा आकार, स्वरूप अजून घडतच निघाला आहे. माझी खात्री आहे, हे घडविण्यात अडचण ती कसली नाही. अडचण आहे ती फक्त प्रयत्नाची, संघटनेची, शास्त्रीय दृष्टी देऊन त्यात नाविन्य आणण्याची व धंदा कमी प्रतीचा आहे ही कमकुवत-पणाची भावना टाकून देण्याची. माझी खात्री आहे, की, यात आम्ही तुम्ही कुणीही अपुरे पडणार नाही. तुम्हा आम्हाला आज मार्गदर्शन

करण्यासाठी अज्ञानी आणि दरिद्री समाजाकडे तितक्याच आपुलकीने आणि कळकळीने पहाणारे आणि देशाची औद्योगिक घडी बसविण्याची ज्याच्यावर जबाबदारी आहे असे माझे मित्र मान्यवर नामदार सदाशिवरावजी बर्वे हे या परिषदेचे उद्घाटन करण्यासाठी व नामदार विठ्ठलरावजी पागे या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी आमच्यामध्ये उपस्थित आहेत, हाही एक फार मोठा आधार आहे. जळगाव जिल्ह्याचे जिद्दीचे कार्यकर्ते आणि महाराष्ट्रामध्ये कानाकोपऱ्यातून जागा झालेला कुंभकार कारागीर समाज याचीही या कामाला अजोड अशी जोड मिळालेली आहे. या अशा सुंदर, स्वच्छ व निर्मळ आणि आत्मविश्वासाच्या वातावरणात महाराष्ट्र राज्यातील आपल्या या उद्योगाला खासच नवे वळण लागेल याची मला खात्री वाटते. सर्वांच्या प्रयत्नाला यश येवो आणि महाराष्ट्रातील १० लाखाहून अधिक अज्ञानी आणि दरिद्री कुंभार समाजाला उर्जितावस्था आणणाऱ्या या धंद्याला सुंदर स्वरूप प्राप्त होवो हीच माझी अपेक्षा व प्रार्थना आहे.

जळगाव,
दिनांक २८ नोव्हेंबर १९६५

लोकशाहीतील एक तीर्थस्थान

कोल्हापूर जिल्हा शेतकरी-विणकरी सहकारी सूत गिरणीच्या उद्घाटन प्रसंगी दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले स्वागताचे भाषण

पंचगंगेच्या पवित्र परिसरात उभारल्या गेलेल्या आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी आणि विणकरी लोकांच्या उर्जित अवस्थेची ग्वाही देणाऱ्या " कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणीच्या " या उद्घाटनाच्या मंगल प्रसंगी थोर पाहुण्यांचे आणि आपणा सर्वांचे स्वागत करताना मला फार आनंद वाटतो.

कोल्हापूरची माती आणि माणसे

कोल्हापूर जिल्ह्याला स्फूर्तिदायक राजकीय इतिहास आहे, उज्ज्वल सामाजिक सुधारणेची परंपरा आहे आणि त्याचप्रमाणे विधायक विकासाचे काम आणि कला यांची ओजस्वी घडण आहे. या उज्ज्वल पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात आपल्या त्याग व कष्टाची आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची शौर्य पताका घेऊन निघालेला हा कोल्हापूर जिल्हा, शेती संवर्धन व अशा अनेक योजना

हातात घेऊन प्रगतीच्या कार्यात आपला वाटा उचलीत आहे. पंचगंगा, वारणा, दूधगंगा, वेदगंगा, कृष्णा या नद्या आपल्या पावन जलाने या या जिल्ह्याला पोषवीत आहेत, तर जुने गड व पवित्र जोतिबा, अंबाई व बाहुबली उज्ज्वल इतिहासाची साक्ष आणि भाविकतेची श्रद्धा देऊन तोषवीत आहेत. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या शिखर माथ्यावरून वेगाने उताराकडे निघालेला भूभाग पूर्वेकडे कृष्णा नदीच्या काठाला जाऊन थबकून उभा आहे, तर त्याच्या अंकावर सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी छोट्या मोठ्या नद्याही आपले जलदान करून या भूभागाला पिकाने, फळाने व फुलाने सजवीत आहेत, समृद्ध करीत आहेत, धान्य पिकविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड आणि जिद्द चालू आहे. शेती उत्पादनासाठी जिद्द धरणाऱ्या या शेतकऱ्यांच्या प्रयत्नाला हातभार लावण्यासाठी येथे उद्योगधंदेवाले आणि कारखानदार आहेत, ऑईल इंजीन निर्माण करणारे आहेत, ट्रॅक्टर बनवू पाहणारे आहेत. कोल्हापूरच्या मातीला उत्पादनाचा, सृजनाचा गंध आहे, तर येथल्या माणसाला उद्योगाचा छंद आहे. येथल्या माणसाच्या पायात जमीन आहे आणि हातात मशीन आहे. या दोहोंचे सूत साधून कृषी-औद्योगिक समाज निर्माण करण्याचे वाण घेऊन निघालेला कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी व कारागीर समाजाला असा एक सूत कारखाना उभारण्याचा ध्यास लागलेला होता. त्यांचे स्वप्न साकार होऊन जेव्हा तो यशस्वी झाला तेव्हा त्या शेतकरी व कारागीर विणकरांचे सूत जमविण्याचा या सूत गिरणीच्या उद्घाटनाचा समारंभ आज येथे घडून येत आहे.

इचलकरंजी : शेतकरी-विणकरांचे संगमस्थान

शेतकरी विणकरांचे हे संगमस्थान आहे. या संगमस्थानाच्या परिसरात पसरलेल्या विस्तीर्ण व उत्कृष्ट मगदुराच्या जमिनीमध्ये नद्यांच्या काठाने आणि विहिरीवर वर्धिष्णु पिकांची जोपासना दिसेल आणि त्याचबरोबर या भागामध्ये पावलापावलागणिक लिफ्ट इरिगेशन योजनांचे जाळे पसरलेले दिसेल. निसर्गाने नटलेल्या या भूमीत

उत्कृष्ट पीक काढण्यासाठी आसुसलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला शाश्वती हवी होती. या भागातील सहकारी साखर कारखान्यानी ऊस पिकाला शाश्वती मिळवून दिली आहे. या भागातील ऊस पिकाला बदला पीक होऊ शकेल अशा उत्तम कापसाची लागवड करण्याची महत्त्वाकांक्षा या भागातील शेतकऱ्यानी धरलेली आहे.त्या कापसाच्या पिकाला ऊस पिकासारखी शाश्वतीची आवश्यकता होती. या संगम-स्थानच्या आवतीभोवती उद्योगाचे दृष्टीने नजर टाकल्यास जवळच महाराष्ट्राचे मँचेस्टर ज्याला म्हणतात ते इचलकरंजी शहर, येथून जवळच असलेले जयसिंगपूर व आजूबाजूला असलेले कुरुंदवाड, हूपरी, रेंदाळ, वडगांव, कोडोली,कोल्हापूर या परिसरात ८ हजार पॉवरमाग आणि १५ हजार हातमाग चालू आहेत. या विणकरांच्या धंद्याला कायम स्वरूपाची शाश्वती हवी होती. या भागातील हे दोन्हीही प्रश्न केवळ चिंतेचेच विषय नव्हते तर प्रगतीकडे धाव घेणाऱ्या या भागातील शेतकऱ्यांच्या व विणकऱ्यांच्या जीवन-मरणाचे प्रश्न होते. स्वातंत्र्योत्तर काळात कार्यकर्त्यांचे पुढे ते एक आव्हान होते. या भागातील शेतकऱ्यांनी आणि विणकऱ्यांनी मिळून हे आव्हान विचार-पूर्वक स्वीकारले आणि परस्परांच्या प्रगतीसाठी ही संयुक्त मालकीची सूत गिरणी सहकारी तत्त्वावर उभी केली.

या सूत गिरणीच्या उभारणीच्या प्रत्यक्ष कामाला ६ डिसेंबर १९६३ रोजी गुरुपुष्य नक्षत्राच्या शुभ दिवशी औद्योगिक परवाना मिळविण्यासाठी रीतसर अर्ज भारत सरकारकडे पाठविण्याने सुरवात झाली आणि आज २६ जून १९६८ रोजी भारताचे उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांच्या शुभ हस्ते होणाऱ्या उद्घाटनाने त्याची परिपूर्ती होत आहे. ही सूत गिरणी उभारण्याच्या या साडेचार वर्षातील सातत्याच्या प्रयत्नाची माहिती आणि महत्वाच्या घटना सूत गिरणीने आज प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेमध्ये देण्यात आलेल्या आहेत. तो सर्व वृत्तांत पुन्हा या ठिकाणी सांगून आपला वेळ मी घेऊ इच्छित नाही. तथापि आवश्यक म्हणून भावी योजनांची रूपरेषा आणि या सूत गिरणीची वैशिष्ट्ये येथे नमूद करीत आहे.

भावी योजनांची रूपरेषा व वैशिष्टये

सध्याच्या २५ हजार चात्यांच्या क्षमतेमध्ये वाढ करून ती ५० हजार चात्याची करणे व त्यानंतर यथावकाश वाढ करून अंतिम उद्दिष्टास अनुसरून एकूण १ लाख चात्याची क्षमता प्रस्थापित करणे, कापसाचे जिनिंग आणि कापूस बियापासून तेल उत्पादन करणे. या प्रक्रियासाठी सहकारी तत्त्वावर व्यवस्था करून घेणे. विणकरी सभासदानी निर्माण केलेल्या कापडावर प्रक्रिया करण्यासाठी सहकारी तत्त्वावर प्रक्रिया केन्द्र उभारणे व त्यांनी निर्माण केलेल्या कापडासाठी बाजारपेठ मिळवून देण्याकरिता सहकारी तत्त्वावर विक्री संघटना स्थापन करणे. विणकरी सभासदाना त्यांचे माग सुव्यस्थित राखणेसाठीं, त्यांच्या दुरूस्तीसाठी व आधुनिकीकरणासाठी आवश्यक त्या सर्व प्रकारची तांत्रिक व आर्थिक मदत देणे. शेतकऱ्याना कापूस पिकविण्यासाठी उत्तेजन देण्याच्या व अद्यावत् शास्त्रीय पद्धतीने कापसाचे उत्पादन व पिकाचे रोगापासून रक्षण करण्याच्या दृष्टीने व्यवस्था करणे. त्याचप्रमाणे आदर्श कापूस उत्पादनाची काही प्रात्यक्षिक केन्द्रे स्थापन करणे.

कापूस पिकविणारा शेतकरी व कापड विणणारा विणकरी यांच्या संयुक्त मालकीची ही भारतातील पहिलीच व एकमेव सूत गिरणी आहे. १९६३–६४ सालात औद्योगिक परवाना मिळालेल्या १४ सहकारी गिरण्याच्या समूहातील सर्वात शेवटी नोंदली गेलेली ही सूत गिरणी सर्वप्रथम उत्पादनास सुरवात करीत आहे ही गोष्ट संचालक मंडळ आणि सभासद या सर्वांना भूषणावह आणि अभिनंदनास्पद आहे. या सूत गिरणीची उभारणी करीत असताना समाजातील आर्थिकदृष्टया वंचित घटकाना सामावून घेण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यात आला आहे. संस्थेच्या एकूण शेतकरी विणकरी सभासदापैकी ८० टक्क्याहून अधिक सभासद केवळ एक भाग धारण करणारे आहेत व त्यामुळे खऱ्याखुऱ्या अर्थाने ही गिरणी सामान्य लोकानी उभारलेली आहे हे दिसून येईल. सूत गिरणीच्या

आजवरच्या उभारणीच्या कार्यामध्ये अवास्तव खर्च कटाक्षाने टाळण्यात आला आहे. या सूत गिरणीच्या बरोबर उभारण्यात येत असलेल्या इतर सूत गिरण्याचा भांडवली खर्च प्रत्येक स्पिंडलला रु. ७५० ते ९०० पर्यंत झालेला आहे.या उलट आमच्या सूत गिरणीचा खर्च प्रत्येक स्पिंडलला रु. ६०० इतका झालेला आहे. सूत गिरणीचे कार्यक्षेत्र संपूर्ण कोल्हापूर जिल्हा असून या सूत गिरणीमध्ये करावयाच्या कर्मचाऱ्याची भरती या ग्रामीण भागातून करण्याचे संचालक मंडळाचे धोरण आहे.

वरील रूपरेषा आणि वैशिष्टये यावरून कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यापासून कापड विणणाऱ्या विणकऱ्याच्या उत्पादीत कापडाच्या विक्री करेपर्यंतच्या कालातील सर्व प्रक्रियेमधील परावलंबित्व व असहायता यामुळे होणारे शोषण थांबवून शेतकरी आणि विणकरी यांच्या श्रमाचा मोबदला संपूर्णपणे त्यांच्या पदरात पडू शकेल असे महत्वाकांक्षी आणि मूलभूत महत्त्वाचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न दिसून येईल. काटकसर, सचोटी आणि समाजातील अशक्त घटकांच्या हिताला प्राधान्य देणे या गोष्टी कटाक्षाने पाळण्यात आल्याचे दिसून येईल.

या सूत गिरणीची ही बाह्य रूपरेखा आणि वैशिष्टये जशी हृदयंगम आणि आनंद देणारी आहेत तशीच किंबहुना त्याहूनही अधिक प्रकर्षाने त्यामध्ये ग्रथीत झालेली समाज परिवर्तनाची मूलभूत तत्वे विलोभनीय आहेत. यासंबंधीच्या भावना व विचार आपल्या सर्वांच्या परवानगीने येथे व्यक्त करणे अस्थानी होणार नाही.

खरीखुरी लोकशाही

देशात आणि जगात आजकाल अर्थव्यवस्थेसंबंधी आणि आर्थिक रचनेसंबंधी विचार चितीले जात आहेत. मोठमोठ्या तत्वज्ञान्यानी या प्रश्नासंबंधी मार्ग शोधण्याचे प्रयत्न चालविले आहेत. समाजात झपाटयाने परिवर्तने घडत आहेत. जगाचा धावण्याचा वेग आणि घडणारे

बदल स्फुटणिकाच्याही पुढे गेलेले आहेत. पण समाजाच्या स्थिरतेचा मार्ग सांपडलेला नाही. समाजाला व्यक्तीस्वातंत्र्य हवे आहे, आर्थिक समानता हवी आहे आणि शासनात स्वविचाराचे प्रतिबिंब पडू शकेल असा मार्ग हवा आहे. म्हणजे दुसऱ्या अर्थाने खरीखुरी लोकशाही हवी आहे. इतिहासाचे सिंहावलोकन केले तर एकेकाळी भांडवलशाही अर्थव्यवस्थेने समाज गुंतवून ठेवला होता. सर्वांना घेऊन न जाणाऱ्या या मार्गावर साम्यवादाने तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. भांडवलशाही अर्थव्यवस्था काय अगर साम्यवादी अर्थव्यवस्था काय या दोहोतही काही अंगभूत दोष आहेत. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य आहे, पण त्यामध्ये आर्थिक समानता नाही. तर उलट आर्थिक पिळवणूक आहे. साम्यवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक समानता दिसून येते पण हुकूमशाही त्यामध्ये अंगभूत आहे आणि त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होतो. स्वयंप्रेरणा नाहीशा होतात. भांडवलशाहीत पिळवणूक अपरिहार्य आहे तर साम्यवादात सारा समाजच एखाद्या हुकूमशाहाचा अंकित बनला जातो.

व्यक्तिस्वातंत्र्य : लोकशाहीचा आत्मा

स्वतंत्र भारताने लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण अभिप्रेत आहे. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरणाची यशस्विता समाजामध्ये आणि देशामध्ये अधिक सत्तेच्या विकेंद्रीकरण होण्यावरच अवलंबून असते. व्यक्तिस्वातंत्र्य हा लोकशाही राज्यकारभाराचा आत्मा आहे. आणि अधिक विकेंद्रीकरण यावर लोकशाहीची यशस्वीता अवलंबून आहे. भांडवलशाहीने सकस आर्थिक विकेंद्रीकरण होवू शकत नाही. आणि त्याचप्रमाणे साम्यवादानेही आर्थिक विकेंद्रीकरणाचा प्रश्न मानवी जीवनाला शोभेल अशा रितीने सुटत नाही हे वरील विवेचनावरून दिसून येईल. आर्थिक जीवनातील पिळवणूक नाहीशी झाली पाहिजे आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेरणा सामुहिक जीवनामध्ये फुलल्या पाहिजेत अशी आर्थिक रचना कोणती असावी असा प्रश्न

आज भारतासमोर उभा आहे आणि त्याचा विचार करून आज लोकशाही समाजवाद निर्माण करण्याचा भारताचा प्रयत्न आहे. कृषी-औद्योगिक क्षेत्रातील सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या आणि तत्सम सहकारी उद्योगधंद्याच्या उभारणीतून निर्माण होत असलेल्या लोकशाहीप्रधान व विकेंद्रीत स्वरूपातील अर्थरचनेतून हा नवा मार्ग दिसू शकेल. व्यक्तिस्वातंत्र्याने नटलेला आणि पिळवणूक नसलेला नवसमाज निर्माण करण्याचे भाग्य या नव्या कृषीऔद्योगिक सहकारी उद्योगधंद्यामुळे लहान प्रमाणात का होईना तुम्हा आम्हाला लाभलेले आहे आणि त्याचे पालनपोषण तितक्याच निश्चयाने करण्याची आवश्यकता आहे. सामान्यपणे काम करणाऱ्या आम्हा कार्यकर्त्यांना या सहकारी उद्योगधंद्यामध्ये ग्रथीत झालेल्या व अंगभूत असलेल्या समाज परिवर्तनाच्या मूलभूत तत्त्वाचे घडलेले हे दर्शन आहे. आणि अशा सहकारी समाजवादातून प्रेरणा घेऊन आणि नवसमाज निर्मितीची निष्ठा घेऊन जन्माला आलेली ही सूत गिरणी आहे.

तोच खरा सुदिन

या नवविचाराचे आणि सहकारी उद्योगधंद्याचे पालनपोषण करताना तितकीच पथ्ये पाळण्याची आवश्यकता आहे. या सहकारी समाज अर्थरचनेत अंगभूत दोष नाहीत, पण त्यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीमधील दोषाने सहकारी उद्योगधंदे बिघडण्याची फार मोठी भिती आहे. माणसातील सचोटी यावर या अर्थरचनेचे यश अवलंन आहे. भारतात आणि महाराष्ट्रात उदयाला येत असलेल्या या सहकारी उद्योगधंद्यामध्ये आज मन खिन्न करणारी मलीनता निर्माण होत असल्याचे दिसून येते. ही मलीनता दूर करण्याचे काम समाजसेवकानी आणि शासनाने तितक्याच निश्चयाने करण्याची आवश्यकता आहे.

व्यक्तिदोषामुळे या सहकारी अर्थ रचनेला जसा धोका आहे तसाच त्याला शासनामधील राजकारणापासूनही धोका होण्याचा संभव आहे. राजकारण मुळात वाईट नसते पण ते राजकारण कोठे व किती वापरले पाहिजे हे समजून न घेण्यात दोषांची निर्मिती होते.गुणावगुणाचे व

तात्त्विक बैठकीचे मूल्यमापन करून घेऊन वाटचाल करण्याची लोकशाही राज्यव्यवस्थेत अत्यंत गरज असते. परंतु हे पथ्य पाळले जात नसलेने गेल्या २० वर्षात प्रयत्न करून आणि अमाप पैसा खर्च करूनही नजरेत भरण्यासारखे यश सगळीकडे सापडणे दुरापास्त होऊन बसले आहे. २० वर्षाच्या अनुभवानंतर तरी या बाबतीत आम्ही शहाणे होण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. हा शहाणपणा ज्या दिवशी, सुचेल, तो आपल्या देशाचे दृष्टीने सुदिन ठरणार आहे.

हे तर समाज परिवर्तनाचे केंद्र

आमची सूत गिरणी बरोबरच्या सूत गिरण्यामध्ये प्रथम उभी राहिली. त्यामध्ये आम्हाला कितीही आनंद वाटत असला तरी आमच्या बरोबरच्या इतर सहकारी सूत गिरण्याही लवकरच उभ्या राहाव्यात अशा आमच्या मनोमन आकांक्षा आहेत. मंजूर झालेल्या सहकारी सूत गिरण्याना काही आर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्या भारत सरकारकडून दूर होतील अशी येथे अपेक्षा व्यक्त करणे योग्य होईल असे मला वाटते. त्याचप्रमाणे सहकारी सामाजिक अर्थव्यवस्थेच्या रूपाने देशात निर्माण होत असलेले सहकारी क्षेत्रातील उद्योगधंदे आणि इतर कामे याकडे भारत सरकारची आणि शासनातील इतर खात्याची दृष्टी आतापेक्षा अधिक आपुलकीची व्हावी अशीही अपेक्षा करणे चूक होणार नाही.

या सूत गिरणीच्या रूपाने अशा आंतरबाह्य गुणानी नटलेले व पुरोगामी समाज परिवर्तनाचे एक वर्धिष्णु कार्य आज येथे सुरू होत आहे. महत्त्वपूर्ण समाज परिवर्तनाचे हे जिवंत केंद्र उभारण्याच्या कामी अनेकाचे कष्ट खर्ची पडले आहेत. महाराष्ट्र सरकारचे विचारपूर्वक सहाय्य झाले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सहकार्याचा हात लागला आहे. सभासद आणि संचालक यांचे कष्ट तर अप्रतीम स्वरूपाचे आहेत. आर्किटेक्ट श्री. आर. एस. बेरी व इमारतीचे कॉंट्रॅक्टर्स कोल्हापूरचे मेसर्स सह्याद्री कन्स्ट्रक्शन कंपनी आणि मेसर्स अनंतराव जाधव आणि कंपनी व मायका सजावटीचे कॉन्ट्रॅक्टर

श्री. लक्ष्मण कृष्णा सपाटे यांचे कौशल्य उपयोगी पडलेले आहे. आमचे कार्डिंग आणि स्पिनिंग मास्टर श्री. भालचंद्र सखाराम आजगांवकर यांची तांत्रिक सूक्ष्म दृष्टी आणि कामामधील कळकळ आणि त्यांच्याच वरोबर काम करणारे संस्थेचे अधिकारी आणि सेवकवर्ग यांनी घेतलेले कष्ट तर अवर्णनीय आहेत.सहकारी खात्यातील अधिकारी आणि तसेच श्री छत्रपती शाहू मिलचे मॅनेजर श्री. गद्रेसाहेब यांचे झालेले सहाय्य उल्लेखनीय आहे. या सर्व लहान थोर असंख्य लोकांनी केलेले सहाय्य मी या शुभप्रसंगी विसरू शकत नाही. आपल्या सर्वांच्यावतीने या सर्वांना मी धन्यवाद दिले तर ते अस्थानी होणार नाही.

आणखी एक दोन महत्त्वाच्या घटना नमूद करून माझे हे स्वागताचे भाषण संपवित आहे.

विधायक कार्याची परंपरा

ही सूत गिरणी श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या पुरस्काराने निघालेली आहे. या साखर कारखान्याच्या सानिध्याने या भागात अशीच विधायक कामे सुरू झालेली आहेत. ऊस उगवताना त्याला एकच कोंब असतो पण नंतर त्याला फूट फुटत असते. किती अधिक फूट फुटेल तितके ऊसाचे पीक चांगले गणले जाते. ऊसाच्या पंचगंगा कारखान्याला ऊस पिकासारखीच विधायक आणि विकासाच्या कामांची जोमदार फूट फुटलेली आहे. सूत गिरणी ही त्यापैकी एक फूट आहे.५०लिफ्ट इरिगेशन योजना ही दूसरी फूट आहे. अल्कोहोल प्लँट, खत कारखाना, कागदाचा कारखाना, पाणंद रस्ते व शैक्षणिक संस्था, या स्वरूपात लहानमोठी फूट जोमदारपणे फुटत आहे आणि नियोजित शिरोळ तालुका सहकारी साखर कारखान्याच्या रूपाने शिरोळ तत्लुक्यासाठी आणखी एक स्वतंत्र सहकारी साखर कारखाना निघण्याच्या मार्गावर आहे. त्यामध्ये काही अडचणी निर्माण होत आहेत. पण ऊसाच्या पीकाला फुटणाऱ्या फुटीच्या आवती भोवती निर्माण होणारे तण तग धरू शकत नाहीत असा निसर्गाचा नियम आहे. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना आणि

ही सूत गिरणी यांच्या सानिध्याने नियोजित शिरोळ तालुका सहकारी साखर कारखाना जनसेवेसाठी उभा राहील असा मला विश्वास वाटतो. याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्याच्या वर्धिष्णु विधायक कार्याची ही परंपरा या भागात चालू झालेली आहे हेही एक महत्त्वाचे वैशिष्टच गणले पाहिजे.

आमची शिदोरी : निर्मळ चारित्र्य व अभंग निर्धार

आजचा उद्घाटन समारंभही तितक्याच वैशिष्टचाने नटलेला आहे. आमच्या देशाच्या प्रगतीच्या वाटा ज्या दिशेने निघाल्या आहेत त्या वाटेवर यशस्वी व्हावयाचे असेल तर योजनापूर्ण व भरपूर अर्थ सहाय्य हवे, औद्योगिक विकास हवा आणि तोही सहकारी मार्गाने व्हावयास हवा. या समारंभासाठी आज येथे आलेली अतिथीत्रय, एक अर्थमंत्री म्हणून भारताची आर्थिक धुरा वाहून राहिले आहेत आणि उपपंतप्रधान म्हणून भारताची प्रमुख शासकीय जबाबदारी अंगावर घेतलेली आहे, दुसरे सहकारी प्रगतीसाठी महाराष्ट्र राज्याला मार्गदर्शन करीत आहेत तर तिसरे उद्योग विकासाची धुरा खांद्यावर घेऊन महाराष्ट्राला उभे करीत आहेत. येथून जवळच कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर श्री दत्ताचे त्रिमूर्तीचे तीर्थस्थान आहे. शेतकऱ्यांच्या आणि विणकऱ्यांच्या या संगमस्थानावर या त्रिमूर्तीचे आगमन झालेले आहे. ज्या सचोटीने आणि निर्धाराने ही सूत गिरणी अनेक अडचणीना तोंड देऊन आम्ही कार्यकर्त्यांनी उभी केली आहे तितकेच ज्यांचे चारित्र्य निर्मळ आहे, कामातील निर्धार अभंग आहे, अशा थोर धीरोदात्त नेत्यांच्या शुभहस्ते येथे उपस्थित असलेल्या जनसागराच्या साक्षीने हे उद्घाटन होत आहे, आणि म्हणून या गिरणीस मी लोकशाहीतील तीर्थस्थान समजतो.

इचलकरंजी,
दिनांक २६ ६-१९६८

कागद ! कागद !! कागद !!!

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकारी कागद कारखाना उभारण्यासंबंधीचा विचार करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सहकारी कार्यकर्त्यांची सभा गंगानगर–इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे भरली होती. त्यावेळी सभेचे निमंत्रक म्हणून दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी केलेले मार्गदर्शक प्रास्ताविक भाषण.

आपला कोल्हापूर जिल्हा निसर्गाने नटलेला आहे, कलावैभवाने बहरलेला आहे, अनेक थोरा मोठ्यांच्या कर्तृत्वाने पुनीत झालेला आहे, स्वकर्तृत्वाने स्फुरलेला आहे. राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, शेती उत्पादन आणि अतर विकास कामे यामध्ये आदर्श असा गौरव कोल्हापूर जिल्ह्याने प्राप्त करून घेतलेला आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीतील कार्य अतिशय वरच्या दर्जाचे आहे. सर्वांगाने स्वयंस्फूर्त असे सामर्थ्य असलेल्या या जिल्ह्यामध्ये अनेक महत्त्वाची विकासाची कामे सहकारी संघटनेद्वारा आणि जनतेच्या स्वकर्तृत्वातून निर्माण होण्याची शक्यता आहे. आज एका अतिशय महत्त्वाच्या सहकारी कागद कारखान्याच्या उभारणीचा विचार करण्यासाठी आम्ही सर्व संबंधीत

मंडळी या ठिकाणी जमलो आहोत. आजचा दिवस आणि हा प्रसंग कोल्हापूरच्या अितिहासामध्ये सुवर्णाक्षरानी लिहून ठेवण्यासारखा आहे. अशा या मंगल आणि महत्त्वाच्या शुभ प्रसंगी आणि कोल्हापूर जिल्हचाच्या विकास कामाला एक नवी गतीमान कलाटणी मिळण्याच्या क्षणी मी आपण सर्व मान्यवर पाहुणे मंडळी आणि उपस्थित मान्यवर सहकारी मित्र यांचे पहिल्यांदा अंतःकरणपूर्वक स्वागत करतो.

गेल्या काही महिन्यापासून कागदाची, विशेषतः वृत्तपत्रासाठी लागणाऱ्या कागदाची तीव्र टंचाई जगातील सर्व लहान मोठ्या राष्ट्राना जाणवू लागली आहे. पेट्रोलनंतर सबंध जगात दुर्मिळ होऊ पहात असलेली अत्त्यावश्यक गरजेची दुसरी महत्त्वाची वस्तु म्हणजे वृत्तपत्रीय कागद असे म्हटल्यास वावगे होणार नाही. प्रामुख्याने आयातीवर अवलंबून असणाऱ्या भारतासारख्या खंडप्राय देशाला ही झळ काहीशी विस्तृत प्रमाणात भासू लागली आहे. आपल्या भारत देशाला परकीय चलनाची बचत करण्यासाठी आणि या महत्त्वाच्या वस्तूच्या बाबतीत स्वावलंबी होण्यासाठी आजवर कधी नव्हती इतकी निकड आज लागून राहिली आहे.

बगॅस : कागद-निर्मितीचे एक साधन

साखर कारखान्यातील बगॅसचा सध्या बॉयलरमध्ये जळण म्हणून उपयोग करण्याची पद्धत सर्वत्र अवलंबलेली आहे. जळण म्हणून वापरून शिल्लक रहाणारा बगॅस किंवा अन्य वस्तुंचा जळण म्हणून वापर करून अंशतः शिल्लक राहिलेला बगॅस रॉ मटेरियल म्हणून वापरून त्यापासून उत्तम प्रतीचा कागद निर्माण होऊ शकतो हे आता अनुभसिद्ध झाले आहे. कागद निर्मितीसाठी लाकूड, लाकडाचा भुसा, बांबू, रद्दी वगैरेचाही रॉ मटेरियल म्हणून उपयोग करता येतो हे खरे असले तरी बगॅस वापरणे हे या सर्वापेक्षा अनेक दृष्टीने सोईचे, विशेषतः ज्या भागात साखर कारखान्यांचा समूह असेल त्या भागात, तुलनात्मक दृष्टया कमी खर्चाचे व विश्वासार्ह मानले जाते.

अशा प्रकारचे बगॅसवर आधारीत कागद निर्मितीचे कारखाने महाराष्ट्रात निघावेत असे प्रयत्न १९६३-६४ सालापासून चालू आहेत. कोल्हापूर, सांगली व सातारा जिह्यातील श्री वारणा, श्री पंचगंगा, शेतकरी व कृष्णा या चार सहकारी साखर कारखान्यानी संघटीपणे प्रयत्न चालू केले. सदर चार साखर कारखान्याचे प्रतिनिधी व सरकारी प्रतिनिधी यांचे एक प्रतिनिधी मंडळ कागद कारखान्याची मशिनरी, ऊसाच्या चिपाडापासून कागद तयार करण्याच्या पद्धती आणि त्या प्रकल्पाची एकूण आर्थिक बाजू यासंबंधीची माहिती घेण्यासाठी ११ देशाचा ४५ दिवसाचा अभ्यास दौरा करून आले. त्यानंतर सदर प्रकल्पाबाबत मेसर्स सायमन हँडलींग इंजिनिअर्स, इंग्लंड व मेसर्स इंटपनॅशनल पल्प कंपनी, मेक्सिको यांचेकडून सविस्तर अहवाल १९६७ मध्ये तयार होऊन आला आहे.

हा प्रदीर्घ जागतिक दौरा करून आल्यानंतर कागद कारखाना उभारणीच्या दृष्टीने सदर दौऱ्यात केलेल्या पहाणीचे निवेदन मी दिनांक १६-११-१९६४ रोजी प्रसिद्ध केले होते. सर्व प्रोसेसिंगचा अभ्यास करून मेसर्स सायमन हँडलींग यांनी तयार केलेला अखेरचा प्रोजेक्ट रिपोर्ट यावरून बगॅसपासून कागद निर्मिती करण्याची तांत्रिक, आर्थिक दृष्टीने सिद्ध गोष्ट असल्याचे दिसून येईल.

त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच सहकारी साखर कारखान्याना कागद प्रकल्पामध्ये सामावून घ्यावे आणि या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा फायदा थोड्याच घटकाना न होता त्याचा फायदा व्यापक दृष्टीकोनातून सामुहिक पद्धतीने अधिक लोकाना व्हावा या दृष्टीने पूर्वीपासून प्रयत्न होत आले आहेत.

बगॅसची उपलब्धता

दररोज ३०० टन उत्पादन क्षमतेचा न्यूजप्रिंटचा कागद कारखाना स्थापण्यासाठी रॉ मटेरियल म्हणून २ लाख ७५ हजार टन बोनड्राय बगॅसची आवश्यकता असते. कोल्हापूर जिल्ह्यातील सह-

कारी साखर कारखान्याची सध्याची ऊस गाळप क्षमता व यापुढे सदर साखर कारखान्याची वाढीव गाळपशक्ती उपयोगात आल्यावर त्यांची होणारी ऊस गाळपाची क्षमता आणि तसेच नजीकच्या काळात कोल्हापूर जिल्ह्यात स्थापन होणाऱ्या किमान तीन सहकारी साखर कारखान्याची क्षमता आणि जिल्ह्यातील सध्या असलेल्या एका खाजगी साखर कारखान्याची सध्याची ऊस गाळप क्षमता विचारात घेता बगॅसची उपलब्धता निश्चितपणे राहील.

दैनिक ३०० टन कागद निर्मितीसाठी आवश्यक इतका बगॅस कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्याकडून विना अडचण मिळू शकेल. कोल्हापूर येथील एकमेव खाजगी साखर कारखाना दि कोल्हापूर केन शुगर वर्क्स (किंवा कोल्हापूर शुगर मिल्स) याचा पुढे मागे जरुरीप्रमाणे समावेश करून घेण्यास हरकत असण्याचे कारण नाही. तथापि त्याचा विचार यथाकाल करता येईल. तसेच जिल्हा नियोजनाच्या आराखड्यात संकल्पिलेले नवीन तीन सहकारी साखर कारखाने अस्तीत्वात येण्यास थोडाफार विलंब लागला तरी त्यामुळे कागद कारखाना प्रकल्पाचे स्वरूप किंवा आर्थिक किफायतशीरपणावर कसलाही प्रतिकूल परिणाम होणार नाही. उलटपक्षी नवीन कारखान्यामुळे संकल्पित कागद कारखान्याच्या प्रकल्पाच्या संभाव्य विस्तार योजनेला हातभारच लागेल.

भांडवल उभारणी

सध्याची आर्थिक परिस्थिती व मालाचे वाढलेले दर विचारात घेता सदर प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च अंदाजे ४० कोटी रुपयापर्यंत जाईल. स्थूलमानाने त्यापैकी २४ कोटी रुपये आर्थिक सहाय्य करणाऱ्या (इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक, आयुर्विमा कॉर्पोरेशन वगैरे) संस्थाकडून दीर्घ मुदतीच्या कर्ज रूपाने घेता येतील आणि ८ कोटी रुपये केंद्र सरकार व ४ कोटी रुपये राज्य सरकारकडून आणि ४ कोटी रुपये सर्व सहकारी साखर

कारखाने यांचेकडून भाग भांडवलाचे रूपाने उभारावयाचे आहेत. प्रकल्पाच्या उभारणीसाठी लागणारा सुमारे ३ वर्षाचा कालावधी, मशिनरीची किंमत हप्तेबंदीने देण्याची शक्यता आणि प्रकल्पात सहभागी होणाऱ्या साखर कारखान्याची संख्या व त्यांची क्षमता विचारात घेता भांडवल उभारणीचे काम सुलभतेने करता येईल. भांडवल उभारण्याबाबतची ही व्यवस्था व त्याची विभागणी येथे स्थूलमानाने नमूद केलेली आहे. त्यामध्ये परिस्थितीस अनुसरून आवश्यकतेप्रमाणे बदल करावा लागला तरी त्या प्रकल्पासाठी लागणारे भांडवल उभारण्यामध्ये काही अडचण भासण्याचे कारण रहाणार नाही.

जागेची निवड

नियोजित कागद कारखान्यासाठी कोणत्याही एखाद्या साखर कारखान्यालगतची जागा निवडणे आवश्यकच आहे असे नाही. तांत्रिकदृष्टचा योग्य, सोईस्कर मध्यवर्ती जागा निवडता येईल. मुबलक पाण्याची सोय, रेल्वे सायडिंगसह दळणवळणाचे सोईचे मार्ग असलेली, सांडपाण्याचा निचरा विनासायास करता येईल अशी सुमारे १०० ते १५० एकर जागा या प्रकल्पासाठी लागणार आहे. तशी सोईची जागा तंत्रज्ञांच्या सल्याने व विचाराने कोल्हापूर जिल्हचात निवडण्यास काहीही अडचण येणार नाही.

शंका व समाधान

या प्रकल्पाच्या उभारणीच्या संदर्भात एक आशंका मनात येण्याची शक्यता आहे. साखर कारखान्यातील संपूर्ण बगॅस नियोजित कागद कारखान्याला दिल्यास फर्नेस ऑईलवर बॉयलर्स चालवावे लागतील आणि नवीन पेट्रोलियम तेल पुरवठचाच्या पार्श्वभूमीवर फर्नेस ऑईलची सध्याची दुर्मिळता पाहिल्यास ते प्रथमदर्शनी अडचणीचे वाटेल. परंतु राष्ट्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास सध्या न्यूजप्रिंट व इतर कागदाची आपल्या देशातील गरजच एवढी प्रचंड आहे आणि ती इतक्या अकल्पीत वेगाने वाढत रहाणार आहे की, आपल्या देशाला

कागदाच्या आयातीवर विसंबून रहाता येणार नाही. त्यामुळे बगॅस-पासून कागद निर्मिती करणाऱ्या साखर कारखान्याची फर्नेस ऑईलची गरज सरकारला अग्रक्रमाने भागवावी लागणार आहे. तेल पुरवठ्याच्या प्रश्नाची दुसरी बाजू विचारात घेणेही आवश्यक आहे. तो म्हणजे कोणत्याही राष्ट्राला तेलासारख्या जीवनमरणाच्या प्रश्नाचे बाबतीत दीर्घकाल परावलंबी राहून चालणार नाही आणि त्या बाबतीत स्वावलंबी होण्याचे दृष्टीने भारत सरकारने आतापासूनच अतिशय द्रुत गतीने प्रयत्न चालू केले आहेत याचीहि माहिती आपणास आहे. कागद कारखाना उभारणीसाठी सुमारे तीन वर्षाचा कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळांत तेल पुरवठ्याबाबतीत निर्धास्त राहण्या अितपत व्यवस्था आपल्या राष्ट्राला करून घेणे भागच आहे. आणि कागद कारखाना उभारणीसाठी खुद्द कागद कारखान्याला बगॅस पुरविणाऱ्या सहकारी साखर कारखान्याना लागणारा फर्नेस ऑॅईलचा पुरवठा शासनाला प्रथम अग्रक्रमाने करावा लागेल. त्यामुळे फर्नेस ऑॅईलच्या पुरवठ्याबाबत अडचण मानण्याचे काही कारण राहणार नाही.

आम्ही विचार करीत असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सहकारी साखर कारखान्याच्यावतीने काढावयाच्या कागद कारखान्याचे काम अतिशय महत्त्वाचे तर आहेच, पण तितकेच ते प्रयासाचे व कष्टाचेही आहे याची जाणीव आम्ही तुम्ही सर्वांनी ठेवली पाहिजे. या गोष्टीचा विचार करीत असताना अनेक प्रश्न निर्माण होतात. बगॅस पुरवठा, बगॅसपासून न्यूजप्रिंट तयार करण्याची तांत्रिक शक्यता व सुलभता, भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून या मोठा प्रकल्पाला सर्व प्रकारचे लागणारे सहकार्य आणि मदत, त्याला लागणाऱ्या मोठ्या भांडवलाची उभारणी, तांत्रिक व आर्थिक किफायतशीरपणा आणि तदनुषंगिक बाबीसंबंधाने या प्रकल्पासंबंधी कोणतीही शंका अगर अडचण असण्याचे कारण नाही.

आशा आणि आस्था

मध्यवर्ती व राज्य शासनाने अशा प्रकारच्या विकास कामाला अनेक वेळा जाहीरपणे अनुकूलता दर्शविली आहे. या कागद उत्पादन

प्रकल्पामुळे महाराष्ट्र राज्याची कृषी औद्योगिक विकासाच्या योजनांची चांगली प्रगती होणार आहे. ग्रामीण भाग उजळून निघणार आहे. सध्या देशातील न्यूजप्रिंट व अेकूणच कागदाची टंचाई पहाता सध्या आपल्या देशात कागद कारखाने सुरू करणे ही काळाची व भावी प्रगतीची गरज होऊन राहिली आहे.

थोड्याच कालापूर्वी १९७३ सालाच्या ऑक्टोबर महिन्यात भारत सरकारचे औद्योगिक विकास व तंत्रज्ञान खात्याचे मंत्री मा. ना. श्री. सी. सुब्रम्हण्यम हे प्रतिथयश शिवाजी विद्यापीठाचे पदवीदान समारंभानिमित्त कोल्हापूरला आले होते. त्यावेळी त्यांनी श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना व कोल्हापूर जिल्हा शेतकरी सहकारी सूत गिरणी या दोन महत्त्वाच्या सहकारी संस्थाना भेट दिली. त्यावेळो त्यांचे स्वागत करीत असनाना व त्यांच्याशी चर्चा करीत असता कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सहकारी साखर कारखान्याच्यावतीने दैनिक ३०० टन उत्पादन क्षमतेचा न्यूजप्रिंट कागद कारखाना काढणेसंबंधी विचार असल्याचा आमच्याकडून उल्लेख करण्यात आला. त्यावेळी त्यांनी त्या गोष्टीचे मनःपूर्वक स्वागत केले आणि अशा प्रकारच्या प्रकल्पाला मूर्त स्वरूप येत असेल तर त्याची छाननी सहानभूतीपूर्वक भारत सरकाकडून केली जाईल आणि त्याबाबत अनुकूल निर्णय घेतले जातील असे आश्वासनपूर्वक त्यांनी सांगितले आहे हे सर्वाना माहिती आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्य सरकारकडूनही या बाबतीत आस्थापूर्वक आमच्याकडे विचारणा करणेत आली आहे.

या घटना घडण्याच्या सुमारासच कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या त्रैवार्षिक निवडणुका नजीकच्या काळात होणार होत्या म्हणून सदरच्या निवडणुका होवून सहकारी साखर कारखान्याच्या नूतन संचालक मंडळाची प्रस्थापना होईपर्यत त्या संधीकालात एवढ्या मोठ्या प्रकल्पाचा घाईने विचार न करता थोडा वेळ थांबणे सयुक्तिक वाटले. आता कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सह-

कारी साखर कारखान्याच्या निवडणुका होऊन नवीन संचालक मंडळे स्थापन झाली आहेत. या नव्या आणि चांगल्या वातावरणात सर्व दृष्टीने परिपूर्ण व सिद्ध असलेल्या आणि कोल्हापूर जिल्ह्याचा कायापालट करणाऱ्या महाराष्ट्र व भारतातील या महत्त्वाच्या योजनेचा विचार करणेसाठी आज आपण सर्व संबंधीत मंडळी येथे जमलो आहोत त्याबद्दल मला अतिशय आनंद वाटतो आणि आमच्या विनंतीला मान देवून उपस्थित असलेल्या आपणा मान्यवर सर्व सहकारी मित्राचे मी अंतःकरणपूर्वक स्वागत करतो.

हा महत्वाचा प्रकल्प स्थापन करण्याचा निर्णय घेणे, त्यासाठी आवश्यक असणारे प्रवर्तक मंडळ व त्याचे प्रमुख प्रवर्तक निवडणे, संस्थेचे नांव ठरविणे, बँकेमध्यें नियोजित संस्थेचे खाते उघडणे व तत्सम गोष्टीची व्यवस्था करून घेणे आणि प्राथमिक सर्व गोष्टीची व्यवस्था करण्यासाठी प्रवर्तक मंडळाला अधिकार देणे वगैरे गोष्टीचा विचार आजच्या सभेत करावयाचा आहे. हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे. त्या बाबतची सर्वांगीण चर्चा करून तितक्याच गंभीर रितीने त्या बाबतचा निर्णय घेण्याचा विचार या सभेत आपणाकडून व्हावा अशी मी अपेक्षा आणि विनंती करतो आणि पुनः एकदा आपणा सर्वाचे अंतःकरणपूर्वक स्वागत करतो.

इचलकरंजी,
दिनांक ९-१-१९७४

शिक्षणविषयक विचार

स्वातंत्र्योत्तर भारतात शिक्षणातून नव्या निष्ठा, नव्या वाटा, नव्या आशा–आकांक्षा, नव्या आस्था आपण निर्माण करीत आहोत काय ? शिक्षणातून माणसातला 'नवा माणूस' पूज्य दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांना असा हवा आहे.

– रा. तु. भगत



लोकशाहीसाठी लोक शिक्षण

प्रा. रा. तु. भगत यांच्या 'महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव' या शैक्षणिक ग्रंथाचे प्रकाशन करताना दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी नाईट कॉलेज ऑफ आर्टस्, कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांच्यासमोर केलेले उद्‌बोधक भाषण.

आजचा हा समारंभ मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. तुमचा असा गैरसमज झाला असेल की हा समारंभ सुशिक्षित लोकासाठीच आहे. पण कृपा करून आपण तसे समजू नका. हा लोकशिक्षणाचा एक प्रसंग आहे. तसे बघावयास गेले तर आजच्या शिक्षणामध्ये देखील सुसंगति आढळत नाही. आजचे शिक्षण समाजाच्या गरजेनुसार दिले जात नाही, आजचे शिक्षण पुस्तकी आहे, आजचा विद्यार्थी बेजबाबदार आहे, आजचा शिक्षक आपल्या विषयाची तयारी करीत नाही, आजच्या पालकाचे आपल्या पाल्याकडे लक्ष नाही व एकूण शिक्षणव्यवस्थेत सर्वत्र गोंधळ सुरू झाला आहे. या व अशा अनेक शिक्षणावरील आक्षेपांचे उत्तर प्रा. रा. तु. भगत यानी लिहिलेल्या "महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव" या ग्रंथात आढळते.

शिक्षण : एक अखंड जीवन प्रक्रिया

शिक्षण हे केवळ पुस्तकातून मिळते किंवा शाळा कॉलेजातून मिळते असे आपण मानतो. परंतु हे फारसे बरोबर नाही. आपण दैनंदिन जीवनातून नित्य नवे काही तरी शिकत असतोच. काही नवे अनुभव घेत असतो. आपण मिळविलेल्या जुन्या अनुभवाच्या पृष्ठभूमीवर या अनुभवाचे आपण मूल्यमापन करतो. जीवनात मिळविलेल्या नव्या अनुभवाचा आपण नवा अर्थ समजावून घेतो व प्रसंगी अितराना समजावून देतो. जीवनातील नव्या अनुभवाचा अर्थ समजावून घेणे व समाजावून देणे या विशिष्ट प्रक्रियेलाच मी शिक्षण समजतो. म्हणून आपण जगतो म्हणजे शिक्षण घेतो म्हणजे आपण जगतो असे म्हटल्यास वावगे होणार नाही. तेव्हा शिक्षण जीवनाशी निगडीत आहे. अगदी पाळण्यापासून ते स्मशानभूमिपर्यंत मनुष्य शिकतच असतो. म्हणून शिक्षणास मी एक अखंड जीवन प्रक्रिया मानतो.

शिक्षण : आदर्श नागरिक निर्माण करण्याचे साधन

लोकजीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. आदर्श शिक्षणातून आदर्श समाजाची बांधणी होऊ शकते. निकोप, स्वावलंबी, स्वातंत्र्यप्रिय व श्रमप्रतिष्ठेवर विश्वास ठेवणारा समाज निर्माण करण्याचे साधनही शिक्षणच आहे. अशा स्वरूपाच्या शिक्षणातून, समाजवादी समाजरचनेच्या आपल्या ध्येयाला अनुषंगून आज आदर्श नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणावर येऊन पडली आहे. लोकशाही पद्धतीने जगणाऱ्या भारतास शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. वास्तविक पाहता शिक्षण हेच लोकशाही राज्यप्रद्धतीचे प्राणभूत तत्त्व होय. आणि म्हणून भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशातील शिक्षणाचे ध्येय अेका विशिष्ट ठिकाणी पोहोचण्याचे नसून गतिमान जीवनाकडे अंगुली निर्देश करण्याचे आहे असे मी मानतो. आजचा आपला विद्यार्थी उद्याचा आदर्श नागरिक बनावयाचा झाल्यास त्याला गतिमान जीवनाकडे पाहण्याची दृष्टी प्राप्त झाली पाहिजे व गतिमान

जीवनाचा अर्थ समजण्याची पात्रताही त्याच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे. शिक्षणातून आपणास नक्की काय साधावयाचे आहे याचे मोठे मार्मिक विवेचन प्रा. रा. तु. भगत यानी आपल्या ग्रंथाच्या मनोगतात केले आहे. ते म्हणतात " शिक्षणातून समाजक्रांती घडवून आणण्यासाठी केवळ शिक्षणक्रम व अभ्यासक्रम बदलून चालेल असे नाही, तर त्यासाठी शिक्षणद्वारा नव्या निष्ठा, नव्या वाटा, नव्या दिशा, नव्या आशा आकांक्षा व नवी मूल्ये निर्माण करता आली पाहिजेत. शिक्षणाने " सिद्ध पुरुष " घडविला पाहिजे व माणसातला " माणूस " जागा ठेवला पाहिजे " या मनोगतातच शिक्षणाच्या ध्येयाचे सर्व सार सामावलेले आहे असे मला वाटते.

यानीच समाज-पुरुष घडविला

माणसाने स्वाभिमानाने जगावे, लाचारीला लाथ मारावी, अन्यायाबद्दल चीड यावी, सत्याविषयी चाड बाळगावी, प्रयत्नातून स्वजीवन घडवावे, चारित्र्याचे संवर्धन करावे व पारंपारिक रूढीच्या श्रृंखलातून मुक्त होऊन स्वातंत्र्य सूर्याच्या प्रकाशात न्हाऊन जावे यासाठी गेल्या दीडशे वर्षातील शैक्षणिक आंदोलनाच्या मूलभूत प्रेरणा समजण्याच्या दृष्टीने प्रा. रा. तु. भगत यांच्या " महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव " या ग्रंथाला अत्यंत महत्त्व आहे. गेल्या दीडशे वर्षात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रात नव्या आकांक्षा व नवी ध्येये यांचेशी शिक्षणद्वारा संधान बांधून नव-समाज बांधणीसाठी जे अहोरात्र झगडले त्यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांचेपासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंतचे सर्व समाजसेवक समाविष्ट आहेत. महात्मा जोतीरावानी समाज उंबरठ्यावर समाज-शिक्षणासाठी पहिल्यांदा टाहो फोडला. गुरुदेव रविंद्रनाथ टागोरासारख्या अप्रतिम प्रतिभाशक्ती असलेल्या कवीने शिक्षणात नवे पर्व निर्माण केले. स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा यांच्या जोरावर गांधीजीनी सर्वार्थाने शिक्षणाला नव्या दिशा दिल्या. डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षणास तत्त्वज्ञानाची जोड दिली तर डॉ. झकिर हुसेन यांनी शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून त्याची व्यावहारिकतेशी सांगड घालून

दिली. महर्षी कर्वे यांनी स्त्री-शिक्षणात व जीवनात आमूलाग्र क्रांती घडवून आणली तर कर्मवीर भाऊरावानी स्वावलंबी शिक्षणाचे ब्रीद प्रतिपादले. सामान्य माणसाला घडविण्यासाठी या शिक्षणतज्ञांनी नवनवी ध्येय-क्षेत्रे समाजापुढे ठेवली. नवराष्ट्रासाठी नवा समाज-पुरुष निर्माण करण्याचे कार्य या समाज-सेवकानी केले. राष्ट्र-पुरूषांच्या डोळ्यामध्ये स्वाभिमान व स्वातंत्र्याचे अंजन घालून त्यास जागृत केले. समाज सामर्थ्याच्या संवर्धनासाठी शिक्षणासारखे सर्वस्पर्शी साधन त्यानी वापरले.

लोकशाहीसाठी लोकशिक्षण

आपणाला स्वातंत्र्य मिळाले ते १५ ऑगस्ट १९४७ ला आणि आपण घटनेसहीत प्रजासत्ताक राज्य आणले ते २६ जानेवारी १९५० ला. जगाच्या इतिहासात कोणत्याही राष्ट्राला इतक्या अल्प-काळात राज्यघटनेसहीत लोकशाही प्रस्थापित करता आली नाही. प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्राची वाटचाल तुम्ही आम्ही समजावून घेतली पाहिजे. स्वराज्यातील रौप्यमहोत्सवी वर्षाच्या उंबरठ्यावर आपण उभा आहोत. या दृष्टीने गेल्या २५ वर्षात आपल्या देशात काय काय झाले याचा आपण विचार केला पाहिजे. स्वराज्यापूर्वीच्या अपेक्षा आणि आकांक्षा आपण उराशी बाळगल्या होत्या त्या आज कोठे आहेत ? स्वराज्यापूर्वी जे अपेक्षिले होते ते का निर्माण झाले नाही ? या सर्व गोष्टीचे चिंतन केले तर असे दिसून येईल की या देशात जिद्द, प्रेरणा, देशभक्ती व चिरतन काम करीत राहावे यासाठी स्वराज्यापूर्वीचे समाजजीवनातील जे धागे दोरे होते ते सांधले गेले नाहीत, उलट ते तुटलेले आहेत.

तुटलेले धागे

माझ्या दृष्टीने तुटलेले काही धागे आहेत. त्यापैकी पहिला धागा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलनाच्या इतिहासाचा. स्वराज्य प्राप्तीनंतरच्या पिढीशी तुटलेला संपर्क होय. आपल्या देशाला जे स्वराज्य मिळाले ते एका अद्भूत मार्गाने मिळाले आहे. अशा स्वरा-

ज्याचा इतिहास समाजातील स्वाभिमान जागविणारा आहे. अन्याया-विरूद्ध या देशातील गरीब माणूस कसा उफाळून उठतो याचा इतिहास आहे. हा इतिहास शिकविला गेला नाही, हा एक महत्वाचा तुटलेला धागा आहे असे मला वाटते. या देशातील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास व वैचारिक आंदोलनाच्या क्रांतीचा इतिहास योग्य दृष्टीकोन ठेवून शिकविला गेला असता, तर या देशात आज लाचार दिसणारा समाज स्वाभिमानाने व ताठ मनाने वावरत असताना दिसला असता.

आणखी एक तुटलेला धागा म्हणजे आपल्या देशात लोक शिक्षणाची झालेली उपेक्षा होय. गेल्या पंचवीस वर्षांत या देशातील जनतेला ज्या प्रकारची राष्ट्रीय आणि सामाजिक हिताची दृष्टी असलेले शिक्षण देण्याची गरज होती ते शिक्षण दिले गेले नाही आणि म्हणून नवी पीढी पूर्व गौरवशाली परंपरेचा आधार नसलेली आणि नव्याबद्दलही फारसा आदर नसलेली अशी निर्माण झालेली आहे. हा दोष नव्या पीढीचा नसून त्यांच्यासाठी योग्य शिक्षणाची आखणी न करणाऱ्या आमच्या पीढीचा आहे. आणि म्हणून आज शिक्षणातून समाज सज्ञान, सतेज व सुसंस्कारित निर्माण करावयाचा असल्यास किंवा लोकशाही टिकवून ती सुसंपन्न बनवावयाची असल्यास लोकशिक्षणाची परम आवश्यकता आहे. लोकशिक्षणासाठी आहोरात्र झटणाऱ्या महात्मा गांधीच्या शैक्षणिक कार्याचे खरे महत्त्व ओळखण्याची आता वेळ आली आहे. जनता जोपर्यंत सज्ञानी होत नाही, तोपर्यंत लोकशाहीचे हात बलशाही होणार नाहीत. लोकशाही टिकाव स्वरूपाची राहणार नाही आणि म्हणूनच लोकशिक्षणाशिवाय लोकशाही व्यर्थ आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

विद्यार्थ्यांचे कर्तव्य

एक घटना व एक छत्र असा स्वातंत्र्यानंतरचा आपला हिंदुस्थान तयार झाला. परंतु आज जातीयवाद, प्रांतवाद व भाषावाद बोकाळला आहे. पूर्वी कधीही नव्हती अेवढी फुटीरतेची भावना वाढीस लागली आहे.आणि म्हणूनच " देश एक आहे " याची आठवण

आजच्या विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. स्वराज्य ६० कोटी लोकांचे आहे. म्हणून लोकशाहीला अनुरूप असे वातावरण निर्माण केले पाहिजे. गेल्या २५ वर्षात आपल्या देशात काय घडले ? याचा अर्थ विद्यार्थ्यांनी समजावून घेतला पाहिजे व त्याप्रमाणे पुढे मार्ग काढला पाहिजे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी देशातील जनता जातपात, धर्म, वर्ण व पंथभेद विसरून देशभावनेने भारावून गेली होती. अशा देश-भावनेतूनच आपणास स्वातंत्र्य मिळाले आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने या स्वातंत्र्य चळवळीचा अितिहास समजावून घेतला पाहिजे. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या पाठीमागील मूलभूत प्रेरणांचे अर्थ समजावून घेतले पाहिजेत. त्यागाने व कष्टाने मिळविलेल्या स्वराज्याची तुम्ही जोपासना केली पाहिजे.

लोकशाही राज्यव्यवस्थेत समाज बांधणीचे काम समर्थपणे करावयाचे असेल तर माणूस सुशिक्षित व सुसंस्कृत बनला पाहिजे. सर्व समाज सुशिक्षित करण्याचे ध्येय विद्यार्थ्याने आपल्या मनाशी बाळगले पाहिजे. प्रत्येक माणसाला वाचता आले पाहिजे. वाचलेले समजले पाहिजे आणि समजलेले कृतीत आणता आले पाहिजे. प्रत्येक खेड्या-गावातील अज्ञानाचे माळ फोडून तेथे ज्ञानाचे नंदनवन निर्माण करण्याचे काम विद्यार्थ्यांनी स्वीकारले पाहिजे. राष्ट्रीय अैक्याच्या बलवत्तर धाग्याने सर्वांची मने बांधली पाहिजेत. तरच आपण स्वातंत्र्य-प्राप्तीच्या वेळी देशाच्या विकासाचे जे मनोरथ बाळगले होते ते सिद्धीस जातील. अशा राष्ट्रीय वृत्तीच्या सिद्धीने देश संपन्न करण्याचा संकल्प तुम्ही केला पाहिजे.

असा शिक्षक पाहिजे

शिक्षक हा नव्या पिढीचा शिल्पकार असतो. आपल्या उक्तीवर व कृतीवर एकवाक्यतेचा अंकुश लावून तो नव्या पिढीची जडण-घडण करीत असतो. चारित्र्य आणि पावित्र्य या द्वयीच्या आधाराने तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देत असतो. सेवा, सहानुभूती आणि सुसंस्कार या त्रयीवर त्याची प्रगाढ निष्ठा असते. अशा शिक्ष-

काचा समाजात गौरवही होतो. परंतु दुर्दैवाने आज असेही चित्र दिसू लागले आहे की, शिक्षक व्यक्तिगत स्वार्थासाठी लाचारी पत्करू लागला आहे. मग असा शिक्षक समाजपरिवर्तनाचे कार्य कसा करणार? हाच अेक गंभीर प्रश्न मला अनेकदा भेडसावित असतो. यासाठी छात्रनिष्ठ, ज्ञाननिष्ठ, समाजनिष्ठ आणि आत्मनिष्ठ असा शिक्षक विद्यार्थ्यांचे पुढे जेव्हा उभा राहील तो सुदिनच समजावयास पाहिजे.

प्रा. रा. तु. भगत यानी आपल्या "महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव" या ग्रंथात शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक, शिस्त,अभ्यासक्रम अित्यादी शिक्षणाशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचा मोठा मार्मिक परामर्श घेतलेला आहे. आजचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक याना हा ग्रंथ दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल असा मला आत्मविश्वास वाटतो.

नाईट कॉलेज ऑफ् आर्टस्, कोल्हापूर
दिनांक २४-९-१९७१

बलसंवर्धन हाच धर्म

मिरज येथील भानुताळीम संस्थेच्या सुवर्ण महोत्सवप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी तरुण पिढीला उद्देशून काढलेले उद्‌गार.

मिरज येथील भानु तालीम संस्थेचे कार्य गेली शंभर वर्षे अखंडपणे चाललेले आहे ही गौरवास्पद गोष्ट आहे. कोणत्याही शिक्षण संस्थेचे कार्य हे नदीसारखे अखंड चालणारे असेच असते. ज्याप्रमाणे नदी आपल्या काठावरील लोकाचे जीवन समृद्ध करते त्याप्रमाणे या शिक्षण संस्थाही लोकाचे बौद्धिक जीवन समृद्ध करतात. आपली संस्था लोकांचे शारीरिक जीवन समृद्ध करण्यासाठी शंभर वर्षे झटत आहे. खरे पाहता शरीर धड असेल तरच सर्व काही धड राहील आणि म्हणून गेली शंभर वर्षे लोकांचे शारीरिक जीवन समृद्ध करण्यासाठी आपल्या संस्थेने बांधलेली ही सामाजिक पूजा खरोखरच स्तुत्य आहे.

आज "धर्म" या शब्दाची व्याख्या व्यक्तिपरत्वे व स्थानपरत्वे बदलत असली तरी आजच्या तरूण पिढीने "बल संवर्धन" हाच धर्म मानावा. "शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्" या संस्कृत

पंक्तीचा अर्थही आम्हास 'बल संवर्धना'चे महत्त्व सांगतो. आज आर्थिक कुचंबणा थांबविण्यासाठी आपल्या देशाला अधिक धान्योत्पादनाची जितकी गरज आहे, तितकीच किंवहुना त्यापेक्षाही अधिक निकड तरूण पिढीचे बलसंवर्धन करण्याची आहे. बलसंवर्धनच मन संवर्धनाचे प्रधान साधन आहे. बलवान शरीरामध्ये वास करणारे मनदेखील बलवानच असते. यासाठी खऱ्या अर्थाने भारत जर बलशाली व्हावयाचा असेल तर आजचा तरुण पहिल्यांदा सुदृढ झाला पाहिजे. कारण कोणत्याही राष्ट्राच्या संरक्षणासाठी शेवटी बलवान पिढीच उपयोगी पडते. तुम्ही ज्या हातात शस्त्र धरणार आहात तो हातच जर बलवान नसेल तर तेथे मन काय करेल ?

एक माणूस : एक किल्ला

मित्रहो, ! आपणास स्वातंत्र्य मिळून आज बावीस वर्षे झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या तख्तावर कोणी राजा किंवा बादशहा आला नसून चाळीस कोटी जनतेच्या स्वाभिमानाचे, द्योतक म्हणून आपण या तख्ताकडे पाहतो आहे. हे तख्त अनेक देशभक्तांच्या रक्ताने न्हाऊन निघालेले आहे. आणि म्हणूनच आज हे तख्त आपल्या स्वातंत्र्याचे, स्वाभिमानाचे व लोकशाहीचे प्रतिक आहे. कोणताही देशभक्तीने भारावलेला माणूसच अशा तख्ताचे रक्षण करेल. आपल्यातून देशभक्तीच्या भावनेने फुललेली मने आणि मनगटे त्यावेळी पुढे सरसावतील. आपल्या देशातील प्रत्येक "माणूस" एक 'किल्ला' बनेल. आणि आज माझ्यापुढे असलेला प्रत्येक तरुण एक किल्ला बनला पाहिजे. यासाठी पहिल्यांदा तुमच्या-आमच्या मनामध्येच निश्चयाचे व निर्धाराचे दुर्ग निर्माण झाले पाहिजेत. स्वातंत्र्योत्तर भारतात भानुतालमीसारख्या अनेक संस्थांनी मनुष्याच्या मनामध्ये निर्धाराचे दुर्ग निर्माण करण्याचे कार्य केले आहे, ही गोष्ट त्या संस्थांना अभिमानास्पद अशीच आहे. देशाच्या प्रगतीचा कणा शाबूत ठेवण्यासाठी भानु तालीम या संस्थेने जे प्रयत्न गेली शंभर वर्षे चालू ठेवले आहेत ते स्तुत्य आहेत.

जे 'माणूस' बनविते ते शिक्षण

शासन 'प्रत्येक जिल्ह्याला एक स्टेडियम बांधणार आहे' या घोषणेचे मी स्वागत करतो. देशात जिल्ह्यापासून तालुक्यापर्यंत आणि तालुक्यापासून गावापर्यंत अनेक तालमी आणि क्रिडांगणे तयार झाली पाहिजेत, राष्ट्रीय ऐक्याचे संवर्धन करण्यासाठी क्रिडांगणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. सद्‌गुण, ऐक्य, बल आणि प्रेम यांचा पहिला पाठ क्रिडांगणावर मिळतो. परस्पर-द्वेष-भावनेच्या भिंती क्रिडांगणावर आल्यावरच ढासळून पडतात. धर्म, जात, वंश व वर्ण विसरून 'आपण सारे एक आहोत' ही भावना क्रिडांगणावरच वाढीस लागते.

आपला देश स्वतंत्र होऊन वीस वर्षे झाली पण आपण अजून शिक्षणाची पद्धती नक्की केली नाही या गोष्टीचे मला दुःख वाटते. स्वातंत्र्योत्तर कालातदेखील भारत पाश्चात्य शिक्षणाचाच चष्मा वापरत आहे. लॉर्ड मेकॉलेप्रणित शिक्षणाची चौकटच आजपावेतो आम्ही वापरीत आहोत. त्यामुळे आमचे शिक्षण वाळूत चोच खुपसून बसलेल्या शहामृगासारखे वाटते. आजचा शैक्षणिक आकृतिबंध भोवळ येऊन कोपऱ्यात पडलेल्या माणसासारखा वाटतो. कारण आजच्या शिक्षणातून माणसाला 'माणूस' बनवावयाचा आहे. 'समर्थ माणूस' बनवावयाचा आहे याचाच विसर पडलेला आहे. बलशाली माणूस बनविण्यासाठी आजची शैक्षणिक चौकट निरुपयोगी ठरलेली आहे.

क्रीडांगण : राष्ट्रीय ऐक्याचे संवर्धन केंद्र

स्वातंत्र्यपूर्व कालापासून बलसंवर्धनासाठी भानुतालीम संस्थेने जे प्रयत्न चालू ठेवले आहेत त्या प्रयत्नांची दिशा स्वातंत्र्योत्तर कालखंडात बदलावी लागेल. आजच्या मरगळलेल्या तरूणाला विधायक कार्याच्या दिशा दाखविणे आवश्यक आहे. स्वतंत्र भारताचे खऱ्या अर्थाने भूषण ठरतील असे तरुण निर्माण करणे जरूर आहे. यासाठी भानुतालीम संस्थेने शारीरिक शिक्षणात आधुनिक साधन-सामुग्रीची

भर टाकली पाहिजे आणि सामान्य युवकांच्या जीवनातदेखील या गोष्टीपासून लाभ होईल हा दृष्टिकोन ठेवला पाहिजे. तरच ही भानुतालीम संस्था भारताचे भूषण ठरेल. क्रीडा ही मनुष्याची एक सहजप्रवृत्ती आहे. मनुष्याच्या सर्व सहजप्रवृत्तीचा विकास करणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे. म्हणून विद्यार्थी घडविण्याचे कार्य क्रीडांगणावरच खऱ्या अर्थाने होईल असे मला वाटते. परस्पर द्वेष, वैर आणि अनीती यांची जळमटे नष्ट करण्याचे एक आदर्श ठिकाण म्हणून मी क्रीडांगणाकडे पहात आलो आहे. निरोगी शरीराची बांधणी क्रीडांगणावर होते व निरोगी मनाची बांधणी शाळेत होते. निरोगी शरीरात निरोगी मन वास करीत असते. परंतु केवळ शरीरसौष्ठवासाठी खेळांची गरज आहे असे नाही. ज्या क्रीडांगणावर खेळत असताना जय-पराजयाकडे पाहण्याची आपली दृष्टी खिलाडू-वृत्तीची असते, तेथेच मनुष्य खऱ्या अर्थाने घडला जात असतो. असा मनुष्यच लोकशाहीसाठी उपयुक्त ठरतो. लोकशाहीसाठी सुदृढ व सुजाण नागरिक तयार करणे हेच क्रीडांगणाचे खरे कार्य आहे. राष्ट्रीय ऐक्याचे संवर्धन करण्याचे पहिले ठिकाण म्हणजे क्रीडांगण ! क्रीडांगणावर मिळणारे न्याय, नीति, शील प्रामाणिकपणा व सुसंस्कृतपणा याचे शिक्षण आपण कधीच विसरत नाही. म्हणून क्रीडांगणावरच मानवी जीवनाची खरीखुरी जडण-घडण होत असते. अशी जडण-घडण करण्याचे काम भानुतालीम गेली शंभर वर्षे करीत आहे ही गौरवास्पद गोष्ट आहे. या संस्थेच्या कार्याला मी सुयश चिंतितो.

मिरज,
दिनांक १२-६-१९७०

मला काय त्याचे ?

कोल्हापूर येथील "नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स" मध्ये आयोजित केलेल्या भारतीय स्वातंत्र्य रौप्य महोत्सव समारंभाचे वेळी विद्यार्थ्यांना उद्देशून दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी केलेले भाषण.

आपल्या देशाला स्वराज्य मिळाल्यानंतर तुमच्या आमच्या आशा-आकांक्षा वाढलेल्या आहेत. लोकशाही राज्यात समाजातील सामाजिक न्याय योग्य रितीने प्रस्थापित व्हावा असे सर्वत्र बोलले जाते. परंतु ते कृतीमध्ये किती उतरले आहे हा आजचा खरा प्रश्न आहे. देशाच्या आशा-आकांक्षाची पूर्ती करण्याच्या हेतूने सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी सर्व प्रथम संस्कारीत मनुष्य निर्माण केला पाहिजे. संस्कारीत माणूस घडविणेचे काम शिक्षणाद्वारे होते म्हणून आपल्या सर्व आशा-आकाक्षांच्या पूर्तीसाठी माणूस घडविणाऱ्या साधनाची-शिक्षणाची प्रथम पुनर्रचना करणे परमावश्यक आहे.

कालबाह्य शिक्षण

५० वर्षापूर्वी आपल्या देशात राज्यशाही होती. परकीय सत्तेच्या पाशात आपला देश जखडलेला होता. त्यावेळी उत्तम लेखनिक तयार करणे हे शिक्षणाचे ध्येय होते. आता आपला देश स्वतंत्र झाला आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवून लोकशाही राज्य निर्माण झाले आहे. आता अिंग्रजी भाषा शिक्षण हे वाघीणीच्या दुधाअितके महाग नसून शेळीच्या दुधाअितके स्वस्त झाले आहे. अशा वेळी लोकशाहीप्रधान देशात आदर्श नागरिकांची बांधणी करण्याच्या दृष्ठीकोनातून शिक्षणाची फेर आखणी करण्याची नितांत गरज आहे. पुरोगामी स्वरूपाच्या भारतीय सामाजिक गरजा लक्षात घेऊन सध्याच्या शिक्षणपद्धतीत बदल करण्याचा कार्यक्रम आखण्यासाठी सर्व पक्षीय संघटना, शिक्षण तज्ञ आणि विद्यार्थी यानी अेकत्र बसून विचार करण्याची वेळ आली आहे, असे मला वाटते. कारण प्रचलित शिक्षण व्यवस्था ही आता कालबाह्य झाली असून सध्याच्या प्रगत तांत्रिक व वैज्ञानिक युगात तरूणांना आपली योग्य ती भूमिका बजावण्यास समर्थ करण्याच्या दृष्टीने ही शिक्षण व्यवस्था अयोग्य आहे हे आता कोणीही नाकबूल करणार नाही. कारण सध्याचा शिक्षणक्रम आणि सुशिक्षित बेकारांची संख्या पाहिली म्हणजे या तरूणांचे पुढे काय होणार आहे याची खूपच चिंता वाटते. यासाठी शिक्षणाद्वारे या तरूणांच्या पुढे काही विधायक कार्यक्रम आखून देवून तरूणाना चांगल्या कामी गुंतविण्याची आवश्यकता आहे.

देशाचे आधारस्तंभ

आज समाजामध्ये जी वैफल्याची भावना दिसून येते, स्वार्थी व संधीसाधुंची जी धावपळ दिसते. त्यामध्ये स्वाभिमानशून्यता व लाचारी आढळून येते, श्रम न करता जगण्याची प्रवृत्ती दिसून येते, तिचे प्रथम मूळ शोधले पाहिजे. स्वार्थीपणा, स्वाभिमानशून्यता व संधीसाधुपणा हे भारतीय पुरूषाला जडलेले विकार आहेत. या विकारामुळे देशाचा विकास साधणे जड होत चाललेले आहे. तरुण लोक म्हणजे देशाची प्रचंड शक्ती आहे. या शक्तीला वरील विकासापासून दूर ठेवण्याची नितांत गरज आहे. ही गरज भागविण्यासाठी तरूणांना निकोप शिक्षण द्यावे लागेल. कारण आपल्या देशाचे खरे आधारस्तंभ हे आजचे तरूणच आहेत. रक्त सांडून मिळविलेला देश होतकरू निरिच्छ व सेवाभावी तरूणांच्याच हाती पडला पाहिजे. या गोष्टीची काळजी करण्याची वेळ आली आहे.

स्वराज्याचे सोने करा

विद्यार्थी मित्रहो, ही गोष्ट आज तुमच्या पुढे मुद्दाम सांगत आहे याचे कारण ती तरूणांनाच सांगितली पाहिजे.आज तुमच्याच खांद्यावर स्वराज्याचे सोने करण्याची जबाबदारी आहे. या स्वराज्य प्राप्तीसाठी जेवढे प्रयत्न केले गेले त्याहून अधिक प्रयत्न या स्वराज्याचे रामराज्य करण्यासाठी करावे लागतील. आपणास स्वातंत्र्य मिळाले खरे परंतु स्वातंत्र्य प्राप्तीने दोन महत्त्वाच्या घटना या खंडप्राय देशात घडल्या. पहिली घटना म्हणजे भारत देश एक झाला आणि दुसरी घटना म्हणजे समान कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले. या पूर्वी भारत एक होता पण तो केवळ भौगोलिकदृष्टचा. अनेक राज्यांची राज्ये येथे नांदत होती. परंतु एकत्त्वाची लाभलेली संधी खऱ्या अर्थाने गेल्या २०–२२ वर्षात आपण घेतली नाही. क्षुद्र प्रादेशिक वाद आपल्या देशात उभे राहिले. आणि मनोमनी आपले एकत्त्व भंग पावत निघाले. परंतु परचक्रासारखे एखादे संकट उभे राहिले की मग आसेतुहिमाचल आपण एक बनतो आणि ही अशी एकता कायम टिकविल्याशिवाय स्वराज्याचे सोने होईल असे वाटत नाही. आणि म्हणून स्वातंत्र्यासाठी झालेल्या ४२ च्या लढ्यात ज्या भावना भारतीय जनतेच्या मनात होत्या त्याच भावना आता पुनश्च मनात बाळगून तुम्ही कामाला लागा. भोगोलिकदृष्टचा एक झालेला भारत अद्याप मनाने एक झाला नसला तरी तशी प्रक्रिया मात्र चालू आहे. तुम्ही तरुण विद्यार्थ्यानी ही प्रक्रिया स्वाभिमानाने पूर्ण करण्याचे काम करावे असे माझे कळ–कळीचे सांगणे आहे.

स्वतंत्र भारतात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यानी आपला स्वाभिमान जागृत ठेऊन निर्भय झाले तर स्वातंत्र्य मिळविण्यामागील सर्व हेतू साध्य झाल्याशिवाय राहाणार नाहीत असे मला वाटते. आजच्या काळात दिसणारी भयावह सामाजिक स्थिती ही तुमच्या स्वाभिमानी वृत्तीमुळे नष्ट होईल. परंतु आज सर्वात मोठी भयावह गोष्ट ही आहे की स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लोकशाहीत वावरणारे आपण हे आपले राज्य आहे हे विसरून " मला काय त्याचे ? " या

वृत्तीने वागत आहोत ही गोष्ट दु:खदायक आहे. या सर्व गोष्टींची जाणीव ठेऊन माझ्यासमोर बसलेल्या विद्यार्थीबांधवानी स्वतंत्र झालेल्या लोकशाही राज्याचे सुराज्य करण्याच्या दृष्टीने अंत:र्मुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे. आज स्वातंत्र्यमहोत्सवाच्या वेळी हे विचार आपल्यापुढे ठेवण्यास जरी उशीर झाला असला तरी अजूनही वेळ गेली नाही, असे समजून तुम्ही तुमचे काम चालू ठेवावे असे मला वाटते.

कोल्हापूर,
दिनांक २२-८-१९७२

वैद्यकीय शिक्षण : समस्या व उपाय

(अखिल भारतीय विद्यार्थी परिषद शाखा इचलकरंजीच्या वतीने सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी अध्यक्ष या नात्याने दे. भ. रत्नाप्पा कुंभार यानी उपस्थित विद्यार्थ्यांना उद्देशून केलेले भाषण.)

मित्रहो, आज माझ्यासमोर बसलेली तुम्ही तरुण मंडळी आमच्या भारताचे आधारस्तंभ आहात. आपणाकडे पाहिले म्हणजे मला पुन: एकदा तरुण व्हावेसे वाटते. त्याचा अर्थ मी म्हातारा झालो आहे असे नाही. या तरुण पिढीसमोर भारतीय संस्कृतीला वारसा देण्याची कामगिरी अद्याप चालूच आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशामध्ये समाज विकासाची एक लाटच निर्माण झाली. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपण अनेक योजना आखल्या. परंतु नवी पिढी घडविण्याच्या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्राकडे आपला कानाडोळा झाल्यामुळे आज समाजात स्थैर्य, शांतता, समता व समाधान निर्माण होवू शकलेले नाही. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्यें चिंता करावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याचे कारण माणसाचा मानसिक विकास ज्या प्रमाणात साधला गेला पाहिजे तो साधलेला गेला नाही. त्याच्या मनाची बांधणी चांगली झाली नाही. तो खऱ्या अर्थाने सुसंस्कारीत व चारित्र्यसंपन्न झाला नाही आणि म्हणूनच खऱ्या विकासासाठी संस्कार-पूर्ण व चारित्र्य-संपन्न समाजनिर्मितीचा ध्यास घेतलेली तरुण पिढी आज पुढे आली

पाहिजे. तेव्हाच राष्ट्रीय बाण्याचा व सामर्थ्यशील समाज निर्माण होईल असा मला आत्मविश्वास वाटतो.

आजचा विद्यार्थी : आक्षेप व निराकरण

दुय्यम शिक्षणापासून उच्चय शिक्षणापर्यन्त ज्या अनेक समस्या आहेत त्यामध्ये आजचा विद्यार्थीच ही एक समस्या आहे. अशी अनेकांची धारणा आहे. कारण आजच्या विद्यार्थ्यावर अनेक दोषारोप केले जातात. उदा. आजचा विद्यार्थी नियमितपणे शाळा कॉलेजात येत नाही. अभ्यासही करीत नाही. शिस्त पाळत नाही व कधीकधी परिक्षेलाही बसत नाही. याहिपेक्षा तो परिक्षाच नको म्हणतो. त्यासाठी प्राचार्य व कुलगुरू यानाही घेराओ घालतो. शाळा कॉलेजे ओस पाडतो आणि अशा दोषारोपांचा मूलभूत शोध घेऊन त्यांचा तपशिलवार बोध मांडणे प्रथमदर्शनी वाटते तेवढे सरळ, सोपे व साधे काम नाही. कारण शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी हा त्रिकोण लाल-त्रिकोणापेक्षाही भयावह वाटतो आहे. विविध विषयांची गाईडस्, खाजगी वर्गाची भरमसाट वाढ, खाजगी वर्गामध्ये टिचभर जागेत बसून जीवांचे कान करून ज्ञान संपादन करणारा विद्यार्थी पाहिला म्हणजे असे वाटते कीं, आजच्या शिक्षण व्यवस्थेत कुठेतरी, काही तरी चुकत आहे. मग ही शिक्षण पद्धती रोगट आहे का शिक्षकाला विषय ज्ञान नाही, का विद्यार्थीवर्गच उदासीन आहे हे तपासून पाहाणे क्रमप्राप्तच आहे.

राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणारा शिक्षणक्रम पाहिजे, आपल्या विषयात तज्ञ व रस घेऊन शिकविणारा शिक्षक पाहिजे व याचा फायदा घेऊन आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढविणारा विद्यार्थी पाहिजे, एवढ्या सोप्या शब्दात विद्यार्थ्याच्यावरील आक्षेपांचे निराकरण करणे सोपे आहे असे मला वाटत नाही. जेथे समाजपुरुषाच्या अुदरी अनेक रोग असताना केवळ उदरावर मलमपट्टी करून रोगाचे मूळ नाहीसे करता येत नाही तसेच काहींसे या शिक्षण क्षेत्रात घडत आहे असे मला वाटते. आम्हाला शारीरिक विकासासाठी जशी सकस अन्नाची गरज आहे तशी मानसिक विकासासाठी सकस शिक्षणाची

गरज आहे. तेव्हां आम्हाला सकस शिक्षण द्या, शिक्षणानंतर व्यवसाय द्या असा आग्रह धरणारा विद्यार्थी कोठे चुकतो आहे असे वाटत नाही. विद्यार्थी ही एक प्रचंड शक्ती असल्यामुळे या शक्तीचा तोल सांभाळणारे शिक्षण आज जर दिले गेले नाही तर या शक्तीचा केव्हा आणि कसा स्फोट होईल हे सांगता येणार नाही.

दुराग्रहाचा दृष्टीकोन

शिक्षण क्षेत्रातील विविध शाखाच्या रोगाचे मूळ मी शोधत बसणार नाही परंतु ज्या शिक्षणाचा सेवाभावाशी निकटचा संबंध असतो तो सेवाभावच संपुष्टात येत असेल तर ते शिक्षण दुर्धर रोगाने पछाडले आहे असेच म्हणावे लागेल. मानवी व्याधीवर उपाय शोधणारे वैद्यकीय शिक्षणच अशा दुर्धर रोगाने व्यापले आहे. मानवी जीवन स्वास्थ्यप्रद करण्यासाठी धडपडणाऱ्या वैद्यकीय शिक्षणात लुबाडणुकीला पारावार राहिला नाही हे कटु सत्य सांगताना भयंकर दुःख वाटते.

शुद्ध आयुर्वेदिक आणि आधुनिक ओलोपेथिक वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत आपल्या देशात आणि महाराष्ट्रात बराच विचार व चर्चा होवून आतापर्यन्त निरनिराळ्या शैक्षणिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या जुन्या व नव्या वैद्यकीय पद्धतीचा चांगला मेळ बसविण्याचाही प्रयत्न होत आला आहे. शुद्ध आयुर्वेदिक, आधुनिक ऑलोपॅथिक आणि अितर वैद्यकीय, पद्धतीमध्ये कांही चांगले गुण आहेत. परंतु या पद्धतीचा स्वीकार एकांगीपणे करून वैद्यकीय सुविधा चांगल्यातऱ्हेने निर्माण करून देता येणे कठीण जाते. आधुनिक पद्धतीची रासायनिक खते वापरून पीक चांगले निघते परंतु जुनी शेणखतासारखी खते वापरून जमीनीचा पोत राखावा लागतो. त्याचप्रमाणें आधुनिक ऑलोपेथिक वैद्यकीय पद्धतीने निरनिराळ्या रोगावर झटपट अिलाज करता येतो. परंतु शुद्ध आयुर्वेद पद्धतीने कायम स्वरूपाची प्रकृतीमध्ये सुधारणा करता येते. खरे पाहाता पद्धत कोणती आहे याला विशेष महत्त्व नाही तर

त्या पद्धतीमध्ये विशेष गुणधर्म कोणते आहेत यालाच विशेष महत्त्व आहे आणि म्हणून निरनिराळ्या पद्धतीमधील चांगले गुण एकत्र करून लोकाना वैद्यकीय सुविधा निर्माण करून देण्याचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. वैद्यकीय व्यवस्थेच्या बाबतीत कोणत्याही पद्धतीवर अेकांगीपणाचा व दुराग्रहाचा दृष्टीकोन हिताचा होणार नाही असे मला वाटते.

वैद्य : समाजाचे शत्रू

भारतीय पातळीवरील या प्रश्नावर महाराष्ट्रात वरीच चर्चा झाली. तज्ञांची मते घेण्यात आली. निरनिराळ्या समित्याही नेमण्यात आल्या आणि महाराष्ट्रात बी. ए. एम. अँड अेस. या वैद्यकीय अिंटिग्रेटेड कोर्सचा अवलंबही करण्यात आला. या कोर्सचे फलीत बऱ्याच अंशी चांगले निघाले. या कोर्समध्ये शिकून तयार झालेले डॉक्टर्स समाजाला उपयुक्त ठरू लागले. या कोर्समधून तयार झालेले सुमारे सात हजार डॉक्टर्स सध्या महाराष्ट्रात प्रॅक्टीस करीत आहेत आणि त्यांचा समाजाला चांगला उपयोगही होत आहे.

परंतु आतां प्रश्न निर्माण झाला आहे तो एम. बी. बी. एस. डॉक्टर्स आणि हे बी. ए. एम. अँड एस. डॉक्टर्स यांच्या नोकरीतील परस्परांच्या स्थानाबाबत. यामध्ये कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ असा हा वाद निर्माण झाला आणि दोघानाही सारखेच स्थान असावे असा आग्रह बी. ए. एम. अँड एस. डॉक्टर्सनी धरला. त्यानी आपली मागणी मान्य करून घेण्यासाठी संपही केले आणि या सर्व घटनेतून पुनः एकदा बी. ए. एम. अँड एस. हे अिंटिग्रेटेड वैद्यकीय कोर्सेस चालू ठेवावेत की न ठेवावेत यासंबंधी चर्चा चालू झाली. याच वेळेला शुद्ध आयुर्वेदिक पद्धतीच्या एकांगीपणाने आग्रह धरणाऱ्या लोकानी उठाव केला आणि दुर्दैवाने बी. ए. एम. अँड एस. हा चांगला अिंटिग्रेटेड कोर्स बंद करण्यांत आला व शुद्ध आयुर्वेदिक कोर्स चालू झाला.

मित्रहो, या नव्या घटनेतून निर्माण झालेल्या शुद्ध आयुर्वेदिक कोर्सकडे विद्यार्थी आकर्षित होईनासे झाले, त्यामुळे शुद्ध आयुर्वेदिक

संस्थाच्या मार्गामध्यें अनेक अडचणी आल्या. त्यावरोबरच विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी निरनिराळ्या अवैध मार्गाचा अवलंब करण्यास सुरवात झाली आणि मराठी भाषेत ज्याला "वैदू" म्हटले जाते असे वैदू तयार होऊ लागले आहेत. अशा वैदू लोकांचा अडचणीत सापडलेल्या गरीब जनतेला त्याच्या आजारपणात काय त्रास होतो, ते कसे लुटले जातात आणि त्यांच्या जीवाला कसे धोके होतात, त्यांचे सविस्तर वर्णन करण्याची गरज नाही. कारण या सर्व गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट दिसून आलेल्या आहेत आणि येत पण आहेत.

चांगल्या गुणांचा परिपोष व्हावा

आपल्या देशात शुद्ध आयुर्वेदिक वैद्यकीय पद्धतीमधील चांगल्या गुणांचा परिपोष करण्याची आवश्यकता आहे, आणि या चांगल्या गुणांचा मेळ अॅलोपॅथेकि वैद्यकीय मधील चांगल्या गुणाशी तितक्याच चांगल्या पद्धतीने घालणे आवश्यक आहे. आपला देश मोठा आहे. आज अेम. बी. बी. अेस. झालेला डॉक्टर देश सोडून परदेशात धंदा थाटण्यासाठी जात आहे. त्यांच्यावर करण्यात आलेला खर्च अितका अमाप आहे की, त्यातून देशाचे भले होणे बाजूलाच राहिले असून देशाची आज त्यामुळे नापत झाली आहे. आपला समाज गरीब आहे, अडाणी आहे आणि म्हणून व्यापक स्वरूपात आवश्यक त्या प्रमाणात भारतीय जनतेला वैद्यकीय सुविधा निर्माण करून देण्याची आवश्यकता आहे.

आज आपण दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरवात केलीत. ही सुरवात मला फार मोठी औचित्यपूर्ण वाटली. येथे संत्कारमूर्ती म्हणून आलेल्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी हे ज्ञानदीप भारताच्या कानाकोपऱ्यात अगदी खेडेगावीसुद्धा घरोघरी पोचवावयाचे आहेत याची दखल घेणे जरूर आहे. माध्यमिक व महाविद्यालयीन परिक्षेत सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे पण आज या प्रसंगी मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

इचलकरंजी,
दिनांक : ११-८-१९७३

आधी कळस मग पाया

नागपूर येथे विदर्भ - खाजगी प्राथमिक शिक्षक संघाच्या परिषदेच्या समारोप समारंभाचे वेळी शिक्षकाना उद्देशून दे.भ. रत्नाप्पा कुंभार यानी केलेले भाषण

शिक्षक बंधुनो, " पंतोजी " चे युग संपून " सरांचे " युग सुरू झाले आहे. " छडी लागे छमछम " संपले असून छडीला अर्धचंद्र मिळाला आहे. आमच्या शैक्षणिक कालात साऱ्या गावाचा व्यवहार पंतोजी पाहात असे. आजचा शिक्षक विद्यार्थ्यांशी भीतीपोटी सौजन्याने वागतो तर आमच्या काळात पंतोजीना पाहिल्यावर पोटात गोळा उठावयाचा. परिस्थितीनुरूप शिक्षणामध्ये बदल झाला असला तरी आज शिक्षक आणि विद्यार्थी यांचा संबंध कर्तव्यापुरताच जवळचा राहिला आहे. त्यात आत्मियता व मनासारखी निकटता राहिलेली नाही. तसे असले तरी शिक्षक हा समाजाचा अेक शिल्पकार आहे. शिक्षण प्रक्रियेचा तो आधारस्तंभ आहे. कारण शिक्षकाच्या व्याख्यानातून आणि जीवनातून प्रतिबिंबीत होणाऱ्या प्रेरणापासूनच सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार मिळत असतो. त्यामुळे शिक्षकाच्या जीवनातून व त्यानी दिलेल्या प्रेरणेतून विद्यार्थी आपल्या जीवनाची शिदोरी साठवत असतो. कधी कधी हुषार विद्यार्थी शिक्षकाच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांच्या अंतरिक विचारांचे मनन करण्याचाही प्रयत्न करीत असतो. त्यामुळे शिक्षकाच्या अंतरबाह्य जीवनधारणेचा ठसा नेहमी विद्या-

थ्यांच्या मनावर उमटत असतो. म्हणून जो शिक्षक तोंडाने शिकवितो अेक आणि मनाने वागतो वेगळाच अशा शिक्षकास मी काय म्हणावे ?

शिक्षक : समाज परिवर्तनाची अेक शक्ती

माणसे घडविणारी शिक्षकांची पिढी ही समाजपरिवर्तनाची अेक जबरदस्त शक्ती आहे. शिक्षणातून सामान्य माणसाना परंपरेच्या जीवघेण्या चौकटीतून बाहेर काढण्यासाठी, लाचार जीवनावद्दल तिटकारा निर्माण करण्यासाठी, स्वार्थी दबावाला भीक न घालण्यासाठी, स्वाभिमानाने आपली मान उंच ठेवण्यासाठी, स्वतःच्या भाग्याचा स्वतःच शिल्पकार होण्यासाठी आणि शिक्षणातून एक सिद्ध व समर्थ " माणूस " निर्माण करण्यासाठी आजच्या शिक्षकावर फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. अलिकडील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा जरा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येईल की आज विद्यार्थ्यांच्यापुढे नैतिक, वैचारिक आणि सांस्कृतिक वारसा घेऊन उभे राहणारे उद्दात्त व्यक्तीमत्त्वच नाही. ज्यांच्यापासून आदर्श घ्यावेत, बौद्धिक नेतृत्त्वाचे पाठ शिकावेत, मूल्यामापनाची ओळख करून घ्यावी व आपल्या जीवनाची बैठक तयार करून घ्यावी असे व्यक्तिमत्वच आज दुर्मिळ झाले आहे. असे मला तीव्रतेने वाटू लागले आहे. आणि म्हणून आजच्या समाजात जर का शिक्षकाची हेटाळणी सुरू असेल तर त्याला जबाबदार तो शिक्षकच आहे. शिक्षकाने आपला दर्जा ओळखून तो कसा जपावा याचाच विचार करण्याची आता वेळ आली आहे असे मला वाटते.

आजचे शिक्षण हीच आजची समस्या

शिक्षणातून एक समर्थ मनुष्य घडवायचा असतो. शिक्षणातून आदर्श जीवनाच्या कसोट्यांचे माणसास आकलन करून द्यावयाचे असते. शिक्षण हे जीवनाच्या समस्त समस्या सोडविण्याचे एक प्रधान साधन असते. परंतु आमच्या लोकशाहीच्या राज्यात शिक्षण हीच एक समस्या वनून राहिली आहे. लोकशाही जीवननिष्ठा उराशी बाळगून जगणाऱ्या भारतासारख्या राष्ट्राला कशा प्रकारचे शिक्षण पाहिजे

याचे गेली २२ वर्षे आम्हाला आकलन झाले नाही. लॉर्ड मेकॉलेप्रणीत शिक्षणपद्धतीची पकड आजही ढिली झाली नाही असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. आपला देश सन १९४७ साली स्वतंत्र झाल्यापासून लोकशाही मार्गाने समाजवादी समाजरचनेकडे जावयाचे ठरल्यापासून शिक्षणासारख्या बलवत्तर साधनामध्ये अजून आम्ही बदल का घडवून आणू शकलो नाही? स्वातंत्र्योत्तर काळातही शैक्षणिक श्वेतपत्रिका व आयोगाचे अहवालही बाहेर पडले. परंतु त्यांच्या अंमलबजावणीचा शोध आणि बोध किती घेतला गेला? आज स्वतंत्र भारतात दिले जात असलेले शिक्षण, लाचार बनत असलेले शिक्षक, आपल्या पुढे आदर्श शोधण्यासाठी आंदोलन करणारे विद्यार्थी पाहिले की असे वाटते की आणखी आमच्या शिक्षणाची किती हेंडसाळ होणार आहे! लोकशाही राज्यातील शिक्षणाची ही समस्या सोडविण्यासाठी शिक्षणाचे सरकारीकरण करावे हा तोडगा अनेकजण सुचवतात परंतु मला असे वाटते कीं, शिक्षण खाजगी क्षेत्रात राहिले काय किंवा त्याचे सरकारीकरण झाले काय या दोन्हीही स्थितीमध्ये शिक्षणाची सूत्रे माणसाकडेच राहणार आहेत. हेच आपण विसरून जातो. स्वयंप्रेरणेने व कर्तबगारीने लोकशाही जशी सबल आणि समर्थ होते तशी शिक्षण प्रक्रियाही स्वयंप्रेरणेने व कर्तबगारीने काम करणाऱ्या शिक्षकाच्या बळावर अवलंबून असते. लोकशाही जीवननिष्ठांची जोपासना करणारे असे आम्हाला शिक्षण पाहिजे. त्यासाठी सरकारी आणि खाजगी क्षेत्रात नित्य नवे प्रयोग करून लोकशाहीची बीजे पेरण्यासाठी जनमनाची भूमिका आपण तयार ठेविली पाहिजे.

आधी कळस मग पाया केव्हां ?

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या शासनाने पंचवार्षिक योजनावर अनेक कोटी रुपये खर्च केले आहेत. समाजाची आर्थिक स्थिती चांगली सुधारावी अशीही शासनाची अपेक्षा आहे. परंतु सामाजिक समता किंवा आर्थिक सुस्थिती याची प्रत्यक्ष अनुभूती प्रत्येकाच्या जीवनात येण्यासाठी व लोकशाहीचा खरा अर्थ समजण्यासाठी समाजाच्या मनाची बांधणी करण्याचा प्रयत्न अद्याप पूर्ण झालेला नाही.

लोकशाहीला अनुकूल अशी चारित्र्य निर्मिती आणि समाजरचनेला अनुरूप अशी मनोरचना करण्याचे काम अद्याप चालू आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये माणसाची मनोरचना करण्याचे काम बालवाडीसारख्या शैक्षणिक कार्यांतून करता येईल अशी माझी ठाम समजूत आहे. लोकशाही राज्यासाठी कशा प्रकारचा "माणूस" आम्हाला पाहिजे ते ठरवून बालवाडीतच बालमनावर योग्य ते संस्कार करता येतील. त्यासाठी प्रत्येक वस्तीत बालवाडी असली पाहिजे ही गोष्ट आता झोपडपट्टीतील रहिवाशीदेखील कबूल करू लागले आहेत. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात अनेक शाळा आणि महाविद्यालये काढण्यात आली. परंतु समाजाचे दारीद्र्य आणि अज्ञान दूर करून संस्कारक्षम शिक्षण देणाऱ्या बालवाडयांच्याकडे कोणीच लक्ष दिले नाही. आपल्या देशात शैक्षणिक विस्ताराचा सुन्दर कळस कदाचित निर्माण केला असेल परंतु त्या शिक्षण मंदिराचा पाया मात्र भक्कम केला गेला नाही अशी आजची अवस्था आहे.


श्रम हीच पूजा

वैयक्तिकदृष्टया शीलसंपन्न, चारित्र्यवान, सुसंस्कृत आणि समाजाला उपयोगी असा नागरिक तयार करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. यासाठी पालकानी आपली मुले शाळेत पाठविली की कार्यभाग संपला असे न मानता आपल्या मुलाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे तो समाजाला कितपत उपयोगी पडेल हे पण पाहिले पाहिजे. परंतु आपल्या देशात शैक्षणिक बाबतीत निर्माण झालेल्या निरुत्साही वातावरणाचा कानोसा घेतला तर असे दिसून येईल की सध्याच्या शिक्षणक्रमातून समाजोपयोगी तरुण बाहेर पडेनासा झाला आहे. आजच्या सुशिक्षित बेकार तरूणांची संख्या पाहिली म्हणजे असे वाटते की या तरूणांचे पुढे काय होणार आहे? ही चिंता दूर करावयाची असेल तर शिक्षण आणि जीवन याचा कुठेतरी मेळ घातला पाहिजे. जीवनासाठी शिक्षण आहे याचाच आपणास विसर पडत चालला आहे. त्यामुळे शिक्षणात श्रमाची प्रतिष्ठा राहिलेली नाही. शिक्षणात श्रमाच्या प्रतिष्ठेची जपणूक जेव्हा केली जाईल तेव्हा राष्ट्रीय ऐक्याची

भावनाही बळावेल. त्यासाठी आजच्या शिक्षणात श्रमाची आराधना कशी करता येईल हे पाहून "श्रम हीच पूजा" हा मनोभाव वाढीस लावण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे असे मला वाटते. आणि आज या दृष्टीकोनातून शैक्षणिक कार्याची फेर आखणी झाली पाहिजे.

नदीसारख्या सतत वाहणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे तुम्ही सर्व शिक्षक निर्माते आहात आणि म्हणून तुम्ही जो विद्यार्थी तयार कराल त्यास वर्तमान काळापुढे केवळ उभा करून तुमची जबाबदारी संपणार नाही. तर वर्तमान काळातील समस्या लोकशाही मार्गाने कशा सोडवाव्यात या गोष्टीची एक दृष्टीही तुम्हाला देता आली पाहिजे. यासाठी शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून समर्थ विद्यार्थी तुम्ही कसा निर्माण करू शकाल याकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे. तेव्हा आपल्याकडून विद्यार्थ्याला व समाजाला नक्की काय हवे आहे हे तुम्हाला ओळखता आले पाहिजे. हे जर आपण ओळखू शकला नाही तर कोणतीही शिक्षण योजना पूर्ण करणे दुरापास्त होईल. याच संदर्भात महात्मा गांधीनी "कितीही किंमत द्यावी लागो परंतु आपल्या मुलासाठी उत्तम शिक्षक मिळविता आला पाहिजे." या वाक्यातील बोध तुम्ही घेतला पाहिजे. कारण शिक्षकाचा व्यवसाय हा कारखान्यात काम करणाऱ्या मजूरासारखा नसून असंख्य विद्यार्थ्यांच्या मनाला तो स्पर्श करून त्यांची मने प्रफुल्लीत करणारा व मनगटे बळकट करणारा असा व्यवसाय आहे. हे पक्के लक्षात ठेवले पाहिजे. शिक्षण हा जरी तुमचा व्यवसाय असला तरी तो तरूणांची मने बांधण्याचा व्यवसाय समजून हळूवारपणाने तो हाताळण्याची अत्यंत जरूर आहे. शिक्षकांच्या संघटनेमधून या गोष्टीचा प्रचार व प्रसार होण्याची जरूर आहे. या शिक्षक परिषदेच्या समारोप समारंभास हजर राहून तुमच्याशी मला हितगुज करावयास मिळाले म्हणून मी स्वतःला धन्य समजतो.

नागपूर,
दिनांक २५-१-१९७१




REFBK-0020921